म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०५७



REFBK-0024327

प्रमोद नवलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

31 OCT 1984
1 NOV 1984
21 NOV 1984
28 NOV 1984
13 JAN 1985
10 FEB 1985
24 FEB 1985
6 MAR 1985
10 MAR 1985
5 MAY 1985
17 JUL 1985
31 JUL 1985
3 DEC. 1985
11 DEC 1986

(क्र. मा. प.)
५०००-१२-८२


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3046
दा. क्र. 27.324
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मनोवेध—मनोवेध—मनोवेध—मनोवेध—मनोवेध—

# मनोवेध

( 'मार्मिक' मधील निवडक आठवणींचा तिसरा संग्रह )

प्रमोद नवलकर


REFBK-0024327

रविराज प्रकाशन / पुण

प्रकाशक
रवि बेहेरे
रविराज प्रकाशन
४५८/२ सदाशिव पेठ,
टिळक पथ, पुणे ४११ ०३०

©
प्रमोद नवलकर

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

प्रथमावृत्ती
१३ ऑगस्ट १९८४

मूल्य
तीस रुपये

मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

संदर्भ निबंध
३०५७
२४३२७
२५४८

ज्या ज्या लहानथोरांनी
आपल्या भल्याबुऱ्या स्पर्शाने
माझ्या जीवनाला आकार देऊन
या आठवणी शृंगारल्या
त्या त्या साऱ्या
ज्ञात अज्ञात सुहृदांना
सादर समर्पण

# पु. लं. चे आशीर्वाद

श्री. पु. ल. देशपांडे म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत ! महाराष्ट्राच्या साहित्य, संगीत आणि कलाक्षेत्रातील एकही गाभारा नसेल की, जेथे पु. लंनी वाहिलेल्या प्रतिभासुमनांचा सुगंध दरवळत नाही. महाराष्ट्र सारस्वताने भारावलेल्या त्या मांगल्यमय गाभाऱ्यात बसून या पुजाऱ्याने आपली माणुसकीने ओथंबलेली तपश्चर्या नादब्रह्मी टाळी लावून अखंड चालू ठेवली आहे, ज्याचे हात देवापर्यंत पोहोचत नाहीत तो पुजाऱ्याच्या हाती भक्तिभावाने फुले देतो. त्याच भावनेने माझ्या नव्या पुस्तकाची पहिली प्रत मी भारावलेल्या मनाने पु. लंच्या कडे पाठवीत असतो. 'आठवणी' आणि 'संवेदना' ही दोन पुस्तके मिळताच देवापुढे वाहिलेली फुले आशीर्वाद म्हणून परत द्यावीत, त्याप्रमाणे पु. लंनी मला मनोवेध घेणाऱ्या शब्दांनी गुंफलेली पत्रे पाठविली. इतर कुणाच्याही औपचारिक प्रस्तावनेपेक्षा पु. लंच्या त्या आशीर्वादाचे बोल अमोलिक असल्याने त्याच नमनाने मी माझ्या या 'मनोवेध' पुस्तकाची सुरुवात करीत आहे.

३१ मार्च १९८०

प्रिय प्रमोद नवलकर,

सुमारे महिनाभराच्या गैरहजेरीनंतर शनिवारी पुण्यात परतलो. कालचा दिवस डॉक्टरकी स्वीकारण्याचा समारंभ वगैरे गडबडीत गेला. गेल्या महिन्यात आलेली पत्रे आज वाचावयास बसलो. त्यात सर्वात वर तुमची पुस्तकाची भेट आणि त्यात तुमचे पत्र होते. समोर महिन्याभराच्या पत्रांचा गठ्ठा होता. ते काम संपवायचे असा निश्चय करून बसलो होतो. पण नवीन पुस्तक हा माझ्या इतर सर्व कामाचा

शत्रू आहे. प्रथम तुमचे पुस्तक वाचून संपवले आणि तुम्हाला पत्र लिहायला घेतले. बाकीची पत्रोत्तरे उद्यावर टाकली — आणि हो, तुमची यापूर्वीचीही पुस्तके मी वाचली. तुम्हाला भेटलो त्यावेळी मोठ्या ऐटीत तुमच्यावरोबर अंधारी मुंबई पहायचे कबूल केले होते. पण तुमची पुस्तके वाचल्यावर हादरून गेलो. गुन्हेगारीच्या ज्वाला-मुखीवर ही महानगरी वसली आहे असे वाटले. 'आठवणी' हे तुमचे पुस्तक मात्र तुम्ही पत्रात लिहिल्याप्रमाणे खरोखरीच निराळे आहे. काही वर्षांपूर्वी माझ्या वाचनात एक सुरेख वाक्य आले होते. 'इतर तुमच्याविषयी काय म्हणतात यापेक्षा तुम्ही इतरांविषयी काय म्हणता यावरून तुमच्या मनाचा लहानमोठेपणा कळतो..' अशा अर्थाचे ते इंग्रजी वाक्य होते. तुमचे पुस्तक वाचताना मला त्या वाक्याची राहून राहून आठवण झाली. प्रतिस्पर्ध्यांनासुद्धा तुम्हीं सहृदयतेने समजून घेण्याचा जो त्यात प्रयत्न केला आहे, त्यांचे तुम्हाला जाणवलेले गुण तुम्ही ज्या सद्भावनेने व्यक्त केले आहेत ते मला खूप मोलाचे वाटले. निरनिराळ्या सामाजिक संघर्षात प्राप्त परिस्थितीनुरूप तुम्हाला आग्रही भूमिका घ्यावी लागली, विरोधकावर तुटून पडावे लागले. एक सार्वजनिक आणि राजकीय प्रश्नांशी संबंध असलेला 'कार्यकर्ता' ही भूमिका वठवावी लागली. ती वठवताना तुम्ही तुमच्यातला सहृदय माणूस गमावून बसला नाही. विनोदबुद्धी हरवू दिली नाही. वृत्तीच्या विरोधाचे व्यक्तीच्या विरोधात रूपांतर होऊ दिले नाही. खेळातल्या प्रतिस्पर्ध्यावर तुटून पडावे तसे तुटून पडलात. सत्तेच्या राजकारणात आक्रमक वृत्तीचे आसुरी वृत्तीत रूपांतर होणे किती साहजिक असते हे तुम्हाला मी सांगायला नको. तुमचे व्यक्तिमत्व तुम्ही त्या वृत्तीने

जगवू दिले नाही याचा प्रत्यय तुमच्या ह्या पुस्तकाने आला. तुमच्या पुस्तकातल्या 'वेळ' या लेखात "–माझ्यासारख्या मवाळ प्रकृतीच्या–" ह्या शब्दांनी केलेली सुरुवात वाचून मात्र मी चाट झालो. तुमच्या प्रकृतीला आणि तुम्ही करीत असलेल्या साहसांना मवाळ म्हणायचे तर 'जहाल' शब्दाचे काय व्हायचे ? मनाचा 'मवाळ' पणा गमावू न देता केलेल्या जहाल साहसांना खरा अर्थ आहे हे मात्र खरेच आहे–– तुमच्या लेखनकार्याला २५ वर्षे झाल्याचा तुम्ही उल्लेख केला आहे. तुमचा जीवन चौफेर पाहण्याचा उत्साह अनेक वर्षे टिकून राहो ही इच्छा व्यक्त करतो.

तुमचा

**पु. ल. देशपांडे**

३–४–८४

प्रिय प्रमोद नवलकर,

तुमचं 'संवेदना' हे पुस्तक मिळून आज एक महिना झाला. यापूर्वीच पोच पाठवायला हवी होती. पुस्तक वाचल्यावर पत्र पाठवायचे ठरवले आणि या ना त्या कारणांनी उशीर झाला. त्याबद्दल प्रथम क्षमा मागतो.

पुस्तकाच्या भेटीबद्दल मनःपूर्वक आभार. तुमचं पुस्तक किंवा एकूण लिखाण वाचणं हे तुमचं बोलणं ऐकण्यासारखं असतं. जवळ काही सांगण्यासारखं असतं त्यावेळीच लिहीणं हे सहज बोलल्यासारखं होतं. एरवी शब्दांचे प्रदर्शन मांडल्यासारखं होतं.

राजकीय धकाधकीत राहूनही तुम्ही माणसाला सुहृदय बनवणाऱ्या

संवेदना बधिर होऊ दिल्या नाहीत. तुमच्या सार्वजनिक जीवनात आणि आवडत्या भटकंतीत साऱ्या जीवनाचा उबग यावा किंवा माणसांचे काहीतरी चांगले होईल, काही मानसिक परिवर्तन होईल यावरचा विश्वासच उडावा असे तुम्हाला असंख्य अनुभव येऊनही तुम्ही ह्या मनुष्य समाजात काहीतरी चांगलं घडेल यावर श्रद्धा ठेवली आहे. मनाला बधिर होऊ दिले नाही याचा प्रत्यय तुमचे लेख वाचताना येतो. हे सारे तुमच्या मनाच्या कंपनातून उमटलेले नाद आहेत. त्यामुळे त्या नादातून व्यक्त होणाऱ्या मताशी सहमत होण्यापेक्षा त्यातल्या प्रामाणिकपणाला अधिक महत्त्व आहे. तुमच्या मनाच्या तारा नाना कारणानी जशा झंकारल्या तशाच नादात तुमच्या हातून कागदावर त्या उतरल्या आहेत. तऱ्हेतऱ्हेचे अनुभव आहेत. असे नाना प्रकारचे अनुभव घेत हिंडणं हा तर तुमचा आवडता छंद आहे. तुमची सर्वच साहित्य निर्मिती ह्या छंदातूनच झालेली आहे. राजकारणाच्या क्षेत्रात किंवा खरं म्हणायचं तर सत्तास्पर्धेच्या बाजारात वावरताना संवेदनाशील मनाला निराशेनं ग्रासून टाकणं अपरिहार्य आहे. पण त्या बाजारातून अशा प्रकारच्या साहित्यनिर्मितीसाठी का होईना पण घटकाभर 'आपला संवाद आपणाशी करायला बाहेर पडणं आणि कागदावर आपलं मन मोकळं करणं आवश्यक आहे. तुम्ही अशा प्रकारचा संवाद चालू ठेवलाय याचा मला खूप आनंद झाला. पुस्तकाच्या भेटीबद्दल पुन्हा एकदा मनःपूर्वक धन्यवाद.

तुमचा

**पु. ल. देशपांडे**

# प्रार्थना

मार्मिकमधून दर आठवड्याच्या प्रसिद्ध होत असलेल्या आठवड्याच्या आठवणीतील निवडक लघुनिबंधांचा हा तिसरा निबंधसंग्रह. अशा प्रकारच्या निबंधात्मक स्वरूपाचे लेखन आणि तेही सातत्याने माझ्याकडून होईल असे मला कदापी वाटले नव्हते. अशा लेखनासाठी माणूस स्वप्नाळू असावा लागतो आणि त्याला तेवढी फुरसतही असावी लागते. त्या दोनही गोष्टींचा माझ्या ठायी संपूर्ण अभाव आहे. तरीही नकळत अव्याहतपणे गेली पाच वर्षे माझ्या लेखणीतून या आठवणी उतरत राहिल्या आहेत, त्याच्या प्रारंभीचे श्रेयच द्यायचे झाले तर ते मार्मिककार बाळासाहेब आणि श्रीकांतभाईंना द्यावे लागेल. मार्मिकसाठी तुम्ही एखादे सदर लिहिलेच पाहिजे या त्यांच्या आज्ञेचे पालन करूनच मी या आठवणीचा श्रीगणेशा सुरू केला. आतापर्यंत मी केलेले लिखाण जरी विपुल होते तरी त्याचे स्वरूप संपूर्ण वेगळे आणि संघर्षात्मक होते. शिवाय साहित्यातील कोणत्याही इतर प्रकारापेक्षा लघुनिबंधाचे लेखन अवघड असते याचीही मला जाणीव होती. नियतकालिकात एखादे सदर सुरू करणे जेवढे सोपे असते तेवढेच ते अखंडपणे चालू ठेवणे अवघड असते. याचा अनुभव जरी घेतला होता तरीही मी हे सदर सुरू केले याचे कारण विद्यार्थी असताना मला खरोखरच पाठ्यपुस्तकातील निबंध आवडत असत. त्यामुळे लहानपणापासूनच माझी लघुनिबंधकार अनंत काणेकरांच्यांवर भक्ती जडली होती.

या आठवणी लिहायला सुरुवात केली आणि काही काळातच मला अलिबाबाच्या गुहेप्रमाणे माझ्या जीवनातील आठवणींची गुहा सापडली

लेखनाच्या ठराविक चाकोरीतून बाहेर पडून आपणही वेगळ्या पद्धतीचे लेखन करू शकतो हा आत्मविश्वास माझ्यात निर्माण झाला आणि परिस्थिती अशी निर्माण झाली की, आठवणींचा अभाव निर्माण होण्याऐवजी आठवणींसाठी आठवडे कमी भासू लागले. डोंगरातील खडकाला भेगा पाडणे अवघड असते. पण तो खडक फोडताना एखादा झरा लागला की त्या झऱ्याला खडकही थांबवू शकत नाही तशी आज माझी परिस्थिती झाली असून आठवड्याच्या आठवणीशिवाय मलाही आज चैन पडत नाही. माणसाचे प्रत्येक जीवन म्हणजे भल्याबुऱ्या आठवणींचा एक बहुमोल संग्रह असतो. मात्र त्या आठवणींचा आनंद उपभोगण्याचे भाग्य फार थोड्यांना लाभते मार्मिकमधील सदरामुळे ते भाग्य माझ्या वाट्याला आले आहे.

माझ्या जीवनात या आठवणींचे महत्त्व फक्त लेखनापुरते मर्यादित राहिले नसून ती आता माझी आठवड्याची प्रार्थना झाली आहे. प्रार्थनेसाठी माणसाला अंतर्मुख होऊन विकारमुक्त व्हावे लागते. मनाचे बंध मोकळे सोडावे लागतात, सत्य तेच उच्चारावे लागते. आठवणी लिहीत असताना मी खरोखरीच माझ्या मनाच्या कोंडमाऱ्यातून मोकळा होतो आणि त्यांतून मला जो आनंद होतो तोच माझा ब्रह्मानंद असतो. त्या आनंदाला शब्दरूप देणे शक्य नाही.

परमेश्वराने माणसाची शरीररचनाच अशी केली आहे की ज्यामुळे माणसाला दुसऱ्याच्या चेहऱ्यावरील सौंदर्यबिंदू अथवा कलंक पहाता येतो पण त्याला स्वतःच्या चेहऱ्यावरचे मात्र अवलोकन करता येत नाही. मग तो आपल्यातील जाणीवा आणि उणीवा निरखण्यासाठी

समाजाचा आरसा समोर धरतो. पण तोच आरसा माणसाला आयुष्यभर फसवत रहातो.

माझ्या आठवणींनी मला स्वतःकडे पहाण्याची नजर दिली आणि त्याच्याबरोबर दुसऱ्याकडे पहाण्याच्या नजरेतील पूर्वदूषित मोतिबिंदूही काढून टाकले.

म्हणूनच या आठवणी म्हणजे दुसऱ्याच्या जीवनाविषयी असलेले माझे मनोगत आहेत. त्यासाठी भेटणाऱ्या लहानथोरांच्या मनाचा वेध घेण्याचें व्यसन मला लागले आहे. ते 'मनोगत' च 'मनोवेधा' च्या शालीने आच्छादून मी वाचकांच्या हाती देत आहे.

पण तरीही त्यातील खरी मौल्यवान पाने फक्त दोनच आहेत आणि ती म्हणजे आदरणीय पु. ल. देशपांडेंची पत्रे. 'आठवणी' नंतर त्यांचे पहिले पत्र आले आणि भारावून मी 'संवेदना' हा दुसरा संग्रह प्रसिद्ध केला, पु. लं. चे दुसरे पत्र आले आणि आज मी 'मनोवेध' प्रसिद्ध करीत आहे. ही दोन्ही पत्रे मी माझ्या देव्हाऱ्यात पोथीच्या बाजूस ठेवली आहेत. एवढे सांगितल्यावर पु. लं. च्या विषयी माझ्या भावना वेगळ्या शब्दात व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. हा संग्रह रविराज प्रकाशनच्या रवि बेहेरेंनी मेहनतपूर्वक प्रसिद्ध केला आहे. पु. लं. च्याच पुण्यनगरीत तो प्रकाशित होतोय हाही मी एक शुभयोग समजतो. या साऱ्या भाग्यवंतांचा सहवास हेच माझ्या जीवनाचे सर्वस्व आहे. आणि त्या सर्वस्वासाठी हे जीवन आहे...

प्रमोद नवलकर

# अनुक्रम


बाथरूम / १
वार्धक्य / ६
विनोद / १०
सिलसिला / १५
फोटो / १९
मस्तान / २३
स्मशानयात्रा / २७
बजेट / ३१
व्यसन / ३६
प्रतिमा / ४०
खर्च / ४५
पार्टी / ५०
बाबुराव / ५५
पोषाख / ५९
चाळा / ६४
इंग्रजी / ६८
समाजवादी / ७२
मलींची विक्री / ७६
जातीय दंगे / ८१
कविता / ८७
दारू / ९२
वेस्ट इंडिज / ९६
टमरेल / १०१
रुपारेल / १०५
नोकरी / ११०
हसा आणि हसवा / ११५
संदेश / ११९
वेषांतर / १२४
प्रवास / १२८
वेश्या / १३२
बचत / १३७
इंजिन / १४२
सखाराम / १४६
अज्ञान / १५१
प्रकाशन / १५६
पाणी / १६०
आगाऊ / १६४
शोध / १६८
विस्मरण / १७२
वहिनींचे घर / १७६
चेहरा / १८०
पोपट / १८४
सत्कार / १८९
बडबड / १९४




# बाथरूम

माणसाच्या जीवनात कोणत्या गोष्टीला केव्हा आणि कसे महत्त्व येईल हे सांगता येत नाही. गेल्याच महिन्यात मी टमरेल नावाची एक आठवण लिहिली होती. घरात संडास नसल्याने शेजाऱ्याच्या घरावर हाती टमरेल घेऊन जावे लागते याची गिरगावातील आजच्या पिढीला लाज वाटत असते, असे चिकित्सकचे प्रिन्सिपॉल नायर यांनी गिरगाव बचाव परिषदेत सांगितल्यानंतर मी ती आठवण लिहिली होती. वाचकांनी वाटल्यास आजची आठवण त्याच आठवणीचा उत्तरार्ध मानावा. इंग्रजी शब्दांचे अर्थही कधी कधी नकळत बदलत असतात मी लहान होतो तेव्हा संडास आणि बाथरूम हे दोन वेगवेगळे शब्द होते. चाळीतील जागा म्हणजे बाथरूम आत आणि संडास बाहेर असे आम्ही म्हणत असू, पण कालांतराने 'बाथरूम' या शब्दाचा अर्थ संडास आणि बाथरूम एकत्र असा झाला. बेडरूम वीथ अटॅच्ड बाथरूम म्हटले म्हणजे संडास त्यातच आला. आता काही लोक तर बाथरूम ऐवजी फक्त 'बाथ' एवढाच शब्द वापरू लागले. आता 'बाथ' या इंग्रजी शब्दाचा अर्थ आंघोळ एवढाच होतो. पण आता टू बेडरूम्स वीथ अटॅच्ड बाथ असे म्हटले की त्यातच आंघोळीची जागा आणि संडासही आहे असे गृहीत धरून चालतात. चाळीत रहाणाऱ्या माझ्या वाचकांना या अर्थशून्य वडबडीचा बोध होणार नाही. कारण त्यांची

झोपायची जागा, स्वयंपाकाची जागा, जेवणाची जागा, आंघोळींची जागा आणि दिवाणखाना हे सर्व एकाच खोलीत सामावलेले असते. पण तरीही चाळीवाल्यांनी या आठवणीकडे दुर्लक्ष करू नये. कारण गिरगावातील चाळीत दादरच्या सेल्फ कंटेन्ड ब्लॉकमधील सून रहायला आली तर केवळ अटॅच्ड बाथ नाही म्हणून ती परत माहेरी गेल्याची दोन उदाहरणे मला माहीत आहेत.

एक काळ असा होता की त्यावेळी सुसंस्कृत माणसाच्या घरात, मग ते घर कितीही लहान असो, देव्हारा आवश्यक ठरत होता. पण काळ असा भयानक बदलला की आता देव्हाऱ्याची जागा संडासयुक्त बाथरूमने घेतली. या बाथरूमविषयीही आज प्रचलित असलेल्या कल्पना मोठ्या विलक्षण आहेत. बाथरूमचे महत्त्व दिवसेदिवस प्रचंड वाढले आहे. अर्थात हे सगळे पैसेवाल्यांचे खेळ आहेत. त्यांना बाथरूमही कमीतकमी दहा बाय दहाची हवी असते. त्यात मोठ्या फ्लॅटमध्ये तर फक्त बाथरूम सजविण्यावर लाख लाख रुपये खर्च करतात. काही चैनी लोक तर आपला रिकामा वेळ बाथरूममध्येच शॉवरखाली किंवा बाथरूममध्ये बसून घालवितात. तसा बाथरूमचा उपयोग नाना प्रकारे होतो. नको असलेल्या पाहुण्यांना टाळण्यासाठी बाथरूममध्ये लपता येते. आपल्या मंत्र्यांचे आणि बाथरूमचे काय नाते आहे कोणास ठाऊक, पण केव्हांही फोन करा 'साहेब बाथरूममध्ये आहेत' असे उत्तर मिळते. पूर्वी आमचे आजोबा कोणाला टाळण्यासाठी 'पूजेला बसलेत सांग' असे सांगत. यायरून माझे 'देवघराची जागा बाथरूमने घेतली' हे विधान किती सत्य आहे ते पटते. याशिवाय असलेले बाथरूमचे उपयोग खाजगी असल्याने समजण्यासारखे नाहीत आणि सांगण्यासारखेही नाहीत. कारण मालासिन्हाच्या बाथरूमचे छत फोडल्यावर त्यात लाखो रूपयांचा काळा पैसा सापडला.

असो. आज मला बाथरूमची आठवण झाली ती एका वेगळ्याच कारणामुळे. गेल्या आठवड्यात राजा पाटलांच्या रौप्य महोत्सवात मला बोलायला बोलावले होते. नाही म्हटले तरी मी अर्ध्या जगाचा प्रवास केलेला आहे. म्हणून मी माझ्या प्रवासातील अनुभवावर

बोलावे अशी त्यांची अपेक्षा होती. पण मी बोललो भलतेच. माझ्या जगातील प्रवासात मी पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांच्याऐवजी मी बापरलेल्या बाथरूमवर बोललो. मला छळणाऱ्या बाथरूमवर या-पूर्वीच केव्हातरी भ्रमंतीत लिहिले आहे. आज फक्त त्या आठवणींना उजाळा द्यायचा एवढेच. विश्वास ठेवा अगर ठेऊ नका पण मी खरे सांगतो. वाचकहो, जगाच्या प्रवासाला निघताना मला कधी ना विमा-नाची भीती वाटली, ना तेथील परिस्थितीला घाबरलो. पण मला एकाच गोष्टीची भीती वाटते आणि ती म्हणजे हॉटेलमधील बाथरूमची.

त्या बाथरूमच्या भीतीमुळे मी प्रवासात कधीच शांतपणे झोपू शकलो नाही. त्याला अनेक कारणे आहेत. माझ्या बाजूच्या खोलीतील प्रवासी नेमका मध्यरात्री बाथरूममध्ये का जातो ते समजत नाही. त्याची बाथरूम स्वतंत्र असल्याने मला तक्रार करण्याचे कारण नव्हते. पण दोन खोल्यांतील भित साऊंड प्रुफ नसल्याने तो संडासाची साखळी खेचतो तेव्हा मी खडबडून जागा होतो. मोडलेल्या झोपेबद्दल मला काही वाटत नाही. पण त्या बाथरूममधील नळाच्या चाव्या आणि माझे कधीच पटले नाही. लंडनमधील बाथरूममध्ये गेलो तेव्हा जोर काढूनही नळाची गोलाकार चावी फिरेना. शेवटी फोन करून रूम–बॉयला बोलावले. त्याने ती चावी फिरवण्याऐवजी वरून दाबताच नळाला पाणी आले, तेव्हा मला कळले की पाश्चात्य देशात नळाची चावी फिरवायची नसते. दाबायची असते. म्हणून पॅरिसच्या बाथरूममध्ये शिरल्यावरोबर आत्मविश्वासाने नळ दाबला पण पाणी येईना. माझे डोके भणाणले. नळावर हात दाबून घेतला. हाताला घट्टे पडले. पण पाण्याला माझी दया आली नाही. हॉटेल-मध्ये पाणीच नसावे म्हणून मी मॅनेजरला झाडला. त्याने तावडतोब रूमबॉयला पाठवले. मी माझा सगळा राग त्यांच्यावर काढायचे ठरवले होते. तो बाथरूममध्ये शिरला आणि . त्याने नळाची चावी दाबण्याऐवजी अलगत वर उचलली आणि पाण्याची धार लागली. तेव्हा मला कळले की पाश्चात्य देशात नळाची चावी दाबली गेली नाही तर ती वर उचलायची. बाथरूमविषयी हे सर्व ज्ञान प्राप्त

झाल्यावर माझ्या मनातील भीती निघून गेली आणि मी वेस्ट जर्मनीला गेलो. प्रवासात थकवा आल्यामुळे कधी रूममध्ये जातो आणि वॉश घेतो असे मला झाले होते. म्हणून रूममध्ये शिरताच बॅग खाली ठेवली पण वाथरूममध्ये पाऊल टाकताच मला जबरदस्त धक्का बसला. क्षणभर ती वाथरूम माझ्या भोंवती गरगर फिरतेय असे वाटले. कारण त्या वॉश बेसीनला नळ होता पण चावीच नव्हती. माझी स्थिती वेड्यासारखी झाली, आता दाबायचे काय आणि उचलायचे काय तेच समजेना. मी त्या नळाला गुद्देही मारून पाहिले. पण पाण्याचा एकही थेंब आला नाही. रागावण्यात अर्थ नव्हता. मी रूम-वॉयला बोलावले आणि त्याला पण ' वॉटर वॉटर ' असे सांगितले. तो काय चमत्कार करतो हे मला पहायचे होते. तो वॉश बेसीनजवळ उभा राहीला आणि नळातून धो धो पाणी वाहू लागले. तेव्हा उलगडा झाला की वॉश बेसीनच्या खाली जमिनीवर असलेल्या एक नॉव त्याने पायाने दावला होता. मला माहीत असलेला नळाच्या चावीचा तो आणखी एक प्रकार मला माहीत झाला. पण स्वित्झर्लन्डमधील बाथरुमने माझा चांगलाच नक्षा उतरला. तेथे नळाला चावीच नसल्याने मी पाया खालचा खटका शोधू लागलो. पण हाती काही लागेना. सगळी बाथरूम मी ओणव्यानेच चाचपली. एखादी लादीच खटका असेल म्हणून सगळचा लाद्याही दाबल्या. पण काहीच दाबले जाईना. माझी स्थिती भ्रमिष्टासारखी झाली. शेवटी नेहमीप्रमाणे रूम-वॉयला बोलवावेच लागले. तो आला आणि त्याने नळाखाली केवळ हात धरताच त्याच्या ओंजळीत नळातून घळघळ पाणी पडू लागले. त्या नळाला चावी नव्हती आणि खटकाही नव्हता. इलेक्ट्रॉनिकच्या सहाय्याने नळाखाली हात धरताच आपोआप पाणी येण्याची व्यवस्था होती.

प्रवासाचे शेवटचे स्थान होते फ्लॉरेन्स. तेथे मात्र नळाची मिजास चालू द्यायची नाही असे मी ठरविले होते. पण तेथे असलेली नळाची चावी दाबली जाईना आणि उचललीही जाईना. रूम-बॉय आल्यावर तो आता आणखी काय प्रकार करतो ते मी डोळचात प्राण आणून

पाहु लागलों. त्याने नळावरील चावी चक्क भारतीय पद्धतीने फिरविली आणि पाणी आले. मी कपाळाला हात लावला. 'कोण हा घाटी' अशा तुच्छ नजरेने पहात तो रूम–बॉय निघून गेला. मी सुटकेचा निश्वास टाकला आणि दाढी केली. त्यानंतर आंघोळ करायची होती पण माझ्या मागे लागलेली बाथरूमची साडेसाती अद्याप संपलेली नव्हती. परदेशात आंघोळ करायची म्हटली तर टब बाथ किना शॉवर बॉथ याशिवाय तिसरा पर्याय नसतो. त्या बाथरूममध्ये एखादा साधा नळ, बादली आणि तांब्या असत नाही हे मला अद्याप कळलेले नाही. त्यामुळे बाहेरून आल्यावर साधे पाय कसे धुवायचे हा प्रश्न पडतो. आंघोळीसाठी मी टबमधील गरम पाण्याचा नळ उघडला. ते पाणी कढत असल्याने थंड पाण्याचाही नळ उघडला. पण पाणी थंड झाल्याने थंड पाण्याचा नळ बंद केला. पुन्हा ते अधिक गरम झाले तेव्हा थंड पाण्याचा उघडला, ही थंड आणि गरमची नळानळी करून मी वैतागलो आणि शॉवरखाली आंघोळ करायचे ठरवले. पण शॉवरच्या धारीतून पाणी नुसते ठिपकत राहिले. मी जिद्दीने ती जाळी काढली आणि आतील घाण टाचणीने साफ केली.

मी जिंकलो होतो. जाळीतून पाण्याचा मस्त झरा सुरू झाला होता. प्रथमच माझी मनासारखी आंघोळ सुरू झाली. तोंडाला साबू लावला आणि इतक्यात डोक्यावर कोणीतरी अभिताबप्रमाणे प्रहार करावा त्याप्रमाणे मला क्षणभर तिरमिरी आली. शॉबरच्या झारीने बंदुकीच्या गोळीप्रमाणे माझ्या डोक्याचा वेध घेतला होता. शेंडीच्या जागी एक मोठे टेंगुळ आले. एका हाती बॅग आणि दुसऱ्या हाताने टेगुळ सांभाळत मी भारतात परतलो. कस्टम अधिकाऱ्यासमोर पासपोर्ट उघडला. त्यावर लिहिले होते–' शरीरावरील खूण खांद्यावर एक अस्पष्ट तीळ ' आणि––आणि––

–– ' डोक्यावर एक स्पष्ट टेंगूळ ! ! ! '

# वार्धक्य !

रोज सकाळी मी घाईघाईत दाढी करतो. शेवटी तो चाळीचाच कोपरा असल्याने माझ्या घरी हवा आणि उजेड मर्यादितच आहे. त्यामुळे मला सफाचाट आणि मनासारखी दाढी आजपर्यंत करता आली नाही. छोटचाशा आरशात चेहरा नव्हे आकृती बघून अंदाजाने साबूचा फेस लावायचा आणि अंदाजाने फटाफटा रेझर ओढायचा. नंतर दोन गालांवर स्वतःच चापट मारायची. बस ! झाली दाढी. परवा मालवणच्या दौऱ्यावर असताना मात्र मी माझा चेहरा इतका स्वच्छ प्रथमच आरशात पाहिला. सर्कीट हाऊस समुद्र किनाऱ्यावर असल्याने बंगल्यातही लख्ख प्रकाश पडला. माझाच चेहरा ॲडमायर करत मी दाढी करत होतो आणि त्याचवेळी महाकवी प्रमोद नवलकरांची काही गाणीही गुणगुणत होतो. बरे.

दाढी आटोपली मी टावेलाने चेहरा पुसला. आज दाढी मस्त झाली होतो. इतक्यात माझे लक्ष माझ्या कल्ल्यांकडे गेले. गेल्या दहा वर्षात त्या कल्ल्यांची अनेक मापे घेऊन झाली होती. पण आजतागायत मला दोनही कल्ल्यांची लांबी सारखी राखणे कधीच जमलेले नाही. परवा मालवणला मात्र कल्ल्यावरही प्रकाश पडल्यामुळे दोन कल्ल्यांची लांबी अगदी कानाच्या आकाराप्रमाणेच समसमान जमली होती.

ते कल्लेही मी टावेलाने पुसले तेव्हा माझ्या डाव्या कल्ल्यावर

अंदाजे अर्ध्या इंचाचा एक पांढरा ठिपका माझ्या नजरेस पडला. दाढीचा सोप चिकटला असेल म्हणून मी पुन्हा पाणी लावले आणि कल्ला टॉवेलने घासला. पण तो पांढरा ठिपका काही जाईना. पावडर असणे तर शक्यच नव्हते. कारण मी पावडर कधीच लावत नाही. च्यायला, कोणी च्युईगम वगैरे लावले काय म्हणून मी तो कल्ला पुन्हा साबूने घासला आणि टॉवेलाने पुसला. पण तरीही पांढरा ठिपका तसाच. मग मानेचा काटकोन करून महाप्रयासने मी आरशात तो पांढरा ठिपका जवळून पाहिला आणि माझ्या मनात कालवाकालव होऊन मी कासावीस झालो. कारण तो ठिपका वगैरे काही नव्हता तर तेथील केसच पांढरे झाले होते.

मी कमालीचा नर्व्हस झालो. त्या छोटयाशा ठिपक्याने माझ्या तारुण्यावर घाला घातला होता. आतापर्यंत तो मला दिसला नव्हता. पण आता दिसल्यावर नजरेसमोरून जायला तयार नव्हता. कल्ल्यावरील हे पांढरे केस घेऊन जर सभेला गेलो तर मालवणकर काय म्हणतील, शिवसैनिक आपल्या 'तरुण' नेत्याबद्दल काय भावना बाळगतील या विचाराने मी बेचैन झालो. चेहेऱ्यावरील बेचैनी, चित्रविचित्र छटा आरशात पहाता पहाता दहा मिनिटे गेली आणि मी तो पांढरेपणा काढण्याचा निश्चय केला आणि हातात पुन्हा साबू आणि रेझर घेऊन कल्ल्याचा तो भागच खालून छाटून टाकला. समाकार करण्यासाठी उजवा कल्लाही छाटला. तो जरा अधिक छाटला गेल्याने पुन्हा डावा थोडा छाटला आणि पुन्हा मी माझ्या नेहमीच्या भोन्वयात सापडून दोनही कल्ले गमावून बसलो. पण त्याच्या दुःखापेक्षा चेहऱ्यावरील वार्धक्य हटविल्याचे समाधान अधिक होते. पण...

–पण इतक्यात मला भोवळ येण्याचीच वेळ आली. माझे लक्ष मिशीकडे गेले. माझी मिशी मी इतक्या बारकाईने कधीच पाहिली नव्हती. एक, दोन, तीन ... बारा ... पंधरा ... वीस, बावीस-माय गॉड ! माझ्या काळ्याभोर मिशीतही अनेक पांढरे केस उगविले होते. त्यातील फक्त एकच मी उपटण्याचा प्रयत्न केला आणि वेदनेने डोळ्यात टचकन पाणी आल्याने तो नाद सोडला आणि सभेला गेलो....

त्या दिवसापासून माझ्या कल्ल्यातील तो पांढरा ठिपका आणि माझे वार्धक्य मी जेथे जातो तेथे माझा पाठलाग करतो आहे. माझ्या प्रत्येक कृती, प्रत्येक हालचालीत आणि प्रत्येक विचारात माझे आयुष्य आता कोठेतरी पश्चिमेला झुकल्याची जाणीव तीव्रतेने होते आहे. ती जाणीव ओरबाडते आहे, भेडसावते आहे. जे जीवन मी सतत झेपावत जगलो ते वार्धक्याकडे वाटचाल करायला तयार नाही. जे जीवन सतत उन्माद आहे ते जीवन नाद सोडायला तयार नाही. जे जीवन सतत भन्नाट गतीने धावत राहिले त्याला थकवा आता सहन होत नाही. जे थरारत राहिले ते थरथरायला तयार नाही. जे जीवन जागले ते केवळ जगायला तयार नाही. पण....

....पण तरीही ते जीवन आज संपायला तयार नाही. कसं संपवायचे ? २३ तारखेला या जीवनाचे आणखी एक वर्ष संपणार, बाळासाहेबांच्या जीवनाचेही एक वर्ष भूतकाळात खाणार पण तरीही माझी जगण्याची आसक्ती कमी होत नाही. जगणे हवे, पण वार्धक्य नको, आयुष्याची ही तडजोड करायची कशी ? चार वर्षांने पन्नास, साठ.... सत्तर, ऐंशी, अंधत्व, परावलंबित्व, गलितगात्र....माझ्या डोक्यात अशुभ विचारांचा वणवा पेटला आणि त्या वणव्याच्या प्रकाशात माझ्यासारखी असंख्य समदुःखी मला आयुष्याची जड पावले टाकताना दिसू लागली वर्षभरातील आठवणी दाटून आल्या...

मी महिन्यापूर्वी वामनरावांच्याकडे गेलो होतो. वणवण हिंडणारे वामनराव पाय दुखतात म्हणून स्वतःच आपल्या हाताने पायला तेल लावून मालीश करत बसले होते. माझ्या मनाला चटका बसला.

त्यावेळी माझेही पाय नकळत लटपटून वजावाकीची जाणीव झाली. त्यानंतर गेल्या महिन्मात नागपूरला मी आणि मनोहर एका रम्य संध्याकाळी उघड्या रिक्शातून रपेट मारत होतो. बोलता बोलता मनोहर स्तब्ध झाले. त्यांनी आपल्या डाव्या हाताचा पंजा उपडा करून त्यावर उजव्या हाताने चिमटा काढला. चिमटचात आलेले मास थोडा वेळ त्याच आकारात राहिले. त्याकडे बोट दाखवून मनोहर म्हणाले, 'पहा प्रमोदभाई, ही सारी म्हातारपणाची लक्षणे' मला ते

सत्य सहन झाले नाही. मी विषय बदलला. त्याच आठवड्यात आम्ही मोटारीने नागपूरला गेलो सुधीरभाऊ बरोबर असल्याने पंक्चरची काळजी नव्हती. पंक्चर काढण्यात त्यांचा हातखंडा, पण गाडी तिसऱ्यांदा पंक्चर झाली आणि सुधीरभाऊ सहज म्हणाले, 'आता बुवा आपण थकलो' मी तेही वाक्य साठविले. गेल्या आठवड्यात बाळासाहेब स. का. पाटील उद्यानात भाषण करायला आले होते. जाताना माझ्याच मोटारीने मी त्यांना वांद्र्याला सोडले. गाडीत बाळासाहेब सहजतेने म्हणाले, 'सध्या काय होते कोणास ठाऊक प्रमोदभाई, पण भाषण केल्यावर थकवा येतो !' माझ्या मनात चर्र झाले ! तेव्हाही मी विषय बदलला.

म्हणजे आम्ही सारेच कोठेतरी काळाबरोबर प्रवासाला निघालो आहोत. या प्रवासाचा शेवट काही चांगला नाही. पण तरीही प्रवास थांबविणे आमच्या हाती नाही. घड्याळाचे काटे मोडता येतील, कॅलेंडरची पाने फाडता येतील पण....पण रोज पश्चिमेला झुकलेला सूर्य मात्र पूर्वेला वळविता येणार नाही. तसेच माझे पश्चिमेला झुकलेले आयुष्यही आता माघारी वळवता येणार नाही....

# विनोद

विलेपार्ल्यातील लोकमान्य सेवासंघाने विनोदी साहित्य संमेलन आयोजित केले होते. काँग्रेसच्या अधिवेशनात ज्याप्रमाणे त्यांच्याच खास लोकांना आमंत्रण असते त्याप्रमाणे सिलेक्टेड लोकांना आमंत्रण असावे. कारण बाळासाहेब ठाकरेंना आमंत्रण होते पण मला कोणी बोलावले नव्हते. मीही कधी कधी विनोदीं लिहितो हे सिद्ध करण्यासाठी मी रमेश मंत्रीना गाठण्याचा प्रयत्न केला पण तेही मंत्र्यांप्रमाणेच सदैव बाथरूममध्ये असावेत. म्हणून मी दुसऱ्या एका साहित्यिक मित्राला मीही विनोदी साहित्यिक असल्याचे सांगितले. पण त्यावर तो असा चावट हसला की माझा चेहरा खरकन उतरला. पण नंतर मोहन रेळेसारख्या सिद्धहस्त मिस्किल व्यंगचित्काराला‌ही आमंत्रण नसल्याचे कळले. त्यामुळे माझे दुःख थोडे हलके झाले. या संमेलनाला विनोदी मंडळीना वगळण्याचे आयोजकांनी ठरविले असावे अशी मी स्वतःचीच समजूत घातली. त्याला नसाच आधार होता. कारण संमेलनाचे उद्घाटन प्रा. गंगाधर गाडगीळ करणार होते. प्रा. गाडगीळांना मी अद्यापही विनोद करताना किवा विनोदावर हसताना पाहिलेले नाही. कदाचित तसा त्यांचा पां. वा. गाडगीळांशी करार झाला असावा. राजकारणात टी. आर. नरवणे आणि साहित्य क्षेत्रात गंगाधर गाडगीळ ही माणसे सहजासहजी कोणासमोर हसत नाहीत,त्यामुळे

गाडगीळांना उद्घाटनाला बोलावण्याचा विनोद करून संचालकांनी चांगलेच औचित्य साधले.

हसणे हा आता असा एकमेव करमणुकीचा प्रकार राहिला आहे की ज्यावर अद्याप सरकारने कर बसविलेला नाही. त्यामुळे रस्त्यातून अनेक वेडेही वेधडक हसत हसत हिंडत असतात. मी दिवसातून किमान एकदा हसतो. कोणी हसवले तर .वाजवीपेक्षा थोडा अधिकच हसतो. तोही खदखदा हसतो, कारण घसा साफ करण्यासाठी मिठाच्या पाण्याची केवळ चूळ भरून चालत नाही तर गुळणाच करावा लागतो. हसण्याच्या आनंदासाठीही मोठ्यानेच हसायला हवे. हसण्याचे अनेक प्रकार मी यापूर्वीच आठवणीत लिहिले आहेत. गांधींघाटावर जाऊ न शकणारे लोक गांधी जयंतीला ज्याप्रमाणे घरीच चरखा फिरवतात त्याप्रमाणे त्या दिवशी निमंत्रण नसल्यान मी भेटेल त्याला हसवून विनोददिन साजरा करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे जो भेटेल त्याला मी हसवत ठेवले. त्यासाठी खास विनोदाचीही गरज भासली नाही. भेटणाऱ्या प्रत्येक माणसाला जरा 'हसा न, हसा' एवढे जरी म्हटले तरी तो हसायचा. मात्र वज्रेश्वरीच्या नित्यानंद आश्रमातील एक गृहस्थ हसायलाच तयार नव्हते. शेवटी मी त्यांना विचारले की, 'काय हो, एवढे विनोद केले तरीही तुम्ही हसत का नाही ?' त्यावर त्यांनी सांगितले की 'आमच्या गुरूनी आम्हाला सांगितले आहे की आपल्या भावनांचे प्रदर्शन करू नका. म्हणून तुमच्या प्रत्येक विनोदाला मी चेहऱ्यात बदल न करता पोटातल्या पोटात खदखदून हसत होतो.' त्यांच्या त्या खुलाशावर मी सात मजली हसतो पण ते मात्र गंभीर चेहऱ्याने पोटातल्या पोटात हसले असावेत.

मी केवळ हसतच राहिलो तर दिवसातून किमान एका माणसाला हसवतो. हसणे हे टॉनिक असून नियमितपणे घेत जा हा गुरुमंत्र मला कॉलेजमध्ये असताना विठ्ठलराव गाडगीळांनी दिला. कमी हसणे हे अनेकजण प्रतिष्ठेचे लक्षण मानतात. इतकेच नव्हे तर मोठ्याने हसणे हेदेखील मॅनर्स नसल्याचे लक्षण मानले जाते. त्यामुळे वकिलातीच्या अनेक पार्टर्या युनोच्या आमसभेप्रमाणे स्मित हास्यातच पार पडतांत.

म्हणून असल्या पाटर्चांच्या आसपासही मी फिरकत नाही. जी माणसे मिस्किल असतात त्यांना नेहमी भेटावेसे वाटते. आमच्या जातीत मोतीराम नवलकर नावाचे एक गृहस्थ होऊन गेले. बनाम हॉल लेन-मधील एका इमारतीच्या तळमजल्यावर ते रहात होते. घराच्या ओटचावर त्यांनी आयुष्यभर जणू हसण्याचा लिलावच मांडला होता. कोणीही जावे, दोन मिनिटे हसावे आणि बाहेर पडावे असे ते एक विनोदाचे दुकान होते. व्यासपीठावर वाघाप्रमाणे गर्जना करणारे बाळासाहेब ठाकरे बैठकीत कमालीचे मिस्किल हसतात हे त्यांना भेटणाऱ्यांनाच कळते. गुजराथी कुटुंबात आल्यावरोवर पाहुण्यांपुढे पाण्याचा ग्लास ठेवतात, त्याप्रमाणे बाळासाहेब आलेल्या माणसासमोर हसण्याचा एक पेला ठेवतात. त्यात फिरकी अधीक असते. उदाहरणार्थ एखादा प्रतिष्ठित माणूस भेटायला आला तर बाळासाहेब त्याच्या-कडून ताडदेवच्या अंध शाळेला देणगी देण्यासाठी टी. व्हीं. मागतील. त्यातला विनोद समोरच्या माणसाच्या चटकन लक्षात येत नाही आणि आला तरी एका संघटनेचा सर्वश्रेष्ठ नेता मिस्किल बनतो यावर त्याचा विश्वास नसल्याने तो न हसता गंभीर चेहऱ्याने टी. व्ही. देण्याचे मान्य करतो. मग त्यातून जो हास्यस्फोट होतो त्यावर आरूढ होऊन पुढची बोलणी चालतात.

माणसातील चाणाक्षपणा टिपण्यासाठीही फिरकी विनोदाचा फार मोठा उपयोग होतो कारण तो विनोद पकडण्यासाठी अवधान लागते. मी आणि मनोहर एकदा तळेगावच्या एका बोर्डींगमध्ये भेट द्यायला गेलो होतो. प्रिन्सिपॉलनी पाण्याची अडचण सांगितली. मी याना गंभीर चेहऱ्याने 'गच्चीत विहीर कां नाही बांधत ?' असं विचारले त्यावर तेवढ्याच गंभीर चेहऱ्याने त्यांनी शाळेवर आणखी दोन मजले चढव-णार असल्याचे सांगितले. हसून गुदमरलेल्या मनोहरनी मला धरूनच बोर्डिगबाहेर काढले. या गच्चीतल्या विहीरीबद्दल मी अनेकदा अने-कांनी बोललो पण त्यातील मर्म फार थोड्या लोकांना कळते. फिरकी विनोदाना एक वेगळीच शान असते. एकदा वेळगावहून मी, मनोहर आणि सतीश प्रधान विमानाने परतत होतो. विमानातच मी त्या

ठाण्याच्या महापौरांना विचारले, 'तुम्ही मुंबईला येणार की ठाण्याला उतरणार ?' सतीशनी मुंबईला येऊन बाळासाहेबांना भेटणार असल्याचे सांगितले. माझ्या प्रश्नातील फिरकी सतीशच्या तीस तासांनी ध्यानात आली माणि त्वांनी मला एक गुच्चा मारला.

न हसणाऱ्या माणसाला हसबिण्यासारखे या जगात पुण्यकर्म नाही. पण तेवढे दुसरे अवघड कामही नाही. आमच्या विधान परिषदेत असे अनेक मंत्री आणि आमदार आहेत की जे कधीच हसत नाहीत. मग मी आणि मनोहर वामनरावांना घेऊन त्यांना घेराव घालतो आणि जंगजंग पछाडून थोडे फार हसवतो. काही माणसे अशी असतात की ती निवडक माणसांच्या समोरच हसतात. माधव मला असेच गंभीर वाटायचे पण पसंतीच्या बैठकीत तेही साऱ्या शरीराने हसताना मी पहातो. ही सर्व हसणारी आणि हसवणारी माणसे मी आयुष्यभर पहात आलो आहे. त्यांच्यापैकी कोणालाच विनोदी साहित्य संमेलनाचे आमंत्रण नव्हते. कारण रमेश मंत्री, वसंत सबनीस, बाळासाहेब ठाकरे इत्यादी विनोदी लोकांनी स्वतःचे एक सिंडीकेट केल्याचा मला दाट संशय आहे. या सिंडीकेटमध्ये ते इतरांना सहभागी करून घ्यायला तयार नाहीत. कारण या मंडळीनीच हसत हसत महाराष्ट्राची सत्ता काबीज करण्याचे ठरविले असल्याची आतल्या गोटातील बातमी माझ्या कानावर आली आहे. त्यामुळे इतरांना ते सत्तेत सहभागी करू इच्छित नाहीत. परंतु महाराष्ट्रातील हजारो हसणारी मंडळी मंत्रीची ती मक्तेदारी मोडून काढल्याखेरीज रहाणार नाहीत. आम्हाला डावलून अशा प्रकारे जर मंत्र्यांनी पुन्हा विनोदी साहित्य संमेलन घेण्याचा प्रयत्न केला. तर मला काँग्रेस (स) प्रमाणे विनोदी (प्र) समांतर समेलन भरवावे लागेल. हे जमले नाही तर खदखदा हसणाऱ्यांचा एक विराट विनोदी मोर्चा नेऊन मंत्र्यांचे विलेपार्ल्यातील संमेलन खदखदा हसत उधळून लावावे लागेल.साहित्याच्या प्रांतात अशी गंभीर परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच संमेलनवाल्यांनी आमच्याशी वाटाघाटी करण्यास हसत हसत तयार व्हावे. आमचा समझोता झाल्यास विनोदी जनता त्याचे हसतमुखाने स्वागत करील. तसे जर घडले

नाही तर आम्ही सर्व स्वतःला विनोदी म्हणवून घेणारे साहित्यिक त्या संमेलनाचा तीव्र हास्यास्पद धिक्कार करून विकट हास्य करू हा अखेरचा इषारा देत आहोत.

शेवटी राग बाजूला सारून एका गोष्टीबद्दल याच संयोजकांचे दिलखुलास अभिनंदन करायला हवे दोन ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीच्या मुहूर्तावर हे संमेलन संपन्न झाले. महाराष्ट्र शासनाने तो दिवस 'ड्राय डे' म्हणून जाहीर केला आहे. त्याच दिवशी हे संमेलन आयोजित केल्याने संमेलनास विनोदी साहित्यिक प्रचंड संख्येने उपस्थित होते.–

# सिलसिला

परवा मी माझ्या एका मित्राच्या लग्नाच्या पार्टीला ताजमहाल हॉटेलमध्ये गेलो होतो. जाण्यासाठी मला नेहमीप्रमाणे उशीर झाला. अर्थात उशीरा जाणे ही माझी सवय शाळेपासूनची आहे. ते जाऊ द्या. पण मला पहाताच माझ्या नवविवाहित मित्राने विनोद केला. म्हणाला 'का रे उशीर झाला ? मला वाटले दिलीपकुमारच्या लग्नाला गेलास की काय ? ' त्याने विनोद केल्याने मला हसावेच लागले. सार्वजनिक जीवनात जी अनेक नाटके असतात त्यापैकी हे एक नाटक असते. अनेकदा न समजलेल्या किंवा नसलेल्या विनोदावर मी नाटकी खळाळून हसतो आणि मग उगीचच नाटकी हसलो म्हणून खरोखर हसतो. अशा प्रकारे हसून हसून माझा अनेकदा जबडा दुखू लागतो.

त्या मित्राने दिलीपकुमारच्या लग्नाचा विषय काढल्यावर मला आश्चर्य वाटले कारण त्याचे स्वत:चे लग्न असताना दिलीपकुमारच्या लग्नाची आठवण ठेवणे हे चमत्कारिक होते. पण 'आधी लग्न कोंडाण्याचं' प्रमाणे 'आधी लग्न दिलीपकुमारचे' असे मानणारे वीर पुरुष अद्यापही पृथ्वीतलावर आहेत. अशाच एका माणसाच्या लग्नाला मी आलो होतो. पण त्या बापुडच्या मित्राला का दोष द्या ? कारण या पूर्वीच्या आठवडच्यात आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या आणि प्रचंड खपाच्या आणि त्याचप्रमाणे एका पत्राने नव्हे मित्राने दिलीपकुमारच्या विवाहा-

वर अग्रलेख लिहिले होते. ज्या दिवशी त्यातील एक अग्रलेख आला त्या दिवशी आभाळात नवगह एकत्र येणार होते. मी त्यामुळें कुतुहलने माहितीवजा अग्रलेख असेल म्हणून पेपर उघडला पण त्यात संपादकाने जीव तोडून दिलीपकुमारच्या दुसऱ्या विवाहानंतर आपले ज्वलंत आणि मननीय विचार प्रकट केले होते. त्या विवाहाने प्रथम-पत्नी सायराबानूला जेवढचा यातना झाल्या नसतील तेवढचा त्या संपादकाना झाल्या होत्या.

या सिनेमातील नटनटचा आणि पुढारी यांच्या खाजगी भानगडीत लोक एवढा का रस घेतात आणि लोकांना एवढा वेळ कसा मिळतो याचे मला नेहमी आश्चर्य वाटते. दिलीपकुमारच्या या सिलसिल्या-वर अलिकडे सर्वत्र इतकी चर्चा चालली आहे की जणू या देशात दुसरी झालेली ही पहिलीच शादी असावी. दिलीपकुमारची शादी ही काही आज नवीन विषय नाही. मला आठवते, पंधरा वर्षांपूर्वी जेव्हा त्याने सायराबानूशी लग्न केले तेव्हाही सायरा एका हिंदू नटाशी लग्न करणार होती. पण ते टाळण्यासाठी दिलीपकुमार बोहोल्यावर बाशिंग बांधून चढला असे सगळचा फिल्मीवाल्यांनी लिहिले होते.

या शादीने या देशातील पन्नास कोटी जनता एवढी बेचैन का व्हावी हे शोधण्याचा मी प्रयत्न करतो आहे. दिलीपकुमारलाही त्याचे उत्तर सापडत नाही. अग्रलेख लिहिले गेले आणि तेही आमच्या गोविंद तळवलकर आणि लोकसत्ताच्या विद्याधर गोखल्यांनी म्हणजे हे प्रकरण प्रतिष्ठानपेक्षाही गंभीर असावे असे मानायला हरकत नाही. पण चौकशी करता समजले की सायराबानूने अद्याप या प्रकरणी बांद्रे पोलिसात तक्रार नोंदवलेली नाही, अगर जनमताच्या कानो-श्यात तिचे पत्रही प्रसिद्ध झालेले नाही अद्यापही ती दिलीपबरोबरच पालीहिलला पूर्वीप्रमाणेच रहात आहे.

पण 'चाबूक उडो कोठेही. बळ अमुच्या पाठीवर' या भावनेने कोठेही सिलसिला झाला की मी बेचैन होतो. कोणा एका दिलीप-कुमारने दुसरी शादी केल्याबरोबर आम्ही बेचैन व्हावे असा हा दिलीपकुमार ? सगळचात गंमत म्हणजे दिलीपकुमारने आपली

दुसरी शादी पब्लिकपासून लपवून ठेवली पण वर्तमानपत्रवाल्यांनी ते प्रकरण त्यांच्या भाषेत ' खणून ' काढले आणि पब्लिकसमोर ठेवले, आणि ती वर्तमानपत्रे आता अशा प्रकराने समाजावर विपरीत परिणाम होतो म्हणून बोंबाबोंब करताहेत.

सिलसिल्याची ती बोंबाबोंब हा आपला एक छंद बनला आहे. मागे त्या धर्मेंद्र का कोण आहे त्यांनी हेमामालिनी नावाच्या कोणा एका बाईशी गुपचुप शादी केली आणि त्यापासून हेमा मालिनीला मुलगी झाली. पण त्यावेळी मला आठवते. जो जो भेटेल तो मला विचारतो, ' अरे समजले काय ? हेमा मालिनीला पाचवा महिना ! ' हे तो अशा तऱ्हेने सांगायचा की जणू काय त्यानेच काही पराक्रम केला असावा. आश्चर्य म्हणजे हेमा मालिनीला दिवस गेल्याचे धर्मेंद्र आणि हेमा मालिनीच्या स्टार अॅन्ड स्टाईलच्या देवयानी चौबळला कळले. आणि मग त्यानंतर हेमा कशी उठते, काय खाते, कोणते कपडे घालते, तिचे वजन किती वाढते, इत्यादी इत्यादी सगळा तपशील वेधशाळेच्या अंदाजाप्रमाणे रोज जाहीर होत होता.

' गॉसिप ' हा प्रकार जांभईसारखा असतो. एकाने जांभई दिली की आजूबाजूचे सगळे जांभई द्यायला लागतात. दिलीपकुमारच्या शादीचे असेच झाले नाहीतर यापूर्वी विनोद मेहरा आणि किशोर कुमारने तीन तीन विवाह केले. कोणी त्याच्यावर ' धावते जग ' मध्येही स्फूट लिहिले नाही. पण एकदा कशावर लिहायचे म्हटले की आमच्या लेखणीतील शाई धबधब्याप्रमाणे पहायला लागते. मध्यंतरी कोण ती नुरजहां नावाची कंठकोकिळा पाकिस्तानातून आली होती. अद्याप आहे वाटते. पण तिला जी प्रसिद्धी मिळाली तेवढी चाऊ एन लाय, वरूश्चेव्ह किंवा केनेडीलाही भारतात आल्यावर मिळाली नव्हती. आमची लता पाकिस्तानात गेली तर तिला त्या लोकांनी स्थानिक कार्यक्रमात प्रसिद्धी दिली तरी खूप झाले. ज्या देशात आपल्या चित्रपटांना बंदी आहे त्या देशातील नायिकेचे आपण किती स्वागत करावे याला कोणतेच तारतम्य नाही,

पण आता आम्हाला अशा बातम्या आणि सिलसिल्याचे वेड लागले

आहे, दुसऱ्याच्या खाजगी गोष्टी हा आमचा जन्मसिद्ध हक्क वाटू लागला आहे. म्हणूनच नवरा-बायकोतील घटस्फोटाचा खटलाही वृत्त-पत्र स्वातंत्र्य म्हणून आम्हाला ऐकायचा आहे असे रिट अर्ज कोर्टापुढे दाखल होऊ लागले आहेत. उद्या वृत्तपत्र स्वातंत्र्य म्हणून आम्हाला रात्री कोणाच्याही बेडरूममध्ये शिरता आले पाहिजे म्हणून रिट केला तरी कोणी आश्चर्य वाटून घेऊ नये. त्यामुळे दिलीपकुमारचा विवाह हाही आमचा जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. पूर्वी असे नव्हते. दोन विवाह केलेल्या अनेक सन्माननीय व्यक्ती माझ्या परिचयाच्या आणि माहितीच्या आहेत. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात गेल्या तीस वर्षांत समावेश झालेल्याच्यापैकी अनेक मंत्र्यांचेही दोन विवाह झालेले आहेत. पण त्यांची चर्चा कधी झाली नाही कारण त्यांच्या बेडरूममध्ये डोकावणारे स्वातंत्र्याचे वारसदार त्यावेळी या देशात नव्हते. आता तो वारसा हक्क आमच्याकडे आल्याने अभिताब रेखावर आमच्या परवानगीशिवाय प्रेम करू शकत नाही. हेमालाही आई होण्याचा हक्क नाही. दिलीपकुमार दुसरी शादी करू शकत नाही. आणि बाबासाहेब भोसलेचा मुलगा आपला घटस्फोटाचा खटलाही आमच्याशिवाय चालवू शकत नाही,

'सिलसिला' हा आता आमचा एकमेव उद्योग राहिला आहे. मलाही आज दुसरा कोणता उद्योग नसल्याने मीही सिलसिल्यावर ही आठवण खरडली आहे.

# फोटो

मराठी शब्दकोशामध्ये 'प्रसिद्धीपराङ्मुख' असा एक शब्द आहे. तो शब्द अनेकदा वापरलाही जातो. पण तो खऱ्या अर्थाने कधीही कोणाला वापरता येईल असे मला वाटत नाही. कारण या जगाच्या पाठीवर स्वतःला प्रसिद्धी नको असलेला माणूस अद्याप जन्माला यायचा आहे. मला प्रसिद्धी नको असे जेव्हा माणूस म्हणतो तेव्हा तो खोटे बोलतो असे धरून चालावे. या संदर्भात वर्तमानपत्रात वेळोवेळी येणारे फोटो पहाण्यासारखे असतात. वृक्षारोपण करणारा मंत्री झाड लावताना कॅमेराकडे बघत असतो. रस्त्याचे नामकरण करणारा पाहुणा पाटीची दोरी ओढतानाही ती कॅमेराकडे पाहूनच ओढतो. फार कशाला दरवर्षी पंढरपूरच्या विठोबाची पूजा करणारे उघडेबंब मंत्री आणि त्यांच्या सौ. फोटोत चेहेरा येण्यासाठी विठोबाकडे पाठ फिरवून वाकड्या हाताने पूजा करतात. फोटो ही चीज भल्याभल्यांना न्हाव्याच्या कात्रीप्रमाणे ताब्यात घेते. इतर प्रसिद्धीचे किस्से मी केव्हा तरी वेगळे सांगेन. पण फोटोसाठी तडफडणारी माणसे का कुणास ठाऊक पुन्हा पुन्हा माझ्या आठवणीत येतात. मुंबईतील एका सिनीअर नगरसेवकाची त्याबद्दल ख्याती आहे. महापालिकेचा कोणताही समारंभ असला की तो नगरसेवक मोक्याची जागा पाहून दुसऱ्या रांगेत उभा रहातो. कारण पहिल्या रांगेत रेटारेटी चाललेली असते.

सर्व स्थिरस्थावर झाल्यावर फोटोग्राफरने कॅमेरा रोखल्याबरोबर दहा सेकंद अगोदर मुसंडी मारून पहिल्या रांगेत घुसतो.

स्वतःच्या फोटोवर स्वतःपेक्षाही प्रेम करणारी माणसे म्हणजे फोटोग्राफरची डोकेदुखी असते. महाराष्ट्रात एक वजनदार मंत्री होते. वारले ते आता. त्यावेळी त्यानी छायाचित्रकार काकडेना आपले फोटो काढायला सांगितले. त्या फोटोत त्यांचे डोळे तेजस्वी दिसावेत आणि मूळ काळचा रंगाऐवजी गोरा रंग यावा हा त्यांचा आग्रह होता. शिवाय टोपीदेखील ऐटदार दिसायला हवी होती. सहा महिने वेगवेगळ्या अँगलने काकडे फोटो काढत होते आणि मंत्री महोदय ते फाडत होते. फोटोचे बिल मिळाले नाही हे वेगळे सांगायची गरज नाही.

या फोटो प्रेमाला पंडित नेहरूही अपवाद नव्हते. १९५६ साली झालेल्या काँग्रेस अधिवेशनाच्यावेळी त्यांचा जांभई देताना फोटो दिला म्हणून मुंबईतील एका मोठ्या संपादकाला त्याच्या सेक्रेटरीकडून दम मिळाला. पंडितजीनी स्वतःच स्वतःच्या छायाचित्रांचा एक संग्रह केला होता. सकाळी साडेआठ ते नऊ बंगल्याच्या आवारात पंडितजी फोटोग्राफरना स्वतःची हवी तेवढी छायाचित्रे अगदी पोझ देऊन काढून देत असत. स्वतःचे फोटो काढून घेण्याची हौस मोठी दांडगी असते. परवा चंद्रशेखर जेव्हा मुंबईच्या हद्दीवर आले तेव्हा फोटोसाठी त्यांच्या भोवती पडलेल्या गराड्यात चंद्रशेखर दिसेनासे झाले. वर्तमानपत्रात येणारा आपला फोटो पहाण्यासाठी छोटी मोठी माणसे इतकी उत्सुक असतात की त्या दिवशी ती पहाटे उठून वृत्तपत्रे पहातात. नटनट्याचे फोटो नियतकालिके आणि वृत्तपत्रातून उदंड येत असली तरी त्यांनीही नटनट्या सुखावतात. इतकेच नव्हे तर स्वतःचे फोटो ते नियतकालिकाकडे पाठवत असतात. या संदर्भात अलिकडेच घडलेला एक किस्सा सांगण्यासारखा आहे 'विधाता'च्या पोस्टरवर आपले चित्र दिलीपकुमारपेक्षा अतिशय लहान आहे अशी तक्रार करून संजीवकुमारने ती पोस्टर्स बदलायला लावली.

या फोटोवरून अनेक झगडे आणि अनर्थ झाले आहेत. 'लोकराज्य'मध्ये आमचे फोटो येत नाहीत म्हणून कॅबिनेटमध्ये दोनदा भांडणे

झाली. त्यात आपले किती फोटो येतात यावर प्रत्येक मुख्यमंत्री नजर ठेऊन असल्याने त्यात मुख्यमंत्र्याचे किमान डझन तरी फोटो असतात. हा रेकॉर्ड महापौर महापालिकेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या मासिकात आपले दोन डझन फोटो छापून मोडतात. स्वतःच्या फोटोप्रमाणेच घरातील पूर्वजांच्या फोटोवर प्रेम करणारी माणसे पाहिली की मला आश्चर्य वाटते. त्यांच्या भितीवर जणू स्वर्गातील पूर्वजांचा दरबार भरलेला असतो. त्याकडे बोट दाखवून ते प्रत्येक पाहुण्याला सांगतात, 'ते डावीकडचे आमचे आजोबा, त्यांच्या बाजूला आजोबांचे वडील. उजव्या टोकाला आजोबांच्या वडलांचे आजोबा आणि त्यांच्या बाजूला आईचे खापर पणजे. त्या सर्व फोटोवर धूळ सांचलेली असते आणि त्यापैकी कुणाची नांवेही त्याला माहीत नसतात. इतराच्याप्रमाणे स्वतःच्या जुन्या फोटोवर प्रेम करणारी माणसेही आढळतात. कोणत्याही साखर कारखान्याचे उद्घाटन असले की वृत्तपत्रात येणाऱ्या पानभर जाहिरातीत यशवंतराव चव्हाण, नरेन्द्र तिडके आणि यशवंतराव मोहितेचे कोणे एकेकाळचे फोटो पाहिले की हे 'तरुण' नुकतेच शिवाजी विद्यापीठातून बाहेर पडल्यासारखे वाटतात. इतर फोटोप्रमाणे लग्नात फोटो फॅशन आता वाढत चालली असून त्यामुळे अहेर करणारा पाहुणाही नवरा–नवरीकडे न पहाता फोटोग्राफरकडेच पहातो. माझा एक पंचवीस वर्षांपूर्वी लग्न झालेला मित्र अद्यापही वेळ मिळेल तेव्हा तासनतास लग्नाच्या आल्बममधील फोटो पहात बसतो. तीन महिन्यापूर्वी वारलेल्या एका साठी उलटलेल्या भगिनीनी दत्तक घेतलेल्या भाच्याला मरता मरता माझा फोटो पेपरमध्ये छाप म्हणून सांगितले. त्या भाच्याने तिची अंतिम इच्छा पुरी करण्यासाठी खरोखरीच लोकसत्ताच्या पहिल्या पानावर तिचा जाहिरातीत फोटो छापला.

ही झाली इतरांची कथा आता आमची कथा काय सांगू ? उगीच लपवून ठेवण्यात अर्थ नाही. वेड्यावाकड्या आविर्भावात फोटो येऊ नये म्हणून छायाचित्रकार दिसला की आम्हीही कोणाला कळणार नाही अशाप्रकारे सावरून बसतो. अशावेळी एकमेकांना इशारा देण्यासाठी आम्ही 'वस्तुनिष्ठ' हा परवलीचा शब्द वापरतो. 'प्रमोदभाई, या

प्रश्नाचा आपण वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे,' असे मनोहरनी म्हटले की मी समजतो की आजूबाजूला फोटोग्राफर आला आहे आणि मी सावरून बसतो. एकदा मात्र एक फोटोग्राफर आम्हाला खरोखरच 'भेटला.' नागपूरला मी, सतीश प्रधान आणि मनोहर उघड्या रिक्षातून चाललो असताना एक फोटोग्राफर भेटला. सीटवर दोघेच बसू शकत होते. मी दोघांमध्ये उभा राहिलो तर चांगला फोटो येईल म्हणून सौजन्याचा आव आणून त्या बसलेल्या दोन मेयरांच्यामध्ये सीटवर उभा राहिलो. फोटोग्राफरने मोठ्या शिताफीने ॲंगल लावून फोटो काढला. आम्ही दहादहा रुपये वर्गणी काढली. दुसऱ्या दिवशी तीन फुलसाईझ कॉप्या मिळाल्या. फोटो फर्स्टक्लास आला होता फक्त...

....फक्त वरचा भाग वगळल्याने माझे मुंडके उडाले होते.

# मस्तान

माझा सुशिलकुमार होऊ नये म्हणून मी सध्या फार जपून वागतो. कारण फट म्हणता ब्रह्महत्या व्हायची आणि बाळासाहेब शिवसेनेतून हाकलून लावतील ही मला भीती वाटते. विरोधी विचारांच्या लोकांशी गाठीभेठी होणे म्हणजे पक्षद्रोह आहे हे परवा षण्मुखानंदमध्ये सुशिलकुमार शिंदेंवर सावरकरांच्या जन्मशताब्दीस बाळासाहेब देवरसांच्या बरोबर हजर राहिल्याबद्दल चिखलफेक होईपर्यंत मला माहीत नव्हते. तेव्हापासून अशा भेटी मी शिवसेना प्रमुखांच्या नकळत घेत असतो. गेल्या आठवड्यात खुद्द सुशिलकुमारना भेटताच माझ्या छातीत बाळासाहेबांना कळेल म्हणून धडधडत होते. परवा साहेब भेटल्यावर मी त्यांनी काही विचारण्यापूर्वीच सांगून टाकले की, 'मी देवळेकरांच्यावरोवर खारच्या हौशी कलामंडळाच्या समारंभाला हजर राहिलो नाही. कर्तारसिग थत्त्यांबरोबर हिंदूधर्म परिषदेला गेलो नाही. साने गुरुजी पुण्यतिथी समारंभाला लीलाताई अल्वारीस हजर राहताच मी सभागृहातून बाहेर पडलो. परवा दंडवते भेटले तेव्हा त्यांच्याशी हसलोही नाही. शापितच्या पार्टीला मधू शेटे आले म्हणून आईस्क्रीमही खाल्ले नाही. कालच अहिल्याबाई रांगणेकर माझ्याच बसमध्ये चढल्या तेव्हा तिकीट काढलेले असतानाही मी चालत्या बसमधून तात्काळ उतरलो. डॉ. शं. वा. मठकरांच्या अंत्ययात्रेलाही मी देवाशपथ गेलो नाही. सुशिलकुमारप्रमाणे मी, बाळासाहेब, कदापी बेईमानी करणार नाही.' माझ्या या इन्काराला वैतागून बाळासाहेब म्हणाले, 'तुम्ही आता निघा. मला

वेणूताई गेल्याने यशवंतराव चव्हाणांकडे जायचे आहे.' मी कपाळाला हात लावला. कारण मी कोणत्याही विरोधी पक्षवाल्याची माझ्यावर सावलीही पडू देत नाही असे भासवून मी माझ्या पक्षनिष्ठा व्यक्त करत असताना बाळासाहेब निघाले होते आमच्या विरोधी पक्षाचे अध्वर्यू श्री. यशवंतरावांचे सांत्वन करायला ! तेव्हा माझ्या लक्षात आले की मी काँग्रेसमध्ये नसून शिवसेनेत आहे.

गंमत म्हणजे सध्या विरोधी सभांना हजर रहाणे पाप ठरले असले तरी मस्तानच्या मानसन्मानाला मात्र राजमान्यता मिळाली आहे. गेल्या आठवड्यात मुंबईत मस्तानचा जाहीर सत्कार झाला. तो कशाबद्दल याची मला कल्पना नाही. त्याच्या वयाला साठ वर्षे पुरी झाली असावीत किंवा त्याच्या स्मगलिंगचा रौप्यमहोत्सव असेल, पण तो सत्कार मोठा दर्जेदार झाला. ताजमहालमध्ये झालेल्या मस्तानच्या सत्काराचा सर्व खर्च बहुधा स्वत: मस्ताननेच केला असावा. त्या समारंभात मस्तानला समाजसेवक हा किताब बहाल करून त्याला एक मानपत्रही बहाल करण्यात आले. अनेकांनी त्याला पुष्पहार घातले. या समारंभात दोन मंत्री हजर होते. दोघांनी संदेश पाठवले आणि दोघे गैरहजर राहिले. या साऱ्या प्रकाराला परी प्रेसने प्रसिद्धी दिल्याने त्यावर आता वादळ माजले आहे.

या वादळावरून जनतेचा असा अकारण गैरसमज होईल की असे समारंभ मुंबईत यापूर्वी कधी झालेच नाहीत. वर्धादादा हा सायन कोळीवाड्यातील एक अट्टल दादा. आता वाल्याचा वाल्मिकी झाला आणि थोडेफार पुण्य करतो असं म्हणतात. पण वाल्या असताना वर्धादादांनी वडाळ्याला एक मंदिर बांधले. त्या मंदिराच्या उद्घाटन-प्रसंगी वर्धाला असा काही भाव मिळाला की शंकराचार्यांनाही हेवा वाटावा. त्यावेळीही विशेष म्हणजे जाणाऱ्या-येणाऱ्या पाहुण्यांची स्थानिक काँग्रेस आमदार सौ. कमला रामन विचारपूस करीत होत्या. दारूबंदी मंत्री डॉ. पोपट, अनेक आमदार आणि प्रतिष्ठित व्यक्तींनी त्यादिवशी हजेरी लावून पहिला नमस्कार वर्धादादाला आणि दुसरा देवाला केला. सहा महिन्यांपूर्वी नप्पू गार्डनजवळ झालेल्या अशाच

एका समारंभात वर्धराजावर फुलांचा वर्षाव झाला. करीमलाला आणि युसुफ पटेल तर असे मानसन्मान वरचेवर घेत असतात. एक आमदार बाई युसुफ पटेलचे प्लॅन्स मंजूर करून घेण्यासाठी त्याच्याबरोबर मंत्रालयात उघड उघड खेटे घालून रदबदली करत असल्याचा प्रकार विधानसभेतच एका आमदाराने जाहीर केला.

मस्तान तर या सगळ्यांच्या बापाचा बाप आहे. एके काळी त्याने या मुंबईत इतका धुमाकूळ घातला होता की त्याचे नाव काढताच मुसाफीरखाना टरकायचा. एकदा तर त्याने भर रस्त्यात युसुफ पटेलच्याच छातीवर गोळी झाडली. मस्तानचे लागेबांधे तेव्हापासूनचे आहेत. त्यावेळी तो राजभवनात कोणतीही आडकाठी न होता सलाम घेत शिरताना मी स्वत: पाहिले आहे. त्यानंतर के. सी. कॉलेजमध्ये झालेल्या एका धार्मिक समारंभात त्याला राज्यपाल अलियावर जंग यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देण्यात आला. त्यानंतरच्या एका प्रचारसभेत मस्तान, आताचे केन्द्रीय मंत्री नामदार विठ्ठलराव गाडगीळ यांच्या मांडीला मांडी लावून बसला होता. अंजुमानच्या मैदानात मस्तानचे दोन नागरिक सत्कार झाले. हाज यात्रेला जाताना त्याच्या गळ्यात किमान दोनशे हार पडले.

मानसन्मानाचे असे प्रसंग निदान मस्तानला तरी काही नवीन नाहीत. मुंबईतील प्रतिष्ठितांनी त्याला केव्हाच प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. मी ह्या मस्तानला दहा वर्षे सळो की पळो करून सोडले होते. त्याला शोधण्यासाठी रात्र रात्र मी किनाऱ्यावर जागून काढल्या. नपशक्तीतून मी त्याच्यावर सतत तोफा डागत होतो. मुसाफीरखाना आणि मिरची गल्लीतून वणवण हिंडत होतो. शेवटी मीही थकलो आणि मस्तानलाही कस्टम आणि इन्कमटॅक्सवाल्यांचा वेढा पडला. पण त्या दहा वर्षात त्याने मंगलदास मार्केटपासून जे. जे. हॉस्पिटलपर्यंत बहुतेक सर्व संस्थांवर देणग्यांचा इतका वर्षाव केला की तो तेथील जनतेचा देवमाणूस झाला. मस्तान स्वत: पौकीन असल्याने पौकीन मंत्री आणि संत्री त्याच्यापुढे लोटांगण घालतात. मंत्रीमंडळातील किमान एक तरी मंत्री त्याच्या दाट दोस्तीत असतो.

त्यामुळे परवाच्या समारंभात दोन-चार मंत्र्यांनी त्याला आशीर्वाद दिले म्हणून आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

तसा मस्तान पूर्वीपासून प्रतिष्ठितांच्यातच वावरत आला आहे. हिलटॉप हॉटेलच्या तळघरात हेल नावाचा डिस्को क्लब होता. तेथे सिनेमावाले जमायचे. त्यांच्याही खाण्यापिण्याची बडदास्त मस्तानच ठेवत असे. तेथेच स्टार ॲन्ड स्टाईलची देवयानी चौबळ सिलसिला शोधण्यासाठी जायची. एक दिवस तिचे आणि मस्तानचे तुफान भांडण झाले आणि मस्तान हेलमधून कायमचा बाहेर पडला. पण तोपर्यंत तो सिनेमा निर्माता झाला होता. त्याने स्वतःच्याच जीवनावर चित्रपट काढायचे ठरवले. स्वतःच हिरो झाला आणि सरला येवलेकरला हिरॉईन केले. सिनेमाचा फटमार समारंभ मुसाफीरखान्यात झाला, त्यावेळी किमान दहा हजार लोक जमले होते. तीसचाळीस पोलीस आणि दहाबारा पो. अधिकारी पहाऱ्याला होते. तो चित्रपट अद्याप पुरा व्हायचा आहे.मस्तानचा खरा मानसन्मान आणि वैभव मी त्याच्या मुलीच्या लग्नात अनुभवले. चौपाटीच्या बँडस्टँडमागील मस्तानच्या घरच्या पटांगणात तो समारंभ होता. मीही वेषांतर करून मुसलमानाच्या वेषात त्या समारंभाला गेलो आणि तीन तास तेथेच काढले. त्यावेळी पाच मिनिटांनी मला जबरदस्त धक्के बसले. समारंभाच्या दारात मस्तानच्या स्वागताच्या त्या मिठ्ठा स्वीकारणाऱ्या प्रतिष्ठितात अनेक राष्ट्रीय पुढारी होते, बडेबडे पोलीस अधिकारी होते, कस्टमचे इन्स्पेक्टर होते, इन्कमटॅक्सवाले होते आणि दिलीपकुमार, जॉनीवॉकरसारखे नामवंत नटही होते. डोळ्यांत प्राण आणून मस्तानची ती सर्वव्यापी प्रतिष्ठा मी कोपऱ्यात बसून पहात होतो. मला ते सहन होत नव्हते. कारण–

..., कारण १९५७ साली मी जेव्हा मॅकिननॉन मॅकेन्झीत नोकरीस लागलो तेव्हा हा हाजी मस्तान मिर्झा त्याच कंपनीत एक कुली म्हणून बोटीवरील ओझी वाहत होता. तोच मस्तान आज जनतेकडून मानसन्मान आणि मुजरे घेत होता. आणि...,

आणि मी मात्र अद्याप त्याच जनतेची ओझी वहातोय...

# स्मशानयात्रा

कोणाचेही मयत झाले की त्याच्या नातेवाईकांना जेवढे दुःख होते त्याहीपेक्षा अधिक ते मला होते. कारण स्मशानयात्रेला जाणे म्हणजे मला एक मोठे संकट वाटते. कारण या स्मशानयात्रेचे भिन्न भिन्न अनुभव मी आतापर्यंत घेतलेले आहेत. पण या स्मशानयात्रेतही रमणारे अनेक लोक माझ्या परिचयाचे आहेत. नागपुरात एक नाना नावाचे गृहस्थ आहेत. गेल्या अधिवेशनासाठी मी जेव्हा नागपूरला गेलो तेव्हा नानांनी मला एक 'गुड न्यूज' दिली. त्यापूर्वीच्या आठवड्यात नाना एक हजाराव्या स्मशानयात्रेला गेले होते. स्मशानयात्री नाना म्हणूनच ते सर्वांच्या परिचयाचे आहेत. कोठेही मयत झाले की नाना धावत जातात आणि 'उत्साहाने' सर्व तजवीज करतात. स्मशानातून घरची माणसे परतली तरी नाना मात्र कवटी फुटेपर्यंत चितेत लाकडे ढकलत राहतात. नानांच्या धोतराचा पंचा स्मशानयात्रेला जाण्यासाठी सदैव दारातीलच खुंटीवर टांगलेला असतो. नाना हा काड़ीजणांचा चेष्टेचा विषय असला तरी अशी माणसे समाजाला वेळप्रसंगी फार उपयोगी पडतात.

आज या स्मशानयात्रेची आठवण झाली याचे कारण परवाच माझ्या नात्यात एक मयत झाले. असे मयत झाले की सर्व कामे बाजूला सारून जावेच लागते. नाहीतर तेथील माणसे कायमची दुरावतात. तेथे गेल्यावर बरीच मंडळी भेटली, वातावरण धीरगंभीर होते. पण एक सुशिक्षित सदगृहस्थ प्रसंगाचे भान न राहून मोठ्यामोठ्याने हसत होते. क्षणभर मी गोंधळात पडलो. कारण काही

माणसांच्या हसण्यातील आणि रडण्यातील फरकच कळत नाही. पण थोड्याच वेळात माझ्या लक्षात आले की ते नक्की हंसतच होते. आम्हा सर्वांची परिस्थिती मोठी अवघडल्यासारखी झाली. मी जरा अधिकच अवघडलो, कारण ते माझ्याच एका विनोदावर हंसत होते. मी एक विनोदी कोपरखळी जरूर मारली होती पण आम्ही कोणी हसत मात्र नव्हतो. त्यांचे ते हसणे असह्य होऊन मी तेथून बाहेर पडलो. नाहीतर कोणत्याही स्मशानयात्रेला मी कधीच रेंगाळत नाही. माणसे मेल्यानंतरही का रेंगाळतात याचे उत्तर मला अद्याप सापडले नाही. त्या बाबतीत काठेवाडातील एका जमातीला मी जरूर मानतो. कोणीही माणूस मरणार असे नक्की झाले की ते मयताचे सामान आणतात. मेल्यानंतर हजर असतील तेवढ्या माणसांसहित कोणाचीही वाट न पहाता तिरडी उचलतात. आणि धावत धावतच स्मशानात जातात. तेथे गेल्यावर चितेवर प्रेत टाकतात आणि तेथेच वाजूच्या नळाखाली बसून फक्त एक मिनिटात आंघोळ करतात आणि सुटलो एकदाचे असे म्हणून धावत पळत आपल्या कामावर जातात. अशा पद्धतीने जर आपल्याही स्मशानयात्रा झटपट उरकल्या तर मी नक्कीच नागपूरच्या नानांप्रमाणे बहुतेक स्मशानयात्रांना हजर राहीन.

पण तसे होत नाही. आवडता राग गाणाऱ्याने पुन्हा पुन्हा आळवावा त्याप्रमाणे आपले लोक स्मशानयात्राही मोठ्या उत्साहाने लांबवतात. मयत झाल्यानंतर स्मशानयात्रेची वेळ शक्यतो उशीरा ठरवतात पण तरीही वेळेवर निघालेली स्मशानयात्रा मी अद्याप पाहिलेली नाही. रेंगाळणे हा आपल्या स्मशानयात्रेचा जणू स्थायीभावच बनला आहे. त्यासाठी सुरुवातीला हेल काढून रडण्याचा कार्यक्रम होतो. विशेष म्हणजे अशा प्रसंगी घरातील महिला संयम पाळतात आणि ज्या नात्यागोत्याच्या नाहीत त्या भगिनी तीन मजली हेल काढून रडतात. महिला मंडळातील अशी एक भगिनी मी चांगलीच ओळखतो. कोणाच्याही मयताला ती आली की रस्त्यातूनच ती अशी काही मोठमोठ्याने रडत येते की त्यामुळे प्रेतदेखील दचकून उठावे.

स्मशानातील भाषणे हाही असाच एक माणसाचा मृत्यूनंतर छळ करणारा प्रकार आहे. शोकप्रदर्शन हाही आमचा एक पौक बनला आहे. एक वल्ली मला आठवते. स्वतः कधीच आणणार नाही. पण शिताफीने गर्दीतीलच कोणाचा हार घेऊन तो सर्वजण पहातील असा उंचावून स्फुंदून स्फुंदत प्रेताला घालील. तसा परवा मीही उगाच विनोद केला नाही. एका आदरणीय वृद्धेचे निधन झाले होते. तेथे स्मशानयात्रा निघण्यापूर्वीच भाषणे सुरू झाली. भाषण करताना त्या-पैकी एकाने त्या वृद्धेच्या यजमानावरच बोलायला सुरुवात केली. मी माझ्या मिस्किल स्वभावाप्रमाणे बाजूच्याला विचारले, 'अरे बारले तरी कोण?' आणि मग तो सुरुवातीला सांगितलेला माणूस शेवटपर्यंत खदाखदा हसतच राहिला.

ही भाषणे करणारी जी मंडळी आहेत त्यांची केव्हातरी एकदा अमर हिंद मंडळात स्मशानव्याख्यानमाला करण्याच्या मी विचारात आहे. म्हणजे जे काय बोलायचे ते अमरहिंद मंडळात बोलतील पण मरणाऱ्यांची सुटका होईल. अनेकजण हुंदके देत बोलतात आणि शेवटी बाजूच्याला कसे झाले माझे भाषण म्हणून विचारतात. या सर्व मंडळींना मी फार घाबरतो. एकदा अशीच मयताची खबर आली. मी ऑफिसमधून थेट स्मशानात जायचे ठरवले. सकाळी नवी-नच पांढरेशुभ्र कपडे घातले होते, टाय वगैरे लावला होता. स्मशा-नात जायला थोडा उशीरच झाला होता. मी पोहोचलो तेव्हा नुक-ताच भडाग्नी दिला होता. मला लवकर परतायचे होते म्हणून मी मयताच्या भावाला भेटणार इतक्यात तिसऱ्याच एका परिचित माण-साने मला पाहून मोठ्याने हंबरडा फोडला. आणि प्रमोऽऽऽद म्हणून मोठ्याने रडला आणि मला गलिच्छ कपड्याने कडकडून मिठी मारली. मी क्षणभर हादरून गेलो. त्याला बाजूला करण्याचा लोकांनी प्रयत्न केला पण तो माझा टायच सोडेना. त्या झटापटीत माझे केस विस्कटले. कपड्यांची वाट लागली. अर्धा शर्ट पँटच्या बाहेर आला आणि त्याच्या घामाने मी डबडबलो. त्यापेक्षा आपण त्या चितेवर झोपलो असतो तर बरे झाले असते असे क्षणभर वाटले. सर्वात कहर

म्हणजे या शोकनाट्याच्या या प्रवेशानंतर मी जेव्हा घाईने बाहेर पडलो तेव्हा तोच नाट्याचा हिरो मला विचारतो, 'नवलकर, गाडी आहे ना? मग मलाही जरा बोरीवंदरला सोड.' त्यावेळी मात्र मी त्याला झुरळाप्रमाणे झटकला.

या सगळ्या प्रकरणातील दांभिकपणा एकदा घाटकोपरला चव्हाट्यावर आला होता. हॉस्पिटलमध्ये नातेवाईकांनी चुकून दुसऱ्याचेच प्रेत दिले गेले. शोकप्रदर्शनाचे सगळे प्रवेश झाल्यावर शेवटी लक्षात आले की मुडदा दुसऱ्याचा आहे. धावधाव केली तेव्हा कळले की खरा मुडदा काही कामाठी लोकांनी चुकून तासापूर्वीच नेला होता आणि कामाठ्याचा मुडदा प्रेतागारात राहिला होता. नातेवाईक मंडळी कामाठ्यांना शोधण्यासाठी धावत धावत स्मशानात गेली पण कपड्यात गुंडाळलेला खरा मुडदा चितेत टाकून कामाठी परतत होते प्रकरण एवढ्यावरच संपले नाही. कामाठ्याचा मुडदा चुकून प्रेतागारात राहिल्याचे समजल्यावर कामाठी प्रक्षुब्ध झाले. कारण–

–कारण खरा मुडदा कामाठ्यांनी वर्गणी काढून जाळला होता. जाळलेल्या मुड्याच्या नातेवाईकांनी पैसे दिल्यावर कामाठी शांत झाले आणि नातेवाईक धोतरे खांद्यावर टाकून घरोघरी परतले. तेव्हापासून मी ठरवले आहे की मरायचे झाल्यास शक्यतो स्मशानातच मरायचे, म्हणजे रेंगाळणे नको, ती भाषणे नकोत आणि अदलाबदल होऊन माझ्याऐवजी दुसऱ्यावर जाळून घेण्याचा प्रसंग नको.

# बजेट

महापालिका, केंद्रसरकार आणि महाराष्ट्र सरकारचे बजेट नुकतेच जाहीर झाले. या बजेटवर भरपूर चर्चाही झाली. विधान परिषदेत झालेल्या चर्चेत मीही भाग घेतला आणि सुमारे वीस मिनिटांचे दणदणीत भाषण केले. त्या भाषणाचा वृत्तांत 'सकाळ'पासून 'टाईम्स ऑफ इंडिया' पर्यंत बहुतेक वृत्तपत्रांनी ठळकपणे प्रसिद्ध केला. त्या वृत्तांतामुळे तमाम जनता माझ्याकडे एक विद्वान अर्थशास्त्रज्ञ म्हणून पाहू लागली असेल तर त्या जनतेची मला कीवच करावी लागेल. कारण एक विदारक सत्य फक्त मलाच माहीत आहे आणि ते म्हणजे अर्थसंकल्पाचा अभ्यास तर राहोच पण मी तो संपूर्णपणे वाचलाही नाही. थोडाफार चाळला एवढेच ! हे सांगण्याचा प्रामाणिकपणा माझ्याकडे शिल्लक आहे हेही काही थोडके नव्हे ! पण–

–पण बजेटवर बोलण्यासाठी बजेटचा अभ्यास केलाच पाहिजे ही कल्पना आता कालबाह्य झाली आहे. आताच्या पद्धतीप्रमाणे बजेटवरील चर्चा म्हणजे लोकप्रतिधींना मन मानेल त्या विषयांवर बोलण्याची एकमेव संधी ! त्यामुळे सध्या बजेटचा आणि आकड्यांचा तसा काहीच संबंध राहिलेला नाही. महापालिकेत बजेट चर्चेला आले की नगरसेवक तब्बल दोन आठवडे भाषणोत्सव साजरा करतात. तोबा तोबा बोलतात. मुगभाटातील गटारे तुंबतातच कशासाठी ? समुद्राचे पाणी गोड का नाही करत ? महापालिकेच्या इस्पितळात मरणाची विनामूल्य सोय केली असतानाही स्मशानभूमीत जळण मोफत का नाही ? खड्ड्यात पाय मुरगळल्यास नुकसानभरपाई का

दिली जात नाही ? आमच्या वॉर्डात फक्त दोनच मुऱ्या का ? आमच्या गल्लीतील गणेशोत्सवाच्या सुवर्ण महोत्सवास महापालिकेने ग्रँट का दिली नाही ? ' शाळे'च्या प्रिमीअरला महापौरांचा शेवटच्या रांगेत बसवून अपमान का करण्यात आला ? वगैरे वगैरे प्रश्नांचा धमाल मारा कमिशनर साहेबांच्यावर करण्यात येतो आणि कमिशनरही बजेटवरील ही ज्वलंत टीका शांतचित्ताने ऐकून घेतात.

लोकसभेत आणि विधानसभेतही बजेट सेशन, बजेट सेशन असे शब्द पुन्हा पुन्हा उच्चारणे हे खासदार, आमदारात बुद्धिमत्तेचे लक्षण मानले जाते. बजेट जाहीर झाल्याबरोबर त्यावर व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रिया मोठ्या मजेशीर असतात. बजेट सभागृहाला सादर केल्याबरोबर दहा मिनिटांतच या प्रतिक्रिया व्यक्त होतात. दहा हजार पानांच्या बजेटचा इतक्या प्रचंड वेगाने अभ्यास करणाऱ्या लोकप्रतिनिधींना ' काँप्युटर सम्राट' ही पदवी बहाल करावयाला हवी. या प्रतिक्रिया नेहमी ठराविक साच्याच्याच असतात. सत्तारूढ पक्षाचे लोक सामान्य माणसाला दिलासा देणारा क्रांतिकारक अर्थसंकल्प असे बजेटचे वर्णन करतात तर विरोधी पक्षाचे लोक ' श्रीमंतांना अधिक श्रीमंत व गरिबांना अधिक गरीब करणारा निराशजनक अर्थसंकल्प' या शब्दात बजेटची संभावना करतात. विधानसभेच्या दारातच अर्थसंकल्पाच्या खातेवार प्रती वाटण्यात येतात. त्या प्रती आमदारांनी घ्याव्यात म्हणून काऊंटरवरील कारकून आमदारांची याचना करीत असतो. पण बहुतेक आमदारांनी अर्थमंत्र्यांचे भाषण एकाग्रतेने ऐकून त्यातील सारे मुद्दे तोंडपाठ केले असल्याने त्यांना बजेटचे पुस्तक वाचण्याची गरज वाटत नाही. यंदा तर आम्हा सर्वांना महागड्या व्ही. आय. पी. बॅगमधून बजेटच्या प्रती वाटण्यात आल्या. बॅग मी न विसरता घरी आणली पण बजेटची पुस्तके मात्र सखोल अभ्यास करण्यासाठी अद्याप विधानभवनातच ठेवली आहेत.

एक वर्ष मला आठवते की मी खरोखरच बजेटचा अभ्यास करण्याचे ठरवले. विधानभवनाचे ग्रंथपाल श्री. थोरात यांच्याकडून बरीच टिपणे मिळविली. पाच-सहा दिवस वाचनालयात बसून बजेट वाचले

आणि दहा वारा पानी भाषणाच्या नोटस् काढल्या. त्या दिवशी अर्थ-संकल्प सादर कराकयास जाणाऱ्या अर्थमंत्र्याप्रमाणे मी बगलेत कागदपत्र घेऊन कॉरीडॉरमधे धीमी धीमी पावले टाकत सभागृहात जाऊन बसलो. माझे नाव पुकारताच मी उभा राहिलो. आत्मविश्वासाने आजूबाजूला नजर टाकली आणि बोलायला सुरुवात केली. पण इतक्यात आगामी संकटाची मला चाहूल लागली. कारण त्यापूर्वी अभ्यास करून आणि टिपणे चाळून मी कधीच भाषण केले नव्हते त्यामुळे मी अडखळू लागलो आणि प्रचंड घोटाळा म्हणजे बजेटमधून कॉपी केलेल्या आठ-आठ आकडयांच्या रकमा मला वाचताच येईनात. जेथे बीस कोटीची तरतूद होती तेथे दोन कोटीची वाचली आणि जेथे दोन लाखाची होती तेथे दोन कोटीची सांगितली कारण दोनवर नेमकी किती शून्य असल्यावर त्याचे लाख अथवा कोटी होतात हे वाचण्याची अक्कल शाळेतच राहिली होती. शेवटी नेहमीप्रमाणे शासनावर प्रखर हल्ला चढवून टाळचांच्या गजरात मी माझे भाषण आटोपले. साऱ्या आमदारानी माझ्या 'अभ्यासपूर्ण' भाषणाबद्दल अभिनंदन केले.

बजेटच्या निमित्ताने लोकप्रतिनिधींचा हा भाषणोत्सव आणखी किती वर्षे चालेल हे सांगता येणार नाही. लोकमान्यांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाप्रमाणे या भाषणोत्सवालाही अमरत्व प्राप्त झालेले आहे कारण गणेशोत्सवाप्रमाणेच या भाषणोत्सवालाही एक व्यापक पूर्वपीठिका आहे, स्वातंत्र्यपूर्वकाळात जेव्हा ही बजेट सादर करण्याची पद्धत सुरू झाली तेव्हा महापालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांना फार मोठी प्रतिष्ठा लाभली होती. कारण त्यावेळी सभागृहात त्या तोडीची माणसे होती. त्याचबरोबर ब्रिटिश प्रतिनिधीही होते. जमनादास मेथा, बमनजी पेटीट, सर जमशेटजी जिजीभाई, फिरोजशहा मर्झबान, विठ्ठलराव चंदावरकर, इत्यादी पर्वतप्राय कर्तृत्वाची तोलामोलाची माणसे सभागृहात बसत असत. जमनादास मेथा विरोधीपक्षनेते म्हणून जेव्हा बजेटची चिरफाड करायचे तेव्हा त्या भाषणाचे बॅ. जयकर, मोतीलाल नेहरू यांच्याकडूनही कौतुक व्हायचे.

महापालिकेच्या बजेटवर बोलण्यासाठी तेव्हाचे लोकप्रतिनिधी केवळ महापालिकेचाच नव्हे तर महाराष्ट्र राज्यापासून विश्वविद्यालयापर्यंत सगळ्यांच्या बजेटच्या तुलनात्मक अभ्यास करायचे. ही परंपरा ओसरत १९५८ पर्यंत टिकाव धरून राहिली. त्या सुवर्ण कालखंडातील शेवटची भाषणे मी महापालिकेच्या प्रेक्षागृहात बसून झपाटल्याप्रमाणे ऐकत असे. ती भाषणे आता पुन्हा ऐकावयास मिळणार नाहीत. आचार्य दोंद्यांच्यासारख्या शिक्षणक्षेत्रात ह्यात घालविलेल्या अनुभवसंपन्न माणसांनीही अभ्यासाशिवाय कधी बजेटवर भाषण केले नाही. १९३० सालीच ते नगरसेवक झाले. त्यावेळी बजेटवर बोलण्यापूर्वी जमनादास मेथा एक आठवडाभर मलबारहिलच्या बंगल्यावर महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यासमवेत सबंध दिवस बजेटचे वाचन करून त्यावर चर्चा करायचे. ही चर्चा चालत असताना सुमारे १५ वर्षे आचार्य दोंदे तेथेच एका कोपऱ्यात बसायचे. या अभ्यासाचा प्रभाव दोंद्यांच्य बजेट भाषणावर शेवटपर्यंत होता.

मिनू मसानी, डॉ. गिल्डर, फिरोजशहा मेहता, मेहेरअल्ली यांची परंपरा प्रा. रामजोशींच्या कारकिर्दीनंतर जवळ जवळ संपुष्टात आली. आताचे उपकुलगुरू तेव्हा नगरसेवक होते. त्यांची बजेटवरील दोन भाषणे मला अद्याप आठवतात. ते एकदा बोलायला लागले की त्यांचा आवाज आणि व्यासंग यांच्या धारेची शर्यत लागायची. मला अनेकदा हेवा वाटायचा त्यांचा. पण ही सारी माणसे खवळलेल्या राजकारणात बुद्धिबळाच्या प्याद्याप्रमाणे इतस्ततः उडून गेली.

आम्हा लोकप्रतिनिधींचा दर्जा खालावला याला अनेक कारणे आहेत. पूर्वी लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार फार मर्यादित लोकांना होता. एकेकाळी तो फक्त जे. पीं. ना असायचा. त्यावेळी सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित बुद्धिमान माणसेच निवडून यायची. नंतर मतदानाचा अधिकार प्राप्तीकर भरणाऱ्यांनाच मिळाला. कालावधीने घरमालक मतदार झाले. आणि नंतर भाडेकरूंना तो अधिकार मिळाला. १९४८ सालापासून तर एकवीस वर्षांवरील साऱ्याच स्त्रीपुरुषांना मतदानाचा अधिकार दिला गेल्याने लोकशाहीच्या वर्मा-

वरच घाव घातला गेला. परिणामी त्यानंतर जे उरलेसुरले ते जेमतेम संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपर्यंत टिकले. पण त्यावेळी 'झालाच पाहिजे'च्या लाटेवर जी भलीबुरी माणसे तरंगली त्यांनी स्वराज्य संस्थाचे पाणीच गढूळ करून टाकले, आणि तेव्हापासून या राज्यातील लोकप्रतिनिधी शिवाजीपार्कच्या कमावलेल्या भाषेत राज्याचा कारभार हाकू लागला.

अशी ही बजेटवरील भाषणांची केविलवाणी परंपरा आहे. या परंपरेतील संस्कार आणि संप्रदाय केव्हाच नष्ट झाले. व्यासंग, तपश्चर्या आणि साधना हे शब्द व्यवहारातून पुनश्च शब्दकोषातील आपापल्या पानावर जाऊन बसले. शंकराचार्य, ज्ञानेश्वर तर केवळ कथावस्तू बनले पण दुर्दैव म्हणजे जमनादास मेथांची ती व्यासंग परंपरा यशवंतरावांच्या बरोबरच या राज्यात अखेरचा श्वास घेती झाली. यशवंतरावांच्यासारख्या शेतकऱ्यांच्या मुलांनीही मान मोडून अभ्यास केला आणि ते मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रीपदावर असतानाच त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश दिल्लीहून महाराष्ट्रात आणला. पण–

पण त्याच वेळी महाराष्ट्राचा व्यासंग–कलश त्यांनी दिल्लीतच ठेवला ! त्यानंतर आम्हा लोकप्रतिनिधींना आमच्या बुद्धिमत्तेचे बजेट केव्हाच करता आले नाही. यापुढेही करता येईल असे वाटत नाही. म्हणून मायबाप जनहो, आम्हाला क्षमा करा !

# व्यसन

काल रात्री मी एका पार्टीला गेलो. सध्या मी पार्टीची आणि जेवणाची आमंत्रणे स्वीकारीत नाही. त्याला दोन कारणे आहेत. एक म्हणजे आयत्या वेळी कोणतेही महत्त्वाचे काम निघते आणि पार्टीला जात येत नाही. त्यामुळे निमंत्रकांचा विरस होतो. दुसरे म्हणजे दुपारी किंवा रात्री पार्टीला हॉटेलात बोलवणारे लोक हे ९९ टक्के स्वार्थी असतात.प्रत्यक्षात त्यांचे काही तरी काम असते.त्यासाठी त्यांना मुबलक वेळ हवा असतो. घरी आल्यास त्यांनी तेवढा वेळ मिळत नाही. आणि शाखेच्या गर्दीत यायला त्यांना एक प्रकारचा कमीपणा वाटत असतो. म्हणून ते संभावितपणे मोठेपणाचा आव आणून 'प्रमोद, यू मस्ट कम फॉर डिनर' म्हणून आग्रह करतात आणि त्या डिनरचे दीड दोन तास डोके भणाणून सोडतात. त्याचा असा वैताग येतो की नको ते जेवण असे वाटायला लागले.

आणखी एक वर्ग आहे तो स्वतःचा मोठेपणा मिरविणारा. पैसे आहेत म्हणून जेवणे घालायची आणि आमदार, खासदार, मंत्री, कमिशनर, कलेक्टर यांना बोलवायचे. चार चौघांच्या समोर आपण कोणी तरी मोठे आहोत म्हणून मिरवायचे आणि भाव खायचा हा त्यांचा उद्योग असतो. काही जण या मार्गाने आपले वजन वाढवून कामेही करून घेत असतात, पण अशा पार्टयात भावनात्मक ओलावा नसतो. सगळा कृत्रिमपणा असतो. त्या कोरडचा औपचारिकपणाने मी गुदमरतो म्हणून अशा प्रकारच्या कोणत्याही पार्टयांना जाण्याचे मी टाळत आलो आहे.

काल मात्र एकदा नाइलाजाने नेपियन सी रोडवरील ग्रँड पसडी-मधील एका पार्टीला गेलो. गर्दी बऱ्यापैकी जमली होती. चेष्टा-मस्करी चालल्या होत्या. आणि बाटल्या फुटत होत्या. त्यासाठी कोप-ऱ्यात एक खास बार केला होता. काहीही झाले तरी आज दारूला स्पर्शही करायचा नाही. अशी हिंमत बाळगून मी गेलो होतो. कारण वेगळेच होते. तशी दारू मला वर्ज्य नाही. कधी काळी कोठे एखादी पार्टी असली तर 'कंपनी' देण्यासाठी मी दारूला जरूर स्पर्श करतो. पण कोणी विश्वास ठेवो न ठेवो पण कोणतीही दारू मला आवडत नाही. शिवाय रात्री दोन लेख लिहायचे असल्याने दारूला स्पर्शही न करण्याचा मी निर्धार केला होता.

मला दारू आवडत नाही यावर कोणाचा विश्वास बसणे अवघड आहे. कारण दारू ही माणसाला कीड लावते असे म्हणतात. पण माझे आणि दारूचे नाते वेगळे आहे. आयुष्यात जे जे समोर आले त्याला मी भिडत आलो आहे. त्यामुळे काय आवडते आणि काय आवडत नाही हे मी अनुभवानंतरच सांगत असतो. १९६३ च्या सुमा-रास मी केवळ दारू पिण्यासाठी गोव्याला गेलो होतो. त्यापूर्वी एकदा दोनदा दारूला स्पर्श केला होता तरी दारूचा परिचय झाला नव्हता. गोव्यात मी अलबर्ट लॉजमध्ये उतरलो. त्यांच्या समोरच एक बार होता. सहा दिवस मी गोव्यात होतो. त्या सहा दिवसांत मी समोरील बारमधील सुसारे वीस प्रकारची दारू एकेक पेग प्यालो पण प्रत्येक पेग घेताना माझा चेहरा तापाचे औषध पिताना होतो तसा झाला. व्हिस्कीपासून व्होडकापर्यंत सर्व चाखले पण सर्व प्रकारच्या दारूला एक उग्र दर्प आणि कडवटपणा होता.बीअरही मला आवडली नाही.तेव्हापासून इतकी कडवट आणि उग्र असलेली दारू लोक आव-डीने का पितात, हा प्रश्न मला सतत भेडसावत आला आहे, त्यानंतर केवळ एक विधी म्हणून मी पार्टीला 'टोस्ट'साठी कधी काळी दारूला स्पर्श करत आलो आहे. मला कोणत्याही प्रकारची दारू गोव्यात आवडली नाही हे परमेश्वराने माझ्यावर केलेले मी फार मोठे उपकार मानतो. कारण मी बोटीच्या कंपनीत काम करत असल्याने आणि

बोटीवर मुबलक दारू उपलब्ध असल्याने मला दारूड्या बनायला वेळ लागला नसता.

हे दारू पुराण मी ओघाओघाने केले. पण काल पार्टीत मी जेव्हा दारू नाकारली तेव्हा मी वेगळेच सांगितले. कोणत्याही व्यसनापासून मी दूर रहातो असे सांगण्याचा प्रयत्न करताच एका नामवंतांनी (नाव सांगत नाही) हातात ग्लास घेऊन माझ्याशी हुज्जत घालायला सुरुवात केली. त्यांच्यावर दारूचा अंमल चढलेला असतानाही त्या झालेल्या वादात मी एकेक मुद्दे हरवून बसलो आणि अखेर माझ्यावर पराभव पत्करण्याची वेळ आली. मी 'व्यसन' हा शब्द उच्चारताच नामवंत बसल्या जागेवरून उठून माझ्याजवळ आले. आणि मग वाद सुरू झाला.

दारूच्या धुंदीत ते जे मला सांगत होते त्यात फार मोठा अर्थ होता. त्यांनी मला प्रथमच 'व्यसन' या शब्दाची व्याख्या काय, हा प्रश्न विचारून निरुत्तर केले. मी दारू म्हणजे व्यसन, सिगरेट म्हणजे व्यसन इत्यादी सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना ते पटणे शक्य नव्हते. कारण त्यांच्या मते प्रत्येक गोष्ट ही व्यसन होती आणि कोणतीही गोष्ट व्यसन नव्हती. या त्यांच्या विरोधाभासी मतातही फार मोठा अर्थ होता. कारण माणसाने व्यसन या शब्दची स्वतःच्या सोयीप्रमाणे व्याख्या करून ठेवली आहे. जे सर्रास सिगरेट पितात ते सिगरेटला व्यसन म्हणत नाहीत. जे सर्रास दारू पितात ते दारूला व्यसन समजत नाहीत आणि ... आणि जे सर्रास चहा पितात ते चहा व्यसन मानायला तयार नाहीत. पण या तीनही गोष्टी मर्यादित असतील तर त्यांपैकी कोणतीही व्यसन नाही. पण मर्यादा सोडली तर चहाही व्यसन आहे. त्या नामवंतांनी सांगितलेली व्यसनाची व्याख्या मोठी विचार करण्यासारखी आहे. त्यांच्या मते, 'ज्या गोष्टीशिवाय माणसाचे चालायला हवे पण चालत नाही ते व्यसन.'

व्यसनाची ही व्याख्या रजनीशांनी केल्याचे मला त्यांनी सांगितले. ती धक्कादायक वाटली तरी सडेतोड आहे. माणूस एखाद्या गोष्टीच्या आधीन जातो तेव्हा त्याला व्यसनी म्हणतात. याचाच अर्थ एखाद्या

गोष्टीशिवाय त्याचे चालत नाही तेव्हा तो व्यसनी बनतो. पण ही व्याख्या स्वीकारली तर अन्नाच्या ताटातील कोणत्याही पदार्थाशिवाय चालत नाही म्हणणारे व्यसनी आहेत. आवश्यकतापेक्षा अधिक पाणी पितात ते व्यसनी आहेत. क्रिकेट किंवा कोणत्याही प्रकारच्या खेळाचे वेड असलेले लोक व्यसनी आहेत. सदा न् कदा धर्माचा घोष करणारे व्यसनी आहेत. भाषणाची खुमखुमी असणारे राजकारणीही व्यसनी आहेत. इतकेच कशाला तर थंडीवाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेल्या कपड्यांपेक्षा अधिक कपडे घालणारेही व्यसनी आहेत. कारण या सर्व गोष्टींपासून माणसाचे चालायला पाहिजे पण चालत नाही. त्यामुळे भटकणे हे माझेही व्यसन आहे. लिहिणे माझे व्यसन आहे.पण आपण ही व्यसने मानायला तयार नाही याचे कारण व्यसनाची व्याख्या प्रत्येकाने आपापल्या सोयीप्रमाणे केली आहे.

# प्रतिमा

परमेश्वराने माणसाला जन्म दिला आणि माणूस या शब्दाची व्याख्या करण्याचे माणसावर सोपवले तेव्हापासून हरएक माणसाच्या जीवनावर रंग भरला आणि प्रत्येक जण आपआपल्या व्याख्येप्रमाणे स्वतःच्या जीवनाला आकार देऊ लागला पण तसे करताना तो इतका गोंधळला की त्यामुळें तो अद्याप माणूस या शब्दाची व्याख्याही करू शकत नाही आणि अद्याप आपल्या जीवनालाही आकार देऊ शकत नाही. स्टूटगार्डमधील प्राणीसंग्रहालयाच्या दारात एक अजब वास्तूशिल्प आहे. समोरून पाहिल्यास ते चौरस दिसते. पाठीमागून पाहिल्यास ते चौकोनी भासते आणि बाजूने पाहिल्यास त्रिकोनी दिसते आणि त्यामुळे त्या वस्तूचा आकार सांगता येत नाही त्याप्रमाणे माणसांच्या जीवनाचाही आकार सांगता येणार नाही. ज्या दिशेने आपण त्या माणसाकडे पाहू त्याप्रमाणे आपल्याला त्याचे स्वभाववैशिष्टय दिसते. परवा रविवारच्या नवशक्तीत आपल्या नाविन्यपूर्ण लोकलमध्ये श्री. पु. रा. बेहेरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयी लिहिलेल्या दोन मार्मिक गोष्टी माझ्या वाचनात आल्या. बेहरे आणि ठाकरे दोघेही एका कार्यक्रमात एकत्र होते तेव्हा बाळासाहेब म्हणाले 'प्रेक्षकांची टाळी ही जांभईप्रमाणे असते. एकाने वाजविली की बाकीचेही वाजवितात.' बेहेरे ह्या वाक्याला बेहद्द खूप झाले. मलाही हे वाक्य एकदम पसंत पडले. बाळासाहेबांच्या नेहमीच्या सहज संवादात उच्चारली जाणारी अशी

अनेक मार्मिक आणि खुमासदार वाक्यें टिपून घेण्यासारखी असतात पण त्याहीपेक्षा बाळासाहेबांच्याविषयी बेहरे यांनी व्यक्त केलेलं मत लाख मोलाचे आहे.

वाचकांना माहीत असेल की १९५३ साली बाळासाहेब हे फ्री प्रेस नवशक्तीमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करीत असत. त्यांच वेळेपासून बेहरे नवशक्तीत आहेत. मीही तेव्हाच नवशक्तीत लिहायला सुरुवात केली म्हणून तीस वर्षांपूर्वी श्रीकांत पालेकरांच्या बाजूच्या टेबलावर खाली मान घालून व्यंगचित्रांत मग्न असताना बाळासाहेबांचे रूप अधूनमधून आमच्या आठवणीत येते.

तीच आठवण घेऊन बेहरे लिहितात, 'ठाकरे यांना मी ते पुढारी नव्हते तेव्हापासून ओळखतो. शिवसेनापती झाल्यापासून त्यांची वेगळीच प्रतिमा लोकांसमोर निर्माण झालेली आहे. धीरगंभीर, आक्रमक वगैरे वगैरे. पुढाऱ्याला आपली प्रतिमा सांभाळावीच लागते. पण खाजगी बोलण्यात त्याच प्रतिमेची वस्त्राप्रावरणे ते सांभाळीत बसत नाहीत हे त्यांचे एक वैशिष्ठ्य आहे.' बाळासाहेबांच्या या वैशिष्ट्याविषयी मी यापूर्वी अनेकदा लिहिले आहे, पण अनेकांना ते पटत नाही. पण जो माणूस बाळासाहेबांच्या सहवासात अर्धा तास काढतो तो हेल्थक्लबमध्ये जाऊन आल्याप्रमाणे सर्व गैरसमज दूर करून स्वच्छ मनाने बाहेर पडतो. व्यासपीठावर वाघाप्रमाणे गर्जना करणारे साहेब हे प्रत्यक्षात केवळ ठाकरे घराण्यातच नव्हे तर आम्हा सर्वांचे एक आदर्श कुटुंबप्रमुख आहेत, एकदा आपले मानल्यानंतर त्याला सांभाळून घेण्याचा त्यांच्यातील गुणच सर्वांना आकर्षित करत असतो.

असो, आज तो माझा विषय नाही. बाळासाहेबांना बेहरेनी स्पर्श केलेला विषय व्यापक आहे. सार्वजनिक क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तीच्या मनातील प्रतिमेच्या संघर्षावर त्यांनी बोट ठेवले आहे. त्यामुळे अशा असंख्य व्यक्ती माझ्या नजरेसमोरून चित्रपटाप्रमाणे सरकल्या. मला एक स्पष्ट आठवते. मी लिहायला सुरुवात केल्यानंतर वर्ष सहा महिन्यांनी मामा वरेरकरांचे अनेक निरोप मला येऊ लागले.त्यांचे दिल्लीला

येऊन रहाण्याचे आग्रहाचे निमंत्रण होते. पण मला ते धाडस होत नव्हते. कारण मामांच्या भोवती एक वेगळे वलय होते. त्यांची एक वेगळी प्रतिमा होती. महाराष्ट्राचे ते एक सिद्धहस्त लेखक होते आणि राजदरबारातही त्यांना मानाचे स्थान होते. त्यामुळे त्यांच्या आसपास जाण्यासही माझे मन धजावत नव्हते. पण तरीही त्यांचा आग्रह चालू राहिल्याने मला दिल्लीस जावे लागले, त्यांच्या सोवत रहावे लागले. तेथील वास्तव्यात मामांची जी प्रतिमा पाहिली ती माझ्या मनावर कायमची कोरली गेली आहे. खाजगी जीवनात मामांच्यासारखा अत्यंत साधा, निगर्वी आणि मिळाल माणूस क्वचितच आढळेल. त्या वास्तव्यात मला अनेकांच्या प्रतिमेतील विरोधाभास जवळून पहावयास मिळाला. जस्टीस छगला, डॉ. व्ही. वी. केसकर, सभापती भारदे, लालजी पेंडसे इत्यादी दुरून डोंगराप्रमाणे स्थितप्रज्ञ आणि शिष्ट दिसणारी मोठी मोठी माणसे मी त्यांच्या दरबारात त्यांच्या अत्यंत मनमिळावू स्वरूपात पाहिली.

हा संघर्ष फक्त राजकारणातच नव्हे तर इतरत्रही होतो. श्री. धुरंधर हे किल्ला कोर्टातील एक धीरगंभीर न्यायाधीश होते. पण प्रत्यक्षात मात्र त्यांच्या खेळाडु वृत्तीशी कोणाला स्पर्धा करता येणार नाही. रमाकांत कुळकर्णी आणि आता ठाण्याचे कमिशनर असलेले रामचंद्रन म्हणजे गुंडांचे कर्दनकाळ एक पोलीस अधिकारी. पण खाजगी जीवनात हे दोघेही इतके कुटुंबवत्सल आणि सौम्य आहेत की ते कोणी मोठे पोलीस अधिकारी असावेत असा आभासही होत नाही. सरकारदरबारात अशीही काही माणसे असतात की ती आपली प्रतिमा सांभाळण्याच्या भानगडीत पडत नाहीत. जी. ए. डी. खात्याचे सचिव श्री. रणदिवे हे नुकतेच निवृत्त झाले. मंत्रालयातही त्यांनी आपला घरगुती साधेपणा सोडला नाही. त्याविरुद्ध दुसरे एक अधिकारी आठवतात. नाव सांगत नाही पण सबंध दिवस शिस्तीवर कडक 'प्रवचने' द्यायचे. संध्याकाळ झाली की थेट सरकारी गाडीतून दारूच्या गुत्त्यावर जायचे आणि आठ साडेआठ वाजता ड्रायव्हरच्या आधाराने घरी परतायचे. प्रतिष्ठा आणि प्रतिमा या दोन वेगवेगळ्या

गोष्टी आहेत. प्रतिष्ठेचा बाऊ कोणी करू नये पण प्रतिमा मात्र सांभाळावी लागते. रेडिओ क्लबमधील पार्टीत प्रतिमा आणि प्रतिष्ठा दोन्हीही गुंडाळून दारूच्या धुंदीत नाचणारे वरिष्ठ पोलिस अधिकारी मी पाहिले आहेत. राजकीय जीवनामध्ये संभावितपणाचा आव आणणारे अनेक पुढारी समाजात आपली एक प्रतिमा ठेवतात आणि प्रत्यक्षात मात्र व्यभिचारात लोळतात. डॉ. जेकील आणि मिस्टर हाईडप्रमाणे विरोधाभासी जीवन जगणारी अनेक माणसे असतात,पण ती अखेर नष्ट होतात. प्रतिमेचा समतोल सांभाळणे अवघड असते. खाजगी जीवनात माणसाची प्रतिमा वेगळी असली तरी ती त्याचे सार्वजनिक जीवन कलंकित करणारी नसावी. कॉम्रेड लालजी पेंडसे गडकऱ्यांच्या साहित्यात रमत होते. चिंतामणराव देशमुख मार्मिक व्यासंगात तासन् तास घालवायचे. डे. कमिशनर इनामदार गृह-शास्त्राचे भोक्ते आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. खामगावकर हे एक उत्कृष्ट चित्रकार आहेत. पत्रकार विद्याधर गोखले खाजगी बैठकीत शेरशायरीचे कारंजे उडवितात. शरद पवार गप्पा रंगल्या तर जगातील विनोद सांगून धमाल उडवितात. शिवसेनाप्रमुख ठाकरे व्यंगचित्रकार म्हणून ख्यातनाम असले तरी व्यंगचित्राइतकेच ते झाडाफुलात रमतात. आमचे दत्ताजी साळवी शिवसैनिकांना उग्र वाटतात पण प्रत्यक्षात हा माणूस अत्यंत हळव्या मनाचा आहे. केंद्रीय मंत्री पी. सी. सेठी जेव्हा वेळ मिळेल तेव्हा पोहत असतात, आता दिल्लीला असलेले श्री. सूर्यकांत जोग हे एक उत्कृष्ट क्रिकेट-पटू आहेत. या साऱ्या प्रतिमा त्यांच्या सार्वजनिक जीवनात विरोधा-भासात असल्या तरी त्या परस्परांना पोषकच ठरतात.

माझ्या मात्र सवयी जगावेगळ्या असल्याने प्रतिमेचा समतोल मला कधीच साधला नाही आणि त्यासाठी मी कधी धडपड केली नाही. वेश्यांच्या वस्तीतून हिंडत असताना अगर मटक्याच्या अड्ड्या-वर चिठ्ठी फाडताना आकस्मिक कोणीतरी 'जय महाराष्ट्र' बोलतो आणि मी क्षणभर दचकतो. पण माझ्या भ्रमंतीतील उद्योग एव्हाना सर्वांनाच माहीत झाले असल्याने तेथे प्रतिमेला जीवदान मिळते. पण

त्याही पलीकडे माझ्या वाईट सवयी आहेत. रात्री अपरात्री मी रिग लच्यामागे खाटेवर बसून कवाब खातो. धोबीतलावच्या फूटपाथवर चटईवर बैठक मारून खिमा खातो. ऑल्फेड सिनेमाच्या दारात कधी रसोईरोटी खातो तर कधी भेंडी बाजारच्या लल्लूभाईकडे बाकडचावर बसून दूध पितो. अनेकदा झटका येतो आणि मग एखाद्या डिस्कोत जाऊन मी बेबंद नाचतो अशा अवेळी जर कोणी जय महाराष्ट्रवाला सामोरा आला तर मात्र माझी प्रतिमा गुदमरल्यासारखी होते. पण आता माझ्या प्रतिमेलाही झाकण्यासारखे काही राहिलेले नाही. दीड महिन्यापूर्वी मी मालाडच्या आक्सा समुद्रकिनाऱ्यावर खबर मिळाली म्हणून गेलो होतो. किनाऱ्यावर कोणीच नव्हते; म्हणून अंगावरील कपडे काढून अंडरवेअरनिशी पाण्यात उतरलो. अर्ध्या तासाने मी बाहेर आलो आणि कपडे घालणार इतक्यात बाजूच्या झाडाखालून दादांच्या सिनेमातील एक कलावंत आला आणि डोळे विस्फारून 'जय महाराष्ट्र' म्हणाला. म्हणूनच म्हटले, माझ्या प्रतिमेला आता झाकण्यासारखे काहीच राहिले नाही.

# खर्च

गेल्या रविवारी सकाळी मी खंडाळ्यात होतो. खंडाळा आता पार बदलला आहे. पूर्वीचा खंडाळा म्हणजे दऱ्या आणि डोंगर, त्या डोंगरावरील गर्द झाडीमध्ये छोटे छोटे बंगले दडलेले असायचे. पक्ष्यांच्या आवाजात संध्याकाळ भारावून जायची. घाटातील वळणं चालणाऱ्याला आव्हान द्यायची. लहानपणी मी सगळं अनुभवलं आहे. पण परवा एक दिवसासाठी गेलो आणि स्मृतिपटलावरील ते चित्र साफ पुसून आलो. कारण आता खंडाळा पार बदलला आहे. तेथेही गर्दीच गर्दी. झाडांची प्रचंड प्रमाणात कत्तल झाली आहे. वस्ती बेसुमार वाढते आहे. जेथे पहावे तेथे घरे उभी रहताहेत. येथेही बिल्डर्स घुसले आहेत. नाक्या-नाक्यावर बाण दाखवले असून झुम बिल्डर्स, डायमंड बिल्डर्स, रवि बिल्डर्स, रायवुड बिल्डर्स इत्यादी पाटया लागल्या आहेत. पूर्वी नजर टाकली की रंगीबेरंगी फुलांचे ताटवे दिसायचे पण आता चौफेर बांधकामे दिसतात.

मुक्काम अल्पच असल्याने हॉटेलात जेवायचे ठरले. मी एकटा असलो की जेवणाची कधीं फिकीर करत नाही. किंवहुना जेवतच नाही. कोणत्याही बकाल हॉटेलात जाऊन सटरफटर खायचे आणि विमानतळावरील टॉर्चप्रमाणे चौफेर नजर टाकायची हा माझा नेहमीचा उद्योग. पण त्या दिवशी बायको, मुले आणि एका स्नेह्याचे कुटुंब बरोबर होते. तो स्नेही उच्चवर्गीय असल्याने जरा वचकूनच हॉटेलात जेवणाचे ठरवले. मस्तपैकी जेवण होणार म्हणून आम्ही सगळे खूष होतो. कोणत्या हॉटेलात जायचे यावरही आम्ही अर्धा

तास स्वादिष्ट चर्चा केली. आणि अखेर खंडाळ्यातील एल. ताज हॉटेलात जाण्याचे ठरले. आम्ही रुबाबात हॉटेलच्या दरवाज्याशी गाडी लावली. अपेक्षा ही होती की हॉटेलचा दरवान गाडीचा दरवाजा उघडून सलाम ठोकेल आणि मालक या म्हणून आमचे हार्दिक स्वागत करेल. पण त्या दिवशी आमची खाण्याची मिजास अशी काय उतरली की तो दिवस मी जन्मात विसरणार नाही. एल. ताजमध्ये आमच्याकडे कोणी ढुंकून पाहिले नाही. कारण एकही टेबल रिकामे नव्हते आणि बाहेर दोन कुटुंबे वेटिंग होती. येथे आमचा अहंगड दुखावला गेल्याने आम्ही तेथून 'नवताज'वर मोर्चा वळविला. तेथेही आत शिरायला जागा नव्हती. आम्ही थांवायला तयार नव्हतो. म्हणून गाडी काढली आणि थेट लोणावळ्याच्या 'प्लाझा' हॉटेलमध्ये रुबाबात दाखल झाली. तेथेही खाण्यासाठी पैसेवाल्यांची प्रचंड गर्दी उसळली होती. आता मात्र आमची तोंडे उतरत चालली होती. रस्ता ओलांडला आणि समोरच्या 'रिगल' आणि 'पितळे'या दोन हॉटेलात हळूच डोकावून पाहिले. सगळे जग बिर्याणी चिकनवर तुटून पडले होते. तेथेही आम्हाला एन्ट्री नव्हती. आम्ही अवमानित तर झालो होतोच पण शिवाय आमच्या अहंगंडालाही धक्का पोहोचला होता. पण आता पोटातही कावळे ओरडायला लागले. होते वायका-मुलांच्या कपाळावरील वैतागाच्या रेषा स्पष्ट दिसू लागल्या होत्या. आमच्याही पोटात कावळ्यांची परिषद सुरू झाली होती. त्यामुळे आमचा दर्जा वगैरे विसरून आम्ही दुय्यम हॉटेलात जाण्याचा अवघड निर्णय घेतला.हे गुलीस्तान अनेक वाचकांच्या परिचयाचे असेल. कारण बॉम्बे-पुना टॅक्सी चहासाठी त्या हॉटेलच्या दारात थांबतात. हॉटेलच्या दारात पोहोचताच पोऱ्याने सांगितले'जगा नही, आधा घंटेके बाद आना.'आणि त्याच वेळी त्याने पलीकडील 'डायमंड' हॉटेलची शिफारसही करून टाकली. त्यावेळी माझ्या डोक्यात चांगलेच डायमंड चमकले. शेवटी आम्ही आमचा दर्जा विसरून एका थर्डक्लास पत्राशेडमध्ये फोर्थक्लास जेवण जेवलो.

हा अनुभव मोठा विचित्र आणि बरेच काही सांगून जाणारा होता.

पण तो अद्यापही पूर्ण झाला नव्हता. जेवलो, थोडी विश्रांती घेतली आणि रात्री आठ वाजता मुंबईत पोहोचलो. एअर पोर्टला एक छोटेसे काम होते ते आटोपले आणि पुन्हा बाहेरच जेवायचे ठरवले. सर्वच भुकेले असल्याने बाजूच्या पॉश एअर पोर्ट हॉटेलात गेलो. त्या हॉटेलमध्ये बसण्यास पुरेशी जागा नसल्याने खंडाळ्याची आठवण होऊन आम्ही बाहेर पडलो आणि दादर हक्काचे ठिकाण असल्याने तेथील एखाद्या चांगल्या हॉटेलमध्ये जेवायचे ठरले. हे हॉटेलचे दर सहसा कोणाला परवडणारे नसतात. पण माझा मित्र अशा वेळी पैशाचा विचार करत नाही. सेनाभवनाच्या समोर 'नेवुला' नावाचे एक चांगले हॉटेल झाले आहे. आम्ही गाडी लावून आंत शिरलो पण एकही जागा नव्हती. बाहेर खुर्च्या टाकून आठ-दहा माणसे वेटिंग होती. आमच्या डोळ्यांसमोर ती खंडाळ्याची खोल दरी उभी राहिली. थांबण्यात अर्थ नव्हता म्हणून दादर टी. टी जवळील नेहमीच्या 'प्रितम'ला गेलो. पण तेथे गाडीतून उतरावे लागले नाही. कारण प्रितमच्या बाहेर टी. व्ही. वरील सिनेमा पाहून आलेली जवळ जवळ पंधरा-वीस माणसे उभी होती. आम्ही सारे एकाच मनःस्थितीत सापडलो होतो पण चेहऱ्यावर काही दाखवत नव्हतो. सर्वजण गप्पगप्प होते. मग आमची हॉटेल भ्रमंती सुरू झाली. वरळीच्या 'कॉर चिमणी'त जागा नव्हती. लिओचे 'फ्लोरा' तुडुंब भरले होते. आम्हीही हट्टाला पेटलो होतो. खूप थकलो होतो आणि अशा वेळी डोक्याला हा ताप होता. शेवटी आम्ही 'पूनम' या आलिशान हॉटेलात शिरलो. आता त्याचे 'व्हिलेज'मध्ये रूपांतर झाले आहे. त्यांनी खरोखरच एक छोटे गाव उभे केले असून तेथे खाण्याची व्यवस्था आहे.पण त्या व्हिलेजच्या दारातही माणसे ताटकळत होती. अखेर आम्ही बाजूच्या 'कॉफी शॉप'मध्ये शिरलो आणि प्रत्येकी तीस रुपयाची करी राईस खाऊन ढेकर देत बाहेर पडलो.

हा साराच अनुभव मोठा चक्रावून टाकणारा होता. माझ्या डोक्यात विचारांचा कल्लोळ उडाला. गरीब आणि श्रीमंत यांच्यात मी भेद मानणारा नसलो तरी श्रीमंतांचा हेवा मी कधीच केला

नाही. किंबहुना गरिबी आणि श्रीमंती हा भेदच माणसाला गतिमान ठेवत असतो.मी कारकून असल्याने माझी मिळकत मर्यादित आहे.पण एखाद्याने उद्योगधंद्यात भरपूर पैसा केला तर त्यात वावगे असे काहीच नाही. मोठमोठा खर्च करणारी माणसे मी जवळून पाहिली आहेत. पण त्यांच्या करण्याची शान असायची, माझे एक मामा होते. अफाट खर्च करायचे पण एकटे कधीच जेवायचे नाहीत. चार चौघांना खायला घालण्यात त्यांना समाधान वाटायचे. गिरगावात डॉ. प्रभाकर कोठारे होते. भारतीय क्रिकेट टीमवरोवर साऱ्या गावाला घरी पार्टीला बोलवायचे. त्या धोकाला खानदानीची झालर होती. पण अलीकडे काही लोकांच्याकडे इतका गडगंज पैसा झाला आहे की तो खर्चावा कसा याची त्यांना विवंचना लागली आहे. त्यातूनच या शहरात समाजापासून दुरावलेला एक वेगळा वर्ग तयार आहे. त्या नाटकात चूल कधीच पेटत नाही. व्हि. डि. ओ. वर चित्रपट पाहून झाला की हॉटेलात जेवायचे हा त्या नाटकातील अखेरचा प्रवेश असतो. ही कुटुंबे दिवसाला बाराशे बाराशे रुपये फक्त जेवणावर खर्च करतात. त्या हॉटेलात करी राईस तीस रुपये पडते, चिकन मखनवाला पंचवीस रुपये पडतात, चहाचं कप बारा रुपये, कॉफी पंधरा रुपये, सँडविच सव्वीस रुपये, सूप पंधरा रुपये, सॅलाड आठ रुपये हे भाव असतात. मनाला येतील ते पदार्थ मागवले जातात. अर्धे खाल्ले जातात. अर्धे टाकले जातात. शेवटी प्रत्येकी चोवीस रुपयाचा आईस्क्रीम मागविला जातो. एवढेही करून खिशातील वजन कमी होत नाही म्हणून वेटरला तीस-पस्तीस रुपये टिप दिली जाते.उरलेल्या पैशातून प्रत्येकी दोन रुपयाचे पान खाल्ले जाते.

हाच वर्ग लग्न संमारंभाच्या फक्त सजावटीवर चार चार लाख रुपये खर्च करतो. नवरा नवरीसाठी फक्त फुलांचा मांडवासाठी तीस हजार रुपये देतो. दहा हजार रुपयांचे अत्तर शिंपडतो. या देशातील एका धनाढ्य घराण्यातील एका मुलीच्या लग्नात मी ते दृश्य पाहिले आणि अवाक् झालो. तिच्या अंगावरील साडी एकोणीस हजाराची होती. आहेरात हिऱ्याचे लाखालाखाचे अकरा सेट पहारेकऱ्यां-

च्यात होते. शिवाय साडचा, अंगठचा आणि गळचातील हार चमकत होते. आणखी वर्णन करत नाही. कारण चार पाने येथेच भरली... पानाला पाच पैसे मोजावे लागतात...

# पार्टी

विधानसभा आणि महापालिकेत केव्हा कोणत्या विषयावर वादंग माजेल हे सांगता येत नाही. तसाच एक वाद महापालिकेच्या वर्तुळात या महिन्यात कमालीचा गाजला. आपले वृत्तपत्रवाले काय, त्यांना कोणताही विषय मिळाला की ते हेडलाईन आणि अग्रलेख सजवतात. त्यामुळे तो वाद वृत्तपत्रातूनही गाजला. महापालिकेचे एक उपायुक्त श्री. प्रविण कामदार यांनी आपल्या सहकाऱ्यांना वरळीच्या पुनम हॉटेलमध्ये पार्टी दिली. त्या पार्टीला प्रवीणभाईंच्या पाच-पन्नास सहकाऱ्यांप्रमाणे कमिशनर श्री. सुकथनकरदेखील हजर होते. पण त्यामुळे जणू या शहरावर आभाळ कोसळले. वृत्तपत्रात त्या पार्टीच्या हेडलाईन्स आल्या. महापालिकेत त्यावर कमालीची खडाजंगी झाली. महापालिकेची आर्थिक परिस्थिती खालावलेली असताना अधिकाऱ्यांनी चैन केलीच कशी? अधिकारी पार्टया झोडू लागले तर महापालिकेची प्रतिष्ठा काय राहील? पंचतारांकित हॉटेलात पार्टी करणे अधिकाऱ्यांना शोभले काय? पुनम हॉटेलची मेहरबानी घेतल्याने हॉटेलवर काय मेहरबानी करणार? असे मोठे करमणूकप्रधान प्रश्न चर्चिले गेले. या बौद्धिक चर्चेत महापालिकेला जेवढा खर्च झाला त्याच्या दहाटक्के खर्च कदाचित कामदारांच्या पार्टीवर झाला असेल. पण ती मनोरंजक चर्चा तडकाफडकी संपली. कारण कामदारांनी ती पार्टी स्वखर्चाने केल्याचा खुलासा केला.

मी जर कामदारांच्या जागी असतो तर खुलासा बिलासा काही न करता ती चर्चा तशीच चालू दिली असती. म्हणजे अनेक नको त्या

पाटर्चा उजेडात आल्या असत्या. पार्टीतील ती चर्चा परदेशातही कोणी वाचली असेल तर तेथे आता ते लोक त्या चर्चेवर कौतुकाने चर्चा करत असतील. ते म्हणत असतील की मुंबई म्हणजे केवढे आदर्श शहर! काय त्या महापालिकेचा आदर्श कारभार! केवढी मोठी तेथील सार्वजनिक नीतिमूल्ये! केवळ एका अधिकाऱ्याने पार्टी दिली, आणि तीही स्वखर्चाने, तरी सार्वजनिक मूल्ये ढवळून निघून केवढा मोठा गहजब झाला! तर मग अशा आदर्श शहरात उद्या कोणी लांच घेतली तर केवढे प्रचंड वादळ माजेल इंग्लंडच्या राणीच्या मुलाने एका सेक्सी नटीवर प्रेम करावे किंवा प्रेसिडेंट रिगनच्या मुलाने रांगेत उभे राहून बेकार भत्ता घ्यावा त्याप्रमाणे कामदारांनी पार्टी दिली ही या शहराच्या इतिहासातील जणू एक अभूतपूर्व घटना घडली!

केवळ विरंगुळा म्हणून पार्टीवर वाद झाला असेल तर माझे काहीच म्हणणे नाही. पण त्याला सनातनी बुरखा पांघरला असेल तर मात्र त्याला नम्रपणे जगातील प्रत्येक माणूस हा वस्त्राखाली आणि बुरख्याखालीही नागवा असतो या चिनी म्हणीची आठवण करून द्यायला हवी. अधिकारी, मग तो महापालिकेचा असो अगर सर्वोदय मंडळाचा असो तो माणूस असतो आणि त्यालाही विरंगुळा आणि चैन हवी असते हे नाकारण्याचे धाडस कोणीही करू नये. कारण जगाच्या पाठीवर त्याला कोणीच अपवाद नाही. जो मी वस्त्राखालीही नागवा नाही असे म्हणतो तो ढोंगी आहे असे चक्क समजावे. अशा विरंगुळ्याचा माणूस नेहमी भुकेला असतो. स्पष्ट सांगायला हरकत नाही. आम्हा शिवसैनिकांच्या बैठकी होतात तेव्हा आम्ही मस्तपैकी जेवतो. त्या बैठकीत पोलिसांच्या अत्याचारांपासून ते उपासपोटी गिरणी कामगारांपर्यन्त सर्व प्रश्नांवर गंभीर चर्चा होते. पण नंतर आम्ही हंसत खेळत जेवतोच. आम्हीच कशाला, परवा बाबासाहेब भोसल्यांनी गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर 'वर्षा'वर बोलाबिलेल्या बैठकीत देखील भोजनच होते दूर कशाला महापालिकेचा अर्थसंकल्प तुटीचा असल तरी दरवर्षी निवृत्त होणारे समित्यांचे

अध्यक्ष आपल्या सहकाऱ्यांना पार्टी देतातच.

पार्टी ही एक अद्‌भुत जादू आहे. तिच्याकडे एकाने दुसऱ्याला केवळ खायला घातले अशा दृष्टीने पहाणे मूर्खपणाचे आहे. पार्टी ही माणसांना जवळ आणते, माणसांचा खराखुरा परिचय करून देते, एकमेकांच्या विषयीचा गैरसमज दूर करते आणि शिवाय माणसाला ताजेतवानेही करते. त्यामुळे एकत्र येण्याचे पार्टी हे प्रभावी माध्यम केवळ कामदारांनीच नव्हे तर जगाने स्वीकारले आहे. अगदी भारत-पाक युद्धानंतरही सिमल्याला जेव्हा इंदिराजी आणि भुत्तो प्रथम भेटले तेव्हा प्रथम भोजन समारंभ झाला आणि नंतर सिमला करार झाला. अधिकाऱ्यांच्या पार्टीतही एक विलक्षण किमया असते. अशा पार्टीत मी नाना रूपे पाहिली आहेत. एरवी चेहऱ्यावरील भाव गंभीर ठेवणारा अधिकारी पार्टीत सरदारजीवर विनोदामागून विनोद करतो. एकादा कणखर अधिकारी पार्टीत बेबंद नृत्य करतो. जबर-दस्त दरारा असलेले पोलीस अधिकारी मी पार्टीत कमालीचे माण-साळलेले पाहिले आहेत. प्राध्यापक राम जोशी उपकुलगुरू म्हणून थोडे रिझर्व असतात पण कोणत्याही पार्टीत मात्र विद्यार्थ्यांपेक्षाही जॉलीगुड वावरतात. अंतुलेतील अंतुले आणि गुंडूरावातील गुंडूराव मला प्रथम दिसला तो अशाच एका पार्टीत चेष्टामस्करऱ्यांना ऊत आला असताना. आपले काही जुने साहित्यिक चेहऱ्यावर नेहमी चौकोन ठेवून वावरतात याचे कारण ते पार्टीला कधी जात नाहीत जबाबदाऱ्या आणि चिंता सगळ्यांना असतात पण त्याही केव्हातरी झटकायच्या असतात म्हणजे माणूस जबाबदाऱ्यादेखील हसतमुखाने पार पाडतो. शंकरराव चव्हाणांना मी हसताना फक्त पार्टीलाच पाहिले इंदिराजींचाही कचेरीतील आणि पार्टीतील मूड वेगवेगळा असतो. आपले इंजिनिअर बोधे, एक बुद्धीवादी तंत्रज्ञ. अनेक कट-कटट्या समित्यांची डोकेदुखी त्यांना असते. पण केव्हाही पहा, बोधे सात मजली खळखळा हसत असतात. त्यांच्या त्या मस्त मूडबद्दल अनेकांना आश्चर्य वाटते. पण मला ते गुपित माहीत आहे. बोधे कोण त्याही पार्टीचे आमंत्रण कधीही नाकारत नाहीत.

मी कधी कधी नेव्हीच्या पार्टयांना जातो. त्यावेळी तेथील मोठ–मोठ्या अधिकाऱ्यांचा प्रचंड उत्साह आणि उचंबळणारा आनंद पाहिला की कराचीवर हल्ला करून ते बंदर उध्वस्त करणारी हीच ती 'क्रूर' माणसे काय असा संभ्रम निर्माण होतो. सभापतींच्या जागी बसून आमदारांना फटकरणारे रा. सू. गवई आणि पार्टीत धमाल रंग भरणारे गवई हेही एक आहेत. आपले चीफ सेक्रेटरी साठे होते. त्यांचाही पार्टीतील मूड वेगळाच असायचा, वसंतराव साठेनाही भेटावे तर एखादा पार्टीलाच.

राजकारण्यांच्या भाषेत सांगायचे म्हणजे समाजवादी समाजरचनेचे पार्टी हे सर्वात अधिक प्रभावी माध्यम आहे. तेथे हुद्दा नाही भेदाभेद नाही. मंत्री आणि सचिव एका पातळीवर येतात. प्रिन्सिपॉल आणि प्राध्यापक एका टेबलावर बसतात. मॅनेजिंग डायरेक्टर आणि सेक्रेटरी एकत्र बॉलडान्स करतात आणि कलेक्टर कारकुनाच्या ग्लासाला ग्लास लावून चिअर्स बोलतो. या चिअर्समध्येदेखील एक मोठे खानदान आहे. कोणत्याही पार्टीत कोणाला थोडीशी प्यावीशी वाटली तर झिंगणार नाही या बेतानं जरूर प्यावी. घेणारे सगळे घेतातही. पण दुसऱ्याने घेतली की आपल्या संस्कृतीच्या ठिकऱ्या झाल्या म्हणून बोंबलतात. हा दांभिकपणा आता पुरे झाला. अधिकारी मग तो महापालिकेतील असो, पोलिसातील असो, अगर कस्टममधील असो तोही माणूस आहे आणि त्यालाही मन आहे. त्याप्रमाणे त्याला कधी नाटक पहावेसे वाटते त्याप्रमाणे कधी नाटकात कामदेखील करावेसे वाटते. चेंज हा जीवनाचा आत्मा असतो. माणसाला त्याची गरज असते. म्हणून छगन भुजबळ सिनेमात काम करतात तर मोहन नाईक हुतुतूत रमतात. दासबुवा परूळेकरांनी नाटकात काम केले तर पु. ल. देशपांड्यानी 'गुळाचा गणपती' काढला. शाहू मोडकांनी विश्वकल्याण योजना राबवली तर बाबूराव पटेलनी डॉक्टरी केली. हा चेंज माणसाला नेहमी उत्साही आणि आनंदी ठेवतो.

पण सर्वांनाच सर्व आनंद परवडत नाहीत. परवडते ती फक्त पार्टी

आपआपल्या ऐपतीप्रमाणे. लहान मुलांना भातुकली परवडते. विद्यार्थ्यांना गुरुवारचे चणे परवडतात. कारकुनांना वेफर सामोसे परवडतात. अधिकाऱ्यांना हॉटेल परवडते तर वरिष्ठ अधिकाऱ्यांना अधूनमधून तारांकित हॉटेलही परवडते. पार्टीसाठी माणूस लग्न, वाढदिवसासारखे दिवस शोधत असतो. कारण विरंगुळा हा धकाधकीच्या जीवनातील माणसाचा श्वास असतो. त्याला कामदार अपवाद नाहीत आणि कामदारांवर टीका करणारेही अपवाद असू शकत नाहीत. कारण–

–कारण कामदारांचे सर्व टीकाकार मला यापूर्वीच तशाच कोणत्या ना कोणत्या पार्टीला केव्हा ना केव्हातरी भेटलेले आहेत.

# बाबुराव

शत्रूनीही प्रेम करावे असे दोन बाबुराव या विसाव्या शतकात होऊन गेले. एक बाबूराव अत्रे आणि दुसरे बाबुराव पटेल. सेनाभवनात आचार्य अत्र्यांच्या भाषणांच्या कॅसेटचे जेव्हा उद्घाटन झाले तेव्हा बाळासाहेब ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, मराठी शिकावे तर बाबूराव अत्र्यांच्याकडून आणि इंग्रजीचे पाठ घ्यावेत तर बाबुराव पटेलांच्याकडून. इतके विलक्षण भाषासामर्थ्य या दोन बाबूरावांच्यात आहे. त्यातील एक बाबुराव त्यावेळी हयात होते. पण तेही गेल्या आठवडचात गेले. या दोन्हीही बाबुरावांशी झंझावती संघर्ष होऊनही बाळासाहेबांनी त्यांच्याविषयी काढलेले गौरवोद्गार तिघांच्याही खानदानी मराठी संस्कृतीचे प्रतीक आहे.

बाबुराव पटेल गेल्याची वृत्तपत्रातील बातमी वाचून मला एका गोष्टीचा फार खेद वाटला. तो म्हणजे पहाडाएवढे कर्तृत्व असलेल्या महाराष्ट्राच्या या आक्रमक चित्त्याच्या मृत्यूचे वृत्त जेवढचा प्रमाणात आणि ठळकतेने प्रसिद्ध व्हायला पाहिजे होते तेवढे झाले नाही. बाबुरावांच्याविषयी अखेरपर्यंत अनेकांना वाटणारा मत्सर हे त्याचे कारण असू शकते. पण बाबुराव आयुष्यात कधीच कोणाच्या मेहेरबानीवर जगले नाहीत. त्या माणसाचे काळीज पोलादाचे होते. त्यामुळे आपल्याविषयी कोण काय बोलते याची त्यांनी कधीच पर्वा केली नाही. आपल्याविषयी कोणी दांभिक मृत्यूलेख लिहून गेले असतील तरी त्यांचा स्वभाव ओळखणाऱ्या माणसाला आश्चर्य वाटणार नाही.

अत्यंत हट्टी, डॉमिनेटिंग आणि हेकेखोर स्वभाव यामुळे बाबुरावांनी

जेवढे मित्र कमावले तेवढे गमावले. पण गमावलेल्या मित्रांनीही प्रेम करावे असा हा माणूस होता. शिवसेनेने मुंबई बंद केल्यावर बाबुरावांनी मदर इंडियात अद्वातद्वा लिहिले. मग बाळासाहेबांचाच स्वभाव तो, त्यांनी मार्मिकमधून शेरास सव्वाशेर लिहिले आणि त्यातून बाबूराव आणि सुशीलाराणी विरुद्ध बाळासाहेब आणि श्रीकांत हा कटु खटला उभा राहिला. असा एखादा इंटरेस्टिंग खटला उभा राहिला की खरे स्फुरण कोणाला चढत असेल तर ते वकिलाला. त्यातून बाळासाहेबांचे वकील होते अधिक शिरोडकर. मग ते एकदम फॉर्मात आले. पण तरीही दोन मराठी पत्रकारांनी असे एकमेकांविरुद्ध झगडावे असे कोणालाच वाटत नव्हते. बाळासाहेबांना नव्हेच नव्हे आणि...

... आणि ग. वा. बेहेरेंना या प्रकरणाची फार खंत लागून राहिली होती. जेव्हा जेव्हा भेटायचे तेव्हा तेव्हा हा विषय काढायचे. तसा शिवसेना आणि बेहेरेंचा छत्तीसचा आकडा. पण वैराचे राजकारण त्यांनी कधी केले नाही. बाबुरावांचा आणि माझा जुना परिचय असल्याने माझ्या सहाय्याने त्यांनी या प्रकरणात मध्यस्थी करायचे ठरविले. स्वाभिमानाला धक्का लागणार नसेल तर बाळासाहेबांचीही त्याला हरकत नव्हती. त्याप्रमाणे आमची पहिली बैठक माधव मनोहरांच्या घरी झाली आणि मी बेहेरे बिचकतच बाबूरावांच्याकडे गेलो. बाबूराव हट्टी भूमिका घेतील असे वाटले होते. पण अनपेक्षितपणे त्यांनी समजूतदारपणाची भूमिका घेतली आणि चेष्टेने 'थांब, पुरावा म्हणून तुझा फोटो काढतो' म्हणत खरोखरच माझा फोटो खेचला, पण दुसऱ्या दिवशी वकिलांनी काय सल्ला दिला कोणास ठाऊक. बाबूरावांनी मला फोन करून सांगितले, चाललाय खटला ते चालू द्या.

फार थोडी माणसे या पृथ्वीतलावर परमेश्वराचा हात मस्तकावर घेऊनच जन्म घेतात. बाबूराव हे त्यांपैकी एक होते. त्यामुळे सामान्य माणसाशी त्यांची तुलना करता येणार नाही. त्या माणसात असलेली

एक वेगळी शक्ती मी फार पूर्वीपासून पाहात आलो आहे. बाबुरावांची पहिली पत्नी धुरंधर ही आमच्या पाठारे प्रभू ज्ञातीतील असल्यामुळे अधून मधून त्यांच्याकडे गेलो तर माझ्या ज्ञातीवरून ते फिरक्या घेत. परभीजेवण करायला सांगायचे. त्यांनी सुशीलाराणींशी जो दुसरा विवाह केला तो आपल्या पहिल्या पत्नीच्या संमतीने केला. आणि बाबूरावांच्या दोनही सहचरीं शेवटपर्यन्त आश्चर्यकारकरीत्या अतिशय गुण्यागोविंदाने नांदल्या.

सुशिलाराणी हाही संसारशास्त्रातील एक चमत्कार मानावा लागेल. या स्वरूपसुंदरींनी बाबुरावांशी एकनिष्ठ राहून जो त्याग केला त्याचा आदर्श सर्व प्रथमपत्नींनी ठेवण्यासारखा आहे. बाबूराव आपला प्रचंड व्याप केवळ सुशीलाराणींच्या सहाय्याने संभाळत होते. त्यांचे वाचनालय, त्यांचा मदर इंडिया, त्यांचा संसार, त्यांच्या लहरी, त्यांचे सार्वजनिक जीवन सुशीलाराणीने समर्थपणे पेलले. शी वॉज़ दी टॉवर ऑफ स्ट्रेन्स इन गिरनार. पण बाबुरावांच्या करारीपणामुळे, आंब्याच्या झाडाखाली इतर झाडांची वाढ खुंटते त्याप्रमाणे सुशीलाराणींच्या गुणांची फुले संपूर्णपणे कधीच बहरली नाहीत. यानंतर कदाचित ही स्त्री स्वतःचे तेज अधिक प्रभावीपणे प्रकट करेल असा माझा कयास आहे.

बाबूरावांच्या व्यक्तिमत्त्वाला न शोभणाऱ्या त्यांच्यात दोन गोष्टी होत्या. एक म्हणजे त्यांना असलेले ज्योतिषाचे वेड आणि दुसरे म्हणजे होमिओपाथ औषधांचा त्यांनी केलेला प्रचार. बाबुराव ज्योतिषशास्त्रात पारंगत होते हे फार थोड्यांना माहीत असेल. त्यांच्यातील असलेल्या फटकळपणामुळे ते कोणतेच भविष्य पोटात ठेवत नसत. जीवनाच्या नभांगणात भराऱ्या मारणाऱ्या संजयला मृत्यू येईल असे भविष्य वर्तवणारा जगाच्या पाठीवरील बाबुराव हा एकमेव ज्योतिषी आठ मार्च १९७७ रोजी त्यांनी चक्क इंदिराजींना पत्र लिहून संजय हा अपघातात मृत्यू पावणार असल्याने त्याला दोन वर्षे विमान आणि मोटार स्वतः चालवू देऊ नका असे कळविले होते. १९७८ एप्रिलच्या अंकात सवाल जबाबात बाबूरावांनी प्रश्नकर्ते नितीश रेळे आणि

त्यापूर्वी इंदर दिवाण यांना संजयच्या भवितव्याबद्दल एका वाक्यात 'ही वुईल डाय इन ॲक्सिडंट' असे रोखठोक उत्तर दिले होते.

आपल्या दूरदृष्टीमुळे या माणसने आयुष्यातील अनेक वादळे आभाळाप्रमाणे पचविली. प्लॅनिंग हा या माणसाचा स्वभाव-विशेष होता. त्यामुळे संजयच्या मृत्यूकडे इंदिराजींचे लक्ष वेधताना त्या माणसने स्वतःच्या मृत्यूकडेही दुर्लक्ष केले नाही. बाबूरावांना स्वतःचा मृत्यू अगोदरच दिसला होता. तशी आवराआवर करण्यासारखे काही नव्हते. पण कोर्टकचेऱ्या हे बाबूरावांचे जणू वस्त्र होते. टेनीस खेळावे त्याप्रमाणे बाबूराव आयुष्यभर खटले खेळत राहिले. इट सिम्स ही वॉज एन्जॉईन्ग दी केसीस. त्यांच्यामागे या कायद्याच्या भानगडी पेलणारी समर्थ व्यक्ती नव्हती. म्हणून बाबूरावांनी स्वतःसाठी उलटलेल्या पत्नीला सुशीलाराणींना एल. एल. एम. चा अभ्यास करण्यास सांगितले. आणि सुशीलाराणीनी बाबूरावांच्या मृत्यूपूर्वी आठ-वडा अगोदर एल. एल. एम. च्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिल्या येऊन त्यांच्या चाहत्यांना एक सुखद धक्का दिला.

पण तो पटेल कुटुंबातील शेवटचा सुखद धक्का ठरला. त्यानंतर बाबूरावांच्या जीवनाचा धक्का बसला. एक तेजस्वी पण लहरी आणि तेवढेच खानदानी व्यक्तिमत्त्व भूतकाळात गेले. ४ एप्रिलला आपल्या वाढदिवशी वाचकांना खाना देणारा संपादक यानंतर होणार नाही. वडिलांच्या पुण्याईवर जगणे नको म्हणून 'पाटील' आडनावाऐवजी 'पटेल' नावाने वावरणारा विक्षिप्त माणूस पुन्हा जन्माला येणार नाही. 'बाळ, आय ॲम प्राऊड ऑफ यू' म्हणून शिवसेनाप्रमुखा-सारख्या दोस्ताच्या पाठीवर हात मारून त्यांच्याशीच खटले लढ-णाऱ्या विक्षिप्तपणाचे कोडे आता उलगडणार नाही. घोडचांच्या प्रमा-णेच इंग्रजी भाषाही हाकणारा तो शब्दप्रभू आता दिसणार नाही. संस्थाने खालसा झाली तरी गिरनारचा हा राजा कधीच कोणाला शरण गेला नाही. पण अखेर तो मृत्यूला शरण गेला आणि... आणि मागे राहिला फक्त गिरनारचा राजवाडा आणि राणी सुशीला.

# पोषाख

परवाच्या शाखाप्रमुखांच्या सभेत बाळासाहेबांनी हाती एक शुभेच्छा कार्ड दिले. दरवर्षी दिवाळीला मित्रमंडळीची शेदोनशे कार्डे येतात. त्यावरील चित्र मी आतुरतेने पहातो आणि तेवढ्याच आतुरतेने पाठवणाऱ्याचे नाव वाचतो. बहुतेक सर्व कार्डे ठराविक साच्याची असतात. 'हॅपी दिवळी' किंवा 'हॅपी न्यू इअर' यापलीकडे त्यावर काही लिहिलेले नसते. अपवाद म्हणून यंदा 'ॲप्ट'तर्फे काढण्यात आलेल्या कार्डांवर काही कल्पक शुभेच्छा असलेल्या आढळल्या. आलेल्या कार्डांपैकी बरीच कार्डे मंत्र्यांची किंवा महापालिकेच्या विविध समित्यांच्या अध्यक्षांची असतात. त्यांना छपाई आणि टपालखर्च मिळत असल्याने त्यांच्याकडे भरपूर शुभेच्छा असतात. काही कार्डांना पोस्टेज कमी लावल्याने वीस पैसे तीस पैसे, द्यावे लागतात. प्रजापती नावाचा माझा एक मित्र होता. काही वर्षांपूर्वी वारला. तो म्हणजे एक वल्ली होता. त्याची शुभेच्छा कार्डे म्हणजे धमाल असायची. स्वतःच्या हाताने तो ती तयार करायचा. दादरमधल्या अनेक दुकानदारांना तो शुभेच्छा पाठवायचा की 'पुढील दिवाळीपर्यंत आपले दिवाळे न निघो ही शुभेच्छा!' आम्हा अनेक मित्रांना 'दीपावली शुभेच्छा! फराळास निमंत्रण आल्यास जातीने शुभेच्छा देईन!' सर्व प्राध्यापकांना त्यांनी एकदा दीपावलीची शुभेच्छाकार्डे स्टँप लावल्याशिवाय पाठवली. त्याने लिहिले होते 'कृपया पोस्टेज भरावे. त्याच मी उलट टपाली शुभेच्छा समजेन. धन्यवाद!'

या कार्डाच्या गंमती मी पुन्हा केव्हातरी सांगेन. कारण आजचा

विषय वेगळा आहे, बाळासाहेबांनी आम्हा शिवसैनिकांना दिलेल्या भावनोत्कट कार्डावर खालील मजकूर लिहिलेला आहे.

जय महाराष्ट्र

'आपण प्रत्यक्ष येऊन आपल्यापैकी असंख्यांनी भेटकार्डे पाठवून माझे हार्दिक शुभचिंतन केले. माझ्या हातांनी घेतले मात्र, दिले काहीच नाही. बांधवांनो, या हातांना आपणा सर्वांना खूप काही द्यावेसे वाटते. पण हे हात मर्यादेच्या शृंखलात अडकलेत. तुम्ही जेव्हा माझे शुभ चिंतिता त्यावेळी या शृंखला गळून पडतात. या हातांना एक प्रकारचा जोम येतो. त्या जोमाने हात उंचावतात ते तुम्हाला आशीर्वाद देण्यासाठीच. विजयादशमीच्या दिवशी शिवतीर्थावर जो व्यवहारी समाजवादाचा पुकार झाला त्याला आपल्या सहकार्याने यश येऊन तुमच्या जीवनात फक्त सुखाचेच क्षण देण्याचे पवित्रकार्य या हातांनी घडो हीच जगदंबेच्या चरणी, शिवचरणी प्रार्थना ! आपला नम्र–बाळ ठाकरे.'

त्या मजकुरापेक्षाही त्यावर असलेल्या फोटोने माझे लक्ष वेधून घेतले. तो फोटो कोणा व्यक्तीचा नव्हता फक्त शिवसेनाप्रमुखांच्या पसरलेल्या दोन हातांचा होता. त्या हातावरील कोटांच्या बाह्यांचा छोटासा भाग त्या छायाचित्रात होता. सफारी सुटाच्या फक्त पंजाकडील बाह्यांवरून त्या चित्रात संपूर्ण बाळासाहेब नजरेसमोर उभे राहत होते. बाळासाहेब अधूनमधून सफारी सूट घालतात. हा सूट त्यांना विशेष शोभून दिसतो. पण तरीही ते नेहमी लेंगा झब्ब्यातच वावरतात. कारण कामाच्या घाईगर्दीत माणसाला पोशाखीपणा परवडणारा नसतो. मी पोशाखाच्या बाबतीत नेहमी गबाळाच राहतो. ऑफिसमध्ये जाताना नियम असल्यामुळे सूट घालावाच लागतो. पण तो घातल्यावरही मोज्यात अडकलेल्या पँटकडे वाटेत कोणीतरी लक्ष वेधते.

वास्तविक पाहाता पोशाखच माणसाची प्रतिमा अधिक घडवत असतो. अशी अनेक माणसे मला माहीत आहेत, की ती बुद्धीने सुमार

असली तरी रोज कडक इस्त्रीशिवाय कपडे घालत नाहीत. त्यांपैकी काही माणसं तर एकवेळ आंघोळ करणार नाहीत पण ड्रेस मात्र रुबाबदार घालतील. काहीजण तर घरातही रुबाबी पोशाखातच वावरतात. मंत्री आणि पक्षाचे अध्यक्ष यांच्या पोशाखाची वैशिष्ट्ये असतात. बी. पी. सी. सी. चे अध्यक्ष मुरली देवरा म्हणजे सतत कोणत्यातरी कापड गिरणीचे सुटाचे मॉडेल असल्यासारखेच भासतात. जनता पार्टीचे अध्यक्ष राजाराम बापू पाटील यांचा पोषाख तर राहोच पण ते टोपीचे टोकही कधी वाकडे झालेले नसते. समाजवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार मात्र पोषाखाची विशेष काळजी घेत नाहीत. पूर्वी ते कधीकधी रुबाबदार सफारी सूट घालायचे. पण आता वाढत्या कापडाचा खर्च परवडत नसल्याने कदाचित त्यांनी सूट वापरण्याचे बंद केले असावे. मंत्री, आमदार असताना कोणत्याही पोशाखात वावरतात. पण मंत्री झाल्याबरोबर एकदम त्यांच्या गळ्याभोवती बंद कोट येतो. वसंतदादा मात्र याला अपवाद आहेत. घरात तर ते गंजीफ्राक घालूनच वावरतात. रामराव आदिक म्हणजे पोषाखाच्या बाबतीत एक मस्त माणूस. त्यांचे मापही स्थिर राहिल्याने सफारी त्यांना फिट्ट बसतो. त्या कोटाच्या खिशावर गुलाबाचे फूल लावायलाही ते कधी विसरणार नाहीत. इतकेच नव्हे तर कोणी त्या फुलावरून विचारले की त्यालाही ते खिशातून दुसरा गुलाब काढून देतात. त्यांच्या खिशातच बहुतेक गुलाबाचे रोपटे असावे. मंत्री नसले तरी डॉक्टर शेरेकरसारखे अपवादात्मक आमदार आपल्या पोषाखाबाबत नेहमी दक्ष असतात. ताराबाई वर्तकही रोज नव्या स्टार्च साडीची घडी मोडत असाव्यात, महापालिकेत असताना डॉ. रविंद्र कुलकर्णी माझे नेहमी लक्ष वेधून घेत. त्यांच्या पिवळसर सफारी सुटावरही कधी सहानसा डागही आढळला नाही.

माणसाचे व्यक्तिमत्व आणि स्वभावही पोषाखावरून ओळखता येतो असे म्हणतात, नेहरू घराणे पोषाखाबाबत सतत ख्यातनाम राहिले आहे. राजीव कोणत्याही पोषाखात राजबिंडा दिसतो. इंदिराजी ज्या राज्यात जातात त्या राज्यातील पोषाखात वावरून

लोकांची मने जिंकतात. महाराष्ट्रात त्या नऊवारीत वावरतात. तर पंजाबात सलवार खमीस घालतात. काश्मीरात काश्मीरी बनतात तर कधी आदीवासीच्या पोषाखात नृत्य करतात. पंडीतजींनी परदेशात गेल्यावर सूट घातला पण इंदिराजी मात्र परदेशात कधीही अभारतीय पोशाखात वावरत नाहीत. अलिकडेच त्या अमेरिकेत होत्या तेव्हा रोज स्थानिक वृत्तपत्रात त्यांनी वापरलेल्या साडीवद्दल चौकट यायची.

पोषाखावरूनच माणसाची जात आणि धर्म ओळखता येंतो, त्यामुळे माणसाने पोषाखाचा सदैव अभिमान वाळगला आहे. पण आता व्यक्तिमत्त्वापेक्षा व्यवहाराला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे, त्यामुळे पूर्वीच्या पगडया आणि बाराबंदी कोट गेले आणि बुशशर्ट पँन्ट आली. गेल्या पाडव्याला आम्ही पाठारे प्रभूंनी त्या जुन्या पोषाखात एक भव्य शोभायात्रा काढली होती त्यावेळी माणसाचा चेहरा कसाही असला तरी पगडीने कसा भारदस्त दिसतो याचे प्रत्यंतर आले. आणि पूर्वीच्या काळात टिळक–आगरकर पगडीच का घालत होते याचे उत्तरही सापडले. काळानुसार पगडयाही गेल्या आणि टोप्याही गेल्या. मुलीही सोयीसाठी साडीऐवजी पंजाबी ड्रेस घालू लागल्या.

पोषाख हा हवामानावरही अवलंबून असतो. उत्तर प्रदेशात गरम कपडयांबरोबरच अद्याप कानटोप्याही घालतात. मात्र दक्षिणेतील लोक लुंग्या का घालतात याचे कोडे मात्र अद्याप कोणाला उलगडले नाही. अनेकदा पोषाख हा व्यवसायाशी संलग्न असतो. वकिलाला काळा कोट घालावा लागतो. पण डॉक्टर मात्र पांढऱ्या पोशाखात वावरतात. गबाळा पोषाख हा शिक्षक वर्गाचा सिंबॉल बनला आहे. या पोषाखावरूनच युनिफॉर्मची कल्पना निघाली आणि ती पोलीसांपासून ते थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. प्रत्येकाला स्वतःच्या पोषाखाचा कडवा अभिमान वाटत असतो. शिखांनी तर आपल्या पगडीच्या रक्षणासाठी लंडनच्या कोर्टात दावा केला. मुंबईतील अनेक हॉटेलात अद्यापही सूट आवश्यक असतो. काही कंपन्यांत टाय वापरणे सक्तीचे असते. माझ्या मते हा सर्व माणसाच्या भावनेचा खेळ आहे.

पोपाखाचा अभिमान वाटावा अशी फक्त एकच जमात नागपूरकडील भामरागड जिल्ह्यात रहाते.त्यांचा पोपाखी स्वाभिमान कोणीच हिरावून घेऊ शकणार नाही. कारण– कारण कोणी कपडेच घालत नाही–

# ' चाळा '

माझ्या घरीच माझी एक छोटी बैठकीची खोली आहे. ती माझी अभ्यासिका आहे. घरी भेटायला आलेल्या लोकांनाही मी तेथे भेटतो. माझ्या लिहिण्या-वाचण्याच्या व्यसनाचा तो एक प्रमुख अड्डा आहे. त्या अड्डचात माझी स्वत:ची अशी सात आठशे पुस्तके आहेत. पूर्वी मी पुस्तके फार विकत घेत असे. आता तो उद्योग परवडण्यासारखा नाही. पण त्या काळात मी काही बहुमोल ग्रंथ साठविले आहेत.त्यात भुत्तोच्या चरित्रापासून महात्माजींच्या चरित्रापर्यंत आणि सावरकरांच्या कवितांपासून ते पदनामकोशापर्यंत अनेक पुस्तके आहेत. अनेकदा संदर्भासाठी ती पुस्तके लागत असल्याने त्यांना मी जीवापाड जपतो. कितीही मोठ्या व्यक्तीने मागितले तरी त्यातील कोणतेही पुस्तक घराबाहेर जाऊ देत नाही. काल अशीच एक व्यक्ती माझ्याकडे कामासाठी आली. बसल्या बसल्या त्यांनी एकेक पुस्तक हाताळायला सुरुवात केली. सहज माझे लक्ष गेले आणि माझे डोकेच भडकले. कारण हाताळता हाताळता त्यांनी पुस्तकाच्या कव्हरच्या वरील त्रिकोणी तुकडा फाडला होता. एकूण पाच पुस्तकाच्या कव्हरचे अशा प्रकारे तुकडे उडाले होते. हे करण्यामागे त्याचा काहीच हेतू नव्हता. पण बसल्या बसल्या त्यांनी तो चाळा केला होता.

असा चाळा करणारी माणसे म्हणजे एक संशोधनाचा विषय. कॉलेजमध्ये माझा एक शेरतुकडे नावाचा मित्र होता. बोलायला वागायला सगळा चांगला. अभ्यासही बरा होता. पण त्याचा एक घाणेरडा चाळा म्हणजे बोलता बोलता अधूनमधून तो तोंडातून

थुंकीचा फुगा काढायचा. आम्ही खूप बोलून पाहिले पण शेवटपर्यन्त त्याची सवय काही गेली नाही. मी बी. ए. झालो त्या दिवशी तो शेवटचा माझ्या घरी आला. पण पेढा खाताखातादेखील त्याने प्रथम तोंडातील फुगा काढला आणि नंतर मला काँग्रॅच्युलेशन्स म्हणाला. इतर कोणतेही चाळे आपण सहन करू शकतो,पण घाणेरडे चाळे अनेकदा सहन होत नाहीत. एक थोडेफार नावाजलेले कवी आहेत. त्यांचा चाळा सांगितला तर तुम्ही त्यांच्या कविता वाचणार नाही म्हणून नाव सांगत नाही. पण कवितेची कडवी करता करता ते कवी डोकीवरचा एक एक केस तोडतात आणि दाताने कुरतडतात त्यांच्या या संचालयामुळे एवढ्या कविता करूनही अद्याप त्यांना टक्कल कसे पडले नाही याचेच मला आश्चर्य वाटते. माझा एक मित्र आहे. वरचेवर शाखेत येतो. बोलता बोलता दहा दहा मिनिटांनी कानात करंगळी घालतो आणि ती गिरमिटासारखी फिरवतो.कानात काही झाले आहे का, असे विचारले तर नाही म्हणतो आणि पुन्हा कानात करंगळी घालतो. हा त्याचा चाळा सुसह्य आहे. पण माझा एक नातेवाईक रेशनिंग ऑफिसमधे अधिकारी आहे. तो काहीही वाचताना आळीपाळीने नाकात आणि तोंडात बोट घालतो.पाहायला ते अत्यंत गलिच्छ वाटते पण बारकाईने पाहिल्यावर कळले की त्याची नाकात आणि तोंडात घालायची बोटें वेगवेगळी असतात. आणखी काही घाणेरडे चाळे वाचवणार नाहीत म्हणून मी सांगत नाही पण--

–पण मी अनुभवलेले काही चाळे मात्र जगावेगळे आहेत. पुण्यात माझ्या माहितीचे मेहेंदळे नावाचे एक गृहस्थ होते. वारले ते दोन वर्षांपूर्वी. मोठे धार्मिक प्रवृत्तीचे होते.गप्पा मारताना मांडीवर मांडी ठोकून बसायचे. बोटांची नखे कुरतडणे हा माणसाचा एक सर्रास चाळा आहे. पण मेहेंदळे बसल्याबसल्या आपल्या मजबूत हातांनी पायाच्या अंगठ्याचे नख कुरतडायचे.कधी कधी तर मेहेंदळेंची आणि नखाची अशी काही जुपायची की बोलणे बाजूला रहायचे. पण नखं कुरतडल्याशिवाय त्या अंगठ्याची मेहेंदळेंच्या तावडीतून सुटका होत

नसे.विधानसभेत असताना माझ्या बाजूला जनसंघाचे एक आमदार होते. अजंड्याचे कागद हातात आले की बसल्या बसल्या त्यावरील मोकळ्या जागेत स्वत:च्या एक तर सहज ठोकत किंवा जेथे जागा मिळेल तेथे पक्ष्यांची चित्रे काढत. पुस्तकांची आणि वहयांची पाने चाळताना बोटाने थुंकी लावणारे अनेक असतात. पण मी शाळेत असताना आमचे पंडीत नावाचे सर फळ्यावर लिहिताना वाक्यागणिक वर्गातच थुंकायचे याच पंडितांची आणखी एक विचित्र सवय होती. शिकताना अधूनमधून बोलिंग टाकल्याप्रमाणे उजवा हात गोलाकार फिरवायचे. मुरकुटे सरांचा चाळा असाच जगावेगळा होता. इतिहासाच्या तासाल किमान दोन-तीनदा तरी ते स्वत:च्याच बुटाच्या नाडया ओढून बाहेर काढायचे आणि मग बूट टेबलावर ठेवून आमच्या समोरच त्या पुन्हा घालायचे.

माणसाला कोणताही चाळा असला की त्याच्या हातातील वस्तू त्याला प्रथम बळी पडते. अनेक नामवंत बोलर काही कारण नसताना जिभेनेच बॉलवर थुंकी लावतात. दळवी नावाचे एक पत्रकार मुंबईत होते. 'स्वच्छ मुंबई' हा त्यांचा आवडता विषय हीता.पण स्वत: मात्र लिहिता लिहिता पाच पाच मिनिटांनी फाऊंटनचे नीब जिभेला लावायचे. त्यामुळे संध्याकाळपर्यंत त्यांची जीभ आणि ओठही जांभळाप्रमाणे जांभळे व्हायचे. मग संध्याकाळी दहा मिनिटे चूळ भरण्याचा कार्यक्रम चालायचा. अशा लोकांच्या हातात पेन्सील सापडली की ती ते मागच्या टोकाने उसाप्रमाणे चावतात. त्यामुळे ती मागच्या टोकाने लवकर संपते. पेन्सील आणि पेनचे ठीक आहे. पण त्यांच्या हाती कंपास, स्क्रू ड्रायव्हर, कातर इत्यादी हत्यार सापडले की ते कशा कशाचा विध्वंस करतील ते सांगता येणार नाही. माझा एक दिनकर नावाचा मित्र आहे. मोठा चलाख आहे. वाडीतील वैद्य प्रेसमध्ये कधी कधी भेटतो. त्याच्या हाती काही टोकेरी सापडले की तो त्यांनी जे पुढ्यात असेल ते खरवडतो. त्या प्रेसमध्ये एखादे छोटे टेबलही राहिलेले नाही.दिनकरनी बहुतेक ते खरवडून खरवडून संपवले असावे. ही दिनकरसारखी माणसं टेबल तर राहोच पण ताजमहाललाही

क्षमा करत नाहीत. त्यामुळे त्यांची नावे देशातील केवळ प्रेक्षणीय स्थळांवरच नव्हे तर स्मशानभूमीच्या भिंतीवरही कोरलेली असतात. अशा मंडळींना स्फुरलेले वाङ्मय अनेकदा लिफ्टच्या प्लायवुडवर आणि संडासाच्या भिंतीवर वाचायला मिळते.

काही लोकांचा चाळा विलक्षण असतो. माझा सेंजित नावाचा मित्र जेथे बसतो तेथे वेळी अवेळी तबला वाजवतो. समोर टेबल असो अगर मटणाचे टोप असो. सेंजितचे धा धी धीन्धा चालूच असते. मात्र सेंजित खरा तबला कधीच वाजवत नाही. समोर काहीच साप-डले नाही तर कधी कधी सेंजित स्वत:च्या मांडीवरून किंवा डोक्यावरून तबल्याची बोटे फिरवतो. महापालिकेचे पंधरा वर्षांपूर्वी जनुभाऊ पटवर्धन कमिशनर होते. भर सभागृहात कितीही खडाजंगी चर्चा चाललेली असली तरी पटवर्धनांचे तबलावादन चालूच असायचे.

पुरुषांच्यापेक्षा बायकांचे चाळे वेगळे असतात. मला क्रिमान अर्धा डझन अखंड सौभाग्यवती माहीत आहेत की ज्या बोलता बोलता मंगळसूत्राचा मणी तोंडात घालतात. माझ्या परिचयांच्या दैठणकर नावाच्या भगिनी पदराला सतत गाठ मारून त्या सोडत असतात. त्या त्यांच्या चाळ्याने सारी साडी शाबूत राहिली तरी दोन महिन्यात पदराचे टोक झिरते. सिडकोमधील एक टेलिफोन ऑपरेटर कधीही भेटली की पायाच्या अंगठ्याने जमीन खरवडते. त्यामुळेच बहुधा मुंबईच्या रस्त्यात खड्डे पडले असावेत. या नोकरी करणाऱ्या मुलींच्या काही काही सवयी कॉमन असतात. उदा. वेणीचे टोक सोडायचे आणि पुन्हा बांधायचे. लिपस्टिक लावली नसेल तरी पुन्हा पुन्हा ओठावरून ओठ फिरवायचे. पर्सच्या बटणाशी चाळा करून त्याची उघडझाप करायची. 'ब्रा'ची पट्टी बाहेर आली नसली तरी अंगठा खांद्यावर सरकवायचा. केसाच्या भांगातून अकारण बोटे फिरवायची आणि-आणि आणखी चाळे सांगत नाही. नाहीतर सगळ्या भगिनी माझ्या अंगावर धावून येतील.

# इंग्रजी

मराठी भाषेतील कदाचित आणि फक्त या शब्दांचा गैरवापर करण्याचे किस्से मी गेल्या आठवडचातील आठवणीत सांगितले. ती माझी आठवण वाचून माझा आठवले नावाचा मित्र (नारायण आठवले) खूप झाला आणि मला म्हणाला 'प्रमोद, तुझी आजच्या मार्मिकमधील आठवण 'सेन्सीटीव्ह' आहे. इतकी सनसनाटी आठवण मी यापूर्वी वाचली नव्हती. त्याला काय म्हणायचे होते हे मला समजले नाही. कारण प्रथम म्हणजे ती आठवण विनोदी असल्याने सनसनाटी नव्हती आणि दुसरे म्हणजे सनसनाटीला इंग्रजी शब्द 'सेन्सेशनल' असून त्यांनी म्हटल्याप्रमाणे 'सेन्सीटीव्ह' नाही. पण अनेकांना अशा प्रकारे आपले इंग्रजी फाडण्यासाठी नको तेथे नको तो शब्द वापरण्याची सवय असते.

माझा दुसरा सावंत नावाचा मित्र आहे. तो तर किमान दोन इंग्रजी शब्द वापरल्याशिवाय मराठीतील कोणतेही वाक्य बोलूच शकत नाही. त्याबद्दल माझी तक्रार नाही पण त्याचे इंग्रजी इतके भयानक आहे की त्याचा अर्थ ज्याला समजेल तो भाग्यवान समजावा लागेल. गेल्या आठवडचात तो मला एका हॉटेलसध्ये भेटला. हॉटेलातील एका कोपऱ्यात चहा पीत बसला होता. अशा वेळी तो इतरांना टाळतो. असा टाळणारा कोणी असला की मुद्दाम मी त्याच्या समोर जाऊन बसतो. सावंतच्या समोर बसल्याबर त्याचा चेहरा थोडा उदास दिसला. त्याने मला सांगितले,' भाई, फार वाइट गोष्ट घडली. माझ्या थोरल्या भावाने काल गावाला विहिरीत उडी मारून 'सुई-

साईड केले. मी म्हणालो 'अरे–अरे !' त्यावर सावंत म्हणाला, 'त्याला उद्या मुंबईला आणणार आहेत मी आश्चर्यचकीत झालो. कारण मुंबईला आणून अंत्ययात्रा काढण्याइतका सावंताचा भाऊ मोठा निश्चित नव्हता. मी त्याप्रमाणे सावंतला विचारलेही. त्यावर सावंत म्हणाला, 'छे, छे ! तो मेला नाही. त्याने विहिरीत उडी टाकून 'सुईसाईड' केले, पण सुदैवाने तो मेला नाही. फक्त जखमी झाला.' मी कपाळाला हात लावला. खिडकीतून उडी मारणे, आगीत उडी घेणे, विहिरीत उडी मारणे, रेल्वे गाडीपुढे पडणे इत्यादी प्रकारांना, मग माणूस मेला नाही तरी, 'सुईसाईड' म्हणतात असा सावंतचा ठाम समज होता आणि सावंत तशा प्रकारचे अनेक इंग्रजी शब्द सतत राबवत होता. त्याने खरोखरीच सुईसाईड करू नये म्हणून मी त्याची चूक सुधारली नाही.

सावंत तर अवघा मॅट्रीक झालेला तरुण. पण मोठे मोठे लोक देखील इंग्रजी बोलण्याच्या गडबडीत कशी धमाल करतात याची एक आठवण सांगण्यासारखी आहे. वीस वर्षांपूर्वी पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट ऑफिसमधील टाईप करणाऱ्या एका सिंधी मुलीला भर ऑफिसात तिच्याच एका सहकाऱ्याने भोसकले. त्यावेळी नेमका काही कामानिमित्त मी त्या कार्यालयात गेलो होतो. तेथे जगदाळे नावाचे सिक्युरिटी ऑफिसर होते. सर्वांना आपल्या फडर्या इंग्रजीत ते दमात घ्यायचे. आणि वॉचमन पण त्यांना घाबरायचे. मला पहाताच त्यांनी मला बातमी दिली, 'नवलकर, कळलं का तुम्हाला? आज वर मोठं लफडं झालं. आमच्या एका क्लार्कने 'टाईपरायटरला' भोसकले,' मी मला कोणी तरी भोसकत आहे असे वाटून दचकलो. तरी तो पुन्हा बडबडला, 'खरं सांगतो. कोणालाही विचारा. तो हळूच मागून आला आणि टाईपरायटरला भोसकले.' त्या टाईपरायटरला भोसकून त्याची मोडतोड करणारा क्लार्क कोण, याची अधिक चौकशी करता कळले की जो टाईप करतो तो 'टाईप रायटर' असा जगदाळेचा ठाम समज होता. त्यामुळे त्या दुपारपासून टाईपरायटरबरोबर ते इंग्रजी भाषेलाही भोसकत सुटले होते.

माझा एक मित्र, नाव सांगत नाही, पण बोलता बोलता अद्यापही पॅन्टचा उल्लेख 'अंडरवेअर' असा करतो. 'शर्ट मला कसाही असला तरी चालतो. पण 'अंडरवेअर' टाईट पाहिजे असतो' असे बोलताना मी त्याला किमान तीनदा ऐकले आहे, त्याच्या इंग्रजीचा जर बारकाईने अभ्यास केला तर आणि एका बोलीभाषेचा शोध लागेल इतके तो बोलताना स्वतःचे शब्द पेरतो. विशेषतः कधी हॉटेलमध्य गेलो तर त्याच्या इंग्रजीला कमालीची धार चढते. पहिली गोष्ट म्हणजे तो 'यू' ह्या शब्दाऐवजी नेहमी 'अू' (ऊ) हा शब्द वापरतो. त्यामुळे मला भेटल्याबरोबर 'हाऊ आर ऊ?' असे विचारतो. मोटारीत बसल्यावर 'ऊ' टर्न घे असे मला सांगतो आणि हॉटेलातील पोऱ्याला मटन करी 'ऊसलेस' आहे, म्हणून दम मारतो. मला इंग्रजी मर्यादित येत असल्याने अनेकदा काही शब्दांशिवाय अडते. पण या माझ्या मित्राचे कधीच अडत नाही एखादा शब्द अडला तर तेथे स्वतःचा मराठी शब्द वापरून तो वेळ मारून नेतो. कालच मी आणि तो अपोला बंदरच्या चायनीज हॉटेलमध्य गेलो होतो. चायनीज हॉटेलमध्ये एक डीश अशी असते की त्यात शेवया आसतात. अम्हाला दोघांना ती डीश माहीत होती पण मला नाव आठवत नव्हते. पण आपल्याला आठवल्याप्रमाणे तो मित्र हं हं म्हणाला आणि त्यांनी वेटरला हाताची ओंजळ करून ऑर्डर दिली 'गेट वन प्लेट फलुदा विदाउट मिल्क' त्या चायनीज पोराला माझा मित्र काय बोलतो ते समजेना. त्यांनी त्याच्या सुशिक्षित प्रमुखाला बोलावला. त्यांनी सूट वगैरे घातला होता. त्यालाही मित्राने धिटाईने ऑर्डर दिली 'बुइ वॉन्ट फलुदा विदाऊट मिल्क.'त्या मॅनेजरलाही माझा मित्र काय बोलतो आहे हे समजेना. इतक्या मला ते नाव आठवले म्हणून त्याला 'नूडल्स' आणायला सांगितले. आमची अब्रू शाबूत राहिली पण ..

पण मित्र बडबडत राहिला. ह्या चिनी लोकांना इंग्रजी येत नाही तर येतात कशाला हिंदुस्थानात? कालच 'मिड डे' नी 'ब्रीफ' मध्ये अग्रलेख लिहून चिनी लोकांना चांगलाच 'फ्लॅटर' केले आहे. साल्यांना तसेच पाहिज. त्यांना मॅनर्स नसतात. पाण्याचा

ग्लास मागितल्याशिवाय देत नाहीत. गेल्या वेळेस हाच मला म्हणाल ' बंड पाणी नाही ' मी त्याला फायर केला. सांगितलं, पाणी नसेल तर ' मेक वॉटर ' पण मला पाणी पाहिजे.' मी फालुदा विदाउट मिल्क कसाबसा घशाखाली घातला आणि पाणी प्याल्याशिवाय हॉटेलबाहेर पडलो.

# समाजवादी

या देशात जे आज राजकीय विघटन चालले आहे त्या विघटन-प्रक्रियेचे सर्वात अधिक बळी कोण असतील तर ते समाजवादी. आज समाजवाद्यांच्या तंबूत एक अपूर्व अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मला स्वतःला या मंडळींविषयी वाटणारे प्रेम सर्वश्रुत आहे. दीर्घ-काळ प्रजासमाजवादी पक्षाबरोबर काम केल्याने माझे सहकारी अद्या-पही चेष्टेने मला 'प्रजासमाजवादी' संबोधतात. कै. श्रीकांत पालेकरच्या बरोबर दहा वर्षे काम करण्याची संधी मिळाल्याने सदस्य न होताही प्रजासमाजवाद्यांच्या मी अगदी जवळ गेलो. तेथे मग निस्वार्थी आणि खूप त्यागी माणसे जवळून पहायला मिळाली आणि त्यांच्यापासून खूप शिकावयासही मिळाले. राजकीय मते भिन्न असू शकतात. पण वैय-क्तिकरीत्या मात्र आजही आमची नाती चांगली आहेत.

एक कोणता तरी अज्ञात शाप सुरुवातीपासूनच समाजवाद्यांचा पाठलाग करत आला आहे. त्यामुळे हा पक्ष जरी टिकला तरी वाढीस मात्र कधीच लागला नाही. एका विशिष्ट पद्धतीने जर या पक्षाने पावले टाकली असती तर आज महाराष्ट्रात तरी त्यांचे राज्य आले असते इतकी मातब्बर मंडळी आणि विचार या पक्षाकडे होते. पण नशीबाचे फासे सतत उलटे पडत गेले. एकेकाळी महानगरपालिकेत या पक्षाचे बेचाळीस नगरसेवक होते पण नंतर समितीचे राजकारण घडले आणि प्रजासमाजवादी बदनाम झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीत जे घडले तेच थोड्याफार फरकाने आज जनता पक्षात घडले आहे. त्यावेळी समितीतील कम्युनिस्टांचे वर्चस्व असह्य होऊन प्रजासमाजवादी समिती-

तून बाहेर पडले. त्यावेळी समाजवाद्यांची चूल वेगळी होती. नंतर ते दोघे एक झाले आणि आता जनता पक्षातील जनसंघाचे वर्चस्व असह्य होऊन समाजवादी बाहेर पडले आहेत. पण विशेष म्हणजे ते सर्व लोहियावादी असून जुने प्रजासमाजवादी मात्र जनता पक्षातच राहिले आहेत. परिणामी समाजवाद्यांची पुन्हा पूर्वीप्रमाणे दोन शकले पडली असून प्रजासमाजवादी आणि लोहीयावादी असे दोन गट आज समोरासमोर लढायला उभे राहिले आहेत.

इतिहासाची पुनरावृत्ती मोठ्या विचित्र पद्धतीने होते आहे. त्यावेळीही समितीत कम्युनिस्ट पूर्वीपासून होते आणि आजही जनसंघ जनतात पूर्वीपासून आहे. फरक इतकाच की त्यावेळी अशी एक घटना घडली की कम्युनिस्टांचे राष्ट्रद्रोही रूप उघड झाले. इम्रे नाज प्रकरणी कम्युनिस्टांनी घेतलेली भूमिका आणि त्यानंतर त्यांचे वाहत जाणारे चीनप्रेम सतापजनक होते. पण आज मात्र तसे काही घडलेलें नसतानाही जनसंघाचे निमित्त करून हे समाजवादी बाहेर पडल्याने माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या डोक्यात एक प्रकारचा गोंधळ उडाला आहे. जनता पक्षाची स्थापना होण्यापूर्वीपासून जनसंघही आहे आणि आर. एस. एस. ही आहे. त्या दोघांचे संबंध जगजाहीर होते तरीही जनता पक्षाची स्थापना झाली आणि सर्वांनी राजघाटावर शपथा घेतल्या. पण आताच असे काय घडले की ज्यामुळे माझ्या समाजवादी मित्रांना जनता पक्षात रहाणे अशक्य झाले? मला जनता पक्षाविषयी खास प्रेम नाही, पण तरीही मृणाल, जॉर्ज यांच्या पक्ष-त्यागाचे समर्थन माझ्या बुद्धीला आज पटणारे नाही. जनता पक्षाचा आसरा मिळाल्याने देशात अथवा सरकारात जनसंघ प्रबळ होत चालला असावा. संघाच्या शाखा वाढत गेल्या तर जनता पक्षातील इतर पक्षांची पीछेहाट होणे मी समजू शकतो. पण त्यामुळे देशाला धोका निर्माण झाला आहे हे प्रयत्न करूनही मला अद्याप पटत नाही,

विशेष म्हणजे त्यावेळी समितीमधून तडकाफडकी बाहेर पडलेली दंडवते, गोरे मंडळी आज जॉर्ज मंडळीना 'असे बाहेर पडणें म्हणजें विश्वासघात आहे' असे म्हणतात तेव्हा गोंधळात अधिकच भर पडते.

त्या काळात दंडवते आणि मंडळींनी समिती सोडल्यानंतर झालेल्या वादळाच्या आठवणी अद्याप ताज्या आहेत. आचार्य अत्रे तर एसेमवर तुटून पडले होते. एसेमच्या पत्नीनाही वादात ओढण्याचा प्रयत्न झाला. कारण त्यांनीही नवशक्तीतून सर्वांचा समाचार घेणारे एक प्रदीर्घ पत्र लिहिले होते. योगायोग म्हणजे ती भूमिका आज अनु वर्देच्या पत्नी सुधाताई पार पाडताहेत.

पण या सर्वांचा शेवट काय होणार आहे हे सांगता येत नाही. जनसंघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या जातीय संघटना असून त्यांचे हात महात्माजींच्या खुनाने बरबटलेले आहेत असा उघड आरोप हे समाजवादी अनेकदा व्यासपीठावरूनही करत होते. त्यामुळे आज त्यातील काही मंडळी जनतापक्षातून बाहेर पडल्याने वाटलेल्या आश्चर्यापेक्षा त्यावेळी जनसंघाबरोबर हे समाजवादी जनता पक्षात गेलेच कसे याचे जास्त आश्चर्य वाटते. आणि आजही जॉर्ज वगैरे बाहेर पडले त्यापेक्षा दंडवते वगैरे अद्याप जनता पक्षात कसे राहिले याचेच आश्चर्य वाटते. कारण ही मंडळी शेवटी एका पिंडाची आहेत. ती अलग राहूच शकत नाहीत. एवढे होऊनही दंडवतेंनी परवा भाषण करताना मृणालताईंचा बचावच केला. मृणालने जे केले त्याला भ्रष्टाचार म्हणू नका म्हणून त्यांनी लोकांना आवाहन केले. पण नानासाहेबांनाही बोलताना नेहमीचा चेव येऊ शकला नाही. जॉर्ज मृणालवर ते घणाघाती हल्ले चढवूच शकत नाहीत. आत राहिलेले आणि बाहेर पडलेले समाजवादी उद्या पुन्हा कोठेतरी एक होणार याची त्या दोघांनाही जाणीव आहे.

दंडवते वगैरे मंडळी अद्यापही जनतापक्षात का राहिली या प्रश्नाचे उत्तर ज्याप्रमाणे सापडत नाही, त्याप्रमाणेच जॉर्ज, मृणाल वगैरे मंडळी जनता पक्षातून बाहेर का पडली याचेही उत्तर सापडत नाही. माझ्यासारख्याला त्यांचे अँन्टी जनसंघीय विचार पटत नसले तरी त्यांनी ते अविचाराने घेतले आहेत असे मानून समाधान करता येत नाही. कारण मधु लिमये, जॉर्ज आणि मृणाल ही बेरकी मंडळी आहेत. एक वेळ दंडवते भावनेच्या आहारी जाऊन एखादा निर्णय

घेतील पण जॉर्ज आणि मृणाल तसे करणार नाहीत.

पण तरीही त्यांच्या पक्षत्यागाचे कारण लोकांना पटवून देण्यात ते अयशस्वी झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. शिल्लक असलेल्या जनता लाटेत त्यांचा आवाज विरून जातो म्हणावे तर तसेही नाही. त्यांच्या पत्रकार परिषदा चालूच आहेत, पण लोकांना पटेल असे सांगण्यासारखे त्यांच्याकडे सध्या तरी काही दिसत नाही. त्यामुळे खरा प्रश्न आहे उद्याचा. कारण निवडणूक जाहीर झाली आहे. तेथे दंडवते आणि जॉर्ज, वर्दे आणि मृणाल, एसेम आणि मधु लिमये एकमेकांच्या विरुद्ध उभे राहिले तर ?

राजकारण राहू द्या बाजूला, पण माझ्यासारख्याला मात्र आज प्रामाणिकपणे वाटते की या सर्व समाजवादी मंडळीनी एकत्र रहावे. त्यासाठी वाटल्यास दंडवतेंनी जनता पक्षातून बाहेर पडावे अगर जॉर्जनी जनता पक्षात पुन्हा जावे. दंडवते, मधु लिमयेसारखी मंडळी या फाटाफुटीमुळे निष्प्रभ व्हावीत असे मला वाटत नाही, त्या पिंडाची आणि त्या रक्ताची माणसे आता मिळणार नाहीत. समितीच्या हलाहलानंतर वाजत गाजत एक झालेले समाजवादी आज जनतापक्षाच्या राजकारणाचे बळी होऊन दुभंगलेले पाहून माझ्यासारख्या त्यांच्यावर दुरून प्रेम करणाऱ्यांना नक्कीच विषाद वाटतो. परस्परांची मनेही दुखावलेली नाहीत पण निवडणुकीत ते घडण्याची शक्यता असल्यामुळे एसेमसारख्या सर्वमान्य नेत्यांनी साऱ्या समाजवादी शक्तींना पुन्हा एकत्र आणण्याची कामगिरी पार पाडावी असे वाटते. पण मला वाटून उपयोग काय ? माझ्या समाजवादी मित्रांना ते पटले पाहिजे. नाहीतर एका शिवसेनावाल्याचे मत म्हणून जाईल ते केराच्या टोपलीत !

# मुलींची विक्री

इंडियन एक्स्प्रेस–लोकसत्तेमध्ये सध्या एक प्रकरण गाजते आहे. त्यांच्या कोणा एका वार्ताहराला समजले की मध्यप्रदेशात मुलींची विक्री होते. त्याप्रमाणे त्या वार्ताहराने अधिक चौकशी करून स्वतःच एक वयस्क मुलगी मुलगी खरेदी केली. त्या मुलीचे नाव कमला. या कमलाच्या छायाचित्रासहित मुलींच्या विक्रीची ही बातमी पहिल्या पानावर बॅनर देऊन त्या दोनही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली. वृत्तपत्रात येणारी अशी क्रमांक एकची बातमी संपादकच प्रसिद्ध करतात असे नव्हे. किंबहुना पहिल्या पानावरील कोणत्या बातम्या कोठे द्याव्या हे शेवटच्या पाळीतील वृत्तसंपादकच ठरवतो. त्यामुळ त्या संदर्भात माझी झालेली प्रतिक्रिया मित्रवर्य संपादक विद्याधरजी गोखले यांच्याकडे व्यक्त करण्याचा मोह मी आवरला. पण–

–पण रहावत नाही म्हणून आज हे लिहीत आहे. आपल्या जीवनात सध्या वृत्तपत्रास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे वृत्तपत्रात अशी कोणतीही बातमी ठळकपणे आली की एक सनसनाटी होते. या बातमीच्या बाबतीत नेमके तेच घडले. ही वाचून सर्वसामान्य जनतेची प्रतिक्रिया कशीही झाली असली तरी मला मात्र ती वाचून हसू आले. कारण माझ्या मते त्या बातमीत सनसनाटी तर राहोच, पण काही बातमीच नव्हती. मुलींची विक्री ही या जगाच्या पाठीवर अनादी काळापासून चालत आलेली बाब आहे. त्यामुळे एक्सप्रेसच्या वार्ताहराला तिचे आकलन करण्यासाठी मध्यप्रदेशापर्यंत जाण्याची आवश्यकता नव्हती. वाचकांना ते पटावे म्हणून कमलाची

गरज नव्हती आणि लोकसत्ताने तशी बातमी जगातील सगळ्या घडामोडी बाजूस सारून पहिल्या पानावर बॅनरसहित प्रसिद्ध करण्याचेही प्रयोजन नव्हते. अर्थात कोणती बातमी कोठे टाकावी हे लोकसत्ताकारांचे असलेले स्वातंत्र्य मी हिरावून घेऊ इच्छीत नाही. पण ही बातमी वाचून गेल्या शतकात घडणारा तो एकमेव प्रकार असा जर जनतेचा समज झाला असेल तर तो दूर करण्याचे स्वातंत्र्य मलाही असावे. मी तीन वर्षे मुंबईतील वेश्याव्यवसायाला रात्रंदिवस भिडलो होतो. त्यानंतर उजळणीसाठी त्या मोहल्ल्यात अजूनही मी उजळणी म्हणून अधूनमधून राऊंड मारतो. तेथें कोणत्या घडामोडी घडतात हे सांगण्यापेक्षा लोकसत्ताकार यांना मी एवढेच सांगू इच्छितो की त्यांनी मला बोलवावे आणि कोणत्या गटातील मुलगी पाहिजे ते सांगून पैसे तयार ठेवावेत. अगदी काही तासात नाही तरी काही दिवसात मी मुंबईतच तशी मुलगी खरेदी करून त्यांच्या–समोर हजर करीन. माझे मित्र विद्याधरजींना भेंटून तसे विचारण्याचे धाडस झाले नाही. कारण त्यांच्या इरसाल स्वभावाप्रमाणे ते मला लगेच 'तू ही भडवेगिरी केव्हापासून करू लागलास ?' असा जहाल प्रश्न विचारतील.

ते जाऊ द्या, पण आज मुलींच्या खरेदीचा व्यवहार पहाण्यासाठी मध्यप्रदेशात जाण्याची काहीच आवश्यकता नाही. कारण सर्वच प्रदेशात हा व्यवहार राजरोसपणे चालू आहे. इतकेच नव्हे तर आपल्या मुंबईसारख्या शहरात लालबत्तीच्या वस्तीत चालणारा वेश्याव्यवसाय आज खरेदी-विक्री तत्त्वावरच चालतो विशेष म्हणजे जगाच्या पाठीवर महागाई भडकत असताना या मुलींच्या बाजारातील भाव मात्र स्थिर झाले आहेत. आज बाजारात बैलही पांचशें रुपयांना मिळत नसताना अद्यापही मुलींची विक्री पाचशे ते पाच हजार या भावाने होते हा एक चमत्कार आहे. आंध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक, नेपाळ इत्यादी प्रांतातून फार मोठ्या प्रमाणावर मुली मुंबईच्या बाजारात आणल्या जातात आणि परस्परांना विकल्या जातात. हा व्यवहार इतका राजरोसपणे चालतो की त्यात बातमी अशी मुळी राहिलीच

नाही. कोणीही त्या मोहल्ल्यात जाऊन दहा मुलींना पैसे देऊन त्यांना विश्वासात घेतले तर त्यांपैकी किमान तीन मुली आपली विक्री केव्हा, कोठे आणि कशी झाली हे सांगतील. मात्र मुंबईत या मुलींची विक्री सहसा होत नाही. येथील विक्री दुसरी विक्री असते. याचाच अर्थ मुंबईतील स्थानिक मुली एखाद दुसरा अपवाद वगळल्यास सध्या विक्रीच्या बाजारात आलेल्या नाहीत.

अशा प्रकारे व्यवहार करणारे बरेचसे ठेकेदार असतात. या ठेकेदारांच्या विक्रीच्या अनेक पद्धती असतात. पहिली विक्री अतिशय काळजीपूर्वक होते पण त्यानंतर आपापल्या कोठडीत दीर्घकाळ राहिलेल्या मुली गिऱ्हाईक टिकविण्यासाठी सौदा करून बदलल्या जातात. हा अंतर्गत विक्रीचा व्यवहार नित्याने आणि राजरोसपणे होत असतो. या व्यवहारात सापडणाऱ्या अनेक मुली अल्पवयीन असून त्या बारा ते अठरा या वयोगटातील असतात. पूर्वी या अल्पवयीन मुली खरेदी केल्यावर धंद्यासाठी आतल्या खोलीत लपवून ठेवल्या जात असत, पण आता पोलिसांचे भय राहिले नसल्याने त्यांचेही पिंजऱ्याच्या दारात राजरोस प्रदर्शन केले जाते. या अल्पवयीन मुलींपैकी अनेकांना आऊटराईट खरेदी केलेली असते तर बाकीच्या भाडेतत्त्वावर आणून त्यांच्या आईबापांना ठरल्याप्रमाणे घरवाली नियमित पैसे पाठवते.

हे सगळे जे आहे त्याचे संशोधन करण्याची आवश्यकता नसून ते उघड उघड चालले आहे. मी त्या विषयावर पंधरा वर्षांपूर्वी खूप लिहले आहे कारण त्यावेळी क्रॉफर्डमार्केटला असलेल्या मुसाफिरखान्यात रोज लग्नाची शहनाई वाजायची. अरब लोक त्यावेळी नुकतेच भारताच्या प्रेमात पडले होते. मुंबईत यायचे, मुलगी खरेदी करायची तिच्याशी अगदी वाजतगाजत लग्न करायचे आणि अरेबियात नेऊन तिला वेठबिगारास लावायचे हा धंदा त्यावेळी मोठा तेजीत चालला होता. साठसाठ सत्तरसत्तर वर्षांचे अरब सोळा वर्षांच्या मुलीशी निका लावून, तिचे धर्मांतर करून आणि तिला बुरख्यात घालून जहाजावर चढवीत. आखाताकडे जाणाऱ्या प्रत्येक बोटीवर ते दृश्य हृद-

याला पीळ पाडीत असे. अरबांनी खरेदी केलेल्या त्या मुली जहाजावरील एका कोपऱ्यात बुरखे घालून बसल्या तरी त्यांचे हुंदके स्पष्ट ऐकू यायचे. त्यावेळी मुकी असलेली अशीच एक मुलगी मला जहाजावर अरबासोबत दिसली तेव्हा तिला सक्तीने मुकी केली या शंकेने येलोगेट पोलिस स्टेशनवरील त्यावेळचे अधिकारी श्री. घाष यांच्याकडे धांव घेतली. पण त्यांनी या बाबतीत असहाय्यता व्यक्त केली.

कल्याणच्या हाजी मलंग दर्ग्याजवळ त्यावेळी एका विशिष्ट काळात विक्री होत असे. तो प्रकार अद्यापही चालू असल्याचे मला समजते. त्याच वेळी हुबळीहून एका अरबाने सहा मुली विकत आणल्या आणि नेपिअनसीरोडच्या नाक्यावरील एका फ्लॅटमध्ये ठेवल्या. विक्रीचा अंतिम व्यवहार कुलाब्यातील कुलाबा चेंबर्स या इमारतीतील तळमजल्यावरील एका फ्लॅटमध्ये झाला. त्या काळात निर्यातीसाठी मुलींची बाजारपेठ तयार होत असल्याने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मी केंद्रसरकारशीही पत्रव्यवहार केला पण तो पत्रव्यवहारच राहिला. शेवटी खासदार मामा वरेरकर यांनी राज्यसभेत त्या आधारावर एक प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचे राज्यसभेत श्रीमती तारकेश्वरी सिन्हा यांनी दिलेले उत्तर जेवढे मासलेवाईक तेवढेच धक्कादायक होते. ते देताना त्या म्हणाल्या, 'भारतात मुलींची विक्री होऊन आणि त्यांच्याशी लग्ने करून त्यांची आखातात वाढत्या प्रमाणात पाठवणी होत असते याची या शासनाला संपूर्ण जाणीव आहे. पण त्या बाबतीत घटनेचा विचार करता कोणतेही प्रतिबंधक उपाय योजण्यास हे शासन असमर्थ आहे.'

हेच शासनाचे धोरण असल्याने मुलींच्या खरेदी-विक्रीचा हा बाजार आजतागायत चालूच राहिला आहे. त्याकाळातली एक गोष्ट मला आठवते फोरासरोडच्या नाक्यावरील अलेक्झान्ड्रा सिनेमाच्या बाजूला एक नवीन तीन मजली इमारत उभी राहिली. त्या इमारतीचा संपूर्ण कब्जा फक्त दोन ठेकेदारांनी घेतला आणि एका रात्रीत तेथे बसेस भरभरून साडेतीनशे ते चारशे मुली धंद्यासाठी आणल्या. ती इमारत आजही सुमारे चारपाचशे मुलींनी खच्चून

भरलेली आहे. या अशा प्रकारे विक्रीहोणाऱ्या मुलींचा बाजार बहुतेक सर्वांच्या संमतीने होत असल्याने त्याला आळा घालणे अवघड आहे. पण माझ्या दृष्टीने गंभीर भाग म्हणजे त्यात असलेली वेठबिगारी. या गुलामगिरीत मुलींच्यावर कडक अमानुष निर्बंध असतात. सतत त्यांच्यावर टेहळणी असते.त्यांची कमाई त्यांना मिळत नाही. दुपारी दोन आणि रात्री दोन वाजता फक्त डाळभात मिळतो. निर्बंधांचा भंग झाला तर अनन्वित छळ होतो. उपाशी ठेवले जाते. अनेकदा डाग दिले जातात. वृत्तपत्रांनी या प्रश्नाला वाचा फोडणे आवश्यक आहे. सध्याच्या सुसंस्कृत युगात हा रानटीपणा शोभणार नाही. वेश्या-व्यवसाय अटळ असला तरी या वेठबिगारीविरुद्ध सामाजिक बंड व्हायला हवे.

तात्पर्य, मुलींची खरेदीविक्री ही आता एक व्यवहारातील बाब झाली आहे. त्यासाठी मध्यप्रदेशात जाण्याची गरज नाही. मध्य मुंबईतली ही बाजारपेठ वर्षानुवर्षे तेजीत आहे.

# जातीय दंगे

भारताच्या विविध भागात जातीय दंगली उसळत आहेत. प्रत्यक्ष दंगलग्रस्त भागात हा विषय गंभीर आणि चिंतेचा असला तरी इतरांना हा विषय म्हणजे केवळ इसापनीतीतील सुरस कथा वाटतात. त्यामुळे दंग्याविषयी रसभरीत चर्चा करणे आणि अफवा पसरविणे हा अनेकांचा आवडता उद्योग असतो. आगगाडीतही ऑलिंपिक आणि दंगे या विषयावर सारख्याच सुरात चर्चा चाललेली असते. त्यात कोणत्याही प्रकारचे तथ्य नसते. कारण झालेली कोणतीही दंगल मुळातच जातीय नसते.

आतापर्यंत या देशात ज्या दंगली जातीय म्हणून झाल्या त्यामागे केवळ एखादे निमित्त असते. कोणीतरी हमाल कोणत्यातरी भिकाऱ्याला मारतो. त्यापैकी एक हिंदु असतो आणि दुसरा मुसलमान असतो आणि त्यांचे निमित्त साधून समाजकंटक धमाल सुरू करतात. दंगल म्हणजे या देशातील लोकांचे जणू ऑलींपिक सामने झाले आहे. इतक्या नियमितपणे ते होताहेत. मग त्यासाठी हिंदु आणि मुसलमान पाहिजेत असेही नाहीत. मुंबईत १९२५ च्या सुमारास जो दंगा झाला तो मोठा आश्चर्यकारक आणि विलक्षण होता. त्या दंग्यात एरव्ही झगडणारे हिंदु-मुस्लीम एक झाले होते आणि त्यांचा दंगा पार्शी समाजावरोवर झाला यावरच आज कोणाचा विश्वास बसणार नाही. अतिशय शांततापिय असलेल्या पार्श्यांनीही दंगा केला यावर कोण विश्वास ठेवील ? जाता- येता 'बाबाजी' अथवा 'काकरा खाव' अशी

मुले त्यांना हाक मारतात. पण या बाबाजींनीही त्यावेळी हिंदु-मुसलमान एक होऊनही जबरदस्त लढत दिली. त्यांच्या अग्यारीचा आसरा घेऊन त्यांनी सगळ्यांना जेरीस आणले. तो दंगा कशामुळे झाला हे मला माहीत नाही.पण कदाचित एखाद्या बाबाजीला कोणीतरी चिडवले असेल आणि त्यावरूनही धमाल झाली असेल.

हिंदु-मुसलमान दंगे म्हणजे या देशात वर्षानुवर्षे नित्याची बाब आहे. दोघांनी मिळून शांतता प्रस्थापित करून एकमेकांना मिठ्या मारायच्या असे सतत घडत आले आहे. अशा या दंग्याची सुरुवात केव्हा झाली हे मला आठवत नाही. पण १८९० साली जेव्हा लोकमान्य टिळकांना पकडले तेव्हा मुंबईतील कामगार विभागात कोणती तरी अशी घटना घडली की त्यामुळे मुसलमान आणि गिरणी कामगार यांच्यात दंगा झाला. हा दंगा आठवडाभर झाला आणि आटोक्यात आला.

मुंबईत खऱ्या अर्थाने दंगा साजरा केला गेला तो १९२९ ते १९३५ च्या अखेरपर्यंत ! (त्यानंतर बहुधा माझा जन्म झाल्याने या शहरात शांतता प्रस्थापित झाली) त्यावेळी दंग्याचे सूत्र एकच असायचे. मुसलमान लोक प्रामुख्याने हिंदूंची दुकाने लुटायचे आणि हिंदु जाळपोळ करायचे. या धुमश्चक्रीत दोनही बाजूने सुरामारी व्हायची. त्यावेळी क्रॉफर्ड मार्केटपासून जे. जे. हॉस्पीटलपर्यंत मोहोल्ला संपूर्णतया मुसलमानांच्या ताब्यात असल्याने त्या भागात वातावरण जास्त तंग व्हायचे. पण त्यावेळच्या गुंडांची जिगर अशी होती की मुसलमान गुंड हिंदूंच्या वस्तीत गटाने येऊन हल्ला करून परत यायचे आणि आणि हिंदु गुंड डोंगरी भागात शिरून त्याचा बदला घ्यायचे.

कुर्ला आणि घाटकोपर भागातही भोसकाभोसकी व्हायची, पण विशेष म्हणजे गिरगांव आणि भेंडीबाजार ही दंग्याची मुख्य ठाणी होती. त्यांचा केंद्रबिंदू होता त्याकाळी धावणाऱ्या ट्रॅम. १ आणि ५ नंबरची ट्रॅम भेंडी बाजारातून जात असे आणि ६ आणि ७ नंबरची ट्रॅम गिरगावातून जात असे. या ट्रॅम दंगलखोर लोक अडवीत आणि त्यात कोणी परमधर्माचा माणूस सापडला की त्याला अक्षरशः

दगडाने ठेचून मारत. इतकेच नव्हे तर नंतर ट्रॅमची मोडतोड करून तिला आग लावली जात असे. मला आठवते १९४५ च्या सुमारास ठाकुरद्वारच्या नाक्यावर, झाववावाडीच्या नाक्यावर असाच एक प्रकार घडला. यावेळी वातावरण तंग होते. कारण अगोदर काही हिंदूही मारले गेले होते. त्याचप्रमाणे आता गंगाराम खत्री वाडीसमोरील भारत तयार कपड्यांच्या दुकानात त्यावेळी एका मुसलमानाचे वाद्याचे दुकान होते. आणि देनावाडीच्या नाक्यावर ललुभाई पतंगवाला बसत असे.ते दोघेही दंग्यात मारले गेले होते. झाववावाडीच्या नाक्यावर दंगा करून दंगेखोर पळून गेले आणि पोलीसांनी नंतर सज्जन बिचाऱ्या पणशीकरांनाच पोलीस ठाण्यावर पकडून नेले.

या सर्व दंगलीत हिंदु रिलीफ कमिटीने फार मोठे कार्य केले.गोर्धनदास मोरारजींच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या त्या कमिटीचे काळबादेवीला ऑफिस होते. गुजराती लोकांनी पुढाकार घेऊन ही स्थापन केली होती.त्या कमिटीचे काम एवढेच होते की कोठे हिंदूला मारले तर तो जखमी अथवा मेलेल्या अवस्थेत रस्त्यातच पडलेला असे. त्याला उचलून नेणे, त्यासाठी कमिटीकडे एक ट्रकही होता. या ट्रकवर मुसलमान वस्तीतही हल्ला होत नसे, ही रिलीफ कमिटी अद्यापही अस्तित्वात असून फोर्टमध्ये तिचे ऑफिस आहे.

कधीही, कोठेही दंगा झाला की भागाभागातून स्वयंसेवकांची गस्त. पथके सुरू व्हायची. गिरगांवातील तरुण मोठ्या उत्साहाने रस्त्यात उतरायचे. पण काळबादेवीसारख्या गुजराती वस्तीत मात्र कमालीची घबराट पसरून पॅनिकी व्हायचे. मुसलमानाची एखादी टॅक्सी आली नाही तरी आय वो-आय वो करीत धावपळ व्हायची आणि दुकानांची दारे बंद होऊन सामसूम व्हायचे. १९४७ साली मात्र खरोखरीच एक छोटी खाजगी गाडी भरधाव वेगाने काळबादेवीच्या रस्त्याने गेली. ती गाडी म्हणजे शेवटपर्यंत गूढच राहिले. कारण त्यात कोण होते ते समजले नाही. पण गाडीतील चारापैकी दोघांच्याकडे मशीनगनप्रमाणे बंदुकी होत्या. त्यांनी दोनही बाजूला तुफान गोळीबार केला. त्यात एकूण ११ लोक जखमी झाले आणि २ ठार

झाले. त्यावेळी शहरात दंगाही नव्हता.

ज्याला दंगलीचा वणवा म्हणता येईल असा वणवा १९३५ साली पेटला. १९३५ चा दंगा मुंबईकर कधीच विसरणार नाहीत त्यावेळी त्या दंगलीत किमान हजार लोक जखमी झाले. ठार किती झाले याचा आकडा कधीच समजू शकला नाही १९६५ च्या त्या दंगलीची पार्श्वभूमी मोठी उद्‌बोधक आहे. भायखळचाच्या पुलाखाली असलेल्या मारुती मंदिराच्या आसपासची जागा नगरपालिकेने सार्वजनिक वाटपासाठी ताब्यात घेण्याचे ठरविले. त्या मंदिराचा उद्धार करण्याची जबाबदारी पालिकेने स्वीकारली. आणि त्याशिवाय दहा हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचा करार कमिशनर आणि मंदिराच्या विश्वस्ताच्यांत आला.

हा करार मान्यतेसाठी पालिकेच्या सभेत आला.पालिकेच्या सभेत अद्यापही एक विचित्र पद्धत रूढ आहे. कोणत्याही ठरावावर एखाद्या नगरपित्यांनी जरी पोस्टपोनमेन्ट ( तहकुबी ) मागितली तरी तो ठराव मतदानशिवाय तहकूब होतो. भायखळचाच्या त्या मारुतीच्या मंदिराच्या बाजूला एक मशिद होती. त्यावेळी भायखळचातून नगरपिता म्हणून मुस्लीम लीगचे पुढारी अली बहादुर खान सतत निवडून येत असत. मंदिराचा विस्तार झाला तर त्याचा मशिदीला उपद्रव होईल. या सबबीवर अली बहादुरनी एकदा दोनदा नव्हे तर बारा वेळा म्हणजे सुमारे चार वर्षे तो ठराव तहकुब करीत ठेवला. विशेष म्हणजे इतर नगरपिते थंड बसून असायचे. त्यामुळे मारुती मंदिराच्या उद्धाराचे काम रेंगाळतच राहिले.

त्यानंतर योगायोगाने एक घटना घडली. ल. ग. थत्ते या व्यक्तीला तुम्ही ओळखता.त्यांच्यावर मी अलिकडेच आठवणी लिहिल्या होत्या. थत्ते म्हणजे एक कडवा हिंदुत्वनिष्ठ माणूस..अतिरेकी म्हटलंत तरी त्यांची काही हरकत नाही. या वादाच्या वेळी नेमकी त्यांची भायखळा येथीलच महात्मा फुले नाईटहायस्कुलचे हेडमास्तर म्हणून नेमणूक झाली. थत्ते स्वस्थ बसणे शक्य नव्हते. त्यांनी सुरुवातीला नवाकाळमधून आवाज उठवला आणि रोज शाळा भरायच्या अगो-

दर भायखळचाला गटागटाने सभा घ्यायला सुरुवात केली. पुलाखालील मारुतीचा स्थानिक माळी भक्त समाज असल्याने ते संघटित व्हायला वेळ लागला नाही. त्या समाजाने सुमारे एक लाख सह्या जमा केल्या आणि ते निवेदन महापौरांच्याकडे नेऊन दिले.

त्यावेळी जमानदास मेहता महापौर होते. वातावरण तापतच चालले होते. त्यानंतर पुन्हा तो आयटेम चर्चेला घेण्यासाठी डॉ. ना. दा. सावरकरांनी प्रायॉरिटी मागितली आणि तो आयटेम अली बहादूरनी विरोध केला असतानाही मंजूर झाला. त्यावेळी भायखळचाचे वातावरण एवढें तंग होते की मंजुरी मिळूनही मंदिराचे काम करण्यास कोणी कॉन्ट्रॅक्टर पुढे येईना. शेवटी हे काम सयाजीराव सिलमनी घेतले. विधानसभेचे सभापती झालेले सिलम त्यावेळी कॉन्ट्रॅक्टरचा धंदा करत होते. त्यांनी कामाठी मजूर लावले आणि कामाला सुरुवात झाली.

वास्तविक पहाता त्या मंदिराचा प्रश्न सुरळीतपणे सुटला होता. पण इतरत्र काही तरी नेहमीप्रमाणे घडले आणि दंगलखोरांनी त्याचा पुरा फायदा उठवला आणि एका रात्रीत साऱ्या मुंबईत दंग्याचा असा काही डोंब उसळला की पहाटेपर्यंत विविध रस्त्यात अडीचशे लोकांना भोसकण्यात आले. हा दंगा म्हणजे मुंबईत हिंदु–मुसलमानांची एक लढाईच झाली.दंगलखोर बाजूला राहिले आणि निरपराध लोकांची कत्तल झाली. परिस्थिती पुढाऱ्यांच्या आणि पोलिसांच्या हाताबाहेर गेली. विशेष म्हणजे दादरसारख्या भागात दंग्याचा जोर अधिक होता. दोनही जमाती इतक्या इरेस पेटल्या होत्या की शांतता समितीही स्थापन झाली नाही. नाही म्हणावयास ॲ. माणिकराम तळपदे यांच्या अध्यक्षतेखाली एक हिंदु समिती स्थापन झाली. आणि हिंदूचे नीतिधैर्य जागण्यासाठी फ्लोरा मिलचे मालक श्री. मथुरादास वसनजी यांनी भरपूर सहाय्य केले.

या दंग्याने उभय जमाती एवढ्या होरपळून निघाल्या की त्यानंतर दहा वर्षे या शहराने दंग्याचे नाव काढले नाही तो वणवा शमविण्यासाठी काही मुस्लिम नेते स्वातंत्र्यवीर सावरकरांच्याकडे गेले,

पण त्यांनीही मध्यस्थी करण्याचे नाकारले. पण हे प्रकरण एवढ्या-वरच संपले नाही. झालेल्या दंगलीचा निषेध म्हणून आणि भायख-ळ्याच्या जनतेच्या भावना व्यक्त करण्यासाठी अली बहादूरखाननी नगरपिता पदाचा राजीनामा देऊन ते फेरनिवडणुकीस उभे राहिले. मग दंगलीचे पर्व संपून लोकशाहीचे पर्व सुरू झाले. थत्ते मंडळींनी कंबरा कसल्या व अली बहादुरच्या विरुद्ध गोवर्धनदास मोरारजींना हिंदूंच्यातर्फे उभे केले. हिंदु आणि मुसलमान दंगली अनेक झाल्या असल्या तरी लोकशाही मार्गाने झालेली ही एकमेव लढत. मतदार संघात दोघांचीही संख्या तुल्यबळ होती. पण विशेष म्हणजे अली बहादुर खानचा पराभव झाला. गोवर्धनदास विजयी झाले आणि साऱ्या मुंबईत दिवाळी साजरी झाली.

१९३५ नंतर थोडेफार दंगे झाले ते १९४६-४७ च्या सुमारास. जीनानी पाकिस्तानची मागणी केल्याने तणाव निर्माण झाला. पण ते दंगे राजकीय स्वरूपाचे होते. आता दिवस बदलले आहेत हिंदु मुसलमानात मोठ्या प्रमाणावर रोटी-बेटी व्यवहार सुरू झाले. अनेक धंद्यात भागीदारी झाली. मोहल्लेही भिन्न झाले. शिवाय मुंबईतील नागरिकांचे आधुनिकीकरण झाल्याने विचारातही बदल झाला. अशा वेळी गुंड आणि समाजकंटक सोडल्यास कोणी दंगलीचा रानटी-पणाचा विचारही करणार नाही, तो कोणालाही परवडणार नाही. कारण वरील आठवणी जुन्या असल्या तरी ताज्या आहेत.

# कविता

स्वभाव हा माणसाचा एक अवयव असतो. त्यापासून माणसाला अलग करता येत नाही. त्यामुळे जितक्या व्यक्ती तेवढे स्वभाव या जगाच्या पाठीवर आहेत. तंतोतंत सर्व स्वभाव जुळणाऱ्या कोणत्याही दोन व्यक्ती या जगाच्या पाठीवर नाहीत. असल्या तरी त्यांचे स्वभाव ताडून पहाता येणार नाहीत. कारण स्वभाव हा जाणवला तरी दिसत नाही. त्याला आकार नसतो. पण काही स्वभावविशेष समान असतात आणि त्यापासून कोणताही माणूस अलग राहू शकत नाही. माझाही स्वभाव तसाच आहे. शिकलेल्या सवरलेल्या माझ्यासारख्या लेखक आमदाराला उगीचच आपण कोणीतरी आहोत असे वाटत असते. त्यालाच 'इगो' म्हणतात. पण त्याला काही अर्थ नसतो. फक्त महाराष्ट्रातच आतापर्यंत माझ्यासारखे हजार आमदार आणि लेखक होऊन गेले. पण तरीही माझ्यातील त्या 'मी' पणाला धक्का लागलेला मला सहन होत नाही. मला कोणी शिव्या दिल्या तरी मी रागवत नाही. मला अद्याप कोणी मारले नाही. मला कोणी गंडवले तरी मला काही वाटत नाही. कोठे पराभव झाला तरी मी हताश होत नाही आणि कोणी माझ्याशी वैर केले तरी मी त्याचा मत्सर करत नाही.

पण माझ्यातील 'मी' पणाच्या उणीवांची जाणीव मला कोणी करून दिली तर माझी तहान भूक हरपते आणि मी बेचैन होतो तरी बेचैनी मला काही सुचू देत नाही. काही लिहू देत नाही. मला ती हिणवते, डिवचते. मग ती माझ्यावरच चिडतो, रडतो आणि मग पाय नेतील तेथे भटकत सुटतो. परवा असाच एक क्षुल्लक प्रकार घडला

आणि माझा मूड गेला. तेव्हापासून माझ्या छोटया वाचनालयातील पुस्तके चाळून मी स्वत:चे मन शांत करण्याचा प्रयत्न करतो आहे. पण ते अधिकच बेचैन होते आहे. वाढत्या वयाच्या माणसाला ज्या प्रमाणे आजार सहन होत नाही त्याप्रमाणे बेचैनीही सहन होत नाही. गेल्या आठवडयात ' रविंद्र 'मध्ये नाटयदर्पण रजनी होती. ही रजनी म्हणजे लोक मराठीचा ' फिल्म फेअर अॅवॉर्ड ' असे म्हणतात. एके–काळी जग इंदिराजींना नेहरूंची कन्या म्हणून ओळखत होते. आता नहरूंचा उल्लेख इतिहासकार 'इंदिराजीज फादर' असा करतात. ज्या-प्रमाणे दोन चार वर्षातच फिल्म फेअर अॅवॉर्ड इंग्रजीतील ' Natya-darpan Award ' या नावाने ओळखला जाईल ' ही रजनी म्हणजे दामले दांपत्यांच्या कल्पनांची सर्कस असते. दर वर्षी नव्या नव्या कल्पना कार्यक्रमातून सादर होतात. त्याप्रमाणे यंदाही दे धमाल कार्य-क्रम होता. ' आमने सामने ' त्यात कलावंतांचे दोन संघ सामन्या–प्रमाणे आपल्या कलेतील कसब दाखवत होते. तो कार्यक्रम कमालीचा रंगला.

रजनी संपल्यावर बाहेर ज्याच्या त्याच्या तोंडी आशा खाडील–करचे नाव होते. 'आशा खाडीलकरनी कमाल केली. काय 'छान कविता म्हटली ' काय पाठांतर आहे तिचे ' वगैरे वगैरे. आठ तासाच्या कार्य-क्रमाचे पडदे फाडून प्रेक्षकांच्या स्मृतीत शिरण्याइतके आशा खाडील–करनी केले तरी काय होते ? आशा ही मराठी रंगभूमीवरील एक गुणी गायिका आहे. गुण आणि कलावंत यांच्यातील अंतर हळूहळू वाढत असते तरी आशासारख्या काही कलावंतांनी आपल्या भोवतीचे वलय कायम ठेवले आहे. त्या वलयात त्यांनी त्या दिवशी कार्यक्रमाच्या शेवटी दोन गाणी म्हटली, नेहमीप्रमाणे ती छान गायली. ( कलावं–तांना एकेरी नावाने संबोधणे मला मान्य नसले तरी लिहिण्याच्या ओघात व्यत्यय नको म्हणून मी तसे संबोधले आहे. क्षमस्व ) पण त्या दिवसाचे वैशिष्टय म्हणजे ती पाठांतराची चाचणी होती. नाटय–गीतावर आशाचे प्रभुत्व असल्याने तिला नाटयगीताशिवाय काहीही गा असे एक मिनिटाची मुदत देऊन सांगितले आणि आशाने पतंग

उडवावा इतक्या सहजतेने कुसुमाग्रजांच्या कवितेचे स्वर त्या धुन्द वातावरणात फेकले. प्रेक्षक अवाक झाले.

त्याच्या अगोदर शं. ना. नवरे आणि रत्नाकर मतकरी यांना त्यांच्याच नाटकांतील संदर्भ देऊन उतारे पाठ बोलावयास सांगितले. मी आतापर्यंत चार हजारावर लेख लिहिले आणि अर्धा डझन पुस्त– केही आहेत. पण त्यातील कोणताही उतारा मला पाठ नाही. शं. ना. तर आता साठीच्या दिशेने घोडदौड करत आहेत. पण शं. ना. आणि रत्नाकरनी त्यांना दिलेल्या आपापल्या तीनही नाटकांतील उतारे पाठ बोलून दाखवले. त्याच्या अगोदर यशवंत दत्तनी एक फर्मास कविता आणि डाव्या डोळ्याची गुगली सांगितली. ही सगळी माणसे माझ्या डोक्यात गिरमीटासारखी भोके पाडत होती. मला शाळेत असताना कविता पाठ करणे कधीच जमले नसल्याची जखम माझ्या जिव्हारी असल्याने आशाच्या कवितेने तिच्यावर मीठ चोळले. माझ्यातील उणीवेची ती करुण जाणीव मला पुन्हा झाली होती.

माझ्या आठवणी तीस वर्षांपूर्वीच्या काळात झेपावल्या. त्यावेळी गिरगावातील ब्राह्मण स्पर्धेच्या एका वक्तृत्व स्पर्धेत मी एक स्पर्धक होतो तेव्हापासूनच परमेश्वराचे देणे असल्याने मी झकास बोललो आणि टाळ्या घेतल्या. त्यानंतर शेवटची उमेदवार होती मीना पेठे. वारली ती आता, त्यावेळी ती मीना वैद्य होती. तिच्या बोलण्यात माझी भाषा नव्हती पण किमान सहा वेळा तिने उदाहरणादाखल संस्कृतमधील काही अर्थपूर्ण श्लोक आपल्या भाषणात पेरले. तिला पहिले बक्षीस मिळाले आणि मी दुसरा आलो. त्या दिवसाच्या वेदना मी कदापी विसरू शकत नाही.

कधी कधी खरंच वाटते, की आपण विद्यार्थी होतो तेव्हा खूप पाठांतर करायला पाहिजे होते. कविता पाठ करायला हव्या होत्या. नाटकांतील उतारे मनात साठवायला हवे होते. पण मी ते केले नाही. त्या उणीवेची जाणीव आतासारखी माणसे करून देऊन डिवचतात तेव्हा मी घरी येतो आणि कपाटातील पुस्तके भ्रमिष्टासारखी वाचतो. मी गेल्या चार दिवसात भुत्तोचे चरित्र वाचले. स्वामी विज्ञानानंदाचे

संत–संगती वाचले. आचार्य अत्र्यांचे 'सावरकर' वाचले आणि आत्ताच कुसुमाग्रजांनी संपादन केलेला काव्यवाहिनीचा खंड पहिला वाचत होतो. पण मला त्या कविता वाचता येत नाहीत. त्यातील कडवे न् कडवे मला वेडावत असल्याचा भास होतो याचे कारण मला समजून चुकले की त्यातील एकही कविता पाठ करण्याइतकी स्मरणशक्ती आता माझ्यात राहिलेली नाही. संसार, राजकारण, लेखन आणि नोकरी त्यातील आठवणींच्या गुदामात आता कवितेला जागा राहिलेली नाही. स्मरणशक्तीचा केव्हाच ऱ्हास झालाय आणि आता तीव्र बनत चाललीय ती केवळ विस्मरणशक्ती. ज्या काळात शक्य होते त्यावेळी पाठांतर केले नाही. आता–

आता भूतकाळात जाता येत नाही. माणूस स्वतःच्या सामर्थ्यावर आपले भवितव्य घडवू शकतो पण भूतकाळातील एखादा क्षण त्याला उधारीवरही मिळत नाही. त्यामुळे त्या कवितेचे दुरावणे मला कायमचे भोगावे लागणार आहे. केशवसुतांच्या त्या

काठोकाठ भरूं द्या पेला,
फेस भराभर उसळू द्या
प्राशन करिता रंग जगाचे
क्षणोक्षणी ते बदलू द्या

या काव्यपंक्तीतील वीररस माझ्या रोमारोमात यापुढे भिनणार नाही. बी कवींचा 'बुलबुल' माझ्याशी बोलणार नाही. भा. रा. तांब्यांची 'नववधू प्रिया' मला दिसणार नाही. टिळकांच्या कवितेतील 'क्षणोक्षणी पडे, उठे परि वळे, पडे बापडी, चुके पथही येऊनी स्तिमित दृष्टीला झापडी–हा आक्रोश ऐकून माझ्या मनाच्या खडकावर अंकूर फुटणार नाही. माधवानुजांच्या 'कृष्णा मिळाली कोयनेप्रती; सखे गे, सुरेख संगम किती' या शब्दांतील श्रृंगारात माझे मन रमणार नाही. 'समर प्रसंगी एक तुतारी दे मज आणूनी, फुंकीत मी जी स्वप्राणाने'या प्रेरणा पंक्ती माझ्या मुखातून उमटणार नाहीत. कवी दत्तांच्या कवितेतील कारुण्याची ओढ माझ्या आसवांना लागणार नाही. आता मनाची माती कोरडी झाली. तिच्यात काही रुज-

णार नाही ज्यावेळी त्या काव्यल्पनांची साठवण करायला हवी होती त्यावेळी मी मनाची साठवण केली आणि आता

काळोखाच्या जगामधे या
मृत आशांच्या चितावरूनिया
पिशाच्च माझे भटकत आहे
शांति नसेची तया–

# दारू

परवा शिवजयंती ठिकठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरी झाली. वास्तविक पहाता शिवजयंती म्हणजे काही नव्याने निर्माण झालेला मंगल दिवस नाही. १६८० सालापासून हा दिवस प्रतिवर्षी उगवत असतो. वीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने या दिवसानिमित्त सुट्टीही जाहीर केली. पण त्यानंतरही केवळ एक सुट्टी यापलिकडे त्याचे महत्त्व नव्हते. पण शिवसेनेने शाखाशाखांतून शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यास सुरुवात केली. त्यानंतर ते लोण झपाटचाने पसरले आणि आता गल्लीगल्लीतून शिवजयंती उत्सव साजरा होत असतो.आमच्या दक्षिण मुंबईत तर अशा गल्ल्यांचे जाळे पसरले आहे. अनेक आमंत्रणे असतात, पण सर्वकडे जाणे जमत नाही तरी शक्यतोवर जेथे जमेल तेथे उभ्या उभ्या जात असतो.

मी यंदा अनेक उत्सव पाहिले, रोषणाई पाहिली आणि हर तऱ्हेचे देखावेही पाहिले. पण लक्षात राहिली ती फक्त एकच गोष्ट.सांगण्या-सारखी नाही पण तरीही मन मोकळें करण्यासाठी सांगितली पाहिजे. एके ठिकाणी शिवजयंतीनिमित्त सत्यनारायणाची पूजा होती. दर्शन घेऊन मी परतलो आणि गाडीत बसलो. इतक्यात समोरून साहेब साहेब म्हणत एक तरुण पुढे आला आणि त्याने माझ्या कपाळाला अबीराचे मळवट लावले. दुसरी घटना वेगळी आहे. गर्दीतून एक तरुण पुढे आला आणि त्याने रेल्वेतील हमालांविषयी काही तक्रार केली. या दोन भिन्न गोष्टीत एक समान गोष्ट होती आणि ती म्हणजे दोघांच्याही तोंडाला दारूचा भपकारा मारत होता.

शिवजयंती असो, सत्यनारायण असो, अगर गणपती उत्सव असो. गल्या काही वर्षात असे प्रसंग वरचेवर येऊ लागले आहेत. अनेकदा तो दारू प्यालेला तरुण अंगाला झोंबतो किंवा पकडलेला हात सोडतच नाही. मग आजूबाजूचे ओशाळलेले कार्यकर्ते मध्यस्थी करतात. या साऱ्या प्रकाराने मी वेळोवेळी बेचैन होतो. कधीकधी संतापतो पण तो संताप आवरावा लागतो. त्या प्यालेल्या तरुणाला त्याचे नावगाव किंवा तो कोणत्या पक्षाचा आहे हेही मी विचारत नाही. तो कार्यकर्ता काँग्रेसचा असेल, भाजपचा असेल किंवा शिवसेनेचाही असू शकेल. निदान त्याक्षणी तरी मला त्यात फरक दिसत नाही. याचे कारण गुन्हेगार आणि नशाबाज माणसाला जातपात, पक्ष, धर्म काही नसते. समाजातील एका विशिष्ट थरातून आलेली ही माणसे आपल्या सोयीसाठी कोणत्याही संस्थेच्या आश्रयाखाली वावरत असतात.

शिवसेनेत अशा तरुणांना क्षणभरही ठेवू नका असे मी म्हणणार नाही. कारण बाळासाहेबांनी हा इशारा यापूर्वीच कठोरपणे दिला आहे. पण मी वर म्हटल्याप्रमाणे हा प्रश्न शिवसेनेपुरता मर्यादित नाही. कारण प्यालेला तरुण हा एका गल्लीत सेनेच्या ध्वजाखाली मला मळवट लावतो आणि अर्ध्या तासाने तोच तरुण कामाठीपुरातील काँग्रेस प्रणीत सत्यनारायणाच्या जागी मला प्रसाद देतो. अशा प्रकारे पिणाऱ्या तरुणांचे प्रमाण समाजात प्रचंड प्रमाणात वाढत आहे. एरव्ही पिणाऱ्या या लोकांना शुभदिनी किंवा उत्सवाच्या दिवशी दारूपासून दूर रहाण्याचाही संयम रहात नाही.दारू पिण्याचे हे वाढते प्रमाण रोखायचे कोणी हाही एक यक्ष प्रश्न आहे. शासनाने आता दारू मुक्त केली आहे. सत्तारूढ पक्ष येनकेन प्रकारे सत्ता टिकविण्यात मग्न आहे. युनियनचे नेते बोनस आणि पगारवाढीच्या पलिकडे डोकावण्यास तयार नाहीत. आम्ही शिवसेनेनेही ऐंशी टक्क्याचा रात्रंदिन ध्यास घेतला आहे. भाजप आगामी निवडणुका कधी होतात याकडे लक्ष लावून आहे. जनता पक्ष आपल्या तिजोरीतील गुजराती टक्का मोजत आहे. शरद पवार काँग्रेस आपली अखिल भारतीय इमेज निर्मिण्याच्या खटपटीत आहे. त्यामुळे हजारो व्यसनाधीन

तरुणांचा प्रश्न आता मामुली वनला आहे.

दारू पिण्याला विरोध करण्याचा सोवळेपणा मी कधीच केला नाही. गोव्यात जाऊन सर्व दारूची चव घेतल्याचा किस्सा मी गेल्या आठवणीतच सांगितला. अत्यंत मर्यादित आणि नियमित मदिरापान करून आपले शरीर सुदृढ ठेवणारी माणसे मी पहातो आहे. नवे वर्ष आणि पाटर्या यावेळी होणाऱ्या दारूच्या सेवनात कधीकधी मीही सहभागी होतो. पण दारू पिणे आणि झिंगणे यात जनीनअस्मानाचा फरक आहे. झिंगणारी माणसे दारूची गुलाम वनतात. एखादा दिवस जरी त्यांना दारू मिळाली नाही तर ती वेडीपिशी होतात.मग आतडी शांत करण्यासाठी ती गटारातील हातभट्टीची दारूही पितात. त्या दारू पिण्यात त्यांचा सर्वनाश असतो. सामाजिक प्रतिष्ठा तर धुळीस मिळतेच पण शरीराचेही जाळें होऊन मेंदू बधीर होतो.आयुष्य वेदनामय होते आणि केव्हातरी आकस्मिक हे जग सोडावे लागते. राजकीय, साहित्यिक आणि कलाक्षेत्रातील भली भली माणसेही दारूने जनावरांच्या मोलाने मारली याची अनेक उदाहरणे आपण वरचेवर पहातो. दारूपासून दूर राहिला असता तर सतीष दुभाषी आज कीर्तीच्या शिखरावर असता. साहित्य आणि राजकीय क्षेत्रातील चांगली चांगली माणसे दारूच्या आधीन जाऊन विनाशाचा मार्ग का चोखाळतात यांचे उत्तर अद्याप मला सापडत नाही आणि आता–

–आता हा तरुण वर्ग आत्महत्येच्या कडचावर उभा आहे. कारण आता दारूला प्रतिष्ठा प्राप्त झाली. मोरारजींना मूर्ख ठरविण्याच्या स्पर्धेत आम्ही केलेली ही एक मोठी घोडचूक आहे. पूर्वी कधी नव्हते एवढे दारूचे बार नाक्यानाक्यावर उघडले. दारूचे परवाने तर दारूबंदी करणाऱ्या राज्यकर्त्यानीच घेतले त्यामुळे दारूबंदीऐवजी दारूचा प्रचार सुरू झाला, अनेक बारमध्ये दारू देण्यासाठी वेटर मुली ठेवण्यात आल्या आहेत. रोज संध्याकाळी तेथील तरुणांची गर्दी पाहिली की छाती दडपून जाते. हातभट्टीच्या गुत्त्यावरही तरुण मुले औषधाचा घोट घ्यावा त्याप्रमाणे नवटाक घशाखाली ओततात आता त्याला मर्यादा राहिलेली नाही. तीन वर्षांपूर्वी एल्फिस्टन–

सारख्या आदर्श कॉलेजातील कॅन्टीनमध्ये मी कोवळ्या पोरांना बिअर पिताना पाहिलं. गेल्या सात आठ वर्षांत दारू पिण्याचे प्रमाण एवढं प्रचंड वाढले आहे की पाश्चात्य देशाप्रमाणे येथेही जेवणावर पाण्याऐवजी दारू पिण्याची पद्धत सुरू होईल. पण माझ्या परदेशच्या दौऱ्यात मी एकही झिंगलेला माणूस पाहिला नाही हे विशेष. श्री. बाळासाहेब भारदे यांच्याशी मी एकदा मध्यरात्रीपर्यंत चर्चा केली तेव्हा संपूर्ण दारूबंदी होईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही असे त्यांनी सांगितले. पुण्यात शोभना रानडेनी दारूविरुद्ध महिलांची आघाडी सुरू केली. पण आता जणू सर्वांनी शरणांगती पत्करली आहे.गांधीजी गेले, गडकरी गेले, रानडे आणि भारदेही स्वस्थ बसले आणि आम्ही काहीही करत नाही याचे कारण दारूच्या नशेप्रमाणे आम्हालाही जोपर्यन्त समाज सुधारण्याची नशा चढत नाही तोपर्यंत ही दारू पिढ्यान् पिढ्या बरबाद करतच रहाणार–

–तेव्हा तरुणांनी आपला निर्णय आपणच घ्यायचा आहे. कोणती गोष्ट कोठे केव्हा आणि किती करावयाची याचे काही संकेत असतात म्हणूनच देवाने चोवीस तासांचे दिवस नि रात्र असे दोन भाग पाडले आहेत. घरात देव्हारा असतो आणि शौचकूपही असतो, झाडू असतो आणि समईही असते. त्याचा केव्हा आणि कसा वापर करायचा हे वापरणाऱ्यांनी ठरवायचे असते. दारूलाही तोच नियम लागू आहे. ती केव्हा, कोठे, किती प्यायची हे पिणाऱ्यांनी ठरवायचे असते. गोंधळलेल्या तरुणांना मी हात जोडून एवढेच सांगेन की, गरज वाटल्यास दारूचा घोट जरूर घ्या पण दारूला मात्र आपला घोट घेऊ देऊ नका. कारण सन्मानाने जगायचे की मातीमोलाने मरायचे या प्रश्नाचा निर्णय त्यांनी घ्यायलाच हवा.

# वेस्ट इंडीज

माणूस हा जन्मतःच वेडा असतो हे गेल्या आठवड्यात लंडनमध्ये झालेल्या दोन क्रिकेट सामन्यात पुन्हा एकदा सिद्ध झाले. दोन वर्षा पूर्वी एक आठवण लिहिली होती. त्यावेळी मुंबईत क्रिकेटचा कसोटी-सामना होता. सामन्याच्या वेळी क्रिकेट समजत असो अगर नसो, लाखो लोक संपूर्ण पाच दिवस आपली कामे कितीही महत्त्वाची असली तरी बाजूला ठेवून त्या वानखेडे स्टेडियमवर किंवा रेडिओ आणि टी. व्ही. समोर बसून आपला सोन्यासारखा वेळ वाया दवड-तात हे माझे कधीही न बदलणारे मत आहे. पण ते कधी बोलून किंवा लिहून व्यक्त केले की चारही बाजूने सर्वजण माझ्यावर बॅटी, बॉल आणि स्टंप्स घेऊन धावून येतात. या माझ्या मताबद्दल मला रविंद्र पाटकरसारखा जिवलग मित्र आणि माझी पत्नी व मुलीही क्षमा करायला तयार नाहीत. तरीही माझे मत कायम आहे. या देशातील सत्तर कोटी नागरिक जरी माझ्या विरोधात असले तरी रशिया, चीन, युगोस्लाव्हिया, पोलंड इत्यादी उद्योगप्रिय देशांनी या वेळदवडू क्रिकेटला दूर ठेवून आपल्या देशाची प्रगती केली आहे. अमेरिकेचाही मलाच पाठिंबा आहे या समाधानात मी नेहमी वावरत असतो. पण

—पण परवाच्या त्या एका दिवसाच्या सामन्यावर मी खूप होतो. कारण प्रश्न फक्त एका दिवसाचा होता आणि तोही आपल्याला दुपारी तीन नंतर दिसणार होता. त्यामुळे नेहमीच्या कामावर विशेष परिणाम होणार नव्हता. म्हणून मीही तो सामना पहाण्याचे ठरवले. संध्याकाळी शाखेचा विद्यार्थी गौरव समारंभ होता. सुधीर भाऊ आले

होते. नंतर सामना पाहू लागलो आणि भारताचा १८३ धावात धुव्वा उडाला. माझ्याप्रमाणेच प्रदीप भिडेलाही क्रिकेटमधील काही कळत नसावे. कारण त्यानेही टी. व्ही. वर मोठ्या उत्साहाने भारताचा खेळ निराशाजनक झाल्याचे रडव्या चेहऱ्याने सांगतले. मी सामना पहायला आल्याने ( टी. व्ही. वर ) माझीच पनवती लागली असे मुलीला वाटले. भारताचा होणारा दारूण पराभव पहायला मला उत्साह नव्हता. आणि वेळही नव्हता कारण त्यानंतर काही कार्यक्रम ठरवले होते. क्रिकेटसाठी मी ते बाजूला ठेवायला तयार नव्हतो

ठरल्याप्रमाणे मी संघमंदिरात गेलो. ग. दि. माडगुळकरांच्या गीतांचा तेथे एक अभिनव कार्यक्रम होता. बाळ कोल्हटकरही येणार होते. पुणेकर मंडळींनी आयोजित केलेल्या त्या कार्यक्रमात रविन्द्र साठे, उत्तरा केळकर इत्यादी गायक गाणार होते. माडगुळकरांची गाणी म्हटली की मी वेडा होतो. विसाव्या शतकातील या महाकवीने महाराष्ट्राला मांगल्याचे जे दर्शन घडविले त्याला तुलना नाही. मी अधीरपणे संघात गेलो पण दुर्दैव म्हणजे तेथे त्या क्रिकेट सामन्यामुळे कर्फ्यू ऑर्डरप्रमाणे सामसुम होते. माझ्याप्रमाणेच जेमतेम चार रसिक आले होते. बुकिंगवाल्यांनी तो कार्यक्रम कोणतेही कारण न देता रद्द झाल्याचे सांगितले. आता परत घरी जाऊन टी. व्ही. वर सामना पाहण्यासारखी नामुष्की नव्हती. माझ्या क्रिकेटविरोधी मनाचा तो दारूण पराभव होता. घरी परतलो असतो तर सगळ्यांनी माझी फिरकी घेतली. असती. म्हणून तेथून थेट चर्चगेटला गेलो. एरॉसला 'कुंग फू' हा कराटे फेम चित्रपट लागला आहे. तिकीट काढले आणि गेलो. पण एरॉसचेही संघमंदिर झाले होते. थिएटरामध्ये हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच लोक आणि तेही कॅन्टीनच्या भोवती जमले होते. दरम्यान बराच वेळ गेल्याने सामन्याला विलक्षण कलाटणी मिळाली होती. एव्हाना पाच गडी बाद झाले होते. चर्चगेट परिसराला स्मशान अवकळा प्राप्त झाली होती. आता घरी जाऊन टी. व्ही.वर

. . . ७

धमाल बघण्याचा मोह अनावर झाला. चित्रपट सुरू झालेला. मूठभर प्रेक्षक असल्याने तो सुरू करावा का रद्द करावा याचा व्यवस्थापक बहुधा विचार करीत असावेत. इतक्यात मॅनेजरपैकीच एकजण कॅन्टीनजवळ आला. त्यांनी मला ओळखल्यासारखे वाटले. चित्रपट रद्द झाल्याची बातमी तो देईल या आशेने मी विचारले, 'पिक्चर सुरू केव्हा करता?' तो म्हणाला, 'अरे वा नवलकरसाहेब, तुम्ही आलात म्हणजे आता पिक्चर सुरू केलेच पाहिजे.' आणि तीन मिनिटात पिक्चर सुरू झाले. मी कपाळाला हात लावून थिएटरमध्ये गेलो. त्यानंतर तो कराटेवाला कुंग फू झाडत असलेली प्रत्येक लाथ माझ्याच छाताडावर बसल्यासारखी वाटत होती. चित्रपट संपला तेव्हा सामनाही संपला होता. भारत जिंकला होता आणि मी हरलो होतो.

रस्त्यात जल्लोष चालला होता. पुन्हा त्या जल्लोषाचा मला अर्थच समजत नव्हता. कारण त्यांच्यापैकी अनेकांना क्रिकेटचा अर्थ समजत नव्हता. मालीशवाले, पालीशवाले 'क्या इंडीयाने कमाल किया' म्हणून नाचत होते. का कुणाला ठाऊक, मला त्या सर्वांचा हेवा वाटत होता. रात्री दोन वाजेपर्यंत धमाल चालली होती. मला या आनंदात सहभागी होता येत नव्हते म्हणून मी चरफडत होतो. सकाळी नेहमीप्रमाणे लवकर उठलो आणि भेटायला येणाऱ्या प्रत्येक क्रिकेट शौकिनावर सूड उगविण्याचे ठरविले. माणसाचा स्वभाव हा असा असतो. तो स्वतः जेव्हा एखाद्या गोष्टीला वंचित होतो तेव्हा दुसऱ्यावर त्याचा सूड उगवितो. मीही त्याला अपवाद नव्हतो. शाखेचा दरवाजा उघडताच माझा लेखनिक विजय सेंजीत आला. तो कपिलदेवाच्या थाटातच शाखेत शिरला. आल्यावरोबर मी त्याला पहिला प्रश्न विचारला 'हा वेस्ट इंडीज देश आहे तरी कोठे?' क्षणभर तो बंपर टाकल्याप्रमाणे गोंधळला आणि त्याने ताबडतोब सांगून टाकले, 'असेल कोठे तरी पृथ्वीच्या पाठीवर. आपण जिंकलो ना? खूप झाले.' मी मोठ्याने हसलो. मला गुगली बॉल सापडला होता. थोड्या वेळात सावंत 'इंडीया जिंकली इंडीया जिंकली' असे ओरडतच आला. मी त्याला विचारले, 'हरलं कोण?' तो म्हणाला, 'अर्थातच वेस्ट इंडीज.'

' कोठे आहे हेवेस्ट इंडीज ?' मी गुगली वॉल पुन्हा टाकला. सावंत बावरला पण त्याने आत्मविश्वासाने सांगितले, ' नक्की माहीत नाही, पण इंडीयाच्या बाहेर कोठेतरी आहे.' मी पुन्हा मोठ्याने हसलो. त्याच वेळी तेथे नवलकर नावाचेच एक वयस्कर, विद्वान गृहस्थ बसले होते. त्यांनी अक्कल पाजळली. म्हणाले, ' वेस्टइंडीज म्हणजे इंडीयाच्याच वेस्ट भागातून कोठून तरी आले असावेत.' मी सेंजीत आणि सावंतही हंसले.

त्यानंतर या क्षणापर्यन्त जो भेटेल त्याची मी वेस्टइंडीज कोठे आहे हा प्रश्न विचारून विकेट घेत राहिलो आहे. सकाळी एकाने पेढे आणले. त्यालाही तोच प्रश्न विचारला. तेव्हा तो कावरा–बावरा झाला. ते खेळाडू काळे असल्याने, आफ्रिका खंडातून आले असावेत, असा भौगोलिक अंदाज त्याने व्यक्त केला. इतक्यात एका राजकीय सहकाऱ्याचा फोन आला. त्यांनीही सामना जिंकल्याचे सांगून आपली राष्ट्रभक्ती व्यक्त केली. मी आपले निर्विकारपणे विचारले, हे वेस्ट इंडिया कोठे आहे हो ?थोडा वेळ तो गप्प बसला आणि म्हणाला टॉयलेटला जाऊन येतो आणि मग पुन्हा फोन करतो. नंतर काही त्याचा फोन आला नाही हे सांगणे नलगे. आतापर्यंत क्रिकेटच्या गप्पा मारणाऱ्या सोळा लोकांना मी हा प्रश्न विचारला पण त्यापैकी एकालाही वेस्ट इंडीज म्हणजे काय सांगता आले नाही. स्वतःला शहाणा समजणाऱ्या माझ्या एका मित्राला हाच प्रश्न विचारता तो माझ्यावर एकदम उखडला. विंडीज कोठे आहे याची उठाठेव तुला कशाला हवी ? तुला क्रिकेटमध्ये इंटेरेस्ट नसेल. तरी सामना इंग्लंडमध्ये झाला हे महत्त्वाचे आहे., मी हसू आवरले.

रात्री रविंद्र महाजनींकडे गप्पा मारत होतो. ही वेस्ट इंडिजची इन्टरेस्टींग स्टोरी सांगताना वहिनींनी मला अडवले आणि म्हणाल्या, ' प्रमोदभाई, यानंतर तुम्ही मला वेस्ट इंडीज कोठे आहे विचारणार असाल तर मी आत्ताच सांगते, 'मला काही माहीत नाही.' आणि आम्ही सगळे सात मजली हंसलो.

वहिनींनी कबुली जबाब दिला. पण माझा असा एक मित्र आहे

की जो कधीच शरण येत नाही. तो १०६ च्या बससाठी बस स्टॉपवर उभा होता. त्याला मी वेस्ट इंडीज कोठे आहे विचारताच तो म्हणाला, 'अरे कमाल आहे. हा काय प्रश्न झाला ?'

'मग सांग ना वेस्ट इंडीज आहे कोठे ?' मी पुन्हा तेच विचारले.

'अरे, मला काय शाळेतला पोर समजलास काय ? वेस्ट इंडीज कोठे आहे विचारायला ? त्यांनी प्रश्न पुन्हा उडवला.

'मला माहीत नाही म्हणून विचारतोय. सांग रे वेस्ट इंडीज कोठे आहे ?' मी कपिलप्रमाणे चिवट झुंज द्यायला सुरुवात केली.

'काय सकाळी सकाळी टिंगल लावलेस ! ते कोठे आहे हे काय तुला माहीत नाही?' त्यांनी पुन्हा प्रश्न टाळला.

'खरंच माहीत नाही म्हणून विचारतो, सांग रे कोठे आहे वेस्ट इंडीज ?' त्याचा चेहरा एव्हाना गोरागोरा झाला होता. तो म्हणाला, 'असल्या पोरकट प्रश्नांची उत्तरे मी देत नसतो.' आणि पुढचा प्रश्न विचारण्यापूर्वीच त्यांनी बसमध्ये उडी मारली. त्या बसचा नंबर होता '८५!' माझ्या तावडीतून सुटण्यासाठी त्याला दुसरा मार्गच नव्हता.

वेस्ट इंडीजचा हा विनोद मी गेले चार दिवस गाजवतो आहे. आज सकाळी माझ्या छोटचा मुलीने मला विचारले, 'बाबा, तुम्ही तरी सांगा वेस्ट इंडीज कोठे आहे ?' इतक्यात टेलीफोनची घंटा वाजली म्हणून माझी सुटका झाली कारण–

–कारण मला तरी कोठे माहीत आहे वेस्ट इंडीज कोठे आहे ते–

# टमरेल

गेल्या आठवडचात गिरगावात झालेल्या गिरगांव बचाव परिषदेत आपले विचार मांडण्यासाठी विविध पक्षातील लोक आले होते. त्यांच्यापैकी चिकित्सक समूहाचे प्रि. श्री. नाबर यांनी मोठे उद्‌बोधक विचार मांडले. आपल्या जागा पागडी घेऊन व्यापाऱ्याला विकणारे मराठी बांधव गिरगावातून चाळ सोडून उपनगरात फ्लॅटमध्ये रहावयास का जातात याची कारणमीमांसा करताना त्यांनी सांगितले, , येथील चाळीत कितीही सुखसोयी असल्या तरी आत्ताच्या तरुण पिढीला स्वतंत्र ब्लॉकच हवा असतो. कारण या पिढीतील तरुणांना हातात टमरेल घेऊन शेजाऱ्यांच्या दारावरून जायला लाज वाटते.' आतापर्यंत अनेक गिरगावकरांनी माझ्याशी बोलताना त्यांनी आपली जागा कां सोडली याची अनेक कारणे सांगितली. त्यातील काही खरी होती आणि काही केवळ सबब म्हणून सांगितली होती. पण कोणीही मला आमच्या गिरगांवातील वास्तव्याच्या मार्गात टमरेल येते असे सांगितले नव्हते. तरीही त्यांनी दडविलेले सत्य नाबरसरांच्या मुखातून बाहेर पडले आणि तेव्हापासून मी विचारमग्न झालो.

माणसाच्या आयुष्यात टमरेलला एवढे महत्त्वाचे स्थान असेल याची मला आतापर्यन्त कल्पना नव्हती. पण नाबरसरांनी सांगितलेली गोष्ट खरी होती. कारण गिरगांवातील अनेक जणांनी आपल्या साडेचारशे पांचशे चौरस फुटाच्या जागा सोडून उपनगरांत चारशे चौरस फुटाचे ब्लॉक घेतल्याचे मला माहीत होते. गिरगावातील त्यांच्या जागेत सर्व काही होते. हवा होती. पाणी होते. नाक्यावर बाजार

होता. पुढे बस स्टॉप होता. मागे स्टेशन होते. नाटके, थिएटर सर्व काही होते. पण तरीही जागा सोडली कारण ती सेल्फ कन्टेन्ड नव्हती. याचाच अर्थ गिरगांवातील जागेत त्यांना जरी प्रायव्हसी होती तरी त्यांच्या टमरेलला प्रायव्हसी नव्हती. थोडक्यात म्हणजे त्यांच्या जागेत टमरेल कन्टेन्ड सुद्धा नसल्याने टमरेलला दुसऱ्याच्या दारावरून रोज सकाळी फेऱ्या माराव्या लागत असत. म्हणून जागा सोडण्याबाबत टमरेल हा एकमेव घटक होता.

या टमरेलनी आमच्या गिरगांवचा सत्यानाश केला याची मला अगोदर कल्पना आली असती तर परिषदेत 'टमरेल' या विषयावर मी विचारवंतांचा एक परिसंवाद ठेवला असता आणि आदल्या दिवशी हाती टमरेल घेऊन गिरगांवकरांचा मंत्रालयावर एखादा प्रचंड मोर्चाही नेला असता. तशी ती कल्पना नवीन नव्हती. मागे मी एकदा गृहनिर्माण मंत्री यशवंतराव मोहितेंच्या बंगल्यावर पडक्या घरांना लावलेल्या टेकूंचा मोर्चा नेला होता. परिसंवादातही टमरेलवर विचार व्यक्त करण्याची संधी माझ्यासकट अनेकांना मिळाली असती आणि 'गिरगाव बचाव' चळवळीच्या मूलभूत कारणालाच त्यामुळे स्पर्श झाला असता.

ज्या पुढच्या पिढीला आता टमरेलचा तिरस्कार आणि लाज वाटू लागली आहे त्या पिढीला त्या टमरेलचे माहात्म्यच समजलेले नाही. माझ्यासारख्या वडीलधारी अनुभवी मंडळीनी ते पुढील पिढीला समजावून सांगायला हवे. आमच्या गिरगावात अशी अनेक बिऱ्हाडे आहेत की ज्यात एकवेळ देवघरे नसतील, दिवाबत्ती नसेल, चूल नसेल किंवा झाडूही नसेल. पण टमरेल नाही असे बिऱ्हाड कुणाला शोधूनही सापडणार नाही. इतके गिरगावकरांचे आणि टमरेलचे जवळचे नाते आहे. बेडेकरांच्या चाळीतील गळचातील जानवी गेली पण टमरेल मात्र निष्ठेने प्रत्येकाच्या हाती राहिले. मलबार हिल, वरळीचे लोक काठी घेऊन मॉर्निंग वॉकला जातात. पण गिरगांवकरांना मात्र वीस पंचवीस फुटाच्या मॉर्निंग वॉकसाठी टमरेलचीच सोबत मिळते. संडासात गेल्यावर गिरगावकर स्वतःशीच बोलतो असा सर्वांचा

गैरसमज आहे. पण तो रोज सकाळी टमरेलशी हितगुज करत असतो.

हे टमरेल गिरगावकरांच्या जीवनाशी एवढे समरस झाले आहे की अनेकांच्या जीवनांत त्यांनी क्रांती घडवून आणली आहे. केशवजी नाईकांच्या चाळीतील तिसऱ्या मजल्यावरील सविता रोज टमरेल घेऊन दुसऱ्या मजल्यावर उभी का रहाते हे चाळीतील लोकांना तिचे दुसऱ्या मजल्यावरील अविनाशशी लग्न होईपर्यंत ध्यानात आले नव्हते. आम्हा गिरगावकरांना दुसरी मोकळी जागा नाही आणि मोकळा वेळ नाही. हातात टमरेल घेऊनच जाता येता काही इशारे करता येतात किंवा संधी मिळालीच तर संध्याकाळी जपानी बागेत भेट असे पुटपुटले जाते. त्यामुळे टमरेल हे परस्परांशी बोलण्याचे एक प्रभावी माध्यम झाले आहे. हाती टमरेल घेऊन बाल्कनीत उभा राहिला की त्याचा किंवा तिचा कोणाला संशयही येत नाही. रोज सकाळची अगदी ठरल्यावेळी ही टमरेल फेरी नसती तर शांता-रामाच्या चाळीतील हेमाचा आणि अनिलचा साखरपुडा कधीच झाला नसता. आमच्या गिरगावातील अशा असंख्य आदर्श जोड्या केवळ टमरेलने जुळविल्या आहेत हे आत्ताच्या पिढीला समजू नये काय?

या टमरेलला गिरगावकरांच्या संसारात एक फार मोठे स्थान आहे. काही बिऱ्हाडात तीन तीन पिढ्या एकच टमरेल मोठ्या श्रद्धेने वापरले जाते. झाववाच्या चाळीतील शिवनाथ भावे पाहुण्यांना आजोबांचा फोटो दाखवतात आणि त्याच वेळी कोपऱ्यातील आजोबांच्या टमरेलकडे भावनाविवश होऊन बोट दाखवतात. टमरेलवरील या प्रेमापोटी गिरगांवकर एक वेळ स्वतःची पँट शेजाऱ्याला वापरायला देईल, पण घाईगर्दीत शेजाऱ्यांनी त्याचे टमरेल नेले तर तो त्याच्या अंगावर धावून जाईल. पूर्वी टमरेलच्या चोऱ्यांवरून इतकी भांडणे होत की चाळीत दोन गट निर्माण होत. पण आता धोब्याच्या कपड्याप्रमाणे टमरेलवरही खूण करण्याची पद्धत सुरू झाल्याने चोऱ्या कमी होऊ लागल्या आहेत.

हे टमरेल म्हणजे गिरगांवकरांच्या राग आणि अनुरागाचे एक मोठे प्रतीक आहे. ते टमरेल फुटलेले असेल तर पाणी सांडत सांडत तसे संडासात जाईल, लवकर पाणी वाहून जाईल म्हणून लवकर आटोपेल पण टमरेल टाकून देणार नाहीत. टमरेलला शिवल्यावर शिव शिव म्हणत हात धुतील पण ते टमरेल मात्र कधी धुणार नाही.

आज तर शेकडो गिरगांवकरांची अव्रू एकटचा टमरेलनी वाचवली आहे. घर दुरुस्ती मंडळांनी अनेक घरे अर्धवट सोडल्याने तेथे संडासांना दारेच नाहीत. अशा चाळीत प्रत्येक टमरेलला एका दोरीने दगड बांधलेला आहे. संडासात गेल्यानंतर त्या दगडांनी टमरेलवर सतत टणटण टणटण आवाज काढत बसले म्हणजे तोपर्यंत दुसऱ्याने तेथे जायचे नाही असे ठरलेले असते. आज ते टमरेल नसते तर अनेक गिरगांवकरांची दहा दहा मिनिटांनी अव्रू गेली असती. असे हे आमच्या गिरगावकरांना पिढ्यान्‌पिढ्या सोबत करणारे, अनेक मुलामुलींची लग्ने जमविणारे, गिरगांवकरांशी रोज सकाळी सुखदुःखाच्या गोष्टी बोलणारे, गिरगांवकरांची लाज राखणारे, साऱ्या गिरगांवचे मानबिंदू ठरलेले टमरेल हाती घ्यायला आजच्या तरुण पिढीला लाज वाटते हे पाहिल्यावर टमरेल देखील दुःखातिशयाने ढसाढसा गळायला लागतील...

# रुपारेल

या मुंबई शहरात एकही जागा अशी राहिली नाही की जेथे माणसाला सुलभतेने प्रवेश मिळतो. ही गर्दी जर अशीच वाढत राहिली तर एक दिवस असा येईल की जेव्हा बाहेरून परतल्यावर घरात प्रवेश मिळण्यासाठीही अर्ज करावा लागेल. हे वाक्य आत्ताच लिहून घेत असताना माझा लेखनिक उपहासाने हसला. पण आता हसण्याचेही दिवस गेले असून हसणाऱ्यालाच जग आता हसू लागले आहे. दहा वर्षांपूर्वी वसंत मासिकात मी एक विनोदी लेख वाचल्याचे स्मरते. त्यात शंभर वर्षांनंतर मुंबईतील बाजारभावांचा अतिरेकी अंदाज केला होता. तो वाचून मीही तेव्हा असाच लेखनिकासारखा हसलो होतो. पण आता मीच हास्यास्पद ठरलो आहे. याचे कारण त्या लोकांनी २०५० सालचे वर्तविलेले बरेचसे काल्पनिक भाव आजच प्रत्यक्षात आले आहेत. काही भाव मला स्पष्ट आठवतात. त्यावेळी पापलेट रुपयाला मिळत असे आणि ओला वाटाणा सिझनमध्ये आठ आणे किलो मिळायचा. त्याचा त्यांनी अनुक्रमे रुपये तीस आणि रुपये पंधरा असा भाव वर्तविला होता. त्या लेखकाचे शंभर वर्षांनंतरचे भविष्य आजच साकार झाले आहे.

अशा तऱ्हेची अनेक हास्यास्पद भविष्ये व्यवहारात खरी ठरू लागली आहेत. मी रूपारेल कॉलेजचा विद्यार्थी, त्या काळी नुकतीच मॅट्रीक बंद होऊन शालांत परीक्षा सुरू झाल्याने बोर्डात प्रचंड गोंधळ होता. त्या गोंधळात मीही पास झालो. नाहीतर कदाचित एस. एस. सी. च्या वाऱ्या करत असतो. नंतर कॉलेजमध्ये जायचे ठरवले. झेविअर्स आणि

एलफिन्स्टन ही दोनच कॉलेजे नावाजलेली होती. दोनही कॉलेजात माझा वशिला केराच्या टोपलीत गेला आणि अखेर मला रूपारेलमध्ये प्रवेश मिळाला. त्यावेळी जयहिंदसारख्या कॉलेजमध्ये सहजतेने प्रवेश मिळत असायचा. सिद्धार्थमध्ये तर सर्वसामान्य विद्यार्थ्याला वर्षभर कॉलेजची द्वारे खुली असायची. रूपारेल तर वर्षापूर्वीच सुरू झाल्याने अर्धवट बांधलेल्या अवस्थेत होते. फक्त आर्ट आणि सायन्सच्या दोन इमारती अर्धवट बांधून त्यांना घाईघाईने गेरू लावला होता. आर्टस इमारतीच्या मागील प्रचंड मैदान झाडेझुडपे आणि गवतांनी भरलेले होते.

अशा या कॉलेजमध्ये आम्ही लाँग पँट हाताने वर धरून प्रवेश केला. नाहीतर त्यावेळी बहुतेक दादा कोंडकेच असायचे. वर्गातील लाद्याही बसविलेल्या नव्हत्या. खिडक्यांच्या काचा लादायच्या होत्या. आमचा वर्ग चालू असतानाच घोडचावर चढून इलेक्ट्रिशियन पंखे लावत होते. त्यामुळे आम्हाला मागच्या बाकावरून पुढच्या बाकावर कागदी बाण मारताना अडथळा व्हायचा. प्रिन्सिपॉल सी. बी. जोशी म्हणजे हिमालयाएवढा माणूस होता. त्यांच्यावर मी वेगळी आठवण यापूर्वीच लिहिली आहे. सी. बी. त्यावेळी आम्हाला सर्व कामाला जुंपायचे. रोज संध्याकाळी एक तास मैदानातील गवत कापण्याचे काम आम्हालाच करावे लागे. मातीचे ढिगारे उपसण्यापासून ते झाडे लावण्यापर्यंत सगळी कामे आम्ही आनंदाने करीत होतो. त्यावेळी तोकडी खाकी पँट घालून सी. बी. स्वत: आमच्याबरोबर राबत असत. ते वातावरण वेड लावणारे होते. सी. बी. च नव्हे तर त्यांच्या पत्नीही अशाच कामाला जुंपल्या होत्या. तेव्हा कॉलेजचे कँटीन नव्हते. नाक्यावर साठेच्या पत्राशेडमध्ये उसळ पाव आणि बटाटावडा मिळायचा. कॉलेज कँटीनचा भटारखाना काही काळ सी. बीं. च्याच घरी त्यांच्या पत्नी चालवायच्या. नाटककार मनोहर काटदरेंची पत्नी, त्यावेळची कुमारी नलिनी भिडे ही एक रूपारेल कॉलेजची एक नंबरची पावती धारण केलेली पहिली विद्यार्थिनी होती. तीही सर्व चळवळीत उत्साहाने भाग घ्यायची.

आज दिसणाऱ्या रूपारेल कॉलेजच्या भव्य वास्तूची वीट आणि वीट माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली आहे. आता जेथे प्रोफेसर्स कॉमनरूम आणि शालांत परीक्षेचे ऑफिस आहे, ती इमारत जिमखान्यासाठी १९५७ साली बांधली गेली. त्या जिमखान्याची पहिली अटीतटीची निवडणूक लढवून मी फ्लूकने सेक्रेटरी म्हणून निवडून आलो. फ्लूकने एवढ्यासाठी म्हणायचे की माझ्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचे नाव नगरकर होते. नावातील साम्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ उडाला आणि एकमेकांची मते मिळून मी निवडून आलो. त्यानंतर कँटीन, उपप्राचार्याचा बंगला, विद्यार्थ्यांचे हॉस्टेल, सायन्सची विस्तारीत इमारत आणि त्याला संलग्न ओपन एअर थिएटर हे सर्व आमच्या डोळ्यादेखत उभे राहिले. प्राचार्य श्री. जोशींनी विद्यार्थ्यांच्या प्रचंड उत्साहावर आणि अभिमानावर स्वार होऊन साकार केलेले ते एक स्वप्न होते.

प्रि. जोशींना त्यावेळी सहकारीही तसेच तोलामोलाचे मिळाले होते. भिडे आणि महाजन हे दोघे व्हाईस प्रिन्सिपल होते. पण त्याच बरोबर बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, प्रा. पोतदार (आता पार्ले कॉलेजचे प्रिन्सिपाल), प्रा. मांजरेकर, प्रा. सोहनी, प्रा. चंद्राबेन, कृ. पां. कुलकर्णी, प्रा. ल. ग. जोग, प्रा. नेर्लेकर, प्रा. मुद्गल इत्यादी अनेक प्राध्यापकांनी कॉलेजला वाहून घेतले होते. अभ्यासाबरोबरच इतर कलागुणांनी विद्यार्थी पुढे यावेत म्हणून सगळ्या सरांची धडपड चालायची. मी आणि वंदना विटणकर कॉलेजात एकच भितीपत्रक चालवीत होतो. रानडेपासून गोखलेपर्यंत महाराष्ट्रातील बहुतेक सर्व वक्तृत्व चषक मी रूपारेलच्या वतीने जिंकले आहेत. पण त्यासाठी माझ्या मराठीचे शुद्धीकरण बॅ. विठ्ठलराव गाडगीळांनी केले हे मी जन्मभर विसरणार नाही. आजही राजकारणात आम्ही दोन टोकाला असलो तरी गुरू–शिष्याचे नाते आम्ही दोघांनीही मनोमन जोपासले आहे. त्यावेळी वक्तृत्व स्पर्धेत माझ्याबरोबर कधी प्रा. गांगण भागिदार असायचे तर कधी प्रा. राम कापसे जोडीला असत. त्यावेळी ते दोघेही माझे सिनिअर सहविद्यार्थी होते.

आजची आठवण मात्र वेगळीच आहे. त्यावेळी रूपारेलमध्ये ब्राह्मण विद्यार्थ्यांचा इतका भरणा असे की दारात बोंबील टांगला तर वर्ग ओस पडतील, असे आम्ही चेष्टेने म्हणत असू. पण तरीही प्रवेशासाठी कधीच गर्दी नव्हती. किंवहुना आपल्या भावंडांना आणि मित्रांना रूपारेलमध्ये यावयास सांगा असे जोशी आणि भिडे सर आम्हाला नेहमी सांगायचे. ज्यु. बी. ए. नंतर मी आजारी पडलो. आगगाडीच्या प्रवासाची दगदग झेपणार नाही म्हणून वडिलांनी मुंबईच्या कॉलेजात घालावयाचे ठरविले. तसे पत्र जाताच प्रि. सी. वी. जोशी एका दुपारी स्वतः माझ्या घरी आले आणि मी कॉलेज सोडू नये म्हणून त्यांनी आग्रह केला. मी ते मान्य केले आणि रूपारेलमधून बी. ए. झालो.

त्याकाळी विद्यार्थी मिळविण्यासाठी जरी प्रचार करावा लागत होता तरी प्रि. जोशी हा एक महान द्रष्टा तत्त्ववेत्ता होता. रूपारेलच्या वाचनालयाच्या स्थापनादिनी त्यांनी केलेले इंग्रजी भाषण अद्याप माझ्या कानात घुमते. पहिल्या मजल्यावर दहा हजार पुस्तकांचे एक वाचनालय स्थापन होऊन श्री. आपटे यांची ग्रंथपाल म्हणून नेमणूक झाली. उद्घाटन समारंभाची आपटेंची कल्पना सी. बी. नी उचलून धरली, त्यावेळी यशवंतराव कोणत्यातरी खात्याचे मंत्री होते पण त्यांना वेळ नव्हता. इतर कोणतेही मंत्री उपलब्ध नव्हते. त्यावेळी इंदिरा गांधी कोणत्यातरी कामासाठी मुंबईला आल्या होत्या. इतर कोणीच नाही तेव्हा त्या नेहरूकन्येला आणण्याचे सी. बी. नी ठरविले. त्याप्रमाणे त्या आल्याही. त्यांचा परिचय करून देण्यासाठी प्रा. जोशींनी जेव्हा प्रास्ताविक भाषण केले तेव्हा ते म्हणाले, ' इंदिराजी, आज अनंत अडचणींना तोंड देत मोठ्या अंधविश्वासाने आम्ही आमच्या कॉलेजचा विकास साधत आहोत. आज कॉलेजात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असली तरी आम्ही क्वालिटीवर भर देत असल्याने लौकरच हे कॉलेज शहरातील सर्व सुविधायुक्त अतिशय आदर्श कॉलेज बनेल आणि मग प्रवेशासाठी गर्दी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सामावून घेणे अवघड होईल. ' आणि त्याच वेळी इंदिराजींचे

स्वागत करनाना ते म्हणाले, 'आज जरी इंदिरा गांधींना भारत पंतप्रधानांची मुलगी म्हणून ओळखत असला तरी या मुलीच्या अंगी विलक्षण गुण आहे की ज्यामुळे उद्या कदाचित पंडितजींना जग इंदिराजींचा पिता म्हणून ओळखेल.'

विश्वाचा फेरा हा असतो. ही आठवण लिहिताना सर अर्ल एसेल याचे 'धी ग्रेट कॉन्ट्रव्हर्शियल मेन ऑफ धी सेंचुरी' हे पुस्तक समोर आहे. त्या पुस्तकात लेखकांनी पंडितजींचा 'मिस्टर जवाहरलाल नेहरू, धी फादर ऑफ मिसेस इंदिरा गांधी–' असा दोनदा उल्लेख केला आहे. गेल्या आठवड्यात माझ्याकडे एका विद्यार्थ्याचे पालक आले. त्या विद्यार्थ्याला ९३ म्हणजे ९१ टक्क्यापेक्षा अधिक गुण शालांत परीक्षेत मिळाले होते. त्याला एफ. वाय. सायन्सला इलेक्ट्रॉनिकसाठी प्रवेश हवा होता. टक्केवारी प्रचंड असल्याने अडचण भासणार नव्हती. मी प्रिन्सिपाल शिदेना फोन केला. सरांनी सांगितले, 'नवलकर, माझ्या हातात काहीच नाही. पहाटे पाच वाजल्यापासून कॉलेजला सहा ते सात हजार विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी गराडा पडला आहे. प्रत्येकाला मेरीटवरच प्रवेश मिळेल. आणि–'

– आणि त्या विद्यार्थ्याला ९० टक्क्यावर मार्क असूनही प्रवेश मिळाला नाही. प्रा. जोशींची भविष्यवाणी खरी ठरली होती. गेल्या वीस वर्षात पापलेट आणि वाटाण्याबरोबर सर्व कॉलेजांचाही भाव बेसुमार वाढला होता. या काळात अवमूल्यन झालें ते फक्त–मानवी गणांचे !

# नोकरी

'साहेब जरा काम होतं.'

'काय बोला.'

'कोठेतरी नोकरी पाहिजे होती.'

'कोठे म्हणजे ?'

'कोठेही चालेल.'

'म्हणजे नेमकी कोठे ?'

'स्टेटबँक, जॉनसन, निरलॉन कोठेही चालेल.'

'उगीच कंपन्यांची नावं घेऊ नका. प्रथम नक्की नोकरी शोधा आणि मग माझ्याकडे शाखाप्रमुखाची चिठ्ठी घेऊन शिफारशीसाठी या.'

'साहेब, तुम्ही शोधाना कोठेतरी. नाहीतरी दत्ताजी साळवींना चिठ्ठी लार्सनमध्ये द्या. भरती आहे.'

'मग असं करा. शाखाप्रमुखाची चिठ्ठी घ्या आणि थेट दत्ताजी साळवींकडे जा (देव तुमचे भले करो स्वरात)'

एखाद्या ईशस्तवनाप्रमाणे शाखाशाखातून हा डॉयलॉग रोज होत असतो. शिवसेनेत आल्यापासून नोकरी मागावयास येणाऱ्या तरुणांचे बोलणे, वागणे आणि मनोभूमिका याचे तपशीलवार टिपण जर मी सुरवातीपासूनच केले असते तर आज मला त्यावर डॉक्टरेट मिळाली असती. नोकरी मागावयास येणाऱ्या लोकांच्या विषयी माझ्याच काय पण कोणच्याही मनात अपार सहानुभूती असते. अनेकदा त्यांची दया येते पण तो मजबूर झालेला तरुण सहजासहजी हलावयाला तयार

नसतो. त्याला आशा असते की नवलकरांची एखादी चिठ्ठी मिळाली की सहज काम होईल. खरोखरच तसे घडले असते तर माझ्या सह्यांच्या पत्रांचा एक गठ्ठाच मी टेबलावर ठेवला असता. पण दुर्दैवाने तसे होत नाही. आजकाल नोकरी ही चीज इतकी महाग झाली आहे की शे–सव्वाशे ठिकाणी शिफारस केली तरी एखाद्याच ठिकाणी 'घोडा' लागतो. कधीकधी एखादा उत्साही शाखाप्रमुख प्रास्ताविक भाषणात शाखेने गेल्या पाच वर्षात दोन हजार तरुणांना नोकऱ्या दिल्याचे सांगतो. त्यावेळी मनातल्या मनात आचार्य अत्रेंची आठवण काढतो. अत्रे सभेचा आकडा असाच सांगत असत. एकदा तर त्यांच्या कित्ते भंडारी हॉलमधील सभेला लाखो लोकांनी गर्दी केल्याचे मराठाने छापले. शिवसेनेतर्फे आणि स्थानिक लोकाधिकार समितीतर्फे ऐंशी टक्के मराठी भरतीच्या मागणीस बरेच यश आले आहे. पण तरीही तेथे विशिष्ट तरुणांची भरती करणे सोपे नसते. बाळासाहेबांनी तर 'कृपया नोकरीसाठी भेटू नये.' अशी परखडपणे पाटी लावून टाकली आहे.

नोकरीसाठी येणारे तरुण हे पुन्हा शिवसेनेचेच असतात असे नाही. कोठून तरी शिवसेनेशी नाते जोडतात, नोकरी मिळवतात आणि भरती झाल्यावर कंपनीत शिवसेनेची युनियन तोडण्यासाठी आघाडीवर रहातात. काही लोक तर शिवसेनेकडे एप्लॉयमेन्ट ऑफिस म्हणूनच पहातात. इतकेच नव्हे तर नोकरी देत नाहीत तर शिवसेनेचा उपयोग काय असा जाता जाता ताशेराही मारतात. कित्येक जण न विचारताच परभारे नावाचा रेफरन्स देतात. मग कंपनीचे पत्र येते, आपण यांना ओळखता काय ? कोण तो काळा गोरा माहीत नसतो. पण बिचाऱ्याचे नुकसान नको म्हणून मी कळवितो की, 'त्याला' मी लहानपणापासून ओळखतो. 'तो' बुद्धीमान आहे. 'तो' प्रामाणिक असून मेहनती आहे. 'त्याला' नोकरीत घेतल्यास तुमच्या कंपनीचे 'भले' होईल. त्यावर 'त्याला' नोकरी मिळतही असेल. पण 'त्याचे' तोंड पहाण्याचे भाग्य मात्र कधीच लाभत नाही.

हा झाला मजबुरीने नोकरी मागणाऱ्यांचा किस्सा. क्षणभर वैताग

आला तरी मला त्यांच्या विषयी राग नाही. किंवा असूयाही नाही. पण एकीकडे हजारो लाखो तरुण नोकरीसाठी वणवण हिंडत असताना बापजाद्यांच्या पुण्याईने नोकऱ्या मिळाल्या आहेत त्यांच्यापैकी काहीचे किस्से धडक्याच भरवतात. नोकरी मिळाली म्हणजे पगार मिळालाच पाहिजे एवढ्याच हक्काची त्याला जाणीव असते. त्याच्या मनात कर्तव्यभावनेचा लवलेशही नसतो. नोकरी या शब्दाचा अर्थच तो विसरतो. परवा एकदा एक धडधाकट तरुण माझ्याकडे आला. गिरगावात रहातो आणि बॅलार्ड पिअरला नोकरी करतो. त्याला ग्रॅन्ट रोडच्या शाखेत बदली होती हवी कारण बॅलार्ड पिअर फार लांब पडते. नोकरी म्हणजे आराम हे समीकरण केलेली माणसे नोकरीसाठी तीन मैलावर जायलासुद्धा तयार नसतात. मुंबईतल्या मुंबईत देखील त्यांना बदल्या नको असतात. परवा तडकाफडकी तीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या म्हणून एका सरकारी कॉर्पोरेशनमधील कर्मचाऱ्यांचे शिष्टमंडळ मला आणि मनोहरना भेटले. आम्ही परवाच लढाईच्या पवित्र्यात त्यांच्या मॅनेजिंग डायरेक्टरना भेटलो. त्यांनी त्या सर्व बदल्या मुंबईतल्या मुंबईतच झाल्याचे सांगताच आमची परिस्थिती मोठी विचित्र झाली. खालच्या मानेने तलवारी म्यान करून आम्ही बाहेर पडलो.

अनेकदा बाहेरगावी बदलीची अट स्वीकारून बँकेतील तरुण बदली स्वीकारतात आणि मग पुणे–कोल्हापूरला बदली झाली की रदबदली करण्यासाठी शिवसेनेकडे येतात. वस्तुस्थिती आम्हाला सांगत नाहीत त्यामुळे आम्ही मॅनेजरला भेटलो की बोलण्यासारखे काहीच नसते. एका प्रकारचा मात्र मला व्यक्तिशः अतिशय संताप येतो. पोटापाण्यासाठी नोकरी मागणाऱ्या तरुणांची परिस्थिती समजण्यासारखी असते. लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही त्यांना मदत करायला हवी. पण प्रकरण येथेच संपत नाही. अनेकदा एकाच ऑफिसमधे खातेबदल मागण्यासाठी कारकून मंडळी येतात त्याला कारण काहीच नसते. आणि असेलच तर ते त्यालाच माहीत असावे. पण त्याला सेक्रेटरी डिपार्टमेन्टमधून ऑक्ट्राय खात्यात बदली हवी असते. जर पंचतारांकीत

हॉटेलात असला तर त्याला फ्रंट ऑफिस हवे असते. बँकेत असेल तर त्याला जवळची ब्रँच पाहिजे असते. पोलीसात असला तर त्याला ट्रॅफिकमध्ये आणि तीही चेंबूरच्या पलीकडे बदली हवी असते. एस. बी. सारखे सुखाचे खाते सोडून तो पोलीस चेंबूरला उन्हातान्हात का जायला मागतो हे कोडे मला अद्याप उलगडलेले नाही. हे झाले बदल्यांचे. पण अनेकदा ऑफिसमधील अंतर्गत बदल्यांसाठीच लोक येतात तेव्हा आलेला राग गिळावा लागतो. कचेरी कारखान्यातील अंतर्गत बदल्या आणि बढत्याही जर शाखेतून होऊ लागल्या तर मग तेथील मॅनेजमेन्टला कामच रहाणार नाही.

एकीकडे नोकऱ्या मिळत नसताना दुसरीकडे नोकरीवरून काढ–ल्याच्या तक्रारी येतात. परवा सर्दी झाली होती म्हणून घरी राहिलो आणि मला नोकरीवरून काढले असे सांगितले जाते. त्याच्या ऑफि-समध्ये चौकशी केल्यावर त्याने गेल्या पाच वर्षात दांड्याच दांड्या मारलेल्या आठवतात. एकदा एक बेस्टचा कंडक्टर असाच अन्याय झाला म्हणून माझ्याकडे आला. बडतर्फ करण्याची शिक्षा निर्दय वाटल्यावरून मी पी. ओ. परांजपेंना भेटलो तेव्हा त्यांच्या फाइलीतून कळले की गेल्या तीन वर्षात त्यांनी एकूण निरनिराळ्या कारणासाठी एकशे नव्याण्णव खाडे केले होते. नोकरीविषयी असणारी हीं बेदर–कार प्रवृत्ती अत्यंत धोकादायक आहे. नोकरी मिळविताना लाचारी दाखवायची आणि ती मिळाल्यावर मस्तीत जायचे हा प्रकार सर्रास घडतो आहे. नोकरी म्हणजे गुलामगिरी नसली तरी ती शिस्त आहे. आणि पगार म्हणजे मानधन नसून केलेल्या कामाचा मोबदला आहे आहे. ज्यांना मान्य नसेल त्यांनी राजिनामे देऊन बेकारांसाठी राजी–नामे द्यावेत हे उत्तम. नोकरी करेन पण काम करणार नाही आणि बदलीही स्वीकारणार नाही हे तत्त्व मान्य केले तर कामावर न जाता पहिल्या तारखेला मनीऑर्डरने पगार घरी पाठवण्याची एकमेव मागणी शिल्लक राहील. दत्ता सामंतनी डिमांडमध्ये त्या मागणीचा अंतर्भाव करण्यापूर्वीच तरुणांनी नोकरी या शब्दाचा खराखुरा अर्थ

. . . ८ म

समजून घ्यावा हे उत्तम.

सांगितलेल्या कामाला जो 'नो' करी तो कधीच नोकरी करू शकणार नाही हे सत्य माझ्यासारख्या नोकरी करणाऱ्यांनी लाथाडून चालणार नाही.

# हसा आणि हसवा

आमच्या विधानपरिषदेत दाजिबा पाटील नात्राचे आमदार आहेत. शरीराने पेहलवान आहेत. अशा प्रकृतीची माणसे नेहमी गंभीर असतात. पण दाजिबांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे खळाळून हसणे. दाजिबा हसले म्हणजे सारे सभागृह गदागदा हसल्यासारखे वाटते. डोळे थोडे किलकिले करत दाजिबा असे काही दिलखुलास हसतात की त्यांना हसविण्याचे आम्हाला व्यसन लागले आहे. मला माझ्या लहानपणापासून हसण्याचे भयंकर व्यसन आहे. मी प्रत्येक विनोदावर हसतो. अनेकदा विनोद झालेला नसला तरी हसतो. कित्येकदा गाडी चालवता चालवता एखादी घटना मुद्दाम आठवून स्वतःशीच सात मजली हसतो. अशा वेळी बाजूने एखादी गाडी चाललेली असली तर तो ड्रायव्हर मला एकटयाला हसताना पाहून वेडा समजतो. पण मला, त्याचे काहीच वाटत नाही. वैद्यकीय शास्त्रात हसण्याचे अनेक फायदे सांगितले आहेत. हसण्याने शरीराचे पंपिंग होते आणि मन हलके होते इत्यादी इत्यादी–

हसण्याचा हा महामंत्र मला बॅ. विठ्ठलराव गाडगीळांनी दिला. रूपारेलमध्ये मी विद्यार्थी आणि ते प्राध्यापक असल्याने मला ते गुरुस्थानी आहेत. पुण्याच्या रानडे वादस्पर्धेत भाग घेण्यासाठी ते मला ट्रेन करत होते. ती स्पर्धा म्हणजे एक भयानक टेन्शन असते. माझा तो वैतागलेला चेहरा पाहून त्यांनी मला गुरुमंत्र दिला. ते म्हणाले, 'प्रमोद, स्माईल इज दी बेस्ट टॉनिक इन लाईफ. हॅव इट रेग्युलरली' गाडगीळांच्या त्या महामंत्राने मला माझ्या आयुष्यात फार मोठा

हात दिला आहे. तेव्हापासून वेळी अवेळी मी लोक काय म्हणतात याची पर्वा न करता हसतच राहिलो आहे. गाडगीळसरांनी मला हा उपदेश केला नाही तर स्वतःही ते हसतमुख राहिले आहेत. गाडगीळांना तुम्ही केव्हाही' कोठेही भेटा आणि कोणत्याही विषयावर बोला, त्यांच्या चेहऱ्यावर असलेले स्मितहास्य कधीच मावळणार नाही. असा सतत हसणारा दुसरा एक माणूस म्हणजे सुशीलकुमार शिंदे. हा माणूस जन्मतःच रडण्याऐवजी दिलखुलास हसला असावा. करमुक्त अर्थसंकल्प त्यांनी हसत हसत सादर केला, पण पाचशे कोटी करवाढीचा अर्थसंकल्प असता तरी देखील सुशीलकुमारनी तो हसत हसतच सादर केला असता. ते हसतात म्हणून विरोधी पक्ष त्यांच्यावर तुटून पडला असता, पण तरीही सुशीलकुमार हसतच राहिले असते. त्यांच्या एका सत्कार समारंभात बोलताना मी म्हणालो होतो, 'सुशीलकुमारांचे व्यक्तिमत्त्व असे आहे, की ते कोणत्याही समारंभात मिसळतात. त्यामुळे सर्वजण त्यांना प्रमुख पाहुणे किंवा अध्यक्ष म्हणून निमंत्रित करतात. पण कृपा करून त्यांना शोकसभेला बोलावू नका कारण त्यांच्या सदैव हसऱ्या चेहऱ्यामुळे उपस्थितांचा गैरसमज होईल.'

हसणे हा माणसाचा केवळ स्वभावधर्मच नव्हे तर आत्मा असल्याने त्या विषयावर अद्याप कोणी प्रबंध लिहून पीएच. डी. कशी मिळविली नाही याचे मला आश्चर्य वाटते. माझ्या आयुष्यात आलेल्या माणसांच्या हसण्याचे विविध प्रकार मी टिपत आलो आहे. शाळेत असताना माझ्या वर्गात पाऊलकर नावाचा मुलगा होता. सरांनी विनोद केल्यावर आम्ही सर्व हसायचो. पण पाऊलकरचे हसणे संपल्यावर पिपाणीच्या फुग्यातील हवा बाहेर पडताना होतो तसा त्याच्या कंठातून आवाज यायचा आणि आम्ही पुन्हा हसायचो. त्याच वेळी आम्हाला पंडीत नावाचे मास्तर होते, त्यांना आम्ही हसताना केव्हाच पाहिले नाही. जेव्हा पहावे तेव्हा त्याचा चेहरा रडवा. त्यांना हसविण्यासाठी सात वर्षे आम्ही जंग जंग पछाडले, पण आम्हाला यश आले नाही.

हसण्याचा आणि प्रतिष्ठेचा काय संबंध असतो ते मला अद्याप समजत नाही. एकदा मी रोटरी क्लबच्या एका छोट्या सभेला गेलो होतो. सगळे प्रतिष्ठित सुटाबुटात होते. मीही सफारी सूट घातला होता. डॉ. मेहता नावाचे वक्ते मानवतेवर बोलत होते. बोलता बोलता त्यांनी एक झकास विनोद केला आणि मी नेहमीप्रमाणे मोठ्याने हसलो. पण त्या क्षणी मी संकोचलो, कारण मी एकटाच हसलो होतो. बाकीच्यांनी हसण्यासाठी फक्त ओठ रुंद केले होते आणि मी शिष्टाचार मोडून मोठ्याने हसलो म्हणून सगळचा नजरा माझ्यावर रोखल्या होत्या. ही मोठमोठी माणसे मोठ्याने हसण्यात कमीपणा का मानतात ते मला कळत नाही. आमचे एक मॅनेजर होते. त्यांना विनोद फार प्रिय होता. पण त्या खुर्चीत बसलेले असताना ते मोठ्याने हसत नसत.

माणसाचे हसण्याचे प्रकारही वेगवेगळचा प्रकारचे असतात. काहीजण फक्त खालच्या दाताने हसतात तर काहीजण देव आनंदप्रमाणे फक्त वरच्या दाताने हसतात. काहीजण हसताना दात दिसणार नाहींत याची काळजी घेतात. पण माझें एक दूरचे काका होते. ते वारले आता. पण ते मोठ्याने हसायचे नाहीत किंवा चेहऱ्यावर हास्यही आणायचे नाहीत. पण कोणी विनोद केला की त्यांचे शरीर ते गदागदा हलवायचे. काका धरणीकंपाप्रमाणे हलले की आम्ही समजायचे की ते मोठ्याने हसले. काही जणांचे हसण्याचेही रेशनिंग असते असे मला वाटू लागले आहे. ते आठवड्यातून किंवा महिन्यातून फक्त एकदाच हसतात. शंकरराव चव्हाण असे आठवड्यातून एकदाच हसायचे. मग ते हसले की सभागृहात एकदम प्रसन्न वातावरण व्हायचे. शरद पवार हे असे मुख्य मंत्री होते की ते स्वतः हसायचे आणि इतरांनाही हसवायचे. पण तरीही असा हसविणारा मुख्यमंत्री झाला नाही असे म्हणता येणार नाही. कारण बाबासाहेब भोसल्यांनी विनोदांचा डोंगर रचून सर्वांचे विक्रम मोडले. काहीजण हसतातही विचारपूर्वक. त्यामुळे विनोद झाल्यानंतर ताबडतोब नाही तर चार दोन क्षण गेल्यावर हसतात. आमचे दत्ताजी साळवी त्यांपैकी आहेत. त्यांचे

ते विनोदानंतरचे चार क्षणांचे गांभीर्य कासाविस करते. पण मग मात्र ते असे हसतात की जणू त्यांचे सारे शरीर हसते. काही जणांचे हसणेही असे विचित्र असते की, ते हसतात तेव्हा रडतात असे वाटते. डॉ. नरवणे दारुबंदीमंत्री होते तेव्हा ते हसताना अनेकदा रडतात असे वाटायचे. त्यावर आचार्य अत्रे नेहमी त्यांची खिल्ली उडवायचे.

काही लोकांना राखीव हसणे जमतच नाही. ते हसताना घराच्या भिंती हलल्या पाहिजेत. अंबर कोलाटेना अनेक वाचक ओळखत असतील ते जर डिरपेर बोर्डाच्या जुन्या चाळीत हसले तर त्यांच्या त्या हसण्याच्या आवाजाने इमारत कोसळण्याची शक्यता आहे. हसण्यावर ताबा नसणारीही काही माणसे असतात. ती नाटक-सिनेमात अशी काही हसतात की विनोदापेक्षा त्यांच्या हसण्याने प्रेक्षकांची अधिक करमणूक होते.

ते काहीही असो. प्रत्येक माणसाने सतत हसत रहावे असे मला वाटते. सुदैवाने त्यावर सरकारने अद्याप कर बसवला नाही. आणि तो बसणारही नाही, कारण अर्थमंत्री सुशीलकुमारनाच सर्वात अधिक कर भरावा लागेल. तेव्हा प्रत्येकाने स्वतः हसावे आणि दिवसात किमान एका माणसाला हसवावे. म्हणजे सारे जग दिवसातून किमान एकदा तरी हसेल... चला तर... आजपासून रोज किमान एका माणसाला तरी हसवा. म्हणजे तुम्हालाही कोणी तरी हसवींल.

# संदेश

मुंबईच्या सार्वजनिक जीवनात संदेश आणि शुभेच्छांचे अमाप पीक येत असते. या सर्व संदेशांचा कोणी कधी अभ्यास केला तर तो मोठा मनोरंजक ठरेल. परवा मनोहरचे सहकारी श्री. माधव कोकणे यांच्या मुलाची मुंज होती. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांना आणि आमदारांना निमंत्रणे पाठवली होती. या राजकीय पुढाऱ्यांना भरपूर मोकळा वेळ असला तरी मुंजी वगैरेसारख्या प्रसिद्धीपराङ्मुख समारंभास हजर राहण्यात त्यांना रस नसतो हे कोकणेंना माहीत नसावे. मात्र अनेक थोरा-मोठ्यांनी त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणें शुभेच्छा संदेश मात्र पाठवला. त्यांपैकी अनेकांनी आपल्या भावनोत्कट संदेशाचा समारोप करताना मुंजास 'वधुवरास विवाहित आयुष्य सुखाचे आणि समृद्धीचे जावो' असे म्हटले होते. असा अफलातून संदेश पाठवणाऱ्यांच्यात नगरसेवक झुटे व बाबुराव शेटे, आ. अहमद झकेरीया व ग. प्र. प्रधान, खा. वसंतकुमार पंडीत यांचा समावेश होता. त्या मुलाचे जेव्हा लग्न होईल तेव्हा बहुतेक या हितचिंतकांच्या बटूस शुभेच्छा येतील.

अशा प्रकारच्या संदेशाचे अनेक अनुभव मी आतापर्यंत घेऊन बसलोय. १९६० साली आम्ही काही मंडळी एकत्रित 'गिरगाव युवक सभा' नावाची एक संस्था स्थापन केली. त्या संस्थेचा उद्घाटन समारंभ आचार्य अत्रे यांच्या हस्ते पार पडला. मी अनेकांना निमंत्रणे पाठविली होती. त्यांपैकी काही जणांचे फक्त संदेश आले. यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे यांचा संदेश माझ्या कायम लक्षात

राहिला. त्यात त्यांनी म्हटले होते ' गिरगाव युवक सभेने आतापर्यंत गिरगावात आदर्श असे विधायक कार्य केले आहे. त्या कार्याची कमान तशीच चढती राहो. स्थापनेच्या दिवशीच कार्याची पावती मिळाल्याने आम्ही खूप झालो.

तारेने पाठविल्या जाणाऱ्या शुभेच्छा म्हणजे एक मोठी धमाल असते. टेलिफोन डिरेक्टरीच्या चौदाव्या पानावर विशेष संदेशाचे नमुने देण्यात आले असून तार करताना त्याचा फक्त आकडा लिहावा लागतो. अनेकदा हा आकडा चुकतो आणि मोठी धमाल होते. मला आठवते मी जेव्हा निवडणुकीला उभा राहिलो तेव्हा घनःश्याम जयकर या माझ्या मित्राची शुभेच्छा तार आली. त्यात लिहिले होते, ' नवविवाहित दांपत्यास माझ्या शुभेच्छा.' मी कपाळावर हात लावला. नंतर पोष्टाने खुलासा केला की त्या टायपिस्टने चुकून तारेचा चोवीस ऐवजी पंचवीस क्रमांक टाईप केला. माझे केशव वाझकर नावाचे एक स्नेही दीर्घकाळाने मोंबासाहून आले. घरी येताच त्यांना तार मिळाली ' हार्टी काँग्रॅच्युलेशन्स ऑन युवर न्यू अरायवल' तार पाठविणाऱ्याला माहीत नसावे की नवे बालक जन्माला आले की ही सहा नंबरची तार पाठविली जाते. ' मेनी हॅपी रिटर्न्स ऑफ द डे' या शुभेच्छा मात्र सर्वांचाच घोटाळा करतात. इंग्रजीतील या शुभेच्छांचा स्पष्ट अर्थ असा आहे की ' आजचा हा सुखाचा दिवस आपणास पुन्हा पुन्हा लाभो.' वाढदिवशी या शुभेच्छा देतात. ' बेस्ट ऑफ लक' या शुभेच्छा तर कुरमुऱ्यासारख्या वाटल्या जातात. आमच्या इमारतीत एका वयोवृद्ध गृहस्थाला अटॅक आला. शिवसेनेची रुग्णवाहिका बोलावली. जाता जाता मेहुण्यांनी त्यांचा हात धरून ' बेस्ट ऑफ लक' अशा शुभेच्छा दिल्या. त्या शुभेच्छा त्यांना उपयोगी पडल्या असाव्या. कारण दुसऱ्या दिवशी ते वारले. परीक्षेला जाताना या शुभेच्छा सर्रास दिल्या जातात आणि स्वीकारल्याही जातात. त्यात काही चूक आहे असं मला वाटत नाही. पण ती स्वीकारताना आपण अभ्यास केला नसून केवळ नशिबावर हवाला ठेवून परीक्षेला बसत आहोत हे आपण मान्य करतो याची विद्यार्थ्यास जाणीव नसते. आग-

गाडी सुटताना फलाटावर निरोप द्यायला आलेले लोकही 'बेस्ट ऑफ लक' म्हणतात. अपघातातून वाचण्यासाठी त्या शुभेच्छा असाव्यात. विवाहप्रसंगीही अधूनमधून देण्यात येणाऱ्या या शुभेच्छा अर्थपूर्ण असाव्यात असं मला वाटतं.

दुःखावर डागण्या देणाऱ्या शुभेच्छा म्हणजे 'बेस्ट लक नेक्स्ट टाईम.' परवा माझे रायगड जिल्ह्यातील गोरेगाव येथे व्याख्यान झाले. खूप गर्दी होते. व्याख्यान संपल्यावर मी गर्दीतून वाट काढीत असताना एक तरुण पुढे आला माझा हात धरून म्हणाला, काँग्रॅच्युलेशन्स. मी थँक्यू म्हणणार, इतक्यात तो पुढे म्हणाला, बेस्ट लक नेक्स्ट टाईम. त्याला काय म्हणायचे होते ते त्याचे त्याला कळले नसेल पण माझा चेहरा मात्र खाडकन उतरला. मला पहिली मुलगी झाली तेव्हा यत्किंचितही वाईट नाही, किंवहुना मनापासून आनंद झाला. पण भेटणारे मात्र उगीचच लांब चेहरा करून 'बेस्ट लक नेक्स्ट टाईम' म्हणून नको त्या शुभेच्छा देऊन गेले. टेलिफोन डिरेक्टरीमधे असलेल्या शुभेच्छांनी अनेक घोटाळे होतात. वेळ वाचवण्यासाठी विविध प्रकारच्या संदेशवजा तारांना तारखात्याने नंबर दिले आहेत. ती संपूर्ण यादी डिरेक्टरीत जनतेच्या माहितीसाठी देण्यात आली आहे. बरेच लोक त्या यादीवर अवलंबून तार करतात. गंमत म्हणजे ती यादी फक्त शुभेच्छादर्शक तारांची असल्याने मृत्यूचा संदेश त्यात नाही हे अनेकांच्या लक्षात येत नाही. ते त्या यादीतच यथायोग्य संदेश शोधतात आणि अखेर अकरा नंबरचा संदेश निवडतात. तो संदेश आहे 'बेस्ट विशेस फॉर सेफ ॲन्ड प्लेझंट जर्नी' प्रवासासाठी असलेला हा संदेश असा दूरच्या प्रवासासाठी वापरला जातो.

कोकणेंना आलेल्या संदेशाचे मला आश्चर्य वाटले नाही. कारण बड्या बड्या लोकांची संदेश पाठविण्याची यंत्रणा कशी निर्बुद्धपणे काम करते हे मी पाहिले आहे. वस्तुस्थिती अशी असते की. पाठविलेले निमंत्रण त्या व्यक्तीपर्यंत कधीच पोहोचत नाही. अशा निमंत्रणाची परभारे संदेश पाठवून विल्हेवाट लावण्याची सूचना खाजगी सचिवांना दिलेल्या असतात. डॉ. राधाकृष्णन राष्ट्रपती असताना

एका कुष्ठरोग्यांच्या हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. त्यावेळी राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटले होते की, 'या देशातील अधिकाधिक लोकांना आपल्या संस्थेचा लाभ होवो.' आता राधाकृष्णनसारखी व्यक्ती असा संदेश पाठविणे शक्यच नव्हते. पण सेक्रेटरी असा विनोदी आगाऊपणा वरचेवर करतात. घर दुरुस्ती परिषदेच्या एका अधिवेशनात मी मंत्री बाबुराव काळेंना बोलावले होते. लेखी निमंत्रण पाठवले आणि बाबुरावना स्वतःही भेटलो. ते आनंदाने आले. पण त्याच दिवशी सकाळी सचिवाद्वारे एक संदेश आला. माननीय मंत्री दौऱ्यावर असल्याने आमंत्रण स्वीकारू शकत नाहीत. त्यांनी आपल्या अधिवेशनास मनःपूर्वक शुभेच्छा पाठविल्या आहेत.

मुख्यमंत्री आणि त्यांच्या वरच्या पातळीवरील लोकांच्या शुभेच्छा तर छापलेल्याच असतात. पण मिळणाऱ्याला त्याचे फार मोठे कौतुक असते. विठ्ठल वैद्य नावाचे आमचे एक मित्र आहेत. त्यांच्या पाच वर्षांपूर्वी झालेल्या विवाहप्रसंगी आलेल्या देशातील भल्याभल्या लोकांचे शुभ संदेश फरेम करून त्यांनी भिंतीवर चौफेर लावले आहेत. आपल्या लग्नाला राष्ट्रपती आणि इंदिराजींचे संदेश आले होते याचा त्यांना अभिमान वाटत असतो. पण असा अभिमान सर्वांनाच वाटतो. कोणत्याही संमेलनाला अध्यक्ष म्हणून गेलो की माझ्या भाषणाला दहा मिनिटं ठेवलेली असतात. पण संदेशवाचन मात्र अर्धा अर्धा तास चालते. त्या संदेशात राष्ट्रपतीपासून मसालेवाल्यांपर्यंत आणि पंतप्रधानापासून कोळसेवाल्यांपर्यंत सर्वांचे संदेश असतात.

अशा प्रकारे शुभेच्छा संदेश म्हणजे माणसाच्या दांभिकपणाचा कळस असतो. आम्ही सर्वजण या देशात सामुदायिकपणे हा दांभिकपणा करत आलो आहोत. आमच्या ह्या गर्दीत एकाच शुभेच्छा संदेशाची मात्र मला राहून राहून आठवण येते. आचार्य अत्र्यांच्या श्यामच्या आईला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. साऱ्या महाराष्ट्रातून अत्र्यांवर अभिनंदनाचा वर्षाव झाला. हजारो पत्रे आली. शुभेच्छांनी अत्रे भारावले. त्यातील फक्त एकच शुभेच्छा अत्र्यांच्या काळजाला

भिडली. त्यांच्या एका चाहत्यांनी लिहिले होते-

' आचार्यजी, याच क्षणी आपणास स्वर्गलाभ होवो. हीच परमेश्वराच्या चरणी प्रार्थना ! ' कारण कीर्तीच्या अत्युच्य शिखरावर असताना माणसाला मरण प्राप्त व्हावे.

अत्र्यांना या शुभेच्छेची आठवण अखेरपर्यंत राहिली असणार. कारण त्यानंतरचे त्यांचे जीवन उतारावरच मार्गक्रमण करीत राहिले.

# वेषांतर

परवा सुधीरभाऊंच्यानिवडणुकीच्या दिवशी एकेक मतदान केंद्रांना भेंट देत दुपार केव्हा झाली हे समजलेही नाही. प्रत्येक केंद्रांच्या बाहेर शिवसैनिकांनी टेबल टाकले होते. त्या शिवसैनिकां ना भेटत दहिसर-पर्यन्त पोहोचण्यास अडीच वाजले. माझे मित्र पोलिंग एजंट असल्याने ते केंद्रात जायचे आणि मी बाहेर शिवसैनिकांशी बोलत उभा रहात असे. दहिसरला टेबल केन्द्रापासून दूर असावे म्हणून आम्हाला ते दिसले नाही. मित्र केन्द्राच्या आत गेले आणि मी बाहेर उन्हात एक-टाच उभा राहिलो, तेवढ्यात माझ्यातील खोडकर माणूस जागा झाला. ते केन्द्र एका कोपऱ्यात रुक्ष स्थानी होते. रस्त्यात कोणीच माणसे नव्हती. समोर जनतावाले आणि भाजपवाले बसले होते. मला कोणीच ओळखले नाही. चॉकलेटी रंगाची पँट आणि त्याच रंगाचा टी शर्ट या वेषात उन्हात फिरल्याने माझा अवतारही न ओळखण्या-सारखाच झाला होता. समोर एक छोटे पत्र्याचे झोपडे करून तेथे मद्राशाने चहा आणि खारी- बिस्कीटे ठेवली होती. एकमेव टेबलावर स्टोव्ह पेटत होता. स्टुलावर मद्रासी बसला होता. तेथील ते एकमेव हॉटेल होते.

माझ्या डोक्यात आयडिया आली. मी त्या मद्राशाला दोस्तीत स्टुलावरून उठवले आणि मीच त्याच्या जागी बसलो. त्याला रुपया टेकवून स्वतःच्याच हाताने चहा घेतला. तो मद्रासी बिचारा बाहेर उभा राहिला. माझ्या अवतारामुळे मी त्याच्या जागी 'च्यावाला' म्हणून ठीक शोभून दिसत होतो. थोड्याच वेळाने केन्द्रातील शिव–

सॅनिक बाहेर आले. मी विचारले, 'तुमकु क्या मंगता है' आणि त्यांना किटलीतील उरलेला चहा ग्लासात दिला. त्या शिवसैनिकांनी माझ्या चेहऱ्याकडेही न पहाता चहाचा एक रुपया दिला. मी त्यातील आठ आणे परत केले.

माझ्या भटक्याच्या जीवनात हे असेच प्रयोग मी वरचेवर करतो. मला भेटणारी माणसे माझ्या वेषांतराविषयी मला नेहमी कुतुहलाने अनेक प्रश्न विचारतात. त्यांच्या त्याविषयी काही भलत्याच कल्पना आहेत. वेषांतर म्हटले म्हणजे तोंडाला रंग आणि दाढीमिशा असा सर्वसाधारणपणे समज आहे. तो संपूर्ण चुकीचा नाही. वेळप्रसंगी दाढी-मिशा लावाव्या लागतात आणि वेषही बदलावा लागतो. पण त्याची गरज असतेच असे नाही. वेषांतर हे एक शास्त्र आहे. जपानमध्ये त्याचा अभ्यास होत असतो. अमेरिकेतही गुप्त पोलिसांसाठी यावर वेगळी व्याख्याने दिली जातात, पण आपल्याकडे ते शास्त्र अस्तित्वात नाही. मी त्याचा थोडाफार उधार उसनवारी अभ्यास केला आहे. वातावरण हा वेषांतराचा आत्मा असतो. ज्या वातावरणात शिरून आपल्याला अज्ञात राहायचे असते त्या वातावरणाचा अभ्यास करणे आवश्यक असते. प्रत्येक वातावरणात काही नगण्य व्यक्ती असतात. त्या व्यक्तीच्या चेहऱ्याकडे कोणाचेच लक्ष जात नाही. क्लबमध्ये नृत्य चालले असल्यास तेथील बँडवाला, लग्नसमारंभातील वेटर, ठरलेल्या वेळी दारी येणारा पोस्टमन, रेशन दुकानच्या पायरीवर बसलेला हमाल, देवळाच्या दारात बसणारा भिकारी, टॅक्सीवाला घोडागाडी-वाला, या साऱ्या व्यक्तिरेखा सहज स्वीकारल्या असल्याने त्यांचे चेहरे कधीच कोणी पारखीत नाही. म्हणूनच परवा मी त्या सिच्युएशनमध्ये चेहऱ्यात बदल न करताही च्यावाल्याच्या स्टुलावर बसल्याने शिव-सैनिकांनी न ओळखता माझ्या हातावर चहाचे पैसे टाकले.

वातावरणाशी सुसंगती नसेल तर कितीही वेषांतर केले तरी ओळ-खण्याचा धोका असतो. दहिसरला चहाच्या गल्ल्यावर बसण्याऐवजी त्या नाक्यावर वासुदेवाच्या वेषात जरी मी नाचलो असतो तरी मला शिवसैनिकांनी ओळखले असते. कारण त्यासाठी ते वातावरण नव्हते.

वातावरणाचा फायदा घेऊन मी असा ठिकठिकाणी घुसलो आहे. सर्वच युक्त्या काही सांगता येणार नाहीत. कारण भ्रमंतीचा उद्योग चालू असल्याने मला मार खायचा नाही. पण तरीही काही किस्से सांगण्यासारखे आहेत. एकदा गोरेगावच्या स्टेशनवरच माझ्या एका जवळच्या नातेवाईकास चॅलेंज देऊन चणे विकले.कारण रोज स्टेशनवर उतरल्यावर तो चणे घेंतो हे मला माहीत होते. वीस वर्षांपूर्वी वेश्यांच्या वस्तीचे निरीक्षण करण्यासाठी मी कित्येक महिने घोडागाडीवाल्याच्या पोषाखात पिला हाऊसला मोकळचा सोडलेल्या घोडागाडीत आरामशीर बसत असे. 'तुमच्यापैकी अनेकजणांनी मला पाहिले असेल पण ओळखले नसेल. पोस्टमनच नव्हे तर तारवाला बनूनही चर्चगेट आणि वॉर्डनरोड सारख्या पॉश वस्तीत मी तीन पत्ती जुगाराचे अड्डे न्याहाळण्यासाठी मध्यरात्रीहो गेलो आहे. एकदा तर नागपूर–मुंबई प्रवास करताना कुपेमध्ये मनोहर सोबत असताना मी स्त्रीच्या वेषातही वावरलो आहे. त्या प्रवासात वामन वापटांपासून मधुकरराव चौधरीपर्यन्त अनेक आमदार डब्यात येऊन गेले. त्या सर्वांनाच वाटले की मिसेस जोशी प्रवासात सोबत आहे. भर प्रवासात आमदार राममनोहर त्रिपाठींनी माझे बिंग फोडले आणि मग एकच धमाल उडाली.

आणखी एक किस्सा सांगण्यासारखा आहे. पंधरा वर्षे झाली असतील. त्या घडलेल्या घटनेत मोठे थरील आहे. मध्यरात्री स्मगलिंगच्या राऊंडवर घराबाहेर पडलो. बाबुलनाथपासून ससून डॉकपर्यंत कस्टमच्या चार चौक्या आहेत. पण आश्चर्य म्हणजे त्यांपैकी एकाही चौकीत त्यारात्री अधिकारी नव्हता. शेवटी त्यांपैकी एकजण कुलाब्यातील पास्तारोड जवळ मला दिसला. सिगारेट घेऊन तो अधिकारी बाजूच्या अलबेवर या नाईट क्लबमध्ये शिरला. मीही त्याच्या मागोमाग गेलो. आत डोकावून पाहिले एकूण चार अधिकारी होते पण तेच ड्यूटीवर होते किंवा काय हे समजण्यास मार्ग नव्हता. मी बाहेर पडलो. माझ्याकडे तेव्हा काळी ॲम्बेसडर गाडी होती आणि अंगावर ड्रायव्हरचा पोषाख होता. मी अवघ्या फर्लांगाच्या अंतरावर गाडी

उभी करून क्लबच्या दारावर नजर ठेवली. अर्ध्या तासाने क्लब बंद झाला. चौघेही अधिकारी त्यांच्याच तंद्रीत बाहेर आले. रस्ता ओलांडून टॅक्सीसाठी थांबले. मी हेड लाईट लावून गाडी चालू केली. अपेक्षेप्रमाणे त्या चौघांनी लिफ्ट मागितली. अर्थातच मी ती दिली. ते सगळे ड्यूटीवरच होते.प्रत्येकाला त्यांच्या त्यांच्या पोस्टवर सोडले. पण त्या छोट्या प्रवासात त्या चौघांच्या ज्या गप्पा रंगल्या त्या मी गाडीच्या टेपवर रेकॉर्ड केल्या आणि पुढील रविवारी रात्री घडलेल्या त्या प्रकारचा मुद्देमालासहीत नवशक्तीतून गौप्यस्फोट केला. कस्टम खात्यात प्रचंड खळबळ माजली.

आता मी आणखी गुपिते सांगत नाही. माझ्या या उद्योगांमुळे मी कधी कोणाला कोणत्या अडगळीत सापडेन ते सांगता येणार नाही. कधी फॉकलंडरोडवर हिजड्यांशी गप्पा मारताना दिसेन तर कधी धोबीतलावच्या फुटपाथवर मांडी ठोकून खिमा-पाव खाताना दिसेन. कधी ग्रॅन्टरोडच्या क्लबवर जुगार खेळताना आढळेन तर कधी चेंबूरच्या नाक्यावर भिकाऱ्यांच्या रांगेत दिसेन. सर्वांना हात जोडून विनंती एवढीच की असा कोठे दिसलो तर हसू नका, ओळख देऊ नका. फक्त मनातल्या मनात 'जय महाराष्ट्र' पुटपुटा आणि–आणि आपल्या कामाला जा. आणि–

–आणि आणखी एकच सूचना. दहिसरच्या त्या शिवसैनिकानी त्या दिवशी जरी या च्यावाल्याला ओळखले नाही तरी स्वतःची ओळख पटवून मला दिलेली अधेली परत घेऊन जावी.

# प्रवास

मरण हे माणसाच्या हाती नसले तरी जगणे हे आपल्या हाती आहे. सामान्य माणसासारखे जगणे हे माझ्या स्वभावप्रकृतीला मानवणारे नाही. जीवनात सतत संघर्ष आणि गती असावी. संथगतीने पावले टाकण्यापेक्षा आयुष्य झेप घेत पुढे सरकावे असे नेहमी मला वाटते. भिडस्त आयुष्यापेक्षा भिडणारे आयुष्य मी पसंत करतो. आर्जवांपेक्षा आव्हानांचे आकर्षण मला अधिक वाटत आले आहे. ती आव्हाने धुंडत मी रात्री अपरात्री मुंबईतील अड्डयाअड्डयावर हिंडत असतो. त्यासाठी पायपीट करतो. कधी टॅक्सीने जातो तर कधी स्वतःची स्कूटर नाही तर गाडी काढतो. मी गाडी भन्नाट वेगाने चालवतो असे सगळे म्हणतात. पण मला तो वेग कधीच जाणवला नाही. कधी कधी वेस्टर्न हायवे वरून दहिसरपर्यंत जाताना मी भान विसरतो पण–

या माझ्या बेलगाम वृत्तीला न शोभणारी अशी एक प्रवृत्ती माझ्या मनात ठाण मांडून बसली आहे. ती म्हणजे गतिमान आयुष्याचा शौक. असला तरी प्रवास म्हटला की माझ्या कपाळावर आठ्यांचे जाळे विणले जाते. मग तो प्रवास बैलगाडीचा असो अगर विमानाचा असो. त्याला काही कारणेही असू शकतात. मी मलेशिया, अरब राष्ट्रे, नेपाळ, दिल्ली, कलकत्ता इत्यादि ठिकाणी वरचेवर जात असल्याने विमानाने प्रवास करावाच लागतो. त्यांपैकी एका प्रसंगी विमानाचा एक पंखाच

बिघडल्याने वरच्या वर घिरट्या घालत इंधन संपवून विमान डमडम विमानतळावर उतरले. दुसऱ्या एका प्रसंगी सांताक्रूझ विमानतळावरची धावपट्टी अचूक सापडत नसल्याने वैमानिकांनी हवेत अनेक कवायती आणि त्याही रात्रीच्या वेळी केल्या. नेपाळला गेलो तेव्हा विमान खाटमांडूच्या ढगात सापडले. वैमानिकाने ते ढगातून बाहेर काढण्यासाठी अर्धा तास प्रयत्नांची शर्थ केली. तेवढचा वेळात आम्ही पोटाला पट्टा बांधून एका जागी बसलो होतो, तरी पोटातील आतड्यांनी मात्र अनेकदा जागा बदलल्या. शेवटी एकदाचे ते विमान धाडकन विमानतळावर उतरले. तेव्हा आम्हाला समजले की ते खाटमांडूऐवजी पाटण्याच्या विमानतळावर उतरले होते.

माझा आगगाडीचा अनुभव जरा वेगळा आहे. रहातो गिरगांवला पण शिकलो माटुंग्याच्या रूपारेल कॉलेजात. नोकरी करत असल्याने सकाळ-संध्याकाळी दोनदा कॉलेजला जावे लागत असे. तेव्हापासून मला आगगाडीची इतकी ॲलर्जी झाली आहे की बोरीवलीला जाताना मी तीनदा बस बदलतो. पण ट्रेनने जात नाही. नागपूरला ट्रेनने जावेच लागते, पण रात्रीच्या प्रवासात ट्रेनमध्ये झोपण्याचा प्रकार मला बिलकूल सहन होत नाही, तरी झोपणारी माणसे हवेची उशी आणतात. हवा भरून फुगवतात आणि मग बर्थवर शांत झोपतात. पण गाडी वेगात आली की त्या उशीवरील झोपलेल्या माणसाचे मुंडके असे काही डुगडुगते की मला सतत तो तिरडीवर झोपल्याचाच भास होतो त्यामुळे मी स्वत: आगगाडीत झोपण्याचे टाळतो. अगदी ना ईलाजच झाला तर झोपताना मुंडक्याच्या दोन्ही बाजूला टॉवेलचा वगैरे आधार देतो. म्हणजे मुंडके डुगडुगण्याची भीती नाही.

प्रवासाची अशी ॲलर्जी असलेल्या माझ्यावर परवा मोठा बाका प्रसंग आला. मिरजेत अरबांनी धूमाकूळ घातल्याचे कळल्यावरून मी दोन दिवस मिरज मुक्कामी गेलो. शनिवारी रात्री तातडीने मुंबईचा निरोप आल्याने रात्री सव्वा आठच्या एस. टी. ने निघालो. डेपोचे मॅनेजर थत्ते, लोकसत्ताचे प्रतिनिधी देशींगकर, आणखी एक सुपरि-

टेंडेंट आणि श्री. इनामदार हे निरोप द्यायला स्टँडवर आले होते. त्यांनी बसच्या कंडक्टरला 'साहेबांना सांभाळून घेऊन जा' अशा सूचना केल्या. त्यामुळे बसमधील इतरांच्या नजरा माझ्याकडे लागल्या होत्या. मलाही जरा बरे वाटले, कारण पुढे काय वाढून ठेवले आहे याची मला कल्पना नव्हती.

बस सुरू झाल्यावर माझ्या लक्षात आले की ती आराम गाडी नसून सामान्य गाडी होती. त्यामुळे सीटच्या पाठीमागील दांडा मानेत घुसत होता. मिरजेहून गाडी निघाली तेव्हा बसमध्ये जेमतेम दहा पॅसेंजर होते. देशिंगकर म्हणाले, नवलकर, आरामात झोपून जा. मी झोपणार होतो पण दहा मिनिटात आलेल्या सांगलीने माझी झोप उडवली. चर्चगेटला संध्याकाळी गाडी प्लॅटफॉर्मला लागल्यावर ज्याप्रमाणे माणसे घुसतात त्याप्रमाणे बसमध्ये माणसे घुसली आणि त्यांनी बसचा कोपरान् कोपरा व्यापला. माझ्यासमोरील आडव्या सीटवर सहाऐवजी सातजण बसले. त्यात एक वडारीणबाईही होती. तिचा नवरा तिच्या समोरील म्हणजे माझ्या बाजूच्या पलिकडील सीटवर बसला इतक्यात माझ्या बाजूला एक धोतर, टोपीवाला खेडुत येऊन बसला. त्याने सुमारे दोनशें पडवळांचे भेंडोळे आणले होते. ते पुढ्यात ठेवले. खाली ठेवायला जागा नसल्याने त्याने पाय दुमडला आणि माझ्या मांडीवर ठेवला. त्यामुळें माझ्या मांडीची हालचाल कायमची थांबली. भेंडोळ्यातून बाहेर पडलेला एक पडवळ चावटपणें माझ्या पँटशी खेळत होता. त्याला मी अनेकदा पायांनी दूर केला तरी पुन्हा तो नागाप्रमाणे माझी पँट पकडायचा.

समोरच्या सीटवर एक सातारी जवान बसला. लेंगा आणि शर्ट त्याने घातला होता. बसल्याबरोबर त्याने खिडकी वर उचलली आणि पानाची पिचकारी मारली. हा प्रकार त्याने प्रवासात नऊ वेळा केला. मी प्रत्येक वेळी पॅलेस्टाईनप्रमाणे बचावाचा पवित्रा घेत होतो नंतर त्याने पाय लांब करून माझ्याच सीटवर आणि तोही माझ्या दोन पायांच्या नेमक्या मधोमध ठेवला त्यामुळे माझे दुभंगलेले पायही बेचकीप्रमाणे त्रिकोनात राहिले.

त्याच्या बाजूची माणसे अवघ्या तीन मिनिटात मंत्र घातल्याप्रमाणे जागच्या जागी झोपली. एकमेकांच्या खांद्यावर झोपेतच मान ठेवून ते एकमेकांना ढकलत होते. त्याच्या बाजूला बसलेल्या त्या वडारी बाईच्या डुलक्या इतक्या रंगात आल्या की शेवटी तिचे डोके समोरच्या सीटवरील नवऱ्याच्या मांडीवर कायमचे स्थिरावले. गँगवेमध्ये उभा असलेला माणूस तर हँडल पकडून उभ्या उभ्याच गाढ झोपला होता. मी एरवी जागच्या जागी झोपणारा माणूस, पण माझी झोप केव्हाच उडाली होती. त्यांच्या झोपेची मी गंमत पाहात होतो. इतक्यात–

इतक्यात बाजूच्याने खांद्यावर मुंडके टाकले. मग मी पण इरेस पेटलो. दोनदा मी ते ढकलले. पण च्यायला, परत ते खांद्यावर आले. तिसऱ्यांदा मी त्या मुंडक्याखालील खांदाच काढून घेतला. पण झाले भलतेच! ते मुंडके खांद्यावरुन सरकून माझ्या मांडीवर येऊन झोपले. मला काय करावे सुचेना. माझ्या मुलांनाही मी असे मांडीवर घेतले नव्हते. सातारा आल्यावर तो उठला आणि झोपेतच पडवळ घेऊन उतरला. वाटले, सुटलो. पण त्याच्या जागी ती वडारी बाई आली. आणि तिने माझ्या खांद्यावरही नवऱ्याइतक्याच विश्वासाने मान टाकली. मला लाज तर वाटलीच पण तिच्या कपड्यांना एक उग्र दर्प येत होता. तिच्या नवऱ्याला मी खुणेने माझ्या जागेवर बोलावले. तो आला. मी त्याच्या जागेवर बसणार इतक्यात तो गँगवेमधील माणूस झोपेतच त्या जागेवर वसला आणि मी गँगवेमध्ये उभा राहिलो त्यावेळी माझ्या लक्षात आले की साऱ्या बसमध्ये मी एकटाच जागा होतो आणि बाकी रांगेत सगळे झोपेत का होईना समाजवादाचे आचरण करत होते. मी पुण्यापर्यंत हँडल धरलेल्या त्या हाताची इतकी मला सवय लागली की ही आठवण लिहितानाही मी डाव हात वर करून बसलो आहे.

# वेश्या

कामाठीपुरासारख्या वेश्यांनी गजबजलेल्या वस्तीत गेल्या रविवारी आरोग्यमंत्री डॉ. बळीराम हिरे यांना मी पाहिले. पण म्हणून कोणी दचकण्याचे कारण नाही. तेथेही ते एका उद्घाटनासाठी गेले होते. पुन्हा दचकलात ! पण तसेही काही नव्हते. जे. जे. हॉस्पिटलच्या डॉ. गिल्डानी त्या वेश्यावस्तीत वेश्यांसाठी एक आरोग्य शिबीर भरविले होते त्या शिबीराचे उद्घाटन करण्यासाठी डॉ. हिरे तेथे गेले होते. शिबीरात सुमारे दीडशे वेश्यांची तपासणी झाली. त्यापैकी सत्तर टक्के वेश्यांना गुप्त रोग झालेला आढळला. मला त्याचे आश्चर्य वाटले नाही. किंवहुना उरलेल्या तीस टक्के वेश्या रोगापासून मुक्त राहिल्या हेच मोठे आश्चर्य आहे.

या उपक्रमाला वृत्तपत्रांनी प्रसिद्धी दिली हे चांगले झाले. नाही तर केवळ वेश्याच नव्हे तर वेश्या व्यवसाय हा विषयही समाजात निंदेचा नि उपहासाचा बनलेला आहे. हा उपहास शहरात जेवढा मी सहन केला तेवढा इतर कोणालाही सहन करावा लागला नसेल. कारण या विषयावर मी खूप लिहिले आणि खूप बोललो. वसंत व्याख्यानमालेपासून विधानसभेपर्यन्त एकही व्यासपीठ मी या विषयापासून दूर ठेवले नाही. वेश्यांच्यावर असलेला सामाजिक बहिष्कार ही एक जागतिक समस्या असल्याने त्यांच्या उद्धाराची तळमळ वगैरे नाटक मला कधीच करायचे नव्हते. त्यासाठी वय मोठे लागते आणि वाहून घेण्याचीही तयारी लागते. पण या वस्तीतून वाढणारा गुप्तरोग हा क भयानक प्रश्न आहे. मुंबई शहरात रोज १५ हजार लोक वेश्या-

गमन करतात. त्यापैकी १० हजार लोक रोज त्या रोगाला कवटाळतात. प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीप्रमाणे या शहरात अंदाजे बारा लाख लोक कमी-जास्त प्रमाणात गुप्तरोगाने पछाडलेले आहेत.

म्हणून मी आवर्जून, कळवळून, हात जोडून शासनाला विनंती करत आलो आहे की वेश्यांची वैद्यकीय तपासणी सक्तीची करून प्रत्येक कोठीच्या दारात वेश्येने फोटोसहित आरोग्यपत्र लावावे असा कायदा केला जावा. पण ज्या ज्यावेळी मी सांगितले त्या त्यावेळी दुर्लक्ष करून माझी टर उडविण्यात आली. महागाई आणि टंचाई-सारखे प्रश्न असताना नवलकर सारखे वेश्याव्यवसायाला का भिडतात म्हणून मी सतत उपहासाचा धनी झालो. हा प्रश्न भेसूर आहे. मुंबईतील प्रत्येक वेश्यावस्ती म्हणजे गुप्त रोगाचा एक प्रचंड कारखाना आहे.

परवा त्या ठिकाणी आरोग्य शिबीर झाले. पण असा उपक्रम प्रथमच झाला नाही. गेल्या चाळीस वर्षात अनेकांनी ही व्यर्थ धडपड केली, पण ती दर्यामें खसखस ठरली. चाळीस वर्षांपूर्वी परळच्या दामोदर हॉलवर पी. जी. नाईक नावाचे गृहस्थ राहात होते. त्यांनी वेश्या व्यवसायातील धोके टाळण्यासाठी एकांडे प्रयत्न करीत हयात वेचली. त्यावर त्यांनी एक पुस्तकही लिहिले. मध्यंतरी दिल्लीहून कपूर नावाची एक बाई वेश्यांच्या उद्धारासाठी मुंबईत आली. या विषयावरील माझी सगळी पुस्तके मी तिला मोफत दिली. माझेच पेट्रोल जाळून तिला वेश्यांचा मोहल्लाही दाखवला. पण ती बाई मोठी बिलंदर निघाली. माझी पुस्तके घेऊन ती बेपत्ता झाली आणि सहा महिन्याने दिल्लीहून 'रेड लाइट इन बॉम्बे' या नावाचे तिने स्वतःच एक पुस्तक काढले. त्यात सत्तर टक्के मजकूर माझ्या पुस्तकातून घेतला होता. मी तिला नोटीस पाठवली पण उत्तरही आले नाही.

डॉ. गिल्डाप्रमाणे या वेश्यावस्तीत रोगनिर्मूलनाचे खरोखरीच विधायक कार्य केले असेल तर ते डॉ. सौ. भालेरावांनी. संघमंदिरच्या डॉ. भालेरावांच्या त्या पत्नी असून के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये असतात. सहा वर्षांपूर्वी या कामाला सुरुवात करण्यापूर्वी त्या माझ्याकडे

आल्या, कारण त्यांना विश्वासाने वेश्यांपर्यन्त पोहोचणे शक्य नव्हते. आमच्या गिरगावातील खाडिलकर रोडवर अनेक वेश्या आहेत त्यांच्याकडे सौ.भालेरावांना घेऊन गेलो. त्यानंतर त्यांनी परिश्रमपूर्वक त्या कार्याची कक्षा वाढवीत ते फोरास रोडपर्यंत नेले. त्यासाठी एक फिरते रुग्णालय आणि वैद्यकीय पथक डॉक्टरबाईंनी स्वत:बरोबर घेतले. याहीपेक्षा अत्यंत लक्षणीय आणि कोणताही गाजावाजा न करता त्या वस्तीत एक तरुण गट काम करीत असतो. पाच-सहा तरुण आणि तीन तरुणी असा एक ध्येयवादाने प्रेरीत झालेला राष्ट्रसेवा दलातील हा ग्रुप आहे. ही तरुण मंडळी वेश्यांच्या घराघरातून जातात. त्यांची मने समजावून घेतात. विशेष म्हणजे या वस्तीत ज्या छोट्या बालिका आहेत त्या उद्या वेश्या होऊ नयेत म्हणून त्यांना त्या वस्तीतून बाहेर काढण्याचे फार मोठे कार्य ते तरुण करत असतात. या छोट्या मुलींची जबाबदारी बाबा आमटेंनी घेतली असून त्या मुलींना त्यांच्याच आश्रमात संभाळले जाते दर शनिवारी कार्यकर्त्यांचा तो ग्रुप सुखलाजी स्ट्रीटच्या नाक्यावरील हॉटेलात जातो आणि कार्याची आखणी करतो या विधायक कार्याला तोड नाही.

वास्तविक पाहाता हे सगळे करण्यासाठी मुंबईच्या पोलिस खात्यात एक वेगळा विभाग आहे. व्हिजिलन्स ब्रॅन्च या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या विभागाचा खरा अर्थ अद्याप पोलिसांनाही समजलेला नाही. उद्देश आणि अधिकार याबाबतही हे खाते अंधारात आहे. अधून मधून एखाद्या गेस्ट हाऊसवर धाड टाकायची आणि हाती लागतील त्या मुलींना अल्पवयीन संबोधून सुधारगृहात घालायचे एवढेच आपले कार्य असल्याचा त्यांचा समज आहे. त्यामुळे शहरातील वेश्यांचे मोहल्ले सर्व धोक्यांसहीत चालू आहेत. दोन महिन्यांपूर्वी फोरास रोडच्या नाक्यावर अलेक्झँड्रा सिनेमाच्या बाजूला असलेल्या इमारतीत एका नेपाळी मुलीला कोंडून ठेवल्याची तक्रार आली. त्या मुलीला पालकांकडे सन्मानपूर्वक जायचे असल्याने पोलीस केस नको होती. नागपाडा पोलिस स्टेशनला असिस्टंट कमिशनरपर्यंत गेलो. पण तशा प्रकारे सूटका करण्यास पोलीस हतबल होते. शेवटी ज्याच्या द्वारे

तक्रार आली तो आणि मी दोघांनी मिळून मोठ्या मिनतवारीने रात्री दोन वाजता तिची त्या मोहल्ल्यातून सुटका केली. आज त्या वेश्या-वस्तीत शेंकडो अल्पवयीन मुली असून त्या राजरोसपणे धंद्यासाठी तोकडे स्कर्ट घालून पिंजऱ्यात उभ्या असतात. ते बेकायदेशीर असू-नही पोलीस निष्क्रीय झाल्याने सेवादलातील त्या मुलांना ती जबाब-दारी घ्यावी लागली.

मुंबईतील सुधारगृहांकडेही अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. आर्थिक अडचणीमुळे मुलींना केवळ अठराव्या वयापर्यन्त अडकवण्यापलिकडे तेथें दुसरे काही होत नाही. परिणामी सुधारगृहातून बाहेर पडल्यावर या मुली पुन्हा धंद्याला लागतात. त्या क्षेत्रात जो एक प्रचंड धुमाकूळ चालला आहे तो वर्णनापलिकडे आहे. तेथे गुलामगिरी चालते, वेठ-बिगारी चालते. अपहरण होते. अत्याचार होतात. खून होऊन मुड-द्यांची खाजगी वासलात लावली जाते आणि त्याचप्रमाणें रोज रात्री या इंडस्ट्रीत सुमारे तीन ते दहा लाख रुपयाच्या काळ्या पैशाची उलाढालही चालते. नीतिनियम आणि सर्व कायद्यांपासून मुक्त अस-लेला हा धंदा माणसाची एक मूलभूत गरज असल्याने बंदही करता येत नाही. त्यातील धोके मात्र टाळायला हवेत. त्यासाठी पोलीसांनी कंबर कसली पाहिजे. शेकडो डॉ. गिल्डा आणि डॉ. सौ. भालेराव हवेत. आणि त्याचप्रमाणे सेवाभावी तरुणांची फौज हवी. मी या विषयाचा खूप अभ्यास केला आहे. त्याबाबत असलेल्या माझ्या ठाम मताला कारणीभूत झालेल्या घटनांपैकी एक घटना सांगण्यासारखी आहे. वीस बावीस वर्षांपूर्वी घोडागाडीवाल्याचा पोशाख घालून मी रात्री वेश्या-वस्तीत हिंडत होतो. स्वतःचेच मन खायचे म्हणून त्याच वेळी ठाकूर-द्वारच्या नाक्यावरील देवळात कीर्तनाला जात असे. एक दिवस बुवांनी वेश्यांचे समाजावर होणारे भीषण दुष्परिणाम सांगून वेश्येचा चेहरा पहाणेही पाप असल्याचे सांगितले त्या रात्री व्यग्र मनस्थितीत मी त्या मोहल्ल्यात गेलो आणि एका सोडलेल्या घोडागाडीत बसलो. डोक्यात तेच विचार होत इतक्यात एक व्यक्ती समोरच्या पायऱ्या चढली आणि मी दचकलो. पंधरा मिनिटात ती व्यक्ती खाली उत-

रली आणि माझी खात्री पटली .. ते कीर्तनकार बुवा होते. मला आश्चर्य वाटले नाही, कारण माणसाची ती एक गरज होती पण माणूसच तेथे पाठ फिरविण्याचा दांभिकपणा करतो हे समाजाचे एकमेव दुर्दैव ...

# बचत

या जगात पैसे कोणालाच पुरत नाहीत. परवा माझ्या स्वप्नात खुद्द टाटा आले. खाली त्यांची लांब इंपोर्टेड पांढरी एअर कंडिशन्ड गाडी उभी रहाताच आमच्या चाळीत एकच खळबळ उडाली. नवलकरांच्याकडे टाटा आलाय ही बातमी साऱ्या वाडीत हा हा म्हणता पसरली. साऱ्या खिडक्या बायका-मुलांनी भरून गेल्या. चाळीची काही वैशिष्टये असतात. हे त्यापैकी एक वैशिष्टय. कोणाकडे कोण आले की सगळ्या खिडक्या खच्चून भरतात. मग परवा तर स्वत: टाटाच आले. मी पेपर वाचत बसलो होतो. इतक्यात पहातो तो दारात टाटा. मला आश्चर्य वाटले. त्यानंतर आम्ही तासभर गप्पा मारल्या. टाटांना बटाटा पोहे आणि चहा फार आवडतो. खाताना टाटांनी विषय काढला आणि म्हणाले, 'प्रमोद, सध्या पैसे बिलकूल पुरत नाहीत. पंचवीस तारीख झाली की पैसे संपतात. ह्याच्या त्याच्याकडे उसने मागावे लागतात. आज तुझ्याकडे पैसे मागायलाच आलो होतो. मला एक पन्नास रुपये उसने हवेत. खारला निघालो होतो आणि पेट्रोल संपलं. पुढल्या महिन्याच्या सहा तारखेला तुझे पैसे मी नक्की परत देईन!' मला टाटांची दया येऊन मी पैसे दिले. आश्चर्य म्हणजे परवा सहा तारखेला टाटा पुन्हा माझ्या स्वप्नात आले आणि पन्नास रुपये परत देऊन गेले. टाटा हे स्वप्नातदेखील एवढे प्रामाणिक असतील असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते.

तात्पर्य हे की पैसे सर्वांनाच कमी पडतात. सामान्य मजुरालाही ते कमी पडतात आणि बँकेतील मोठमोठे अधिकारीही पैशासाठी रड–

तात. या सर्वांवर रामबाण उपाय म्हणजे पैशाची बचत करणे. ही बचत करण्यासाठी अकलेचे गाठोडे पाठीवर मारून सारी मानवजात जगाच्या पाठीवर वणवण हिंडत असते. त्यापैकी असाच मी एक माणूस. वटपौर्णिमेला सौ. नी आंबे आणण्यास सांगितले. नाक्यावरील आंबेवाल्याने डझनाचा तीस रुपये भाव सांगितला. मी घासाघीस केली. वीस रुपये भाव केला पण तो ऐकेना. म्हणून गाडी भाय-खळ्याच्या दिशेने वळवली सारे मार्केट पालथे घातले. पण पायरीचे आंबेच दिसेनात. हट्टाला पेटलो. गाडी उलटी वळवली आणि नळ बाजारात गेलो. तेथे पायरीचे आंबे होते. थोडी वादावादी झाल्यावर मी चोवीस रुपये डझनाने आंबे घेऊन सहा रुपयांची बचत केली. विजयी वीराप्रमाणे घरी आलो आणि सौ.च्या समोर आंबे आदळले. स्वस्त आंबे आणले म्हणून सौ.ही खूष झाली. पण नंतर माझ्या लक्षात आले की सहा रुपये वाचविण्याच्या धडपडीसाठी माझा दीड तास आणि किमान वीस रुपयाचे पेट्रोल वाया गेले होते.

'पेनी वाईज ॲन्ड पाऊन्ड फुलीश' अशी एक इंग्रजी म्हण आहे. या जगात या म्हणीला कोणी अपवाद असेल असे मला वाटत नाही. माणसाला एकदा बचतीचे व्यसन लागले की तो अक्षरशः वेडा होतो. त्यासाठी तो स्वतःची अक्कल प्रथम गहाण खात्यात टाकतो. माझा एक दिनकर नावाचा मित्र आहे. नेहमी कडका असतो पण विल्स-शिवाय दुसरी सिगरेट ओढत नाही. बचत म्हणून तो सगळी सिगरेट एकाच वेळी ओढत नाही. थोडीशी ओढतो आणि पुन्हा ती विझवून खिशातल्या डबीत ठेवतो. चार सहा तासाने आणखी एक इंच ओढतो. आणि उरलेली रात्री झोपताना ओढतो. नंतर थोटुकाचा कागद काढतो आणि तंबाखूची मशेरी करून दात घासतो. हा सगळा उप-द्व्याप करण्याऐवजी तो ब्ल्यूबर्डसारखी स्वस्त सिगारेट संपूर्ण का ओढत नाही, याचे उत्तर त्यालाही माहीत नाही. असाच एक माझा बापट नावाचा मित्र होता. वारला बिचारा. तो दिखाऊपणाही करायचा आणि बचतही करायचा. टॅक्सीचे पैसे वाचविण्यासाठी प्रथम दोन फर्लांग चालायचा आणि जायच्या स्थानापासून पुन्हा दोन फर्लांग

अगोदर उतरायचा आणि कधी भेटला तर टॅक्सीशिवाय मी फिरत नाही अशी बढाई मारायला मात्र विसरायचा नाही.

माझ्या नात्यातील एक डॉक्टर आहेत. वाकडेपणा नको म्हणून नाव सांगत नाही. दोन वर्षांपूर्वी त्यांना असाच बचतीचा झटका आला. आणि कपडे लाँड्रीत पाठविण्याऐवजी त्यांनी घरी धुवायला सुरुवात केली. आठवड्यातून दोनदा सकाळी धुणी धोपटण्याचा कार्यक्रम चालायचा. एक दिवस खांदा निखळला आणि डॉक्टरांचा हात आमच्याच फॅमिलीतील दुसऱ्याच एका डॉक्टरांनी स्लींगमध्ये घालून सहा आठवडे पाठीला बांधला. तेव्हापासून डॉक्टर सेव्हिंग हा शब्दही उच्चारत नाहीत.

असाच एक माझा गिरगावात दामले नावाचा मित्र आहे. त्याच्याबरोबर खरेदीला जायचे म्हणजे वैताग असतो. भावाची घासाघीस केल्याशिवाय तो दहा पैशाची वस्तूही खरेदी करत नाही. त्यात त्याला काही कळते असेही नाही. विकणारा नेहमी डबल भाव सांगतो हा त्याचा एक 'सायको' आहे. त्यामुळे प्रत्येक व्यापाऱ्याशी तो हुज्जत घालत असतो. व्यापारीही दामलेना चांगले ओळखू लागले आहेत. तेच आता वाढीव भाव सांगतात. गेल्या महिन्यात सकाळी दामले भेटले. भाजी आणायला चालले होते. एकूण सोळा नारळ हलवून त्यांनी त्यातील एक निवडला. वाटाणा घेतला तेव्हा तराजूतील दाण्याशिवाय असलेली टरफले तराजूतून वाजूला काढली. कोथिंबिरीच्या जुडींसाठी सारे मार्केट पायाखाली घालून पाच पैसे वाचवले. शिराळ्यापेक्षा स्वस्त म्हणून दामलेनी पाव किलो तोंडली घेतली. ही खरेदी चालू असताना दामलेंचे 'बचत' या विषयावर आख्यान चालूच होते. जीवनात बचतीला किती महत्त्वाचे स्थान आहे हे मला ते पटवून देत होते. या सगळ्या खरेदीत त्यांनी पस्तीस पैसे कसे वाचवले हेही त्यांनी मला गणिती शास्त्रांनी पटवून दिले. त्याच संध्याकाळी दामलेंच्याबरोबर मी एका कार्यक्रमाला गेलो. आम्ही चौघेजण होतो. कार्यक्रमानंतर रात्री उशीरा दामलेंचा मूड एकदम बदलला. ते आम्हाला ताजमहालमधील 'शामियाना' या राजेशाही

हॉटेलमध्ये घेऊन गेले. तेथे त्यांनी चार सॅन्डवीच आणि कॉफी मागवली. त्यावेळी आपण क्वचितच फाईव्ह स्टार हॉटेलचे महत्त्व रंगवून सांगत होते. आहार संपल्यावर वेटरने एकशे पाच रुपयाचे बिल आणले. दामलेनी वरच्या खिशातून झोकात नोटा काढल्या आणि नंतर वेटरला पाच रुपये टीपही दिली. सकाळी मला बचतीवर व्याख्यान देऊन संध्याकाळी सॅन्डवीच कॉफीवर एकशे दहा रुपये खर्च करणारा माझा हा मित्र मला अद्याप उमजलेला नाही. पैसे असोत अगर नसोत, बचत हे माणसाला लागणारं एक व्यसन आहे. माझा एक जवळचा मित्र आहे. धंद्यात नशिबाने हात दिला आणि आता तो एक मोठा उद्योगपती होण्याच्या मार्गावर आहे. पण तरीही रविवारी सकाळी धोबी घरी आला की वहिनींना बचतीचा झटका येतो. आणि रुमालाचे पैसे त्यांनी का लावले यावर वहिनींची आणि धोब्याची एवढी खडाजंगी होते की घराचा थोडा काळ धोबीघाट बनतो. शेवटी सन्मान्य तडजोड होते आणि पन्नास टक्क्यावर तह होतो. मग वहिनी आम्हाला 'मी अशी काटसर करते म्हणून यांना हे दिवस दिसले.' हे पुराण ऐकवते. थोड्याच वेळात वहिनी सारे काही विसरून नवऱ्याला आपल्याकडे व्हिडिओ आणा म्हणून गळ घालते.

माझे एक शिक्षक होते. शिकवायचे चांगले पण त्यांच्या इतका कंजूष माणूस जगाच्या पाठीवर नसेल. त्यांचा कोट अनेक ठिकाणी ठिगळे लावलेला असायचा. वर्गात आम्हाला 'किताब पढो' सांगून एका खिशातून ते तार काढायचे आणि पायातली तुटलेली चप्पल शिवायचे. सलूनमध्ये गेल्यावरही केस जेवढे बारीक करता येतील तेवढे करायचे. आयुष्यात त्यांनी कधी कुणाला चहा पाजला नाही. चष्मेवाले आर. एन. शिर्देकडे चष्मा घेताना पुन्हा पुन्हा तो बदलायला नको म्हणून जरा जास्तच नंबर द्या म्हणून सांगायचे. मला वाटते बचतीच्या याच तत्त्वज्ञानाने सर कपडेही शिवायचे. कारण त्यांची पॅन्ट नेहमी जमिनीवर लोळायची. सरांनी आयुष्यात किती बचत केली कुणास ठाऊक पण सगळा संसार मागे टाकून ते जे एकदा

वंपत्ता झाले त्यानंतर ते कोणालाच दिसले नाहीत.

काही मित्र खरोखरीच भेटतात. आमच्या नाक्यावर एक उडपी हॉटेल आहे. त्याच्याकडे इडलीसांबर एक रुपया आहे. पण माझ्या मित्राने शोधून काढले की तेथेच इडली साठ पैसे व सांबार वीस पैसे पडतो. परवा हॉटेलात गेल्यावर त्यांनी माझ्यासाठी इडली आणि त्याच्यासाठी सांबार दोनदा मागवला. आणि शिताफीने चाळीस पैसे वाचवले. वाचकहो, ते पैसे माझे वाचले. कारण त्या शिच्यानी बिल मलाच द्यायला लावले. एक रुपया साठ पैसे खर्च झाल्याच्या दुःखापेक्षा चाळीस पैसे बचत केल्याच्या समाधानात मी सध्या वावरत असतो.

# इंजिन

गेल्या आठवड्यात बोरीबंदरच्या बाजूने चाललो असताना माझे एका गोष्टीने लक्ष वेधले. तसे लक्ष वेधणाऱ्या अनेक गोष्टी बोरीबंदरला असतात. त्यामुळे कधीही वेळ मिळाला की मी सरळ बोरीबंदरला हिंडायला जातो. बोरीबंदरच्या एम्पायर सिनेमाबाहेर एक पेपरवाला असतो. भय्या आहे. पण त्याचे वैशिष्टच म्हणजे त्याच्याकडून कोणतेही दैनिक अथवा साप्ताहिक मागितले की तात्काळ तो त्यातली महत्त्वाची बातमी किंवा मजकूर सांगतो. याचा अर्थ तो प्रत्येक नियतकालिक स्वतः चाळत असतो. असा विक्रेता इतर कोठे असेल असे मला वाटत नाही. याशिवाय बोरीबंदरला असलेली घड्याळाची दुकाने म्हणजे एक प्रकरण आहे. तेथे ज्याप्रमाणे अस्सल घड्याळे मिळतात त्याप्रमाणे जगातील सगळी बनावट घड्याळे तेथे उपलब्ध असतात. त्यांचे भाव विचारण्यात वेळ कधी जातो ते समजत नाही. अगदीच कटाळा आला तर मी पत्रकार भवनाबाहेर बसणाऱ्या ज्योतिषासमोर फुटपाथवर बसतो आणि त्याला हात दाखवतो. मला नोकरी नाही, बेकार आहे आणि मला लग्न करायचे आहे पण योग येत नाही. एवढ्या दोन गोष्टी मी ज्योतिषाला सांगितल्या की मग करमणूक! नोकरी मिळाली नाही तरी काळजी करू नकोस. तुझ्यावर अशी एखादी मुलगी भाळेल की ती तुझ्याशी लग्न तर करेलच पण शिवाय येताना घरातून ती भरपूर संपत्ती घेऊन येईल, वगैरे वगैरे तो सांगतो. इतक्यात एखादा पत्रकार मित्र येऊन तिथे टपकतो अन मला माझा हात आवरता घ्यावा लागतो.

त्या दिवशी त्या नित्याच्या वैशिष्ट्याशिवाय वेगळेच काहीतरी मी पाहिले. बोरीबंदरच्या इमारतीसमोरील प्रशस्त चौकात एक बगीचा आहे. त्या बगीच्याकडे लक्ष गेले आणि मी चमकलो. कारण त्या बगीच्यातच एक रेल्वेचे इंजिन घुसले होते. क्षणभर मी थबकलो. मला अपघात वगैरे झाला असावा असे वाटते. पण तसे नव्हते. ते नेरळ- माथेरानच्या गाडीला लागणारे कोळशाचे छोटे इंजिन होते. अधिक चौकशी करता समजले की डोंगरावर चढणारे ते इंजिन आता रद्दबातल करण्यात आले असून यापुढें इंजिन आता बोरीबंदरच्या बागेत प्रदर्शनार्थ ठेवण्यात आले आहे.

मला कधी कधी अशा आधुनिकीकरणाचा अर्थ समजत नाही. इतर गाडयांना अद्यावत इंजिन लावणे मी समजू शकतो. पण माथेरानच्या गाडीच्या इंजिनाचे नूतनीकरण म्हणजे एक मूर्खपणा आहे. कारण नेरळहून माथेरानला जाणारे पर्यटक हे केवळ मजा करण्यासाठी, त्या निसर्गाशी एकरूप होण्यासाठी आणि शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी कल्पकतेने सात डोंगरांवरून पलिकडे नेलेल्या झुक झुक गाडीची मौज लुटण्यासाठी जात असतात. त्या जुन्या आणि हेलावणाऱ्या गाडीतून प्रवास हेच त्या प्रवाशाचे वैशिष्ट्य आहे. केवळ तेवढ्याचमुळे माथेरानला पोहोचवणारा रस्ताही अद्याप बांधला गेला नाही. पण आजकाल अशा गोष्टी कोणी लक्षातच घेत नाही. जो तो आधुनिकपणाच्या मागे लागला आहे.

सहा महिन्यांपूर्वी एका तक्रारीची पाहणी करण्यासाठी मी एलिफंटा बेटावर गेलो होतो. थोडी मौज करावी हाही त्यामागे हेतू होता. पण लाँचमध्ये बसलो आणि थाड थाड थाड थाड आवाज करीत एलिफंटाला पोहोचलो. कारण ती मोटार बोट होती. तिचेही आधुनीकीकरण झाले होते. त्यामुळें पूर्वीची लाटांवर हेलकावे खात जाणाऱ्या लाँचची मौज त्यात राहिली नव्हती. ते थरीलही राहिले नव्हते. आता त्या गाडाच्या होडचा फक्त 'एशियाड' साठी ठेवल्या असाव्यात.

वेळेच्या अभावी प्रवासाच्या साधनांचे. आधुनिकीकरण होणे ठीक

होते पण त्यामुळे आपण आयुष्यातील एका फार मोठ्या आनंदाला मुकलो होतो. लोकांचा विश्वास बसणार नाहीं. पण मी लहान होतो तेव्हा अल्पकाळ गोरेगांवच्या विजयकर वाडीत राहात होतो. आता असलेल्या साठफूट रुंदीच्या घोडबंदर रोडच्या जागी त्यावेळी जेमतेम आठ फूट रुंदीचा कच्चा रस्ता होता. त्या रस्त्यावरून रोज मी मालाडला बैलगाडीतून जात होतो. जाता-येताना वाटेत दगड मारून चिंचा आणि कैऱ्या पाडत होतो. त्यानंतर मी त्याच रस्त्यावरून टॅक्सीने फिरलो. आता विमानानेही दिल्लीला जातो. पण तरीही त्या बैलगाडीच्या प्रवासाने माझ्या मनात कायमचे स्थान मिळविले आहे.

आता मुंबईतील सायकलीही कमी झाल्या. पण सायकलीवरून दम छाटण्यात जी मजा असते ती इतर दुसऱ्या कोणत्याही वाहनात नसते. माझीही पूर्वी सायकल होती. त्या सायकलीपासून आजूबाजूच्या इमारतीकडे पाहात गिरगावातून महालक्ष्मीला जाताना मी स्वतःला हरवून बसत असे. त्यानंतर मी स्कुटर घेतली आणि जीवनांतील तो निर्भेळ आनंद कायमचा गमावला.

ट्रॅमनीही मला असेच वेड लावले. सारी मुंबई मी ट्रॅममधून हजारदा भटकलो. ट्रॅम म्हणजे माझे दुसरे घरच झाले होते. तो फेटा बांधलेला ट्रॅमवाला, त्याच्या पायाखालील खण खण वाजणारी घंटा, त्याचे ते गोल फिरविण्याचे कर कर आवाज करणारे हॅन्डल, सीटची उलटी पालटी होणारी पाठ आणि हक्काच्या रुळावरून खडाड् आवाज करणारी ती लोखंडी चाके म्हणजे एक धमाल होती. ट्रॅमच्या त्या-वरच्या मजल्यावरील खिडकीतून मी मुंबईतील सारे विश्व पाहिले, न्याहाळले, त्याच्याशी एकरूप झालो. त्या ट्रॅमने माझे जीवनच बद-लून भ्रमंतीमय केले. आजही त्याच रस्त्यावरून बसने प्रवास करतो. पण मन रमत नाही. सारे कसे कृत्रिम वाटते.

आता एक आनंद उरला आहे. पोलीसांच्या कृपेने दक्षिण मुंबईत घोडागाड्या राहिल्या आहे. रात्री चौपाटीवर घोडागाडीत तंगड्या ताणून बसायचे आणि आकाशातील चांदण्या मोजत गेटवेजवळ

जायचे यासारखा आनंद नाही. मी तो अद्याप उपभोगतो आहे. कधी त्रासलो, वैतागलो तर घोडागाडीतून हिंडतो. त्या प्रवासात मनाला आणि विचारालाही गती मिळते. कधी कधी नव्या नव्या कल्पना सुचतात. वातावरण हा जीवनाचा आत्मा असतो, आधुनिकीकरण हा वातावरणाशी संघर्ष करतो आणि माझ्यासारखा निसर्गवेडा माणूस भरडून निघतो. आता विरंगुळा राहिला आहे फक्त घोडागाडीचा... कारण. कारण घोड्याचे यंत्र अद्याप यायचे आहे.

# सखाराम

माणसाच्या आयुष्यात कोण कधी येईल आणि चटका लावून जाईल हे सांगता येत नाही. भेटणारी ही माणसे नसतात रक्ताच्या नात्याचीं ना गोत्याची. तरीही आपल्या मनाचा एखादा कोपरा ती सहजतेने व्यापून टाकतात. पण अशी माणसे जेव्हा रेल्वेच्या स्टेशना-प्रमाणे मागे जातात तेव्हा जीवनाच्या प्रवासातील हुरूपच निघून जातो पण तरीही आपण त्या स्थानकाच्या स्वप्नरंजनात जीवनाचा प्रवास चालूच ठेवतो.

परवा सकाळी शाखेत जाण्यापूर्वी भाजी आणण्यासाठी मी बाहेर पडलो. आठवड्यातून एक दोनदा तरी माझी ही ठरलेली भाजीफेरी असते. ठाकुरद्वारच्या फुटपाथवर भरपूर भाजी विकायला असते त्यांच्याकडून झटपट खरेदी केल्यानंतर काळचा रामाच्या देवळानजिक बोळात बसणाऱ्या सखाराम भाजीवाल्याकडून एकतरी भाजी नाही-तर मिरच्या-कोथींबीर खरेदी करायची हा माझा कित्येक वर्षांपूर्वी-पासूनचा नित्यक्रम आहे. रोज माझ्याबरोबर कोणी ना कोणी तरी सोबत असतो. कधी एखादा शिवसैनिक असतो तर कधी नारायण झावबा असतो. त्या सर्वांना माहीत आहे की सखाराम हा ठाकुरद्वा-रचा सर्वात जुना भाजीवाला असल्याने एका भावनेने मी त्याच्या दुकानी हजेरी लावत असतो. भाजीकडे बोट दाखवायचे, भाव विचा-रायचा नाही आणि सखारामने निवडक दोन वांगी किंवा जे काही असेल ते पिशवीत टाकताना आम्ही उगीचच एकमेकांची विचारपूस करायची हे वर्षानुवर्षे नकळत चालू राहिले. आदरामुळे म्हणा किंवा

प्रमामुळे म्हणा दोन भेंडे किंवा कोथींबीरीच्या दोन काडचा माझ्या पिशवीत जादा टाकण्यातही सखारामने कधी खंड पडू दिला नाही एखादी तशीच ताजी भाजी असेल तर बाईसाहेबांच्यासाठी घेऊन जा म्हणून ओंजळ भरून त्याने अनेकदा माझ्या पिशवीत ओतली आहे. सखारामचा मुलगाही धंद्यात आल्याला दहा–बारा वर्षे झाली. त्याने चुकूनही एखादा शिळा भेडा माझ्या पिशवीत टाकलेला सखारामला रुचलेला नाही. परवा अशीच भाजी फुटपाथवर खरेदी केली आणि वाल घेण्यासाठी रस्ता ओलांडून सखारामच्या दुकानी गेलो. सखाराम अद्याप आला नव्हता. मुलानी वाल पिशवीत टाकले आणि मी सहज सखारामची चौकशी केली. मुलांनी नजर खाली ठेवूनच सांगितले- बाबा वारले.

माझ्या काळजात चर्र झालं. मी माघारी फिरलो पण रस्ता ओलांडण्यापूर्वीच डोळ्याच्या कडा पाणावल्या होत्या. माझ्या जीवनातील जिव्हाळा लावणारे आणखी एक स्टेशन मागे पडले होते. काही आठवणी दाटून आल्या. केव्हापासून त्याचे नाते ? वयाच्या चौथ्या किंवा पाचव्या वर्षी सखाराम माझ्या जीवनात डोकावला. ज्या बोळात सखारामचे दुकान आहे त्या बोळातून काळचा रामाच्या देवळाच्या मागील बाजूस देऊळ बंद झाल्यानंतरही जाता येते. मागे चौकात एक सुंदर बगीचा होता. शिवाय एक झुपकेदार चाफ्याचे झाड तेथे अद्यापही आहे. आम्ही मुले सखारामच्या दुकानातूनच त्याची नजर चुकवून मागील दारी जात असू. पण सखारामने पकडले की त्याचा धपाटाही खात असू. पुढे मोठे झाल्यावर सखारामशी आमची दोस्ती झाली. त्यालाही मुले आवडायची. कधी तो आम्हाला जिऱ्याच्या गोळ्या द्यायचा तर पुढे पुढे छोटीशी पानाची घडीही आमच्या गालात सरकवायचा. त्याच्याकडून आम्हाला कळले की फार पूर्वी तो एकटा देवळाच्या दारात दोन पाटच्या लावून भाज्या विकायचा आणि तेथेच आडोशाला झोपायचा. तेव्हा सध्याचे देऊळ बांधलेले नव्हते. पन्नास वर्षांपूर्वी जेव्हा त्याची मागील बाजू बांधली तेव्हा ट्रस्टींनी सखारामला बोळात बसायला परवानगी दिली. तेव्हापासून ठाकूर-

द्वारच्या भाजी मार्केटचा हा आद्यप्रवर्तक इमानदारीने आपल्या भाजीची पूजा बांधत राहिला. अवती भवतीचे जग एवढे बदलले की सखारामच्या दुकानातून काळचा रामाच्या देवळामागे फुले वेचण्यासाठी उडचा मारून जाणारा त्या काळचा तो उनाड प्रमोद आज त्याच काळाराम मंदिराचा विश्वस्त झाला. पण गती अधोगतीच्या या काळात सखाराम भाजीवाला भाजीवालाच राहिला. तेच धोतर, तोच सदरा, तीच पांढरी टोपी आणि आणि त्याच झुपकेदार मिशा. ना वेष बदलला, ना आवेश बदलला. अखेर हृदयविकाराच्या एकाच झटक्याने गेली सत्तर पंचाहत्तर वर्षे लोकांना भाजीप्रमाणे टवटवीत दिसणारा सखाराम कालवश झाला.

मी विचार करू लागलो की कशासाठी, कुणासाठी आपण जिवाला असा चटका लावून घेतो ! आणि मग आठवणी भिरभिरू लागल्या. आपले जीवन रुक्ष बनत चालल्याचे मला तीव्रतेने जाणवले. काळाच्या पडद्याआड आपल्या जीवनातील कित्येक चांगल्या गोष्टी केव्हा जातात हे आपल्याला अनेकदा उमजतही नाही. आपल्या जगण्याच्या पद्धतीतच बदल झाला असून आपण आपले जीवन विकसित करण्याऐवजी आपल्यावरच केंद्रीत करू लागलो आहोत. पूर्वी दोन माणसे भेटली की जो जिव्हाळा निर्माण व्हायचा तो आता राहिलेला नाही. दुकानदार असो अगर दारी येणारा धोबी असो, आपण त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करत होतो. त्यातून नकळत एक नात्याचा धागा विणला जायचा. माणसामधे असलेल्या माणसाच्या त्या नैसर्गिक हालचाली होत्या. पण नकळत का होईना आज आपल्यातील माणुसकीचेच शोषण होत राहिल्याने आपण आज कृत्रिम बनलो आहोत. त्यामुळे व्यवहारात भेटणाऱ्या माणसाशी व्यवहारापलिकडे नातेच जाऊ शकत नाही.

पूर्वी असे होत नव्हते. आमच्या घरातील नोकर तर घरच्यासारखा होताच पण दारी येणारी माणकू कोळीणही आम्हाला नातेवाईकाच्यापेक्षाही जवळची वाटत होती. घरी दागिने घडवायला येणारा विष्णू सोनार कधी संसारातील सुखदुःखाच्या गोष्टी बोलल्याशिवाय

परत जायचा नाही. ठाकुद्वारच्या पोस्टात परब नावाचा पोस्टमन होता. आला की प्यायला पाणी मागायचा. गोऱ्या रामाच्या देवळासमोरील लक्ष्मण सोडेंवाल्याचे दुकान म्हणजे आमचे दुसरे घरच होते. आम्ही त्याला लक्ष्या म्हणायचो. त्यावेळी सोडालेमनच्या गोळ्याच्या बाटल्या होत्या. त्यातील एक बाटली फुटली आणि उडालेल्या गोळीने लक्ष्याचा एक डोळा फोडला. लक्ष्या वारल्याला पंधरा वर्षे होऊन गेली पण त्याची दुकान सांभाळणारी बबन आणि मनोहर ही दोन्ही मुले आजही आम्हाला घरच्यासारखी वाटतात. घरी येणारा हन्या पेपरवालाही पेपरातील ताजी बातमी सांगूनच वडलांच्या हाती नवशक्तीचा अंक देत असे.

सखारामसारखे जीव लावणारे दुकानदार तर जीवनातील एक हिरवळ होती. पणशीकरकडे दूध आणायला गेल्यावर टोपीवाले पणशीकर माझ्या अभ्यासाची चौकशी करायचे. हॉटेलवाल्या टेंबेचे कुटुंबही सर्वांची विचारपूस करायचे. आझाद हॉटेलमधे आजही गेलो तरी घरच्यासारखे वाटते. त्या नात्यातून ऋण जन्माला येते. आझादच्या मालकांनी तर माझ्या निवडणूक कचेरीला जागा देऊन तीन महिने हॉटेलच बंद ठेवले. नाक्यावर असलेल्या सनशाईन हॉटेलवाल्याला सर्व गिऱ्हाईकांच्या घरची बित्तंबातमी असे. चित्रा स्टुडिओचे पाटील म्हणजे लाख माणूस. जाता येताना हाक मारायचे आणि खुशाली विचारायचे. फुटाणीभाई पेढेवाला म्हणजे गिरगावातील सर्वांचाच नातेवाईक. चष्मेवाले बाबूराव अनाळकर समोरच्या फुटपाथवरून हाक मारायचे आणि रहस्यकथा लिहिता लिहिता चहा पाजायचे. चष्मेवाल्या शिद्यांनाही कोणी विसरू शकणार नाही. लल्लूभाई पतंगवाल्याला गल्लीगल्लीतील आम्हा सर्व मुलांची नावे पाठ होती. आता शाखेसमोर असलेल्या कोलंबो हेअर कटिंग सलूनमधे राम नगरकर न्हाव्याचा धंदा करत होते. त्यावेळी गिऱ्हाईकाशी केलेल्या जवळकीतून आज 'रामनगरी' उभी राहिली. मला कावीळ झाली तेव्हा फाटक बटाटेवडेवाल्यांनी वड्याचा डबा बाजूला ठेवला आणि मला कोठून तरी औषधाची पुडी आणून दिली.

अशी रक्ताशिवाय जिव्हाळ्याची नाती केवळ गिरगावातच नव्हे तर ताडदेव, लालबाग, परळ, माहिम अशा सगळ्या मध्यवस्तीत निर्माण होत होती. हळूहळू काळ बदलला आणि माणुसकीचा गहिवर ओसरून माणूस माणसाला ओळखेनासा झाला. सखाराम निवर्तल्याचे समजले तेव्हा गेल्या चार दशकातील अशी माणसे आठवली, की ज्यांनी मला जीवनात प्रेम आणि जिव्हाळा दिला. जीवनाचा तो बहरच वेगळा होता. मोहल्ले आणि रस्ते सजीव होते. वाटेवाटेवर माणुसकीच्या पारिजातकाची फुले विखुरलेली असत. दुकानादुकानाजवळ स्थानकाप्रमाणे थांबावेसे वाटे. तोच दैनंदिन जीवनातील विरंगुळा होता, आधारही होता. परवा सखाराम गेला ! त्यापूर्वी असे सखाराम जीवनात आले आणि गेले... पण माझे जीवन धावते आहे.. नव्या वेडया आशेने.. पुढल्या स्टेशनच्या दिशेने....!


मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
दा. क्र. 2.3.32
शाखा (स्थळ प्रत)

# अज्ञान

अज्ञानाची सबब जगातील कोणताच कायदा मान्य करत नाही असं म्हणतात. याचाच अर्थ या देशातील छोटे. मोठे सगळे कायदे सामान्य माणसालाही अवगत असले पाहिजेत असे अभिप्रेत आहे. हा जो नियम कायद्यात अभिप्रेत आहे तो व्यवहारात मात्र नसावा हे एक मोठे आश्चर्य आहे. माझ्या आयुष्यात पावलोपावली अज्ञान व्यक्त करणारी जी माणसं भेटतात ती मोठी अजब असतात. त्यांचे ते अज्ञान अनेकदा असह्य होते.परवा नागपूरला जाण्यापूर्वी मला एक प्रथितयश डॉक्टर भेटले.डॉक्टरांच्या कोणत्यातरी असोसिएशनचे ते पदाधिकारी आहेत. मी नागपूरला जाणार असे सांगितल्यावर आमचा झालेला डायलॉग ऐकण्यासारखा आहे.

'नागपूरला काय विशेष ?' डॉक्टर.

'विधानसभेचे अधिवेशन आहे.' मी.

'अधिवेशन नागपूरला कधीपासून भरायला लागले ?' डॉक्टर.

'पंचवीस वर्षे झाली.' मी.

'पण तुमचं तिकडे काय काम आहे ?' डॉक्टर.

'आमदार असल्यामुळे जावेच लागते.' मी.

'म्हणजे तुम्ही पुन्हा आमदार झालात ?' डॉक्टर.

'होय.' वैतागून मी.

'पण आमदारांना विधानसभेला हजर रहावेच लागते ?' डॉक्टर.

'कधी कधी.' मी दुसरे काय सांगणार ?

'आणखी कोण कोण हजर असतात ?' डॉक्टर.

'कधी कधी अमिताभ बच्चन किंवा गावस्कर वगैरे हजर रहातात. मी माझ्या पद्धतीने फेकली.

'डॅम गुड.' डॉक्टरांचा चेहरा फुलला.

पण त्याच वेळी मला त्यांच्या कानाखाली आवाज काढण्याचा मोह आवरावा लागला. नको तो विषय काढून आपलं भयानक अज्ञान प्रगट करणारी ही माणसे म्हणजे डोक्याला एक ताप असतो नेमकी मलाच ही माणसं कशी भेटतात हे समजत नाही. गेल्या आठवड्यात एक नवोदित हौशी पत्रकार भेटला. काही कारण नसताना त्यांनी साहित्य संमेलनाचा विषय काढला. बोलता बोलता म्हणाला, 'नवशक्ती चालू असती तर ग. वा. बेहेरेनी सणसणीत लेख लिहिले असते 'नवशक्ती'कार पु. रा. बेहेरे आणि 'सोबत'कार ग. वा. बेहेरे यांची अनेकजण गल्लत करतात म्हणून मी त्याच सुरात विचारले, 'मग पु. रा. बेहेरेंनी काय केले असते !' त्यावर तो म्हणाला, 'पु. रा. बेहेरे वारले. नाहीतर त्यांनीही मुंबईच्या संमेलनालाच पाठिंबा दिला असता.' मी कपाळाला हात लावला.

असे क्वचितच घडते. पण घडते. कोणीतरी शिष्ट कामासाठी येतो आणि मलाच विचारतो, 'प्रमोद नवलकर केव्हा भेटतील ?' मी चेहऱ्यावरच्या रेषा कायम ठेवून म्हणालो, 'उद्या सकाळी भेटतील. काय काम होतं ?' 'तसे विशेष काही नाही. त्यांचा आणि माझा जुना परिचय म्हणून सहज भेटायला आलो होतो.' अशी बेमालूम थाप मारून तो गेला. त्याचे नशीब म्हणून तो दुसऱ्या दिवशी आला नाही. एकदा अशीच एक विलेपार्ल्याची सुविद्य भगिनी आली. तिचे काम बाळासाहेबांच्याकडे होते. विशेष म्हणजे शाखेत आली आणि तिने मला पहिलाच प्रश्न विचारला–

'अहो, तुमची बाळासाहेब ठाकरेंशी ओळख आहे का ?'

'कोण ठाकरे ?' मी माझ्या स्टायलीत–

'ते वांद्र्याला कलानगरात राहतात.' भगिनी.

'म्हणजे ते व्यंगचित्रकार काय ?' मी.

'होय. तेच तेच. शिवाय ते शिवसेनेत पण काम करतात.' भगिनी

'माझी ओळख आहे कोण बोललं ?' मी.

'आमच्या बाजूला तळपदेबाई रहातात ना, त्या बोलल्या.' भगिनी.

'माझा तेवढा परिचय नाही, पण नावाने आम्ही एकमेकांना ओळखतो !' मी ओळख पटवली.

'हरकत नाही. आम्हाला नं पार्ल्यात एक स्टॉल टाकायचा आहे. ठाकप्यांना चिठ्ठी द्या म्हणजे काम होईल.' भगिनी.

मी खरोखरच लेटरहेड घेतले आणि दहाबारा ओळींचे शिफारसवजा पत्र लिहिले. त्या भगिनींनी ते दोनदा वाचले आणि थँक यू थँक यू म्हणत त्या बाई गेल्या. पण त्या पत्रावर मी माननीय बाळासाहेब ठाकरेंच्या ऐवजी माननीय बाळासाहेब देसाई लिहिले होते. हे एकतर भगिनीच्या लक्षात आले नसावे अथवा बाळासाहेब ठाकरे म्हणजेच बाळासाहेब देसाई असा तिचा समज झाला असावा.

एकदा माझ्याकडे आशा भोसले कामासाठी आल्या होत्या. माझ्या घराच्या पहिल्याच खोलीत मी लोकांना भेटतो. त्या आल्या तेव्हा मी आतल्या खोलीत होतो. बाहेरच्या खोलीत अगोदरच एक वयस्कर वकील मला भेटण्यासाठी थांबले होते. आशा भोसलेनी आपले नाव सांगितल्यावर त्यांनी निर्विकारपणे त्यांना बसायला सांगितले. बऱ्याच वेळानंतर मी आंघोळ वगैरे आटपून बाहेर आलो तेव्हा आशाबाई वाट पहात बसलेल्या. मी कमालीचा ओशाळलो आणि दिलगिरी व्यक्त केली. त्या स्वभावाच्या नम्र असल्याने त्यांनी ते मनावर घेतले नाही. त्या गेल्यावर त्या वकील महाशयांना मी चांगलेच फैलावर घेतले. पण मलाच पश्चात्ताप झाला. याचं कारण भारताची घटना सांभाळणाऱ्या त्या वकिलाला या देशात आशा भोसले नावाची एक आंतरराष्ट्रीय कीर्तीची पार्श्वगायिका आहे हेच मुळी माहीत नव्हते. केवळ मेहरबानी म्हणून लता मंगेशकर हे नाव त्यांनी ऐकले होते.

आमच्या ठाकुरद्वारला एक डॉक्टर आहेत. त्यांचा राजेश खन्ना हाही पेशंट आहे. कारण राजेश खन्ना हा पूर्वी ठाकुरद्वारच्या नाक्यावरच रहात होता. एकदा डॉक्टरांच्याकडे असेच एक जगाची चिंता

करणारे बडेबडे पेशंट आले होते. ते पेशंट वकील आहेत.डॉक्टरांच्या खोलीत ते बसले असताना राजेश खन्ना आला. पण वकील काही त्याची दखल घ्यायला तयार नव्हते. त्यांची बडबड चालूच होती. शेवटी डॉक्टरांनीच वकील महाशयांना विचारले,

'तुम्ही ओळखलंत न यांना ?'

तरी वकिलांच्या चेहऱ्यावर काहीच बदल झाला नाही. तेव्हा डॉक्टरांनी सांगितले-

'हे प्रसिद्ध चित्रपटकलावंत राजेश खन्ना.'

वकिलांनी नमस्कार केला आणि विस्मयाने म्हणाले, 'हां हां तरीच मी मघापासून आठवत होतो की यांचा चेहरा कोठेतरी पाहिल्यासारखा वाटतो.' राजेशचा चेहरा खाडकन उतरला आणि डॉक्टरांनी कपाळाला हात लावला.

दुर्दैवाने अशा अज्ञानाला कायद्यात कोणतीच शिक्षा सांगितलेली नाही. विशेष म्हणजे असे अज्ञानी लोकच स्वतःला फार विद्वान म्हणवून घेत असतात. मग स्वतःची विद्वत्ता फाडताना ते वाढदिवसाला पुण्यतिथी म्हणतात, मनोहर कोतवालांचे हुतात्मा कोतवालांशी नाते जोडतात आणि अहिंसावादी महात्मा गांधींची कन्या असूनही इंदिरा गांधींनी पाकिस्तानशी युद्ध केले म्हणून सडकून टीकाही करतात.

एक मात्र आहे की आपले अज्ञान झाकणे माणसाला कधीच शक्य होत नाही. कधी ना कधी ते उघड होतेच. मीही त्याला अपवाद नाही. परवा मॅच सुरू झाली. एका मित्राने मला ट्रॅन्झीस्टर दिला आहे. एरव्ही त्याचा मला उपयोग नाही म्हणून ऑफिसमध्ये घेऊन गेलो आणि कॉमेन्ट्री लावली. अर्धा पाऊण तास कामातच गेला. इतक्यात दुसरा एक सहकारी केबिनमध्ये आला आणि त्याने स्कोर विचारला. मला स्कोर सांगता येईना. कामात असल्यामुळे लेटेस्ट स्कोर ऐकला नाही असे सांगून वेळ मारून नेली. तेव्हा तो सहकारी समोरच्या खुर्चीत बसून कान टवकारून कॉमेन्ट्री ऐकू लागला. एक मिनिट गेलें. दोन मिनिटं गेली. त्या सहकाऱ्याच्या चेहऱ्यावर गोंध-

ळच गोंधळ दिसला. अखेर त्याने कपाळावर हात मारून घेतला आणि वैतागून केबिनबाहेर गेला. कारण-

—कारण ती कॉमेन्ट्री हॉकीची होती.

# प्रकाशन

नागपूर अधिवेशनाचा तो अखेरचा दिवस होता. त्यामुळे आमदार निवास नेहमीपेक्षा जरा अधिक गजबजलेले होते. सकाळचे नऊ वाजले होते. थंडी अंगाला झोंबत होती. तरी आमदार मंडळी आज जरा लवकर उठली होती. थोडी खरेदी करायची होती. कोणाला संत्री घ्यायची होती. तर इतरांना आपापल्या बॅगा भरायच्या होत्या. पण त्या गडबडीत आमदार निवासाच्या चौथ्या मजल्यावरील प्रशस्त सभागृहात एक अपूर्व आणि अभूतपूर्व असा समारंभ आयोजित करण्यात आला होता. 'वसाहत' नावाच्या एका पुस्तकाचा तो प्रकाशन समारंभ होता. महाराष्ट्राचे अर्थमंत्री ना. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते त्या पुस्तकाचे प्रकाशन होणार होते आणि त्या समारंभाचे अध्यक्ष होते मुंबई दूरचित्रवाणीचे श्री. याकूब सईद. आमदार निवासाच्या प्रवेशद्वारी असलेल्या फलकाच्यावर त्या प्रकाशन समारंभाची जाहिरात करण्यात आली होती आणि त्यानिमित्त एक एकपात्री प्रयोग जाहीर झाला होता.

मी आणि मनोहर आमदार निवासाच्या प्रवेशद्वारी सहज उभे होतो. इतक्यात तेथे याकूब सईद आले आणि आमच्या बाजूलाच ते सुशीलकुमारजींची वाट पाहात उभे राहिले. लाल दिव्याच्या गाडीसाठी त्यांनी प्रवेशद्वाराकडे नजर रोखली होती. आमदार निवासापुढे हिरवळ आहे. उजवीकडे 'प्रवेश' दरवाजा आहे तेथून गाडचा आत येतात आणि डाव्या बाजूला असलेल्या 'बाहेर' गेटमधून बाहेर पडतात. याकूब वाट पहात असताना सुशीलकुमारजी त्यांच्या बाजूस येऊन

केव्हा उभे राहिले हे त्यांना समजलेच नाही. कारण 'प्रवेश' दरवाजातून आत येण्याऐवजी त्यांनी चक्क 'बाहेर' दरवाजातून प्रवेश केला. आणि शिवाय ते गाडी बंगल्यावर ठेवून चालतच आले होते. 'बाहेर' दरवाजातूनच प्रवेश करण्याच्या सुशीलकुमारजींच्या या सवयीमुळेच त्यांना आतापर्यंत कोणतेही मुख्यमंत्री 'बाहेर' ठेवू शकत नसावेत.

प्रवेशद्वारापाशी महाराष्ट्राच्या या अर्थमंत्र्याचे श्री. याकूब सईद यांनी हार्दिक स्वागत केले. तेथे दुसरे कोणी हजर नव्हते. यजमान स्वागतासाठी चौथ्या मजल्यावरील सभागृहाबाहेर उभे असावेत या भावनेने अध्यक्ष आणि पाहुणे खास सुशीलकुमार स्टाईलने हातात हात घालून लिफ्टने चौथ्या मजल्यावर गेले. थोडा उशीरच झाला होता. सभागृहाच्या दारात पुस्तकाचे लेखक श्री. शिवराम भोंडेकर यांचे एक मित्र हाजीर होते. भोंडेकर स्वत: आले नव्हते. सभागृहात प्रकाशन समारंभाची जय्यत तयारी झाली होती. भारतीय बैठक असल्याने सर्वत्र गाद्या, त्यावर शुभ्र चादरी आणि लोड होते. ध्वनीक्षेपक अर्थमंत्र्यांच्या बहुमोल विचारांचे वितरण करण्यास उत्सुक होता. दोन पांढरे शुभ्र हार अध्यक्ष पाहुण्यांच्या गळी पडण्याची वाट पहात होते. रंगीत रिबीन बांधलेल्या वेष्टनाच्या आंत पुस्तकांची प्रत गुदमरल्याने तीही सुशीलकुमारनी फीत सोडण्याची वाट पहात होते. सर्व काही ठाकठीक होते. वाण होती ती एकाच गोष्टीची... कारण...

कारण त्या सभागृहात प्रकाशन समारंभासाठी एकही श्रोता हजर नव्हता. सुशीलकुमारजी, याकूब आणि लेखकाचा मित्र असा हा सरकारी त्रिकोन तेथे तयार होणार होता. पण सभागृहात जाताना सुशीलकुमारजींनी आमच्याही खांद्यावर हात टाकल्याने मी आणि मनोहर दोघांनाही त्या अपूर्व समारंभाला हजर रहाण्याचे भाग्य लाभले. आतापर्यंत मी कमीत कमी श्रोत्यांची सभा अनुभवली आहे, पण प्रेक्षकच नसलेला समारंभ मी प्रथमच पहात होतो. मी आणि मनोहर एकमेकांच्याकडे पहात राहिलो. लेखकाचा मित्र गादीखाली,

उशीमागे कोठेतरी एखादा श्रोता दिसेल म्हणून सर्वत्र टेहळणी करत होता. याकूब सईद या विनोदी नटाला आपल्या चेहऱ्यावर इतका गंभीरपणा, अभिनय करूनही आणता आला नसता. या साऱ्याचा परिणाम झाला नाही अशी एकच व्यक्ती शिल्लक राहिली आणि ती म्हणजे सुशीलकुमारजी. स्वतः त्यांच्या जागी दुसरा कोणीही मंत्री असता तरी त्यांनी आपला पडलेला चेहरा दोनही पंजाने झाकून घेतला असता. पण चार कोटी जनतेचा हा अर्थमंत्री त्याही परिस्थितीत हंसत राहिला. परिस्थिती कशीही असो, विचलीत न होता ती एंजॉय करायची ही सामान्य वाव नाही. 'स्माईल इज धी बेस्ट टॉनिक' हा मंत्र मला माझे महाविद्यालयीन गुरू वॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी दिला. पण सुशीलकुमार म्हणजे माझ्या गुरूंचे गुरू निघाले त्या 'विराट' सभेत त्यांचा जॉली मूड कायम होता. इतक्यात त्या प्रकाशाच्या मित्राने ध्वनिक्षेपक ऑन केला. तेव्हा सुशीलकुमारजींनी त्याला 'बाबारे ऐकायला कोण नाहो आणि हा भोंगा कशाला लावतोस!' म्हणून मागे ओढले तेव्हा आम्ही सगळेच हसलो आणि 'सभे'ला रंग चढला.

दुसरे कोणी नसल्याने मीच पुष्पहार घालून अर्थमंत्र्यांचे स्वागत केले. मनोहरनी याकूबच्या गळ्यात हार घातला. आणि मग सुशील कुमारजींनी आवरणावरची फीत सोडून समोर जणू दहा हजार प्रेक्षक असावेत त्या आविर्भावात पुस्तकाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर केले. मी आणि मनोहरनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाट केला. आणि मराठी सारस्वताच्या इतिहासातील तो ऐतिहासिक समारंभ पार पडला. आतापर्यंत मी हजर राहिलेल्या हजारो समारंभांपैकी हा एक अविस्मरणीय समारंभ म्हणून मी त्याच दिवशी डायरीत नोंदवला त्या समारंभापेक्षाही माझ्या आठवणीत रहातील ते त्या दिवसाचे सुशीलकुमारजी. या माणसाविषयी मी खाजगीत दोन गोष्टी नेहमी सांगत असतो. कधी कधी एखाद्या संस्थेचे कार्यकर्ते येतात. त्यांना समारंभासाठी एखादा बोलका मंत्री हवा असतो. तो समारंभ दोन अगर तीन महिन्यांनी असतो पण मधल्या काळात निमंत्रणपत्रिका

छापल्यावर मंत्रीमंडळ गडगडेल अशी त्यांना साधार भीती वाटत असते, मग मी त्यांना सुशीलकुमार शिंदेचे नांव सुचवतो. कारण उद्या शरद पवारांचेच काय पण महाराष्ट्रात फारूकचे मंत्रिमंडळ आले तरी शिंद्यांची छत्री मात्र कायम रहाणार. कारण सुशीलकुमार हे महाराष्ट्र मंत्रिमंडळाचे एकमेव आजीव सदस्य आहेत. त्याच वेळी मी त्या कार्यकर्त्याला दुसराही एक सल्ला देतो की कोठे कधी शोक सभा असेल तर मात्र शिंदेंना बोलावू नका. कारण तेथेही हा माणूस नेहमीसारखा आनंदी हसतमुख राहिला तर मोठो विचित्र परिस्थिती होईल.

त्या दिवशीचा तो समारंभ मला विलक्षण वाटला तरी सुशीलकुमारजींना ते अपेक्षित असणार. या उपेक्षित समारंभाच्या उपेक्षित सभेचे निमंत्रण शिंदेनी जाणीवपूर्वक स्वीकारले होते. म्हणूनच ते सहजतेने चालत आले आणि त्याच सहजतेने त्यांनी तो समारंभ पार पाडला. त्यांच्या जागी दुसरा कोणी मंत्रीच काय पण मी जरी असतो तरी वैतागलो असतो, चिडलो असतो. माझ्यासारख्या वेळी अवेळी छोट्या मोठ्या निमित्ताने डिस्टर्ब होणाऱ्या माणसाने असे क्षण टिपण्यासारखे असतात. हे अनुभव अधून मधून सर्वांच्याच वाट्याला येतात. एका सभेत मला श्रोत्यांअभावी परत पाठवून छायागीत झाल्यावर या असे सांगितले गेले. बदलापूरपलिकडच्या वाचनालयात तीस मैलांवर गेलो. श्रोते पंधरा होते. कांदिवलीच्या एका सभेत सगळे श्रोते फक्त स्टेजवरच मावले. करीरोडच्या परिसंवादात दोन्ही बाजूचे मिळून मी एकटाच वक्ता असल्याने मलाच दोन्ही बाजू मांडायला सांगितल्या. किमान दोनदा माझें व्याख्यान कमी श्रोते असल्याने रद्द झाले. भाई जीवनजी लेनमधील सोशल समाजात मी एकदा फक्त एकाच श्रोत्यासमोर 'भारताने अणुस्फोट करावा काय!' या विषयावर वीरश्रीयुक्त भाषण केले, तो माझा विक्रम आहे असा माझा आतापर्यंतचा समज होता. पण परवा सुशीलकुमारजींनी तो विक्रम मोडला. आणि तोही हसत हसत... काय करणार! जो स्वतःलाच हसतो त्याला दुसरे हसूही शकत नाहीत.

# पाणी

परवाच्या दंगलीनंतर पुण्यास जात असताना आमच्या गप्पा रंगात आल्या होत्या. बोलता बोलता सुधीरभाऊ सहजतेने एक वाक्य बोलले 'नवलकऽऽऽर (ते 'क' नेहमी लांबतात) एवढा मोठा समुद्र किनारा असताना मुंबईतील लोकांना पोहता येत नाही हे म्हणजे एक आश्चर्य आहे.' आणि त्यानंतर गेले तीन दिवस माझे विचार पाण्यात गटांगळ्या खात आहेत. माझ्या मते 'पाणी' या शब्दात एक फार मोठे काव्य भरलेले आहे. कोणत्याही महाकवीने आपले आयुष्य ओवाळून टाकावे असा हा विषय आहे. पण तरीही या विषयावर मराठी लेखक आणि कवींची स्फूर्ती अभावानेच तळपली आहे. कारण पाणी म्हटले की ते एक तर तळ्यातील नाहीतर डोळ्यातील या-पलिकडे आमच्या विचारांची भरारी कधीच जाऊ शकली नाही. परिणामी–

परिणामी 'वॉटर स्पोर्टस' हा विषयच अद्याप आमच्याकडे अस्तित्वात आलेला नाही. जगाच्या पाठीवरील करोडो लोक पाण्यासाठी अक्षरशः वेडे होतात. अमेरिकेसारख्या भांडवलशाही राष्ट्रापासून ते जर्मनीसारख्या साम्यवादी राष्ट्रापर्यंत लोक आहेत वेगवेगळ्या मताचे आवडीचे आणि निवडीचे. पण एका बाबतीत मात्र त्यांची आवड समान आहे आणि ती म्हणजे 'पाणी'. तेथे शनिवार–रविवार सुटी असते. पण सोमवारपासून ते शनिवारची वाट पहात आठवडा काढतात ते केवळ समुद्रकिनाऱ्यावर जाण्यासाठी. लक्षावधी लोक जणु पंढरपूरच्या स्नानासाठी जावे त्याप्रमाणे किनाऱ्यांच्या दिशेने झेप

घेतात. हजारो मोटारी मुंगीच्या वेगाने मार्ग काढत रहातात. पार्किंगला जागा मिळाली नाही तर मैल अन मैल चालतात. आणि ती दोन दिवसाची सुटी समुद्रकिनाऱ्यावर काढतात. तेथे अनेक किनारे आहेत. पण कोणत्याही किनाऱ्यावर मुंगीला पाय ठेवायला जागा मिळणार नाही इतकी गर्दी होते. असे हे सारे जग पाण्यासाठी वेडे झाले असताना आम्ही मुंबईची माणसे मात्र तीनही बाजूला किनारा असताना तेथे आयुष्यभर ढुंकूनही पहात नाही याला काय म्हणावे ?

किनाऱ्याची अशा प्रकारे उपेक्षा करणारे आपल्यासारखे दळभद्री आपणच. मुंबईचा पूर्व किनारा आपल्या मोठ्या जहाजांच्या गोदींनी व्यापला आहे. एकेकाळी दक्षिणेच्या टोकाला असलेला किनारा वेडावून टाकणारा होता. माझ्या लहानपणी मी कफ परेडला जात असे. तेथील किनाऱ्यावर समुद्राच्या लाटा धडक मारीत. तेथे वाळू नव्हती पण मोठमोठे खडक होते. त्या खडकात एक जादू होती. अनेकदा मी त्या खडकांवर तासन् तास काढलेले आहेत. त्याशिवाय नरिमन पॉईंटला एक रस्त्याचे चिंचोळे टोक थेट पाण्यात जात होते. त्या टोकावर बसून अवती भवती उसळणाऱ्या लाटा पाहिन्या की भान हरपून जायचे. माझे अनेक लेख मला त्या नरिमन पॉईंटच्या टोकावर पाण्याच्या सहवासात स्फुरलेले आहेत. पण वसंतराव नाईकांना त्या सुखाचा हेवा वाटला आणि नरिमन पॉईंटपासून कफपरेडपर्यंत भरणी टाकून त्यांनी तो नयनरम्य किनाराच नष्ट करून टाकला. त्याच वेळी महापालिकेने सर्व पाण्याचे कारंजे बंद केले.

समुद्रकिनारा म्हटला की भेळपुरी असे आम्ही एक समीकरण करून टाकलेले आहे. त्यामुळे आषाढी एकादशीसारख्या दिवसाव्यतिरिक्त एरव्ही त्या किनाऱ्यावरील पाण्यात कोणी डुंबतही नाही. अगर तेथे बसून कोणी क्षितिजाशी गुजगोष्टीही करीत नाही. या किनारी वैफल्याबद्दल माझ्याकडे दहा वर्षांपूर्वी मगनलाल राडीया या माणसाने पोटतिडकेने तक्रार केली होती. त्यांनी तो चौपाटीवरील राडीया फ्लोटिल्ला क्लब सुरू केला आहे. पाणी हा आयुष्यातील

माणसाचा सर्वात मोठा आनंद आहे असे मानणाऱ्यांपैकी राडीया हे एक आहेत. त्यांनी किनाऱ्यावर अफाट खर्च करून बोटिंग, स्किईंग इत्यादी किनाऱ्यावरील खेळ सुरू केले आहेत. पण मुंबईतील लोकांनी त्यांच्या त्या उपक्रमाचे स्वागत न करता उलट अनेक अडथळेच आणले.

त्याउलट मी बॅन्कॉकला जे दृश्य पाहिले ते अपूर्व होते. तेथील पटाय्या शहराला आपल्यासारखाच किनारा आहे. शहरातील क्वचितच लोक घरात असतात, सर्व शहर किनाऱ्यावर लोटलेले असते. तेथेच खुर्च्या आणि तेथेच यंत्राच्या बोटिंगपासून ते पॅराशूटमधून आकाशात उडण्यापर्यंत आणि पाण्यातील स्कूटर्सपासून ते विमानातून पाण्यात डाईव्ह मारण्यापर्यंत अनेक साहसे जणू खेळ खेंळावेत त्याप्रमाणे लहान मुले आणि स्त्रियाही करत असतात. त्या किनाऱ्याकडे पहात असताना निर्मालय झालेल्या आमच्या मुंबईच्या किनाऱ्याची मला आठवण झाली आणि मनाला वेदना झाल्या.

पाणी हे माणसाला चिरतारुण्य देते म्हणून जो पाण्याशी दोस्ती करतो तो उशीरा वृद्ध होतो. या पाण्याशी दोस्ती करण्याचे अनेक प्रकार आहेत. पाण्याच्या बाथटबमध्ये अगर शॉवरखाली हातात पुस्तक वाचत तासन् तास बसणारी माणसे मला माहीत आहेत. पाण्याच्या अभावी मुंबईकरांना हे सुख नाही. पण तरीही उदंड पाण्यासाठी समुद्र आहे. पुण्याच्या संगमावर बसल्यावर मला घरी परतावेसे वाटत नाही. बंडगार्डनच्या समोरच्या बाजूला एक झाड आहे. पुण्यात कधीही वेळ मिळाला की मी त्या झाडासारखी बसून धावणाऱ्या नदीकडे पहात रहातो. समुद्र ही चीजच वर्णनापलिकडची आहे. डावीकडे, उजवीकडे, अलिकडे, पलिकडे पाणीच पाणी आणि उंच उसळणाऱ्या लाटा हे रोज दिसणारे दृश्य विलक्षण आहे. ३० वर्षांपूर्वी मी दिल्लीत असताना मला जयपूरचा मोहन महर्षी नावाचा एक तरुण भेटला. नंतर त्यांनी मामा वरेरकरांच्या नातीशी विवाह केला. तो कधी भेटला की समुद्राविषयी झपाटल्यासारखा बोलायचा. आमचा हेवा करायचा. कारण समुद्र त्यांनी कधी पाहिलाच नव्हता.

अमर्याद पाणी ही कल्पनाच त्याला शहारून टाकायची. माथेरानला एक बॉम्बे पॉइंट आहे. तेथून मुंबईच्या पश्चिम क्षितिजावर सूर्य मावळताना दिसतो. तो पहाण्यासाठी रोज तिथे पर्यटकांची गर्दी उसळते. पण मुंबईकर मात्र संध्याकाळी किनाऱ्याच्या बाजूने चालत असला तरी पश्चिमेकडे मान वळवूनही पाहायला तयार नसतो.

कफ परेडचा किनारा गेला. गिरगावचा किनारा गलिच्छ झाला. दादरचा किनारा भेळवाल्यांनी व्यापला. जुहूच्या किनाऱ्यावर टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या आणि आता मार्वेचा किनाराही विकासाच्या नावाखाली धोक्यात आला आहे. पण आपण कोणी त्याची चिंता करण्याचे कारण नाही. कारण आपल्याला त्या किनाऱ्याचे आणि त्यावर उसळणाऱ्या लाटांचे आकर्षण कधीच वाटले नाही त्या पाण्याशी आपण कधी समरस झालो नाही. त्या लाटांशी आपण कधी बोललो नाही. त्या वाळूस आपण कधी आंजारले नाही. गोंजारले नाही. त्या क्षितिजाचा आपण कधी वेध घेतला नाही. त्या प्रवाहावर आपण आपल्या विचारांचे तरंग कधी हळूवारपणे सोडले नाहीत. किती दळभद्री आपण ! ओंजळभर आनंदासाठी जगातील कोटयवधी माणसे पाण्याशी झटापट करत असताना आम्ही मात्र चारही बाजूंनी पाणी असूनही कोरडेच राहिलो आहोत. तेव्हा आम्हाला पोहता येत नाही याबद्दल सुधीरभाऊंना खंत वाटण्याचे कारण नाही.

# आगाऊ

परवा मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी एक विलक्षण प्रकार घडला. प्रतिवर्षी हा समारंभ पारंपरिक शिष्टाचाराने पार पडतो. त्या समारंभापूर्वी विद्यापीठाच्या वर्गीच्यात काळे गाऊन परिधान केलेल्या पदवीधर विद्यार्थी विद्यार्थिनींची मिरवणूक धीरगंभीरपणे निघते. तिच्या अग्रभागी स्वत: राज्यपाल असतात. त्यांच्यामागे उप-कुलगुरू आणि रजिस्ट्रार चालतात. मागोमाग सिनेटर्स आणि त्या-मागे विद्यार्थी चालतात. सर्वांनी काळे गाऊन परिधान केलेले अस-तात. ही मिरवणूक पदवीदान समारंभगृहात जाते आणि तेथे तासभर प्रोटोकोलप्रमाणे त्याच वातावरणात पदवीदान समारंभ होतो. यंदा विद्यापीठाला १२५ वर्षे झाल्याने उपराष्ट्रपती हिदायतुल्ला या समा-रंभास आले होते. काही मोर्चे येणार असल्याने विद्यापीठाच्या आवाराभोवती कडेकोट पोलीस बंदोबस्त होता.

सालाबादप्रमाणे समारंभ अत्यंत शिस्तीने आणि शिष्टाचाराने पार पडला. इतक्यात एक मध्यमवर्गीय महिला सर्वांची नजर चुकवून थेट व्यासपीठावर चढली आणि जणू पुतणी किंवा भाची असावी त्याप्रमाणे उपराष्ट्रपती हिदायतुल्लाकाकांशी बोलू लागली. सगळे सभागृह या प्रकाराने अवाक झाले. समारंभानंतर त्याच शिस्तीने मिरवणूक माघारी जाणार होती. पण उपराष्ट्रपतींची परिचित अस-ल्याने सिक्युरिटीचे लोकही हवालदिल झाले. तिला थोडे बाजूस सारून रामजोशींनी पुन्हा मिरवणुकीसाठी हिदायतुल्लांना व्यासपीठा-वरून उतरण्यासाठी मार्गदर्शन केलं. आणि पुन्हा ती मिरवणूक सुरू

झाली. कहर म्हणजे त्या मिरवणुकीतही ती उपराष्ट्रपतींच्या बरोबर गप्पा मारत आणि पावले टाकत राहिली. हा गंभीर औचित्यभंग असल्याने सगळेच अस्वस्थ झाले. ती शेवटपर्यंत चालली आणि डाव्या बाजूच्या झाडीत शिरून अदृश्य झाली.

त्यानंतर तिचे अस्तित्व म्हणजे खडाजंडीचा विषय झाला. कारण विद्यापीठाच्या इतिहासात अशी बेशिस्त घटना घडली नव्हती, ती कोण होती म्हणून जो तो चौकशी करू लागला. तेव्हा समजले की उपकुलगुरूपासून तो उपराष्ट्रपतीपर्यंत कोणीच त्या महिलेला ओळखत नव्हते, सर्वांना चकवून पदवीदान समारंभाचे नेतृत्व करणाऱ्या त्या बाईचा शोध घेण्यासाठी पोलिसांनीही विद्यापीठाभोवती चकरा मारल्या पण ती बाई सापडली नाही. 'वह कौन थी ?' म्हणून त्या बाईवर अद्यापही चर्चा चालू आहे.

अशा प्रकारे अनाहूतपणे आगाऊपणा करणाऱ्या अनेक व्यक्ती समाजात वावरत असतात. माझ्या माहितीत मसुरेकर नावाचे एक गृहस्थ होते. थोडेफार समाजसेवक होते. आता वारले ते. पण हयात असताना ते मला अनेकदा व्यासपीठावर भेटत असत. मुंबईत कोठेही समारंभ असला की ते समारंभाच्या दारात उभे रहात. प्रमुख पाहुणा आला की नमस्कार नमस्कार म्हणत त्यांचा अगदी जुना परिचय असावा त्याप्रमाणे हस्तांदोलन करत आणि मग त्या पाहुण्याबरोबर थेट व्यासपीठावर जाऊन बसत. इतकेच नव्हे तर नंतरच्या चहापानातही सहभागी होत. समारंभचालकांना वाटे ते पाहुण्यांच्याबरोबर आले आहेत आणि पाहुण्यांना वाटे ते सभासंचालक आहेत. किमान तीनदा तरी ते असे माझ्याबरोबर व्यासपीठावर बसले. शेवटी शिरोडकर हॉलमधील एका सभेत 'नवलकरांच्याबरोबर आलेले पाहुणे' म्हणून त्यांना हार घातला गेला तेव्हा त्यांचे बिंग बाहेर फुटले.

परिस्थितीचा फायदा घेऊन असे प्रकार सर्वत्र घडत असतात. बालगंधर्वांच्या नाटक कंपनीत रोज शेकडो लोक पंक्तीला बसत असत. त्या कंपनीत घुसलेले एक चार तरुणांचे टोळके जेवायला बसत

असे ते दहा दिवसांनी उघडकीस आले. तोपर्यंत त्यांना सर्व 'नाटक कंपनीतील लोक' म्हणून समजत असत.

आपला एक मराठी पत्रकार आहे. तो तर पाहुण्यांशी इतकी लगट करतो की यजमानांना वाटावे की पाहुण्यांनीच त्याला आपल्याला प्रसिद्धी देण्यासाठी बरोबर आणले आहे, त्या पत्रकारांनी तर एकदा आगाऊपणाचा विक्रमच केला. अमर हिंद मंडळात बाळासाहेबांचे व्याख्यान होते. नेहमीप्रमाणे तो बाळासाहेबांना गाडीतून उतरल्यापासून चिकटला. व्याख्यान सुरू झाले तेव्हा तो पत्रकार 'साहेबांचा माणूस' म्हणून पहिल्या रांगेत बसला आणि व्याख्यान ऐन रंगात आले असताना तो उठला आणि थेट व्यासपीठावर चढला. श्रोत्यांना तो प्रकार उमजेना. बाळासाहेबही क्षणभर बावरले. पण त्या पत्रकाराने अगदी सहजतेने बाळासाहेबांच्या टेबलावरील पाण्याचा ग्लास उचलला. त्यातील पाणी तो प्याला आणि खाली उतरून परत आपल्या जागेवर जाऊन बसला. त्यावेळी हसण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

माझ्या परिचयाचे एक धुरंधर नावाचे गृहस्थ आहेत. त्यांची हौस आणि आगाऊपणा मोठा विलक्षण आहे. कोणत्या लग्नसमारंभाचे आमंत्रण असले तर ते तुमच्या-आमच्यासारखें तेथे अहेर करून नि आईस्क्रीम खाऊन परत येणार नाहीत जर तेथे गेल्याबरोबर प्रथम चौघडेवाला किंवा बँडवाल्याला वाजवावे कसे यावर दम मारतील. नंतर आईस्क्रीमच्या व्यवस्थेची थोडीफार पुनर्रचना करतील. युनिफॉर्म स्वच्छ नाही म्हणून दोन पोरांना सडकून दम मारतील. मग कॉंट्रॅक्टरनी क्षमा मागितल्यावर त्याला माफ करतील. त्यानंतर स्वत: मेहनत घेऊन आईस्क्रीम वाटतील आणि कंटाळा आला की निघून जातील. या सर्व धावपळीत वधुपक्षाला वाटते धुरंधर वराचे मामा असतील आणि वरपक्षाला वाटते वधूचे मामा असतील. पण प्रत्यक्षात ते सर्वांना 'मामा' बनवून गेलेले असतात.

सार्वजनिक जीवनात अशा व्यक्ती आणि वल्ली आमच्या अवतीभवती नेहमी नेहमी वावरत असतात. विशेषत: छायाचित्रकार फोटो घेऊ लागला की त्या बाजूला येऊन दोस्ती असल्याप्रमाणे उभ्या रहा-

तात. अशीच एक कारखानीस नावाची आगाऊ व्यक्ती माझ्या कायम स्मरणात राहिली. कोणत्याही गर्दीत घुसायची आणि आगाऊपणा करायची. जणू काल इंदिराजी भेटल्या आणि त्यांना बोलावले आहे अशा आवेशात बोलताना तोंड खुपसायची. हे कारखानीस साधारण चाळीस पंचेचाळीस वर्षांचे होते. आता नागपुरात स्थायिक झाले आहेत. पण त्यांच्यासारखा लोचट आणि आगाऊ माणूस मी पाहिला नाही. एकदा आर्यनच्या सभागृहात एका शिक्षणसंस्थेचा स्वातंत्र्य–दिन समारंभ होता. लोचट कारखानीस माझ्याशी घसट करून पहिल्या रांगेत बसले होते. बक्षीस समारंभ आणि इतर काही मुलांचे कार्य–क्रम झाले. त्यानंतर 'झेंडा उंचा रहे हमारा' हे गीत विद्यार्थी विद्यार्थिनी गाणार होत्या. पण प्रिन्सिपॉलनी अनवधानाने आता राष्ट्रगीत होईल असे जाहीर केले. मुली व्यासपीठावर येणार इतक्यात कारखानीस टुणकन उडी मारून वर आले आणि त्यांनी माईकसमोर खडचा आवाजात 'जन गण मन' सुरू केले. सर्वजण साहजिकच उभे राहिले आणि...

त्यानंतरचा आभाराचा आणि हाततुऱ्याचा कार्यक्रम बारगळला. पण तरीही कारखानीस हे नवलकरांच्याबरोबर आले आहेत या समजुतीने कोणी काही बोलले नाही. मी तरी काय बोलणार–!

# शोध

अलिकडेच मी लंडन आणि युरोपचा दौरा करून आलो. त्यात नवीन असे काहीच नव्हते. तसा दौरा म्हणजे आता विशेष बाब राहिलेली नाही. नित्याने कोणी ना कोणी परदेशी जातच असतात. पूर्वी मला आठवते. मी जहाज कंपनीतच नोकरी करत असताना बंदरात जावे लागे. नंतर सुएज कालवा बंद झाल्यावर लंडनला जाणाऱ्या बोटी बंद झाल्या. पण त्यावेळी कोणीही लंडनला जाणार असला की त्याचा कोण मोठा गवगवा व्हायचा. बोटीवर त्याला निरोप देण्यासाठी नातेवाईक मंडळी, मित्रमंडळी वगैरे हारतुरे घेऊन यायची. गळ्यांत गळे घालून रडायची. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात त्याचा बातमीवजा ( जाहिरात म्हणून नव्हे ) फोटो यायचा. मला आठवते, आमच्या वाडीत वैशंपायन नावाचे एक गृहस्थ रहात होते. त्याच्या दारावर वारलेल्या वडिलांची पाटी कायम होती. त्यावर मो. ह. वैशंपायन. एल. आर.' असे लिहिले होते. शेवटी शेवटी मला कळले की, एल. आर. म्हणजे लंडन रिटर्न म्हणजे एक मोठी पदवी होती. आमचा जावई लंडन रिटर्न आहे हे अनेक सासुबाई भाजी घेताना भाजीवाल्यांना सांगायच्या. मग कधी कधी भाजीवाला 'मी देखील वसई रिटर्न आहे' म्हणून सांगायचा. पूर्वीची ही पदवी कायम असती तर राजा पाटलांना आपल्या प्रत्येक टूरनंतर एक पदवीदान समारंभ आयोजित करावा लागला असता.

माझ्या या परदेश दौऱ्यात जे सर्व पहातात ते मीही पाहिले. पण त्यातील एक गोष्ट माझ्या डोक्यातून जायला तयार नाही. या जगात

माणसाचे होणारे यांत्रिकीकरण जर असेच चालू राहिले तर जिवंत माणूस आणि मेलेला माणूस यात काही फरक रहाणार नाही. परदेशात रेल्वेची तिकिटे वगैरे यंत्रात नाणे टाकून मिळतात हे सर्वांना माहीत आहे, पण आता परिस्थिती त्याहीपेक्षा पुढे गेली आहे. लंडनमधील माझ्या मुक्कामात मी एक चमत्कारिक गोष्ट पाहिली. जी. पी. ओला. भितीत बसविलेल्या पेटचांप्रमाणे छोटी यंत्रे काही ठिकाणी बसविली आहेत. ते एक छोटसे यंत्र बॅन्केचे सर्व व्यवहार करते. उदाहरणार्थ रस्त्यातच उभे राहून आपण चेकवर आपला अकाऊंट नंबर आणि पैसे लिहून तो फटीतून आता सरकवला की बाजूच्या झरोयातून तेवढे पौड बाहेर येतात ते पाहिल्यावर मती कुंठीत होऊन जाते.

तेथील बँक स्ट्रीटवरील चार्टर्ड बँकेत गेलो असता त्या बँकेत गर्दी नव्हती. त्या प्रचंड बँकेत जेमतेम चार-सहा माण्से पैसे काढायला अगर ठेवायला आली होती. तेव्हा मला मॅनेजरनी त्या यंत्राविषयी सांगितले आणि नंतर मी नाक्यावर जाऊन ते यंत्र पाहिलेही. त्या मॅनेजरशीच मी या विषयावर गप्पा मारल्या आणि नंतर माझे डोके गरगरायला लागले. माणसाला पर्याय म्हणून जगात संशोधन करण्याची जी स्पर्धा लागलेली आहे ती विलक्षण आहे. आपण मात्र अद्याप चपाती करण्याच्या यंत्रावर अयशस्वी प्रयोग करत राहिलो आहोत.

सहा वर्षांपूर्वी मी दुबईला गेलो होतो. आपले टेलीफोनचे बुथ असतात त्याप्रमाणे थिएटर किंवा तशा सार्वजनिक स्थळांच्या दारात छोटे बुथ आहेत. त्या बुथमध्ये एक छोटे स्टुल असून समोर अॅडजस्ट करण्याचा आरसा आहे. त्या स्टुलावर बसून आपले प्रतिबिंब हवे तसे अॅडजस्ट केल्यावर समोरील छोटचा यंत्रात नाणे टाकणे की वजनाच्या काटचातून तिकीट बाहेर पडते त्याप्रमाणे बाजूच्या फटीतून आपला सुंदर रंगीत फोटो बाहेर येतो. ती यंत्रे निघाल्यापासून दुबईमधील सर्व फोटो स्टुडियो बंद पडले.

बँकेचे दुय्यम मॅनेजर मला सांगत होते की लवकरच लंडन-अमे-

रिकेत तशाच प्रकारचे पण वेगळे बुथ हॉस्पिटल्समधून बसविण्यात येणार आहेत. त्या बुथमध्ये माणसाने आपल्या अंगावरील सर्व कपडे काढून जायचे. आता गेल्यावर कळ दाबायची की त्याच्यासमोर एक कार्ड येईल. त्या कार्डावर त्याच्या रोगाचे निदान केलेले असेल. ते कार्ड त्यांनी बाजूला असलेल्या यंत्राच्या झरोक्यातून आत टाकायचे की दोन मिनिटात त्या रोगावरील औषध आणि ते कार्ड पुन्हा बाहेर येईल. असे झाल्यास तुमच्या डॉक्टरांचे काय होईल या माझ्या प्रश्नावर तो मॅनेजर फक्त हंसला. मला त्यांनी सांगितल्याचे आश्चर्य वाटले नाही. माझे वडील दहा वर्षांपूर्वी हृदयविकाराने के. ई. एम. मध्ये होते, त्यावेळी तेथे एक यंत्र होते. डॉक्टरांनी वडलांच्या छातीला एक पट्टा बांधून हॉस्पिटलमधून एक फेरफटका मारून येण्यास सांगितले आणि त्यांच्या तब्येतीच्या रेषा डॉक्टरांना त्यावेळी त्यांच्या खोलीतील स्क्रीनवर दिसल्या.

मी विचारमग्न झालो असतानाच त्या मॅनेजरनी खणातून एक छोटीशी चीज काढली. ती कॅल्क्युलेटरप्रमाणे दिसत होती. पण दुसरीच. त्यांनी त्यावरील माझ्या नावाची आद्याक्षरे दाबली. माझे नाव त्यावर आले नंतर आणखी एक बटन दाबले आणि आपोआप जन्मतारीख आली. माझ्या मुखातून नकळत उद्‌गार निघाले 'फॅन्टास्टीक!

पण ते काहीच फॅन्टास्टॅस्टीक नव्हते. हचा मॅनेजरनी मला वेडेच करायचे ठरविले होते. म्हणून पाश्चात्य देशात प्रगत होणारे आणखी दोन शोध सांगितले. तो म्हणाला, ' आता अभिनव चष्म्यांचा शोध लावला आहे. अद्याप ते बाजारात विकायला आले नाहीत. कारण त्यांना गव्हर्नमेन्ट रजिस्ट्रेशन देणे अवघड आहे. त्या चष्म्यास एक्स रे चष्मे म्हणतात. तो चष्मा लावल्यावर समोरील व्यक्ती विवस्त्र दिसते. मी चमकून मॅनेजरच्या चष्म्याकडे पाहिले. तेव्हा तो म्हणाला ' डोन्ट वरी, माझा चष्मा तसा नाही.' त्यांनी सांगितलेला दुसरा शोध म्हणजे आता एका यंत्राद्वारे यापूर्वी कोणत्याही सालात झालेला संवाद आज ध्वनिमुद्रित करता येतो. हा शोध तीनशे वर्षांपूर्वीचा आवाज टिपण्यापर्यंत गेला आहे असे म्हणतात. म्हणजे शिवाजी महा-

राजांच्या आग्र्याच्या तुरुंगातील खलबतापासून ते बाजीराव मस्तानीच्या प्रेम संवादापर्यंत आणि नेपोलीयन चर्चिलच्या खाजगी गोष्टीपासून ते जनता पक्षातील कारस्थानापर्यंत सर्व संवाद त्या यंत्रणे टिपता येतील आता त्या यंत्राने प्रिन्स चार्लसच्या बेडरूममध्ये त्यांच्या आणि डायनाचा संवादही टिपता येईल. बाबासाहेब भोसले. सह्याद्रीवर गेल्यावर्षी अंतुलेच्याविषयी काय बोलले, अंतुले अदिकाविषयी काय बोलले आणि आदिक इंदिराजींच्याविषयी काय बोलले आणि इंदिराजीही शेख अब्दुल्लाविषयी काय बोलल्या हे सगळे टिपता येईल. म्हणजेच मीही कोणाविषयी काय बोललो तेही टिपले जाईल. त्यामुळे यापुढे काही बोलायचे नाही असे ठरवून अधिक शब्द न बोलता मी त्या बँक मॅनेजरचा निरोप घेतला.

# विस्मरण

माणूस हा आपल्या स्मरणशक्तीशी नेहमी जुगार खेळत असतो. ती स्मरणशक्ती त्याला कधी साथ देते तर कधी दगा देते. शकुंतला-देवींसारखी गणिती स्मरणशक्ती असलेली अनेक माणसे आपल्या अवतीभोवती वावरत असतात. माझा एक मित्र त्याच्या सहाव्या वर्षा-पासून झालेल्या नातेवाइकांच्या लग्नाच्या तारखा सांगत असतो तर दुसरा एक मित्र कोठे काम करतोस ? असे विचारले तर दोन मिनिटे डोके खाजवून ' म्युनिसिपल को. ऑप. बँक ' असे सांगतो. यश-वंतराव चव्हाणांचा मला स्वतःला एक अनुभव आहे. एखाद्या गर्दीत वीस वर्षांपूर्वी भेटलेल्या व्यक्तीला ते आजही नावाने ओळखतात. विजय मर्चंट ही अशीच एक व्यक्ती ! त्यांनी क्रिकेट सोडल्यास आज पाव शतक होऊन गेले तरीही गेल्या पन्नास वर्षातील जगातील क्रिकेट क्षेत्रांत घडलेल्या घटना ते जणू काल घडल्याप्रमाणे सांगतात. परवा त्यांचे आमच्या स. का. पाटील उद्यानात भाषण झाले तेव्हा तो विल-क्षण अनुभव श्रोत्यांना आला. चाळीस वर्षांपूर्वी कोणत्या खेळाडूने कोणत्या सामन्यात किती वेळात किती धावा काढल्या आणि त्यात चौकार आणि षटकार किती होते हे आज सफाईदारपणे सांगणे म्हणजे सामान्य गोष्ट नाही.

मलाही माझ्या स्मरणशक्तीचा फार मोठा अभिमान आहे. अगदी लहानपणापासून घडलेल्या आणि वाचलेल्या असंख्य घटना माझ्या स्मरणात आहेत. किंबहुना या आठवणी म्हणजे त्याचाच परिपाक आहे. त्यामुळे आठवणी लिहिताना मला बिलकुल कष्ट पडत नाहीत.

पण अलिकडे स्मरणशक्तीची टाकी कुठेतरी गळू लागली असावी असे वाटते. कदाचित तो माझ्या वाढत्या वयाचा परिणाम असू शकेल. कारण कधी कधी स्मरणशक्ती केवळ मंदच नव्हे तर ती अक्षरशः ठार होते. इतकी की मेट्रो सिनेमा धोबी तलावच्या नाक्यावर आहे हे सांगताना 'धोबी तलाव' हा नेहमीचा घोकला जाणारा शब्दच आठवत नाही. अशा वेळी काही सुचत नाहीं. डोके फिरायची वेळ येते. परवा असेच झाले. कमलाकर सारंग हा माझा वर्गमित्र, लालन सारंगचा नाही म्हटला तरी जुना परिचय. पण परवा 'जोडीदार' या नाटकात कोण काम करते हे सांगताना कमलाकरची बायको इथपर्यंत स्मरणशक्ती गेली पण 'लालन' हे नाव काही आठवेना. शेवटी घरी गेल्यावर वर्तमानपत्रातील नाटकाच्या जाहिराती वाचल्या आणि माझी कोंडलेली स्मरणशक्ती मोकळी केली.

परवा विजय मर्चंट यांचे भाषण ऐकताना हा विरोधाभास मला तीव्रतेने जाणवत होता. कारण आठवड्यापूर्वी अशीच एक घटना घडली होती. माझ्या स्मरणशक्तीने दगा दिल्याने मोठा अनवस्था प्रसंग ओढवला होता. नात्यातील अरुण अजिक्य नावाच्या शिवसैनिकाकडे लग्न होते. त्याचे वडील शाखेत येऊन अतिशय आग्रहाने आमंत्रण देऊन गेले. लग्नाचा वार होता शुक्रवार आणि आमंत्रण होते फक्त दुपारचे. पण कधी कधी आग्रहाला बळी पडावे लागते. 'येईन पण थांबणार नाही' या अटीवर येण्याचे मी कबूल केले आणि ऑफिसच्या गर्दीत वेळ काढून घाईघाईत ऑपेरा हाऊसला लक्ष्मीबाग हॉलमध्ये गेलो. तेथे मला जबरदस्त धक्का बसला. कारण लक्ष्मीबागेत दुसरेच कोणाचे लग्न होते. माझ्या स्मरणशक्तीने मला जबरदस्त धक्का दिला होता. काही केल्या खरे लग्न नेमके कोठे आहे ते आठवेना. शेवटी थोडा कॉमन सेन्स वापरला. नवरा मुलगा शेणव्याच्या कांदेवाडीत रहात होता आणि शेणव्याच्या कांदेवाडीत 'विष्णुबाग' हा लग्नाचा हॉल आहे. या दोन नावांचा माझा नेहमी गोंधळ होतो. विवाह समारंभ विष्णूबागेत असावा, असा अंदाज बांधून मी गाडी गिरगावातील वळणे घेत विष्णूबागेजवळ आलो.

दारात केळीचे खांब बांधले होते. पण लक्ष्मीबागेत झालेली शोभा टाळण्यासाठी मी दूरच उभा राहिलो. इतक्यात नेहमीप्रमाणे चार-दोन शिवसैनिक आले. त्यांना मी झाला प्रकार सांगितला आणि विष्णू बागेत अरुण अजिक्यचेच लग्न आहे काय याची चौकशी करायला सांगितले. इतक्यात...

इतक्यात समोर उभा ठाकलेला शिवसैनिक म्हणाला, 'साहेब, ते लग्न उद्या आहे.' मी भांबावलो. 'खात्री आहे तुमची ?' मी गोंधळून विचारले. त्यावर त्यांनी उत्तर दिले, 'म्हणजे काय ? माझेच लग्न आहे. मीच अरुण. उद्या लग्न आहे आणि लक्ष्मीबागेतच आहे.' क्षणभर माझ्या पायाखालची वाळू सरकते आहे असे वाटले. त्या शिवसैनिकाला मी ओळखत होतो, पण तोच अरुण आणि त्याचेच लग्न आहे याची मला यत्किंचितही कल्पना नव्हती. पण अगोदरच मी कबुलीजबाब दिल्याने थापा मारून प्रसंगातून बाहेर पडलो. मग अरुणच्या घरी गेलो. आणि तेथेच विवाहपूर्व समारंभाला हजर राहिलो. थम्सअप प्यालो आणि खाली मान घालून कचेरीत आलो. माझ्या त्या बावळटपणाची आठवण होऊन अरुणच्या घरची मंडळी अद्यापही खो खो हसत असतील. अरुणही उद्या एक वेळ आपला विवाह समारंभ विसरेल पण माझी झालेली शोभा मात्र विसरणार नाही.

पण मला मात्र अशा प्रसंगांचीच आता जवळ जवळ सवय होत चाललेली आहे. कारण अलिकडे असे प्रसंग वरचेवर घडायला लागलेले आहेत. गेल्या वर्षी दादरच्या स्काऊट हॉलमध्ये माझ्या एका मित्राच्या मुलाचे लग्न होते. वधूही माझ्या परिचयाची होती. समारंभ साडेआठपर्यंत होता. मी पोहोचलो नऊला पाच मिनिटे असताना आणि तेथे नेमक्या दोन मुलांच्या मुंजी होत्या. माझ्या दुर्दैवाने त्या मुलांचे वडीलही ओळखीचे होते. मला पाहिल्यावर त्यांना मोठा आनंद झाला. दारात स्वागत झाले. आणि मुकाट्याने मी माझ्या खिशातील आहेराची पाकिटे त्या दोन मुंज्यांना दिली. नवलकर असे आकस्मित आपल्या मुलांच्या मुंजीला कसे आले या प्रश्नाचे उत्तर

त्या मुंज्याच्या बापाला अद्यापही सापडले नसेल. एकदा घडलेला प्रसंग वेगळाच होता ! रेळे नावाच्या माझ्या मित्राच्या मुलाचे लग्न होते. लग्नाला गेलो तेव्हा दारात मुलीच्या बापाने माझे जबरदस्त स्वागत केले आणि थेट स्टेजवर नेऊन मुलीशी ओळख करून दिली. मुलासाठी आणलेले पाकीट मी झक मारत मुलीला दिले. माझी थोडी विचित्र परिस्थिती झाली, पण दुसऱ्या दिवशी मी मुलाच्या बापाला फोन करून खरा प्रकार सांगितला.

अशा या गुगली टाकणाऱ्या गोष्टी सभेतही घडतात. एकदा फोर्ट-मधील एका गणेशोत्सवात भाषण होते. मी दीड तास उशीरा गेलो. गल्लीच्या नाक्यावर मुले उभी होती. मी गाडी थांबवली. थेट स्टेज-वर गेलो आणि त्यांच्या सेक्रेटरींनी ओळख करून द्यायला सुरुवात केली. आपले महान नेते प्रोफेसर कर्डक आले आहेत. ते मोठे विद्वान आहेत. वगैरे वगैरे. मला घाम सुटला. कारण ती दुसरीच कसलीतरी सभा होती. प्रोफेसर कर्डक प्रमुख पाहुणे होते. आणि खरी सभा.. ? ती कोठेतरी माझी वाट पहात होती.

# वहिनींचे घर

रविवारी संध्याकाळी खारला एक लग्नसमारंभ होता. तेथून परतताना गाडी वांद्र्याच्या कलानगरकडे वळविली. बरोबर सौ. होती. तिची सौ. मीना वहिनींशी बरेच दिवस भेट झाली नव्हती आणि मलाही बाळासाहेबांशी काही महत्त्वाचे बोलायचे होते. पण दुरूनच लक्षात आले की बाळासाहेब घरी नसावेत.कारण बाळासाहेब घरी असल्यावर बंगल्याभोवती जमणारी लोकांची गर्दी तेथे नव्हती. कलानगर अगदी सामसुम होते. बंगल्याच्या पटांगणात कोणी नव्हते आणि एरवी गजबजलेला ओटाही निर्मनुष्य होता. आतल्या दिवाण–खान्यात मीनावहिनी नेहमीच्या प्रसन्न मुद्रेने एकटयाच बसल्या होत्या. त्यामुळे बंगल्याला जाग नसली तरी त्याचे तेज काय़म होते. बाळासाहेब डोंबिवलीला जाणार होते ते माझ्या लक्षात राहिले नव्हते.

सार्वजनिक जीवनात पडलेला घरातील कर्ता पुरुष बाहेर गेल्या–वर आपल्या घराची त्याला आठवण रहात नाही आणि आपल्यामागे आपले घर कसे स्तब्ध बसते याची कल्पनाही येत नाही. नागपूरला आठ दिवस जाऊन आल्यावर सौ. ने मला हेच सांगितले- 'तुम्ही नसलात की घर खायला उठते. येणाऱ्या माणसांची गर्दी ओसरते आणि टेलिफोनचा खणखणाटही कमी होतो.' थोडक्यात म्हणजे मी नसतो तेव्हा ते घर माझे रहात नाही. ते वहिनींचे घर बनते. आणि माझ्या आणि त्या वहिनीच्या घरात जमीन–अस्मानाचे अंतर असते.

त्या संध्याकाळी ज्या घरात मी बसलो होतो ते घर नेहमीप्रमाणे बाळासाहेबांचे घर नव्हते तर ते वहिनींचे घर होते.अर्थात वहिनींच्या घराचा रंग वेगळा होता, रूप वेगळे होते आणि तेथे बोलले जाणारे विषयही वेगळे होते. आपले असे अनेक मित्र आणि सहकारी असतात त्यांच्या घरी आपण वरचेवर जातो. प्रत्येक घराचे एक प्रकारचे वेगळे कॅरेक्टर असते. पण ते असते आपल्या मित्राचे घर ! पण त्या घरातच वहिनींचे घर दडलेले असते. त्या घराचे दर्शन आपल्याला क्वचितच होते. त्या वहिनींच्या घरात दिवाणखान्याची जागा कमी होऊन स्वयंपाक घराची जागा वाढते. एरवी मित्राने वहिनीला मारलेल्या हाका ऐकू येत नाहीत, तर वहिनींनी नोकरांना मारलेल्या हाका कानावर येतात. अस्ताव्यस्त पडलेले कपडे वहिनींच्या घरात जागच्या जागी जाऊन बसतात. भांडी, विशेषतः काचेची, मग ती साफ असली तरी ती पुन्हा पुन्हा साफ होतात, झाडूलाही विश्रांती मिळत नाही. या वहिनीच्या घरात पुढल्या दाराच्या आतल्या कडीचे महत्त्व अकारण वाढते. पलंगावरील चादरीच्या कपाळावरील आठ्या सपाट होतात. मुलांची पुस्तके आणि वर्तमानपत्रे यांनाही स्वतःचे प्रदर्शन करण्यास वहिनीच्या घरात बंदी असते. एरव्ही भणाभणा जळणाऱ्या दिव्यांपैकी एकाच भाग्यवान दिव्याला जळण्यास परवानगी मिळते. पण मुलांना मात्र वहिनींच्या घरातील कोणत्याही कोपऱ्यात हुंदडण्याचे स्वातंत्र्य मिळते.

घरातील कर्ता पुरुष घराबाहेर पडल्यावर घर ओके ओके होऊन स्तब्ध बनते. पण वर वर स्तब्ध वाटणारे ते घर वहिनींशी मात्र गुजगोष्टी करते. कारण त्या घराच्या वेदना आणि संवेदना वहिनींना जेवढ्या जाणवतात आणि भोगाव्या लागतात तेवढ्या इतर कोणालाच भोगाव्या लागत नाहीत. कारण सारे विश्वची आमचे घर असले तरी 'आमचे घर' हे खऱ्या अर्थाने वहिनींचे घर असते, कारण ते घर हेच वहिनींचे विश्व असते. ज्यावेळी ते घर बांधले जाते त्याच वेळी त्या घरात एक वहिनी साकार होते. ते घर वहिनींचे एक स्वप्न

असते. त्या स्वप्नावर वहिनी जगत असते. त्या घरातील जमिनी तिच्या पावलांनी सारवलेल्या असतात. त्या घराच्या भिंती वहिनींच्या आसवांनी न्हालेल्या असतात. त्या घराच्या दारावर वहिनीच्या साकारलेल्या स्वप्नाची कमान असते. त्या कमानीतून आत शिरल्यावर वहिनींच्या स्वप्नांचा सुगंध दरवळत असतो आणि त्याच चौकोनात तिच्या सुखदुःखाचा चैतन्यमय संघर्ष चाललेला असतो.

चंद्राला ज्याप्रमाणे उमललेले सुर्यफूल पहाता येत नाही त्याप्रमाणे घरातल्या कर्त्या पुरुषाला या वहिनीच्या घराचा आनंद कधीच उपभोगता येत नाही. गजबजलेल्या वातावरणाचा तो शौकीन घराबाहेर पडल्यानंतर त्याचे घर स्वप्न बनले तरी वहिनीच्या सान्निध्यात ते निर्गाल्य न होता गुजगुंजन करतच रहाते याची त्याला जाणीव नसते. किंबहुना ते घर त्याच्या मागे वहिनीशी जितक्या मोकळेपणाने बोलते तेवढ्या मोकळेपणाने ते त्याच्याशी बोलत नाही. त्या वहिनींच्या बोलक्या घरात मी त्या दिवशी बऱ्याच वर्षांनी प्रवेश केला. होय, बऱ्याच वर्षांनी. बाळासाहेबांच्या घरी मी वरचेवर जातो. पण त्या वहिनींच्या घरी मी बऱ्याच वर्षांनी गेलो. १९६९ च्या फेब्रुवारीत मी वहिनींच्या घरी गेलो होतो. त्यावेळीही बाळासाहेब असेच बाहेर गेले होते. पण ते परत केव्हा येणार याची खात्री नव्हती. बेळगावच्या आंदोलनानंतर त्यांना येरवड्याच्या तुरुंगात बंदिस्त करण्यात आले होते. मी बाहेरच होतो. काही काळ भूमिगत होतो. पण बाहेरील वातावरणातील तणाव इतका होता की यापेक्षा तुरुंगात गेलो असतो तर बरे झाले असते असे वाटू लागले. त्यावेळी वहिनींच्या घरात प्रवेश केल्यानंतर काय बोलावे ते सुचत नसे. पण तरीही मन खंबीर होते. कारण त्या घरात आणखी एक व्यक्ती आम्हाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करत होती. प्रबोधनकारांनी धीरोदात्तपणे ते घर सांभाळले होते. पण तरीही खरी कसोटी वहिनींची होती. 'सांभाळून घेणे' हा ज्याप्रमाणे बाळासाहेबांचा गुण आहे त्याप्रमाणे 'सहन करणे' हा वहिनींचा स्थायीभाव आहे. त्यावेळी पाणावल्या डोळ्यांच्या कडा आमच्यापासून लपवत वहिनीच आम्हाला धीर देत राहिल्या.

पण–

–पण प्रत्येक वहिनींच्या घरात असलेली विसंगती येथेही होती. साहेबांचे घर हे राजकारण्यांचे घर होते. पण वहिनींच्या घरात राजकारणाला वाव नव्हता. वहिनींना राजकारण समजत नव्हते. ते त्यांनी कधी जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. तो त्यांचा पिंड नव्हता. साहेबांनी त्यांचे राजकारण करावे आणि मी माझा संसार चालवावा या कर्तव्यभावनेने वागणाऱ्या वहिनींना बाळासाहेबांच्या अटकेचा अन्वयार्थ लावता येत नव्हता. आम्हीही सारे भांबावलो होतो. काय करावे ते सुचत नव्हते. त्यावेळी वहिनींचे घर हाच आमचा एकमेव दिलासा होता. त्या घरात आम्ही वहिनींना धीर देण्यासाठी जात असू आणि वहिनीच आम्हाला धीर देत असत. ते दिवस मी विसरणार नाही. त्यावेळीच मला जाणीव झाली की प्रत्येक घरात असे एक वहिनींचे घर असते. ते घरच खरे घर असते ते घर सुखदुःखाने भरलेले असते. ते घर भावनाप्रधान असते. ते घर बोलके असते. ते फक्त वहिनींशीच बोलते कारण–

कारण वहिनी ही त्या घरातील एकमेव लक्ष्मी असते–

# चेहरा

परवा माझ्याकडे एक गृहस्थ तक्रार घेऊन आले. तक्रार अगदी साधी होती. त्यांच्या घरामागील गटार तुंबलेले होते. मी त्यांना ते दुसऱ्या दिवशी सकाळी साफ करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी मला ते बरेच दिवस तुंबलेले असल्याचे सांगितले. मी पुन्हा तेच आश्वासन दिले तरी ते गृहस्थ, त्यांचे नाव आठवले होते हे आता आठवले, माझ्याकडे एखाद्या चित्राप्रमाणे पहात राहिले. मी काय सांगितले हे त्यांना समजले नसावे असे वाटून मी पुन्हा तेच सांगितले. तरीही त्यांच्या चेहऱ्यावर समजल्याची रेषा उमटेना. मी थोडा वैतागून, 'अहो मी काय सांगतो हे समजलं का ?' असे विचारले. तरीही आठवले जागेवरून हलेनात आणि चेहराही बदलेनात. शेवटी एका कार्यकर्त्यांनी पण थोडे बळे बळेच त्यांची समजूत घालून त्यांना त्या गर्दीतून उठवले. ही अशी बिनचेहऱ्याची माणसं भेटली की सगळा दिवस खराब होतो. मला बडबडणारी, हसणारी, चिडणारी आणि रडणारीही माणसं आवडतात. पण काही माणसं अशी असतात की त्यांच्या चेहऱ्यावर कधी फरकच पडत नाही.

गेल्या महिन्यात पुण्यात केसरीच्या गायकवाडवाड्यात मी एक व्याख्यान दिले. व्याख्यानाला खूप गर्दी होती. प्रतिसाद पण चांगला होता. सर्व गर्दीत दुसऱ्या तिसऱ्या रांगेत भव्य कपाळ असलेला एक गोऱ्या रंगाचा साठीच्या आत असलेला श्रोता बसला होता सर्व व्याख्यानभर त्या एकट्यांनी माझे लक्ष वेधून घेतले. कारण एखाद्या पुतळ्यासारखा स्तब्ध राहून तो माझे व्याख्यान ऐकत होता. पण

त्याच्या चेहऱ्यावर रेषा उमटायला तयार नव्हती. इतकेच नव्हे तर तो डोळ्यांची उघडझापही करायला तयार नव्हता. मी त्याच्याकडून एकतरी हशा किंवा टाळचा मिळविण्यासाठी दीड तास जिद्दीने बोललो, पण अखेरपर्यंत त्या पठ्ठ्याने हालचाल केली नाही.

चेहरा आणि अंगठा या परमेश्वराने निर्माण केलेल्या दोन विलक्षण किमया आहेत. जगाची लोकसंख्या किती कोटी आहे याची मला कल्पना नाही, पण कोणत्याही दोन व्यक्तींचे चेहरे परस्परांशी जुळत नाहीत हा एक अफाट चमत्कार आहे, अनेकदा कोणत्यातरी दोन व्यक्ती सारख्याच दिसतात असे आपण म्हणतो. पण ते खरे नसते. कोणत्याही दोन व्यक्तींचे चेहरे, मग ते सख्खे जुळे भाऊ असले तरी त्यात फरक हा असतोच. चेहरा राहू द्या पण माणसाच्या अवघ्या एक इंच असलेल्या अंगठ्याच्या टोकाचे गूढ मानवी शक्तीच्या पलिकडे राहिले आहे. इवलासा तो अंगठा पण दोन अंगठ्यांवरील रेषा परस्परांशी कधीच जुळत नाहीत. करोडो व्यक्तींच्या इवल्याशा अंगठ्यावरील रेषांच्या भिन्नतेमुळे गणितशास्त्रही कोलमडून त्यातून एक नवीन शास्त्र उदयाला आले. त्या शास्त्रानेच जगातील गुन्हेगारीचा शस्त्रापेक्षाही प्रभावीपणे बळी घेतला. आज कोणत्याही गुन्हेगाराचा शोध लावण्यासाठी चेहरा आणि अंगठा एक प्रभावी माध्यम झाले आहे. चेहऱ्यातील भिन्नता ओळख परेडने जाणली जाते आणि अंगठ्याच्या ठशावरून गुन्हेगार ओळखला जातो. त्याला कायद्यात देखील मान्यता मिळाल्याने केवळ अंगठ्याच्या ठशावरून जगातील अनेक गुन्हेगार फासावर जातात.

चेहरा हा विषय माझ्या दृष्टीने माणसाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा विषय आहे. माणसाचे सर्व काही चेहऱ्यावर असते.चेहऱ्या वरून माणसं ओळखली जातात पण त्याचप्रमाणे अनेकदा चेहऱ्यामुळे माणसाविषयी गैरसमजही होतात. एखादा रुक्ष चेहऱ्याचा माणूस प्रत्यक्षात विनोदी असतो. पु. ल. देशपांडेसारखा चेहऱ्यावर बावळट रेषा असलेला गुळाचा गणपती प्रत्यक्षात मात्र अत्यंत बुद्धिमान आणि प्रतिभाशाली असतो. निळूभाऊ खाडिलकरांच्या चेहऱ्याकडे पाहिल्या-

वर हा माणूस नवाकाळमधून खाडिलकरांची महान परंपरा नवाकाळद्वारे यशस्वीरीत्या चालवतोय यावर कोणाचा विश्वास बसणार नाही आणि विश्वनाथराव वाबळेंच्याकडे पाहिल्यावर ते 'शिवनेर' नावाने छोटे सायंदैनिक चालवतात हे खरे वाटणार नाही. चेहऱ्याकडे पाहिल्यावर निळू फुले आणि सुहास भालेकर हे अभिनेते असतील असे वाटणार नाही. तसा चेहरा आणि स्वभाव यांचा परस्परांशी काही संबंध नसतो हे ज्या दिवशी दत्ताजी साळवी भेटले त्याच दिवशी मला समजले आणि माणसे चेहऱ्यावर दिसतात तशी बिलंदर नसतात हे मोहन सावंत भेटल्यावर कळले. सैन्यातील एखाद्या कॅप्टनसारखे दिसणारे अमरनाथ पाटील बोलायला फार मृदु आहेत आणि चेहऱ्यावरून मिष्किल दिसणारे शरद आचार्य एकदा बोलायला लागले की काहीच शिल्लक ठेवत नाहीत.

चेहऱ्यावर माणसाचे जीवन आधारित असते. प्रत्येक मुलाला सुंदर चेहऱ्याची मुलगी पाहिजे असते आणि प्रत्येक मुलीला सुंदर चेहऱ्याचा मुलगा पाहिजे असतो. मुलीचा चेहरा सुंदर असल्यास तिचे डोके रिकामे असले तरी ती लग्नाच्या बाजारात खपून जाते. चेहरा हा मनुष्यजन्मानंतर उपस्थित होणारा दुसरा प्रश्न असतो. मूल जन्माला आले की पहिला प्रश्न विचारला जातो, 'काय झालं ?' मुलगा किंवा मुलगी कळल्यावर कोणासारखा दिसतो किंवा दिसते, हा दुसरा प्रश्न आतुरतेने विचारला जातो. मुलगी असली तर आईच्या वळणावर गेली आणि मुलगा असला तर वापासारखा दिसतो हे म्हणण्याची एक फॅशन पडून गेली आहे. नाहीतर त्या मुलाचा चार इंचाचा चेहरा कोणासारखा तरी खरोखरच दिसत असेल असे मला तरी वाटत नाही.

या चेहऱ्यावरून प्रगत झालेले दुसरे एक शास्त्र म्हणजे रेखाचित्र. पोलिसांचे मोडस ऑपरेंडी ब्यूरो नावाचे एक खाते आहे. त्यात गुन्हेगारांचे हजारो फोटो आहेत. त्यापैकी एखादा फोटो ओळखल्यास आरोपीला पकडता येते. जर त्यात फोटो आढळला नाही तर पोलिसांचे आर्टिस्ट फिर्यादीने केलेल्या वर्णनावरून आरोपीचा शोध लाव-

तात. पोलिसांच्या प्रमाणेच कवींना देखील चेहऱ्याचें महत्व पटले आहे. कारण अनेक कवींच्या कविता माणसाच्या चेहऱ्याला वाहिलेल्या असतात. अनेक कवींनी तर चेहऱ्यावरील एकेका अवयवावर काव्य केले आहे. कोणी डोळे निवडले, तर कोणी गाल निवडले, कोणी कपाळावर भाळला तर कोणी ओठावर कडवी लिहिली. जीवनात चेहऱ्याला इतके महत्त्व आहे की अनेक महिला आपल्या बजेटपैकी अर्धा खर्च सौंदर्यप्रसाधनावर करतात. माणसाचा चेहरा बदलण्याचा नवा शोध लागला असून तो जाहीर होताच या देशातील बहुसंख्य तरुण अमिताभ बच्चनसारखे आणि तरुणी हेमा मालिनीसारख्या दिसू लागतील.

चेहऱ्यातील साम्यामुळे घोटाळेही अनेक होतात. आमच्या वाडीत दोन जुळे भाऊ आहेत. त्यांच्यात बराच सारखेपणा आहे. माझा मावसभाऊ एकदा मला म्हणाला, 'अरे तुमच्या वाडीत तो समेळ आहे ना, तो सकाळी नऊ वाजता बसच्या लाइनीत उभा असतो आणि पुन्हा दहा वाजता त्याच रांगेत उभा राहतो, ते दोघे जुळे भाऊ आहेत हे सांगितल्यावर त्याचे कोडे उलगडले. मनोहर जोशींचा एक भाऊ हुबेहूब मनोहरसारखा दिसतो. मनोहर तुरुंगात असताना तो एकदा कॉर्पोरेशनमध्ये आला आणि एकच खळबळ उडाली. तुरुंगातसुद्धा खरोखरच मनोहर जोशी गेले होते की त्यांचा भाऊ डुप्लीकेट म्हणून येरवड्यात होता याबद्दल अद्यापही माझ्या मनात शंका आहे. तसेच पोलिसांमध्ये अवस्थी नावाचे दोन हुबेहूब दिसणारे इन्स्पेक्टर जुळे बंधू आहेत. त्यातील सारखेपणामुळे ते अनेकदा एकमेकाला ओळखू शकत नाहीत. दोघेही इतके वल्ली आहेत की ते परस्परांच्या ड्यूटीवर सोयीप्रमाणे गेले तरी रिबेरोंनाही कळणार नाही. त्यांच्याविषयी अधिक न लिहिता येथेच आटोपते घेतो. नाहीतर बदनामीच्या एका आरोपाबद्दल मला दोनदा अटक होऊन शिक्षाही दोनदा भोगावी लागेल.

# पोपट

या जगाच्या पाठीवरील गर्दीत अनेक महात्मे वावरत असतात. मात्र त्या महात्म्यांचं दर्शन होण्यासाठी तसाच योग यावा लागतो. ते महात्म्य प्राप्त करण्यासाठी अंगावर भगवी वस्त्रे परिधान करून देव-धर्मांचा डंका पिटायलाच हवा असेही नव्हे. काही काही सामान्य माणसेही सहजतेने अद्वितीय कार्य करत असतात. त्यांच्या कार्याचा मोठेपणा जाणवण्यासाठी आपल्याला दृष्टीही तशीच असावी लागते. माझ्या जीवनाच्या पूर्वार्धात साने गुरुजींपासून ते प्रा. सी. बी. जोशी-पर्यंत अशी अनेक माणसे आली की ती माझ्या जीवनाला कायमचा स्पर्श करून गेली. असे महापुरुष आपापल्या क्षेत्रात महान कामगिरी करत असतात. पण अनेकदा दुसऱ्या क्षेत्रातल्या माणसांना त्याची जाणीवही नसते. त्यामुळे संजीवनी देणाऱ्या धन्वंतरीची ओळख वकिलाला नसते आणि गरिबांची सेवा करणाऱ्या वकिलाला प्राध्यापक ओळखत नाहीत. दुर्दैवाने आजकाल प्रत्येक माणूस स्वत:लाच इतका मोठा समजत असतो की दुसऱ्या क्षेत्रातील मोठी माणसे हेरण्याचा कोणी प्रयत्नच करत नाही.

गेल्या आठवड्यात मी दोन दिवस दिल्लीला गेलो होतो. आपल्या महापालिकेचे माजी कमिशनर श्री. बी. जे. देशमुख हे केन्द्र सरकारच्या मजूर मंत्रालयातील सचिव पदाच्या महत्त्वाच्या हुद्यावर आहेत. त्यांच्याकडे माझे काम होते. दुपारी दहा मिनिटाचे काम आटोपले आणि मी मोकळा झालो. विमान दुसऱ्या दिवशीचे असल्याने सबंध दिवस मी मोकळाच होतो. तशी दिल्लीत माझी अनेक खासदार

आणि मंत्रीमंडळी परिचयाची आहेत. पण मी कधीच कोणाकडे शिळोप्याच्या गप्पा मारायला जात नाही. म्हणून मी हिंडत हिंडत कॅनॉट सर्कसच्या वर्तुळात आलो. तेथील रिव्होली सिनेमात 'मशाल' चित्रपट लागला होता. मला तो पहायचा होता. दीड वाजला होता. आणि दुर्दैवाने चित्रपट बाराला सुरू झाला होता. मुंबईत वेळ कसा जातो हे समजत नाही. आणि अशा वेळी वेळ कसा घालवावा हा प्रश्न पडतो. दुपारची वेळ होती तरी दिल्लीत मरणाची थंडी पडली होती. रस्त्यातील त्या गर्दीत मी सोडल्यास बाकी सर्वांनी गरम कपडे घातले होते. मी ऊब येण्यासाठी तिखट भेळ खाल्ली आणि थिएटरच्याच बाजूला फुटपाथवर उन्हात उभा राहिलो. इतक्यात थोड्याच अंतरावर जमलेल्या गर्दीकडे माझे लक्ष गेले. मीही त्या घोळक्यात शिरलो, पण विशेष काही नव्हते. वीस- पंचवीस पिंजऱ्यांचा झुपका घेऊन एक माणूस फुटपाथवर उभा होता. प्रत्येक पिंजऱ्यात एकेक पोपट होता. दिल्लीस त्या मानाने पोपट कमी असल्याने तेथे थोडी माणसे जमली होती. इतक्यात–

–– इतक्यात रिक्षातून एक थोडे वयस्कर गृहस्थ लेंगा आणि झब्बा परिधान करून तेथे आले. रिक्षातून खाली उतरल्यावर क्षणभर त्यांनी त्या गर्दीकडे पाहिले. कोणाचेही लक्ष वेधले जाईल असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या गळ्यात सोन्याची माळ, हातात दोन अंगठ्या आणि चष्म्याची फ्रेमही सोन्याची होती. दुसऱ्या क्षणाला ते त्या गर्दीत मिसळले आणि त्यांचा पोपट विक्रेत्याशी वाद सुरू झाला. प्रथम त्या वादाकडे माझे लक्ष नव्हते. पण गर्दीतील सर्वांच्या नजरा त्यांच्याकडे रोखल्यानंतर माझ्या लक्षात आले की तो गृहस्थ म्हणजे खरोखरीच एक महात्मा होता. कोणत्याही जिवंत प्राण्याचे परमेश्वराने दिलेले शरीर अशा प्रकारे पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवणे हा अमानुषपणा असल्याचे तो त्याला पटवीत होता. शिक्षेसाठीसुद्धा माणसाला तुरुंगात डांबून ठेवणे अन्यायाचे आहे, असेही त्या महात्म्याचे मत होते. त्याचे ते तत्त्वज्ञान आम्हाला पटून पिंजऱ्यातील त्या पोपटांची सर्वांना दया आली. पण पोपटवाला मात्र ते तत्त्वज्ञान ऐक-

ण्यास तयार नव्हता. कारण पोपट विकणे हा त्याचा धंदा होता. त्या-वर त्याचे पोट होते. पण तो धर्मात्मा इरेस पेटला होता. त्यांनी जिद्द केली आणि खिशातले पाकीट काढून त्यातील होत्या नव्हत्या त्या नोटा पोपटवाल्याकडे फेकल्या. त्या किती होत्या मला कळले नाही. पण त्या हाती येताच त्या भूतदयावादी माणसाच्या उपदेशानुसार एकेका पिंजऱ्याचे दार उघडून त्यातील पोपट हवेत उडविण्यास सुरु-वात केली. बंदीवासातून सुटलेले ते पोपट आनंदाने या झाडावरून त्या इमारतीवर आणि पाहता पाहता चित्रविचित्र आवाज काढत आभाळात उडून गेले.

त्या वेळचे ते वातावरण वर्णनापलिकडचे होते. त्या गर्दीच्या अंगावर रोमांच उभे राहिले. लोकांनी प्रत्येक पोपटाच्या सुटकेच्या क्षणी आनंदाने टाळ्या वाजवण्यास सुरुवात केली. त्या आसमंतातील वातावरण भारावल्यासारखे झाले. प्राणीमात्रांचा तो दयावंत रिक्षाला टेकून ते दृश्य शांतपणे पाहात होता. कुतुहलाने त्याच्या भोवतीही गर्दी जमली होती. हिशेब चुकता झाला. आणि तरीही सात–आठ पोपट बंदिस्तच राहिले. माझ्या बाजूस पांढरी शुभ्र साडी परिधान केलेली एक सिंधी प्रौढा होती. तिने हाताच्या रुमालाची गाठ सोडली आणि दहा व शिवाय काही एक–दोन रुपयांच्या नोटा त्या पोपटवाल्याच्या हाती देऊन सांगितले, 'हमारे नामसेभी एक पंछी छोडो.' पोपट-वाल्याने दहाची नोट ठेवून बाकीच्या नोटा परत केल्या आणि म्हणाला 'हमेभी थोडा धरम करने दो,' आणि त्याने त्या प्रौढेच्या नावे एक पोपट सोडला. मी ते दृश्य पाहून अक्षरशः वेडा झालो. माझ्या आयु-ष्यात मी तसे मंतरलेले वातावरण पाहिले नव्हते. क्षणार्धात मी दहा रुपयाची नोट काढली आणि आणखी एक बंदिवान निष्पाप जीव मुक्त झाला. त्या पुण्याच्या आनंदाने माझ्या डोळ्यात आसवें तरळली. क्षणभर वाटले, जावे आणि त्या माणसाच्या पायाला स्पर्श करावा. अशी माणसे या जगात फार थोडी राहिली आहेत. जेथे माणसाला माणसाच्या स्वातंत्र्याचे मोल उरले नाही तेथे मुक्या प्राण्यांच्या स्वातं-त्र्याची कदर कोणाला ?

काही क्षण मी स्वतःला हरवून बसलो होतो. भारावून मी त्या साधू पुरुषाशी हस्तांदोलन केले आणि तेवढ्यात माझ्यातील लेखक जागा झाला. मला ते क्षण टिपावेसे वाटले. ती दुपार साठवावीशी वाटली. वेड्यासारखा मी कॅनॉट सर्कसच्या फुटपाथवरून पालिका मार्केटच्या दिशेने धावत सुटलो. मला त्या क्षणाचे छायाचित्र हवे होते. पडेल ती किंमत देऊन मला स्टुडिओतील फोटोग्राफर हवा होता. मी या टोकापासून त्या टोकापर्यंत धावलो. पण माझ्या दुर्दैवाने एकही स्टुडिओ त्या परिसरात आढळला नाही. मनाला खूप चुटपुट लागली. त्याच वेगानं माघारी आलो. पण एव्हाना सारे पोपट मुक्त झाले होते. भूतदयेने भारावून लोकांनीच पैसे देऊन त्यांची सुटका केली होती. बाजूच्या इमारतीच्या कमानीवर नुकताच मुक्त झालेला पोपट स्वातंत्र्याच्या आनंदाने ओरडत होता. त्याचे ते ओरडणे मला 'प्रमोद प्रमोद' असा भास करून देत होते. मला उगीचच तसे वाटले असावे पण तो खरंच 'प्रमोद प्रमोद' च ओरडत असावा. कदाचित मी मुक्त केलेलाच तो पोपट असावा. तो कृतज्ञतेने मला साद घालत होता. आणि मी त्याच्याकडे डोळ्यांत प्राण आणून पाहात होतो. पोपटवाला निघून गेला होता. तो भूतदयावादी धर्मात्माही पुण्याचे गाठोडे घेऊन आपल्या वाटेने गेला होता. कॅनॉट सर्कसमधील रहदारी नेहमीप्रमाणेच चालू झाली होती. पण त्या गर्दीतही तो पोपट हेच माझे विश्व बनला होता.

मी त्याच भारावलेल्या स्थितीत बाजूच्या क्वालिटी हॉटेलात गेलो आणि फक्त सूप घेऊन बाहेर आलो. हॉटेलच्या बाजूला आईस्क्रीम पार्लर आहे. तेथे आईस्क्रीमचा कोन घेतला. पोपटांच्या स्वातंत्र्याचा सोहळा तेथेच बाजूला अर्ध्या तासापूर्वी झाला होता. असे काही घडले की माणसाला त्याबद्दर बोलावेसे वाटते, सर्वांना ते सांगावेसे वाटते, म्हणून मी त्या अनोळखी आईस्क्रीमवाल्याकडेच माझ्या भावनांना वाट करून देण्यासाठी म्हणालो, 'भाईसाब हमने पुरी दुनिया देखी है. लंडन, पॅरिस, अरबस्तान भी देखा. मगर ऐसा भला आदमी हमे दुनियामें नहीं मिला.'

माझे ते उद्‌गार ऐकून तो आईस्क्रीमवाला थोडा मिस्कील हसला आणि म्हणाला, 'साब वह तो दुनियाको झुकानेवाला चारसौ बीस आदमी है. दो चार महिनेमें कभी कभी इधर उधर आता है और यह नाटक करता है. लोगोंको फसाके पैसा लेता है और छुटे हुए सब पोपट वापस सालेके मकानमें जाते है. वह सब उनकाही पाला हुआ है. उधरही अकबररोडके पिछाडीमें उसका मकान है. आपको मैंने पैसे देते हुए देखा. मगर हमे क्या ? हमारे धंदेसे मतलब.'

त्याचे ते उद्‌गार ऐकताच हातातील आईस्क्रीमने देखील मला माझा हात भाजल्यासारखा वाटला. पायाखालच्या धरणीने दुभंगून आपल्याला पोटात घ्यावे असे वाटले, तापलेल्या कानशिलाने मी रस्ता ओलांडला. पण तरीही तो वरचा पोपट मला हाका मारतच होता. प्रमोद–प्रमोद, प्रमोद, प्रमोद– त्याक्षणी मलाच कोणीतरी पोपटाच्या पिंजऱ्यात बंद केल्यासारखे वाटले. प्रमोद–प्रमोद, प्रमोद–प्रमोद–––

# सत्कार

स्वभाव या विषयावर अद्याप कोणीच कसा प्रबन्ध लिहिला नाही याचे मला आश्चर्य वाटते. बाळासाहेबांच्या सांगण्यावरून चार वर्षांपूर्वी सहज म्हणून मी आठवड्याच्या आठवणी हे सदर सुरू केले. कोणतेही सदर सुरू करणे सोपे असते. त्यातूनही आठवणीसारखे कोणताही विषय नसताना दर आठवड्याला सदर लिहिणे म्हणजे जवळ जवळ अशक्य गोष्ट होती. वर्षभर लिहून मग मी हे सदर विषय संपले म्हणून बन्द करेन असा विचार केला होता. पण या आठवणींनी मला वेगळीच दृष्टी दिली. हे सदर लिहिण्या-पूर्वी तशी मी अनेक सदरे लिहिली आहेत. नवशक्तीतील महिलांचे सदरही मी काही काळ चालविले. त्याचप्रमाणे कोकणमित्रचा संपादक म्हणून त्यातही लिहीत होतो. आज ग. का. रायकरांच्या दीप-लक्ष्मीत बेधडक हे सदर लिहितो आहे आणि लवकरच पुण्याच्या केसरीत एक सदर सुरू करणार आहे. पण हें सर्व लिखाण प्रसंग-निष्ठ असल्याने मी केवळ हिंडत राहिलो. पण आठवणी हे सदर व्यक्तिनिष्ठ असल्याने समोर येणारी प्रत्येक व्यक्ती आणि तिचा स्वभाव माझ्या आठवणीत कोठे बसेल हे मी शोधण्याचा प्रयत्न करू लागलो आणि त्यातून मला फार मोठे भांडार सापडले आणि मी आठवणीमागून आठवणी लिहीत राहिलो.

गेल्या आठवड्यात असेच एक आदरणीय गृहस्थ मला भेटण्यास आले. त्यांची इच्छा अशी होती की त्यांच्या वयाला लवकरच साठ वर्षे पुरी होत असल्याने मी लोकसत्तातून त्यांचे माझ्या नावे जाहीर

अभिनंदन करावे. त्यावद्दलचा जाहिरातीचा खर्च अर्थातच ते करणार होते. इतकेच नव्हे तर त्यांनी आणखी एक विलक्षण इच्छा प्रकट केली, त्यांनी सांगितले की ते आणखी एका पहिल्या पानावरील जाहिरातीचे पैसे आणि त्यांच्या फोटोचा ब्लॉक माझ्याकडे पाठवून देतील. त्यांच्या मृत्यूनंतरही मी त्यांना वर्तमानपत्रातून फोटोसहित जाहिरात देऊन श्रद्धांजली वहावी अशी त्यांची इच्छा होती. मी ते ऐकून अवाक झालो. बोलूच शकलो नाही. ही आठवण लिहीत असताना त्यांचा ब्लॉक आणि साडेसहाशे रुपयांचे पाकीट माझ्या टेबलावर आहे.

या स्वभावाची माणसे जगाच्या पाठीवर अनेक आहेत. कऱ्हेचे पाणी या पुस्तकाचे प्रकाशन करत असताना आचार्य अत्र्यांनी एकामागून एक 'हे मी केले, ते मी केले' अशी वाक्ये उच्चारून स्वत:ची वारेमाप स्तुती केली. आणि शेवटी अत्रे म्हणाले, 'वास्तविक पहाता माझे हे महान कार्य इतरांनी सांगायला पाहिजे. पण इतर कुणी सांगत नाही म्हणून मीच सांगतो' आणि प्रचंड हशा पिकला. ही गोष्ट हसण्यासारखी आहे. पण रडतानाही माणूस आपला स्वभाव बाजूला ठेवत नाही. आमच्यासमोर एक देवताळे नावाचे गृहस्थ होते ते वारले तेव्हा त्यांच्या मुलांनीच भुलेश्वरला जाऊन वीस जाडे जाडे हार आणले आणि आलेल्या लोकांना त्याच्या मेव्हण्याकरवी हळूहळू वाटले. सगळ्यांना झक मारत देवताळेंना पुष्पांजली वाहायला लागली. मलाही ते करावे लागले. पण देवताळे अद्याप गावात सांगत असतात की, त्यांचे वडील गेले तेव्हा लोकांनी हार घातले. आमदार नवलकर देखील हार घेऊन आले होते.

शिवसेनेच्या समारंभात बाळासाहेबांना जेव्हा हारामागून हार पडतात तेव्हा मला आठवण होते, एका साहित्यिकांच्या सत्काराची. तो सत्कार सुरे विठ्ठल सभागृहात मीच आयोजित केला होता. समारंभापूर्वी एक माळी हारांनी भरलेली टोपली घेऊन आला. सत्कारापूर्वी अर्धा तास अगोदरच तें आले. त्यांनी माझ्या हातात एक संस्थांची यादी दिली. जवळ जवळ सोळा-सतरा संस्था होत्या. त्या संस्थांच्या

नावाने कोणीतरी त्या टोपलीतील एकेक हार त्यांना घालावा अशी त्यांनी मला सूचना दिली. मी त्यांना म्हटले की, 'या गोष्टीला त्या त्या संस्थांची संमती नसेल तर उद्या अडचण निर्माण होईल. त्यावर त्यांनी मला डोळे मिचकावत सांगितले, 'तसे होणार नाही. कारण या नांवाच्या संस्थांच अस्तित्वात नाहीत' त्या सत्काराचा वृत्तांत दुसऱ्या दिवशी नवा काळमध्ये आला होता. त्यात काहीच चुकीचे नव्हते. कारण अनेक संस्थांच्या नावाला 'अखिल भारतीय' या नांवाने सुरुवात होत होती.

या सगळ्या गोष्टीमुळे मला चौधरींच्या पारड्याची आठवण झाली. दादरला चौधरी नावाचे एक वृद्ध गृहस्थ होते. त्यांच्या काळांत त्यांनी भरपूर समाजसेवा केली असा त्यांचा दावा होता. बोलताना के. सी. बोल्यांचे नांव ते नेहमी घ्यायचे. 'त्या' काळात चौधरींच्या शिवाय दादरमधीलपान हालत नसे असे ते सर्वांना सांगत. कॅडेल रोडच्या समुद्राव्यतिरिक्त दादरमधील सर्व काही चौधरींच्या प्रयत्नाने झाले हेही चौधरी सांगत असत. १९५८ सालापर्यंत दादरमध्ये निवडणुकीत कोणीही उमेदवार उभा राहिला की हमखास निवडून येणाऱ्या उमेदवारांच्या नांवे चौधरी एक पत्रक काढायचे. त्या पत्रकाची भाषा अशी असायची की जणू रोममधील नागरिक ज्याप्रमाणे पोपला मानतात त्याप्रमाणे दादरची जनता मतदानासाठी चौधरींच्या आदेशाची वाट पहात आहे. पत्रक काढल्यानंतर चौधरी वर्तमानपत्राकडे, 'चौधरींनी पाठिंबा दिल्याने अमुक अमुक यांचे पारडे जड झाले' अशी बातमी पाठवायला विसरत नसत. इतकेच नव्हे तर तो उमेदवार निवडून आल्यावर चौधरींनी दादरमधील कोणत्या तरी गच्चीत स्वतःचाच छोटासा सत्कार घडवून आणला. १९५८च्या निवडणुकीत त्यांनी सौ. शांताबाई जोशींना पाठिंबा देणारे पत्रक काढल्याचे मला आठवते. पण शांताबाई पराभूत झाल्या. त्यानंतर चौधरींनी पत्रक काढल्याचे आठवत नाही पण त्या शेवटच्या पत्रकाचा हेतू असफल झाल्याने त्याच्या छपाईचे बील चौधरींनी शांताबाईंच्याकडे पाठविले.

मी ज्या कंपनीत नोकरी करतो त्या कंपनीतील एक जुनी गोष्ट. राजाराम नावाचा दप्तरी आम्हाला सांगायचा जी. टी. खात्यात एक हेड क्लार्क होते. ते गिरगावातील गोरेगावकर चाळीत रहायचे. वाडीतील सगळ्यांना त्यांनी आपण मॅकीनॉनमध्ये मोठे साहेब आहोत म्हणून सांगितले होते. त्यावेळी युरोपियन साहेब असल्याने साहेब म्हटले म्हणजे मोठा मान होता. आता स्वतःचा साहेबीपणा गोरेगावकर लेनमधील चाळकरांना त्यांनी पटवून दिला होता. कारण दर शनिवारी हेडक्लार्कची स्वारी उघड्या घोडागाडीतून गोरेगावकर लेनमध्ये पहिल्या वळणापर्यंत जायची त्यावेळी साहेबांच्या डाव्या हातावर एक हार असे आणि घोडागाडीच्या दोन सीटसमध्ये फळांची करंडी असे. साहेबांचा शीपर लोक वरचेवर असा सत्कार करतात हे गोरेगावकरवाडीतील लोकांना पटले होते. ही बातमी राजारामच्या कानावर त्याच्या तेथील दोस्तांकडून आली. तेव्हा एका शनिवारी राजारामने 'साहेबां'च्यावर पाळत ठेवली. ते शनिवारी ' एन ' रूट पकडून क्रॉफर्ड मार्केटला गेले. तेथे त्यांनी प्रथम हार आणि थोडी फळे घेतली. नंतर एका रिकाम्या करंडीत ती फळे आणि गवत भरले. नंतर ती स्वारी घोडागाडीत बसली आणि हातावर हार टाकून रुबाबात गोरेगावकर लेनच्या नाक्यावर उतरली. वाडीतील लोक गॅलऱ्या गॅलऱ्यातून त्यांच्याकडे अदबीने पाहात होते. राजारामला समोर पाहिल्यावर मात्र त्यांचा चेहरा हार घालून फोटो काढण्यासारखा झाला.

अशी ही माणसे अधून मधून भेटतात आणि करमणूक करतात. पण आता टेंबलावरील ब्लॉक आणि साडेसहाशे रुपये माझ्या टेबलावर असल्याने त्या आदरणीय गृहस्थांना श्रद्धांजली वाहण्याची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली आहे. शिवसैनिकांना हात जोडून विनंती एवढीच की त्या सद्गृहस्थांच्या अगोदरच माझे काही बरे वाईट झाले तर..

..तर हे साडेसहाशे रुपये घ्या आणि श्रीकांतकडून ब्लॉक घेऊन मला श्रद्धांजली वहायला विसरू नका ! फक्त ते मी दिलेल्या पैशाने

झालंय हे कोणाला सांगू नका..धन्यवाद !

# बडबड

मी परवा एका सभेला गेलो होतो. तिथून दुसऱ्या कामाला जायचे होते. अगोदरच वेळ झाला होता. पण माझ्या अगोदरचा वक्ता काही केल्या खाली बसेना. अखेर तो भाषणाचा समारोप करता करता म्हणाला, 'मी आपला फार वेळ घेत नाही. विद्यार्थी विकास मंडळाने मला बोलायला संधी दिली त्याबद्दल मी मंडळाचे आभार मानून आपली रजा घेतो!' श्रोते भाषण संपले म्हणून उत्साहाने टाळ्या बाजवणार इतक्यात तो वक्ता पुढे म्हणाला, 'पण रजा घेण्यापूर्वी मला एक गोष्ट सांगितलीच पाहिजे आणि ती म्हणजे शिस्तीने वागले तरच विद्यार्थ्यांचा विकास होईल. शिस्त ही जीवनाचा..' वगैरे वगैरे. शिस्त या विषयावर तो वक्ता आणखी सहा मिनिटे बोलला. त्या वाढीव भाषणाचा समारोप करताना तो म्हणाला, 'सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देऊन मी माझ्या भाषणाचा समारोप करतो.' टाळ्यांचा अत्यानंदाने कडकडाट होणार इतक्यात पुन्हा त्या वक्त्याने उचल खाल्ली आणि तो म्हणाला, भाषणाचा समारोप म्हणजे कार्याचा समारोप नव्हे, अनेक संस्थांच्या कार्याचा उद्घाटनाच्या दिवशीच समारोप होतो. तसे आपले होता कामा नये–वगैरे वगैरे–म्हणून मी असे ठरविले आहे की ....' त्याचे भाषण आणखी सुमारे पाच-सहा मिनिटे चालले. माझ्या एक गोष्ट लगेच लक्षात आली की प्रयत्न करूनही त्या वक्त्याला ब्रेक सुटलेल्या गाडीप्रमाणे भाषण थांबवणे जमत नव्हते. शेवटी न रहावून मीच त्याच्या सहाय्याला जाण्याचे ठरविले. मी उभा राहून त्याचाच माईक हाती घेऊन म्हणालो,

'इतक्या सुंदर भाषणाचा समारोप व्हावा असे मला वाटत नाही,' आणि मी माझ्या भाषणाला सुरुवात केली. श्रोत्यांनी गुदमरलेल्या टाळ्या मोकळ्या केल्या.

अशी ही वायफळ बोलणारी माणसे अलिकडे एवढी भेटतात, आणि इतकी छळतात की उद्या जर मला कोणी अर्थमंत्री केले तर मी पहिला कर या लोकांच्या बोलण्यावर बसवेन. या देशातील लोक वायफळ बोलण्यावर जेवढा वेळ आणि शक्ती खर्च करतात, तसा प्रकार इतर कोणत्याही देशात घडत नसेल. परदेशातील बाजारात जेवढी शांतता असते तेवढी शांतताही या शहराच्या कोणत्याही कोपऱ्यात राहिलेली नाही. या संदर्भात सिंगापूरमधील एक घटना मला आठवली. एका हॉटेलात मी गेलो. तिथे वेटर नसल्याने सेल्फ सर्व्हिस होती. कोपऱ्यातील टेबलावर ट्रे ठेवले होते. त्यातील एक ट्रे उचलून मी प्रशस्त काऊंटरवर गेलो. ट्रेवरच एकूण चोवीस पदार्थांची सुंदर चित्रे काढून त्याखाली पदार्थांच्या किंमतीही लिहिल्या होत्या. जे दोन पदार्थ मला हवे होते त्यावर मी बोट ठेवले. काऊंटरवरील मुलीने स्मित हास्य करून आतून ते दोन पदार्थ आणून माझ्या ट्रेमध्ये ठेवले. मी बाहेरील स्वच्छ टेबलावर बसून ते खाल्ले. टेबलावरच पाण्याचे ग्लास होते. पाणी प्यालो आणि हाती ट्रे घेऊनच कोपऱ्यातील कॅशकाऊंटरवर गेलो. जे पदार्थ खाल्ले त्यावर पुन्हा बोट ठेवले. समोरच्या मशीनवर दोन-चार बोटे दाबून क्षणात कॅशरनी मला एका हाताने बिल दिले आणि दुसऱ्या हाताने माझ्या हातातील ट्रे घेऊन तो बाजूच्या ट्रॉलीत ठेवला. मी पैसे देऊन बाहेर पडलो.

वाचकांच्या लक्षात कदाचित एक गोष्ट आली नसेल, की हॉटेलमधील या संपूर्ण प्रक्रियेत आमच्यापैकी कोणीही एक शब्दही बोलले नाहीत. अशा प्रकारे वेळ आणि परिश्रम याचे मोल जाणूनच सिंगापूर हे राष्ट्र आज मोठे झाले आहे. हीच प्रक्रिया त्यावेळी मुंबईतील रामभरोसे हिंदू हॉटेलमध्ये होती तेव्हा... पोऱ्या, फडकाऽऽमारऽऽमार पुढचा इसमा देड रुपयाऽऽचष्मावाला एक रुपैयाऽऽदो पानी कम चाय

लाव लावऽऽसुकी भाजी खतम.. गरम वडा हैऽऽपोऱ्या इधर पानी लाव आणि इतक्यात दोन कपबश्या फुटल्याचा आवाज ऐकल्याशिवाय चहाचा कप गिऱ्हाईकाला मिळणे शक्य नाही. या देशाचे भले करायचे असेल तर व्यवहारातही कमी बोलले पाहिजे हा विचार या देशात रुजायला आणखी किमान शंभर वर्षे लागतील. पण तोपर्यंत निदान या देशात वायफळ बोलण्यावर बंदी घातली तर बरेच काही साधण्यासारखे आहे. हा रोग खरे पहाता पूर्वापार चालत आहे. माझे एक काका होते. घरात कोणतेही कार्य असले की त्यांची अशी काही तुफान बडबड चालायची की त्यापुढे ताशा–चौघडयाचा आवाजही फिका पडायचा. शिवसेनेच्या शाखेतही दोन तास बसल्यावर तेथे होणाऱ्या संवादाची टेप काढली आणि सर्व शब्दांचे पृथःकरण केले तर हमखास असे आढळेल की खऱ्या कामाचे बोलणे जेमतेम पंधरा ते वीस मिनिटे झालेले असते. येणारा प्रत्येक माणूस हा तक्रार घेऊनच हमखास येतो. पण प्रस्तावनेशिवाय तो तक्रार सांगणार नाही. प्रथम मराठी माणसाविषयी त्याला वाटणारे (आजच) प्रेम सांगेल, नंतर अंतुल्यांविषयी बोलेल. बाबासाहेब भोसल्यांची चौकशी करेल. गिरणी संपावर चर्चा करेल आणि मग त्याचा संडास तुंबल्याचे सांगेल. संडास एकदाच तुंबला असला तरी ते पुन्हा पुन्हा पाच वेळा सांगेल. नंतर एखाद्या लग्नाच्या आमंत्रणाप्रमाणे तो तुंबलेला संडास बघायला चला म्हणून आग्रह धरेल आणि शेवटी 'नक्की हं नक्की हं, नक्की कोणाला तरी पाठवा हं' असं म्हणत शाखेबाहेर जाईल. एक मिनिटाने पुन्हा आत येईल. विसरू नका हं दोनशे चाळीस एफ मुगभाट क्रॉस लेन, गोविंदराव भगवंतराव बारटक्के, तिसरा मजला कोणालाही विचारा. संडास तुंबलाय म्हणावं आणि एकदाची स्वारी निघून जाते.

वायफळ बोलण्याचे व्यसन असणारी ही माणसे कधी कधी भयानक ताप असतो. माझ्याकडे कधीकधी एक गृहस्थ येतात. हुशार आहेत. स्वभावाचेही चांगले आहेत. पण रामायणावर त्यांचा विश्वास नाही. त्यांचे म्हणणे रामायण घडलेच नाही. सगळे काही कपोल–

कल्पित आहे. मी त्यांच्या या विचाराशी कधीच मतभेद व्यक्त करत नाही. पण ते मात्र तावातावाने सुमारे अर्धा तास रामायणावर बोलतात. माझे डोके भणभणते. पण त्यांचे रामायणपुराण संपत नाही. सभेचे आणि समारंभाचे आमंत्रण द्यायला येणारे कार्यकर्तेही असेच शब्दांचे वळी असतात. मी जर येणार नाही म्हटले तर व्याकरणाप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारे आमंत्रण चालवतात. कल्याणला सभा असली तरी साहेब, फक्त अर्धा तास लागेल असे ठोकून देतात हेही मी समजू शकतो. पण आमंत्रण मिळताच मी तडकाफडकी 'हो नक्की येणार' म्हटलें तरी तो कार्यकर्ता विश्वास ठेवत नाही. समारंभाचे महत्त्व मला सांगतच रहातो. मी पुन्हा पुन्हा 'नक्की येणार' म्हटले तरी साहेब असं करू नका, नक्की या असं तो म्हणत रहातो. अशावेळी बोलण्याला शेवट नसतो आणि शेवटी दोघांनाही हसू येते.

अशी वायफळ बोलणारी माणसं परमेश्वराने निरनिराळ्या संस्थात नेमकी पेरलली आहेत. गेल्या महिन्यात एका व्याख्यानाला गेलो होतो. त्या व्याख्यानानंतर तातडीने जळगावला जायचे होते म्हणून अवघ्या वीस मिनिटात मी घाईघाईने आपले भाषण आटोपले. संस्थेचे अध्यक्ष शेवटी आभार मानायला उभे राहिले. आभाराचे फक्त एकच वाक्य ते बोलले आणि नंतर दर दोन मिनिटांनी, आजच्या वक्त्यांनी असेही बहुमोल विचार मांडले की, अशी प्रस्तावना करून त्यांनी जवळजवळ सगळे भाषण पुन्हा बोलून दाखवले. या मंडळींची बोलण्याचा कंडू शमवून घेण्याची हक्काची जागा म्हणजे कमिटीची बैठक. अशा अनेक कमिट्यांवर काम करण्याचा दुर्धर प्रसंग माझ्यावर आला आहे. तेथे बोलण्यावर वेळेचे बंधन नसल्याने विषयावर आणि विषयाशिवाय कोणालाही काहीही बोलायला मुभा असते. मी एका शिक्षण संस्थेच्या कमिटी मीटिंगला परवा गेलो होतो. त्या संस्थेच्या एका संडासाची पितळी कडी चोरीला गेली. आता ती कडी बसवण्याचा आयटेम अजेंड्यावर आला. कशासाठी हे मला समजले नाही. बरं आला तो आला, पण त्यावरही चर्चा!! 'कडी काढता कशी आली? पितळेला सध्या फार डिमांड आहे... आपण सगळ्याच

पितळेच्या कडचा बदलूया. काही उपयोग नाहीं. तरीपण चोऱ्या होणारच... आमच्या चाळीत दिवे पण चोरीला जातात. आज लावला की उद्या गेला. सध्या चोऱ्या फार वाढल्यात. नवलकर, तुम्ही अंतुलेंबरोबर राऊंड मारून काही उपयोग नाही. सगळे पक्ष चोर. आम्ही तर उद्या मतदानच करणार ना कडी बसवा, माझे काही म्हणणे नाही. पण हे केव्हा तरी थांबले पाहिजे. शिपायाला दम मारा. शिपाई काय प्रत्येकाबरोबर संडासात जाईल काय? तो मोठा लुच्चा आहे. सगळ्यात कमिशन ठेवतो. सगळीकडे तेच चाललेय. परवा सेल्सटॅक्समध्ये गेलो होतो. पैसे दिल्याशिवाय फाईल हलत नाही... ही सेल्सटॅक्सची पद्धतच चुकीची आहे. येथे मात्र अध्यक्षांची सहनशीलता संपली. ते वैतागून म्हणाले, मी आता कडी मताला टाकतो. कोणा मेंबरला संडासाला लागले तर दरवाजाला कडी नाही !

–आणि प्रसंगाचे गांभीर्य ओळखून कडीचा ठराव एकमताने मंजूर झाला.


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०५८
दा. क्र. २००३२१
शिवाजी
शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024327

# प्रमोद नवलकर

## प्रकाशने

- मुंबई मोहनगरी
- धुमाकूळ
- भटक्या
- थैमान
- झपाटा
- आठवणी
- प्रहार
- संवेदना आणि मनोवेध

## आगामी प्रकाशने

पारू आणि भ्रमणगाथा